म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ...... भू प्रवास
सं. क्र. ८३१०

REFBK-0026554

२७५७८
९७३।९२

# सीनच्या तीरावर

श्री. शिरीष अवधानी

REFBK-0026554
REFBK-0026554

योगेश प्रकाशन
वालचंदनगर

**प्रकाशक व मुद्रक :**
योगेश शिरीष अवधानी
योगेश प्रकाशन
बी १३ ए, मेन कॉलनी
वालचंदनगर, जि. पुणे


© योगेश अवधानी

**प्रथमावृत्ती :** ऑक्टोबर १९९१.

**टाइपसेटिंग :**
प्रमोद प्रिंटर्स
(प्रमोद वि. बापट)
११२०, सदाशिव पेठ
निंबाळकर तालीम चौक, पुणे ३०

**मुद्रणस्थळ :**
स्मिता प्रिंटर्स
(प्रमोद वि. बापट)
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.

**मूल्य :** ४० रु.



महाराष्ट्रीयन माणूस मुळात अनुभवांना फारसा समोरा जात नाही. अनुभवलेच तर ते शब्दबद्ध करीत नाही आणि केलेच तरी ते बहुदा 'स्वान्त सुखाय' म्हणून इतरांपुढे ठेवत नाही. संकोच हा आपला पिंड, तर 'जगाला आवडेल का ?' ही चिंता. ज्ञानेश्वर म्हणतात,

*'राजहंसाचे चालणे । भूतळी झालीया शहाणे ।*
*आणिक काय कोणे । चालवेचि ना ? ॥'*

म्हणूनच वालचंदनगरसारख्या दूरवरच्या ठिकाणी ज्ञानदानाचे काम करीत पॅरीसचं स्वप्नं प्रत्यक्षात उतरवणे, त्या स्वप्नातून अनुभवांचे मोती वेचून ते पानोपानी गुंफणे मला येरागबाळ्याचे काम वाटत नाही. सरस्वतीच्या मंदिरातल्या या पुजाऱ्याला लक्ष्मी कुठली प्रसन्न असायला ? तरीही 'झपाटलेपणा'मुळे लेखक श्री. शिरीष अवधानी आज आपल्यालाही 'सीन तीरावर' घेऊन गेले आहेत.

'सीनच्या तीरावरून' वाचलं आणि थेट पॅरीसच्या आयफेल टॉवरवर उभे असल्याचा भास झाला. पॅरीसचं दर्शन 'धुंदफुंद' असतं, असं काहीसं मनात होतं. पण हे पुस्तक वाचताना 'धुंदी'ची पातळी वास्तव व नैतिक अधिष्ठान राखून असल्याचा प्रत्यय आला. बहुदा स्थळांची वर्णनं, त्यांचा इतिहास यांची जंत्री म्हणजे प्रवासवर्णन, प्रवासाला जाताना करावी लागलेली यातायात म्हणजे अनुभवदर्शन, असे ठोकताळे असतात. अवधानींनी त्यापलीकडे आपल्याला सहज पण

प्रयत्नपूर्वक, विचारपूर्वक नेले आहे. शांज एलीझेच्या भव्य राजमार्गावर, तर कधी सीनच्या तीरावर तर कधी मेट्रोमध्ये तर कधी फ्रेंच माणसाबरोबर मनसोक्त भटकल्याचा आनंद मिळतो. पॅरीसचं सौंदर्य दाखवताना कुरूपतेचंही दर्शन घडवलं आहे. पण अशा खुबीनं की, त्या कुरूपतेतही सौंदर्य दिसावं. पॅरीसमध्ये भिकारी न्याहाळणारा हा एकमेव पर्यटक असावा... संस्कृतीचा धागा शोधणाऱ्या शोधक वृत्तीनं पॅरीसमध्ये कलंदराप्रमाणे भटकून त्यातून काही शिकण्याचा आणि आपल्याला शिकवण्याचा प्रयत्न कौतुकास्पदच आहे.

फ्रेंच जीवन समृद्ध आहे. कल्पनातीत आहे. पण ती त्यांची सहज अशी जीवनपद्धती आहे. आपल्या जीवनपद्धतीशीच परिचित असलेल्या लेखकाच्या मनावर झालेल्या परिणामांचे चित्रही वाचताना नजरेस येते. लेखक काहीसा झुकतं माप फ्रेंच जीवनमानाला देताना दिसतो, पण अवास्तवता नसल्याने 'आपणही असं असावं' हे विशफूल थिंकिंगच त्यामागे कारण म्हणून असावे असे वाटते.

भाषा आणि शब्दयोजना ही अर्थांची, भावनांची माध्यमं असतात. लेखकाची भाषा शुद्ध, अतिशय समृद्ध आणि सशक्त वाटते. म्हणूनच अर्थ आणि भाव दर्शन सुलभ झाले आहे.... छायाचित्रांचा आणि रेखाचित्रांचा वापर कौशल्याने करून रचना चित्ताकर्षक केली आहे. ज्ञानदान, समाजकार्य, संस्थांची धुरा सांभाळत व्यक्तिगत जीवनापलीकडे जाऊन सातासमुद्रापारची स्वप्ने आपल्यालाही दाखवताना पुस्तक प्रकाशनाची अवधाने सांभाळणाऱ्या श्री. शिरीष अवधानी यांना माझ्या शुभेच्छा !

'सीनच्या तीरावरून' 'नायगराच्या धबधब्याखाली' ते कधी नेतात, याची आता वाट पाहायची ! !

**– डॉ. अरुण हतवळणे**

# पॅरीसला जाण्यापूर्वी

फ्रान्स ह्या अत्यंत सुंदर देशाची लावण्यवती राजधानी पॅरीस, असे उल्लेखणे देखील पॅरीसवर अन्यायकारक होईल, याचे कारण पॅरीसनगरी केवळ लावण्यवतीच नाही, तर ती पर्यटकांच्या हृदयांच्या तारांना नाजूकपणे छेडून एक असामान्य सरगम निर्माण करणारी कलावंतीण आहे. कलावंतांचे, चित्रकारांचे, शिल्पकारांचे भाग्य इथेच हसते. मनस्वी माणसाला हवे ते गवसेल या जादूमय पॅरीस नगरीतच. संस्कृती, साहित्य, संगीत, कला या सर्वांचे परमोच्च बिंदू पॅरीसच्या साक्षीनेच अजरामर झालेत. अशा पॅरीसचे दर्शन घेण्याची अनिवार इच्छा सर्वच युरोपीय नागरिकांना पूर्वीपासून आहे. सतराव्या शतकाच्या काळी राजेरजवाडे, धनिक आपल्या मुलांच्या शिक्षणाचा एक भाग म्हणून मोठी सहल त्या मुलांसाठी युरोपभर आयोजित करीत. त्या सहलीचा आरंभबिंदू हा पॅरीसच असायचा. व्हिएन्ना, ॲमस्टरडॅम, झुरीक, व्हेनीस, लंडन यांसारख्या मातब्बर शहराच्याही अगोदर पॅरीसला अग्रहक्क होता. तो काय उगीच नाही. आजही सर्व टुरिस्ट कंपन्यांच्या कार्यक्रमात पॅरीसभेट हा कार्यक्रम ठळकपणे छापला जातो.

पॅरीसचे आकर्षण त्याच्या अवाढव्य इमारती, भव्य राजमार्ग यात नसून ते कशात आहे, हे जगविख्यात प्रवासी संघटक ब्रिटनचे थॉमस कुक यांच्या उद्‌गारात सापडते. 'प्रत्येक ब्रिटिश नागरिकाने, मग तो कोणत्याही वर्गाचा असो, त्याने एकदा तरी पॅरीसचे दर्शन आवर्जून घ्यावे. त्याचबरोबर पॅरीसची भव्यता व योग्यता आपल्या ज्ञानचक्षूंनी जाणावी.' पुढे जाऊन थॉमस कुक म्हणतो ते फारच मार्मिक आणि मर्मभेदक आहे. तो म्हणतो, 'अभिरुचीसंपन्नता आणि सौजन्य या बाबतीत ब्रिटिशांनासुद्धा पॅरीसियनांपासून बरेच काही शिकण्यासारखे आहे.' थॉमस कुकचे, एका सनातन ब्रिटिश प्रवाशाचे उद्‌गार पॅरीसची व पॅरीसियनांची उंचीच दर्शवते.

पॅरीसचे बाह्य रूप जितके लोभस आहे त्याहून त्याचे अंतरंग अधिक सुंदर

आहे. पॅरीसचे अंतरंग म्हणजेच पॅरिसीयन. ह्या पॅरीसियनांविषयी आणखी एका ब्रिटिश तत्त्ववेत्त्याचे विचार फारच मननीय आहेत. तो लिहितो, 'प्रत्येक युरोपीय पर्यटकाचे एक स्वप्न असते. पॅरीसला जावे, कॅलिडिओस्कोपमधल्या दृश्याप्रमाणे आयफेल टॉवरचे रमणीय दृश्य डोळ्यांत साठवावे, फ्रेंच रेस्तराँमध्ये चविष्ट फ्रेंच पदार्थांचा रसास्वाद घ्यावा. शांज एलिझेच्या राजरस्त्यावर मनसोक्त भटकावे आणि व्हर्सायचा जगप्रसिद्ध राजप्रासाद पाहावा.' आणि खरोखरच पॅरीसमध्ये प्रत्येक पर्यटकाच्या डोळ्यांत हेच भाव असल्याचे जाणवते. मग यजमान पॅरीसियनांचे गुण काय वर्णावेत. लॉरेन्स डरेल पॅरीसीयनांचे वर्णन करताना लिहितो, 'प्रत्येक पॅरीसीयन हा राष्ट्रीय वैशिष्ट्यासह परिपूर्ण तर असतोच, परंतु त्याची अविरत आध्यात्मिक अंतरंगाची जाण, राहणी पद्धतीतील हळुवारपणा आणि कमालीची व्यक्तिनिष्ठता जाणून घेणे अगदी सोपे आहे. त्यासाठी कुठल्याही कॅफेच्या फूटपाथवरील खुर्चीवर शांतपणे मद्याचे घोट घेत निरीक्षण केले की, पॅरीसीयन बराचसा गवसतो. त्याच्या अंतरंगाचे एक एक पदर आपण जाणू शकतो.'

खरोखरच, पर्स्पेक्टिव्ह असिएनच्या, उत्साहाने फसफसणाऱ्या चिरतरुण कार्यकर्त्यांनी पॅरीसचे बाह्य रूप जितके दाखविले त्याहून शतपटीने अधिक पॅरीसियनांचे अंतरंग खुले केले. सर थॉमस कुक आणि लॉरेन्स डरेल यांचे शब्दन्‌शब्द प्रत्ययाला येतात. त्यांनी आयफेल टॉवरच्या अजस्र राक्षसी सांगाड्यातही हळुवारपणाचा स्पर्श मनाला बिलगविला, नोत्रदाम परिसरात जुन्या फ्रेंच जाणिवांचा प्रत्यय दिला. सीनच्या तीरावर पॅरीसियनांच्या स्पंदनाचा आवाज ऐकविला, शांज एलिझेच्या फेरफटक्यात अद्‌भुततेचा आनंद लुटविला. अनुभवविश्वात एकाहून एक अजब चीजांची गर्दी करून सोडली. ह्या अनुभवांना शब्दरूप केलंय 'सीनच्या तीरावर' या शब्दसमूहात. ज्यांनी पॅरीस व पॅरीसपण अनुभवलंय त्यांना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळाला, तर ज्यांची पॅरीस ही एक स्वप्नसृष्टी आहे, त्यांच्या स्वप्नात अर्थपूर्ण रंग भरले जावेत ही अंतरीची प्रामाणिक तळमळ आहे.

ह्या पॅरीस सफरीस फ्रान्स मित्रमंडळ पुणे, पर्स्पेक्टिव्ह असिएन पॅरीस यांचे योगदान जन्मांतरी न फिटणाऱ्या ऋणाइतके आहे. पॅरीसमधील माझे यजमान श्री. पिअर व मादाम दानिएल यांनी पॅरीसमधील माझा प्रत्येक क्षण अद्‌भुत अनुभवांनी चिंब भिजविला आहे. त्यांचे- माझे या जन्मीचे नाते कोणत्याही प्रस्थापित नात्याहून

श्रेष्ठ आहे. माझे हे पहिले पुस्तक मराठी शारदेच्या चरणी अर्पण करताना डॉ. अरुण हतवळणे यांचे उपकार तीव्रतेने स्मरतात. माझ्या विद्यालयाचे प्राचार्य श्रीकृष्ण कोरडे, स्कूल कमिटीचे श्री. विलास महाजन तसेच अनेक सुहृद यांची मदतच या पुस्तकाच्या निर्मितीस कारणीभूत आहे. स्मिता प्रिंटर्स यांनी अल्पावधीत याची छपाई करून दिली, त्याबद्दल स्मिता प्रिंटर्सचे श्री. बापट यांचे आभार व्यक्त करणे उचित ठरेल. माधुरी पुरंदरे यांनी त्यांची रेखाचित्रे वापरण्यास संमती दिली याबद्दल विशेष आभार.

या सर्वांचेच आभार मानताना 'मर्सी बुकू' हा फ्रेंच शब्दच लेखणीतून उतरतो आहे.

श्री. शिरीष अवधानी

ऑक्टोबर १९९१

# फ्रान्स मित्रमंडळाबद्दल थोडेसे. . .

इ. स. १९६० च्या सुमारास फादर दलरी पुण्यात वास्तव्य करीत असताना त्यांचा ह.भ.प. गुरुवर्य सोनोपंत दांडेकरांशी अध्यात्मातून घनिष्ठ संबंध आला. फादर दलरी फ्रेंच असूनही ज्ञानेश्वरांच्या पालखीसमवेत पंढरपुरास जाऊन आले. यातून त्यांनी 'कल्ट ऑफ विठोबा' हा प्रबंध अभ्यासपूर्वक परिश्रम करून लिहिला. हा देश, इथली माणसं, त्यांचं आध्यात्मिक संचित या सर्वांचा त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. भारतातील कार्यभाग संपल्यावर त्यांनी फ्रान्समध्ये गेल्यावर वृत्तपत्र, रेडिओ, दूरदर्शन, व्याख्याने या सर्व माध्यमांतून भारताच्या संपन्न आध्यात्मिक चळवळींची फ्रेंचांना ओळख करून दिली. त्यांचे भारतीय अध्यात्मवाद यावर नितांत प्रेम होते. त्यामुळे त्यांच्या वाणीने फ्रेंच मंत्रमुग्ध झाले.

तथापि फ्रेंचांना भारताविषयी विपरीत पूर्वज्ञान असल्याने त्यांचे सर्वच विचार फ्रेंच मंडळींना पूर्णपणे रुचले नाहीत. भारत देश हा अर्धनग्न, भुकेल्या लोकांचा देश आहे, जातीपातींमुळे सारा देश खिळखिळा झाला आहे. अशा व इतर अनेक कल्पना फ्रेंचांच्या मनात घर करून बसल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर फादर दलरीने दिग्दर्शित केलेले आध्यात्मिक दृष्ट्या संपन्न भारताचे चित्र त्यांना अचंबित करू लागले. त्यांचा दलरींच्या म्हणण्यावर पूर्ण विश्वास बसेना. त्याच क्षणी एका मोठ्या चळवळीचा जन्म झाला.

फादर दलरींनी तमाम फ्रेंचांना आवाहन केले की, त्यांनी भारतात प्रत्यक्ष जाऊन, कुटुंबात राहून भारतीय जीवनप्रणालीची ओळख करून घ्यावी. संपन्नतेला सद्अभिरुचीची, सद्अभिरुचीला पर्यटनाची, पर्यटनाला उत्सुकतेची जोड मिळाल्याने १५० फ्रेंच मंडळी सर्वप्रथम पुण्यात फादर दलरींनी आणली. विविध कुटुंबांत राहून या चौकस मंडळींनी भारतीय जीवनाचे सूक्ष्म अवलोकन तर केलेच, परंतु ते करता करता त्यांना जाणवले की भारतीयांच्या मनात फ्रान्स व फ्रेंचांविषयी

काही (गैर)समजुती आहेत. त्याच क्षणी चळवळीला दुसरी बाजू आली. त्यांनी भारतीय मंडळींना फ्रान्समध्ये कुटुंबात वास्तव्य करून फ्रान्सची खरी ओळख करून घेण्याचे आवाहन केले. त्याप्रमाणे सन १९६५ मध्ये भारतीय (अर्थात पुणेरी) मंडळी फ्रान्समध्ये विविध कुटुंबांत राहून आली.

एखाद्या मंदिराच्या शिखरदर्शनापेक्षा गर्भमंदिरातील देवाचे दर्शन जसे अधिक परिणामकारक, तसे कुटुंबवास्तव्यात राष्ट्राचे दर्शन हृदयस्पर्शीच होते. नेमक्या ह्याचा अनुभव भारतीय, तसेच फ्रेंच मंडळींना गेली २५ वर्षे देण्याचा उपक्रम फ्रान्स मित्रमंडळ व पॅरीसमधील पर्स्पेक्टिव्ह असिएन ह्या संस्था संयुक्तपणे करीत आहेत. ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे 'हृदयी हृदय घातले' हेच ह्या देवाणघेवाण कार्यक्रमातून साध्य झाले. आजपर्यंत १५००० फ्रेंच स्त्रीपुरुष व १५०० भारतीय स्त्री-पुरुष या जन्माअखेर, एकमेकांशी स्नेहबद्ध झाले आहेत. दोन देशांतील सामंजस्य दृढ होण्यात या कार्यक्रमांचा वाटा निश्चितच कौतुकास्पद आहे.

दरवर्षी पॅरीसस्थित पर्स्पेक्टिव्ह असिएन ही संस्था तीस भारतीयांच्या गटास फ्रान्सभेटीचे आमंत्रण अगत्यपूर्वक देते. एप्रिल-मे मध्ये भारतीयांचा गट फ्रान्सभेटीस जातो, कारण त्या वेळी फ्रान्समधील हवामान सुखद व उत्साहवर्धक असते. त्याचप्रमाणे सप्टेंबर महिन्यात येथील हवामान फ्रेंचांना सुसह्य असल्याने फ्रेंच गट या काळात भारतात येतो. ऋतुचक्राप्रमाणे हे भेटीचे चक्र अव्याहतपणे विनाखंड गेली पंचवीस वर्षे चालू आहे.

सध्या सौ. निर्मलाताई पुरंदरे ह्या संस्थेचा कार्यभार सांभाळून अनेक उत्साही व समर्पित वृत्तीच्या सहकाऱ्यांच्या साह्याने फ्रान्स मित्र मंडळास आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वश्रुत केले आहे. फ्रान्स मित्रमंडळाच्या सदस्यांच्या परस्परविश्वासपूर्वक स्नेहामुळे एक वेगळेच वातावरण मंडळाच्या विविध कार्यक्रमांत आढळून येते. स्वयंअनुशासन, सतत कार्यरतता आणि सेवाभाव यांचा सुंदर समन्वय झाला आहे.

सर्वप्रथम पॅरीसमध्ये पुणे मित्रमंडळ स्थापन झाले. पुण्यास राहून गेलेल्यांनी हे मंडळ निर्माण केले. हळूहळू ही फ्रेंच मंडळी मुंबई, बडोदा, भावनगर, बंगलोर या ठिकाणीही भेटी देऊ लागली. त्या प्रमाणात त्यांचा व्याप वाढला. पुणे मित्र मंडळास भारत मित्रमंडळ नाव देऊन व्यापक स्वरूप धारण केले. आता तर आणखी विस्तृत उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून पर्स्पेक्टिव असिएन हे नाव धारण केले आहे. फ्रान्समधील

पॅरीसव्यतिरिक्त मेतूझ, मार्सेय, कॉ, नॅन्सी, नान्ते, वायोन, पॉतिए इत्यादी शहरांत संस्थेचे कार्यकर्ते विलक्षण तळमळीने भारतीयांचे वास्तव्य चिरस्मरणीय करतात. फ्रान्सच्या संस्कृतीचे, औद्योगिक संपन्नतेचे, शेती व शिक्षणाचे आडवे-उभे विणलेले धागे हळुवारपणे भारतीयांना उकलून दाखवितात. फ्रेंच कुटुंबात वास्तव्य असल्याने त्यास स्नेहाचे वेगळेच परिमाण मिळते.

फ्रान्स मित्रमंडळ व पर्स्पेक्टिव्ह असिएन यांची स्पंदने एक आहेत. कारण ध्येयही एकच आहे. भारतीयांच्या मनात फ्रेंचांसाठी, फ्रेंचांच्या मनात भारतीयांसाठी एक अढळपद निर्माण करण्याची ध्येयासक्ती आहे. कोलंबसच्या गर्वगीताप्रमाणे 'अनंत अमुची ध्येयासक्ती. . .' ह्या प्रेरक ओळी दोन्ही संस्थांच्या कार्यकर्त्यांच्या मनावर कोरल्या गेल्या आहेत.

आपल्या इथे संस्था स्थापन करणे अगदी सोपे असल्याने, संस्थांचे अमाप पीक आले आहे. संस्थांचा कणा हा कार्यकर्ता असतो आणि नेमके हेच हेरून दोन्ही संस्थांनी प्रथम कार्यकर्ते निर्माण केले आणि परिस्थितीच्या झंझावातातही ह्या दोन्ही संस्था आयफेल टॉवरच्या दिमाखाने उभ्या आहेत. भारतभेटीनं फ्रेंचांना भारताच्या अंतर्प्रवाहाची ओळख जशी झाली त्याचप्रमाणे भारतीयांना फ्रेंच संस्कृतीचा नाद, गंध, रूप समजू शकले. हे अद्वितीय कार्य ज्या कार्यकर्त्यांच्या अव्याहत कार्यनिष्ठेने होते आहे आणि माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीस फ्रान्सभेटीचे अनुपम अनुभव घेता आले, त्या कार्यकर्त्यांना ही अक्षरयात्रा समर्पण करताना कृतज्ञता भाव उफाळून येतो आहे.

परदेशप्रवास म्हणजे विघ्नांची न संपणारी मालिका, हा अनुभव बहुतांशी लोकांना येतो आणि तो मलाही आलाच. तरी मला तो अनुभव सुखद वाटतो आणि परदेशप्रवासाच्या उत्कटतेएवढाच तोही अनुभव उत्कट आहे.' मुळात आपली कल्पना अशी असते की, सर्व काही सुरळीत व्हावे आणि आपण थेट एअर इंडियात स्थानापन्न व्हावे. खरं जीवन अडचणींवर मात करण्यात आहे. अडचणी दूर करताना खरं तर आपण प्रसंगाप्रसंगाने सुधारत जातो, धडपडे बनतो, धीट बनतो, हरतऱ्हेच्या अधिकाऱ्यांशी सुसंबद्धपणे संवाद करू शकतो, विपरीत स्थितीत मन शांत ठेवून कार्यभाग नेमका साधू शकतो आणि हीच कौशल्ये आपल्याला परदेशात उपयोगी पडतात. म्हणून परदेशप्रयाणापूर्वी आलेले सर्वच कडूगोड अनुभव मला खूपच शिकवून गेले. त्यामुळे त्या अनुभवांना कटुतेची झालर न लावता, आपल्याच

अज्ञानामुळे, मुखदुर्बळपणामुळे ओढवून घेतलेल्या संकटांमुळे आलेले शहाणपण म्हणून स्वीकारतो.

फ्रान्सला जाण्यासाठी निवड तर झाली, परंतु पासपोर्ट तर नव्हते. ते काम मार्गी लावण्यात मा. आमदार अण्णा जोशींसह अनेकांचे सहकार्य तर लाभलेच, परंतु त्या सर्वांशी घनिष्ठ संबंध येऊन मित्रपरिवारात मोठी भर पडली. पुढे प्रश्न होता फ्रेंच भाषेचा. वालचंदनगरसारख्या खेडेगावात जिथे इंग्रजी भाषा संदर्भग्रंथाची अडचण तिथे फ्रेंच भाषेसंबंधी काय मदत मिळणार. निराश न होता पुण्यातून 'फ्रेंच इन थ्री मंथस' हे पुस्तक विकत घेतले, तसेच कॉन्व्हेंट शाळेतले फ्रेंच विषयाचे पहिलीचे पुस्तक व त्याचे नवनीतचे मार्गदर्शक रस्त्याच्या कडेला बसणाऱ्या पुस्तक विक्रेत्याकडून मिळविले. घरी फ्रान्स मित्र मंडळाने दिलेले फ्रेंच-मराठी छोटीशी पुस्तिका होतीच. ह्या सर्वांच्या साह्याने दररोज काही शब्द घोकून पाठ करायला सुरुवात केली. शेवटी संवादाशिवाय फ्रेंचच काय कुठलीच भाषा येणार नाही म्हणून स्वतः मुलाला योगेशला व मुलीला योगितालाही माझ्या बरोबर फ्रेंच शब्द शिकवायला सुरुवात केली. हे काय आहे ? हे घड्याळ आहे. हे काय आहे ? हे पुस्तक आहे ! अशी छोटी छोटी वाक्ये आम्ही तिघे घरी रात्री झोपण्यापूर्वी म्हणत असू. त्यामुळे माझे फ्रेंच मार्गी लागले.

सर्वांत महत्त्वाचा अवघड प्रश्न होता आर्थिक ! वर्षभर ज्यादा काम करून दहा हजार रुपये गोळा केले आणि उरलेले दहा हजार रुपये वालचंदनगर इंडस्ट्रीजचे मॅनेजिंग डायरेक्टर सेठ चकोर यांनी दीर्घमुदतीच्या कर्जरूपाने दिले. त्या कामी श्री. महाजन व्ही. एस. यांनी खूप मदत केली. त्यामुळे ट्रॅव्हल कॉर्नरला २३ हजाराचा ड्राफ्ट पाठविता आला. ट्रॅव्हल कॉर्नरच्या श्री. संजीव कारखानीसांनी व्हिसा, डॉलर्स इ. गोष्टी इतक्या सहजपणे केल्या की, प्रवासाच्या तयारीच्या वर्णनात व्हिसा डॉलर्सचे विनोदी किवा क्लेशकारक किस्सेच लिहिता येत नाहीत याचे वैषम्य वाटते.

सर्वांत महत्त्वाची म्हणजे पैसा, पासपोर्ट, व्हिसा, डॉलर्स पेक्षाही महत्त्वाची बाब म्हणजे फ्रान्सला जाण्याची मानसिक तयारी जी फ्रान्स मित्रमंडळाने कसोशीने करून घेतली. त्याचा सविस्तर वृत्तांत उद्‌बोधक ठरेल. निर्मलाताईंचे प्रेरक व्यक्तिमत्त्व व कार्य दरवेळी मंडळाच्या कार्यालयात गेल्यावर लक्षात तर यायचेच, परंतु मनावर खोलवर परिणाम करून जाई. श्रीकांत श्रोत्री, सौ. वीणाताई सप्रे, श्री. तांबोळी या

सर्व मंडळींनी फ्रान्सविषयी, आहाराविषयी, वाहतुकीविषयी, रीतीभातींविषयी सखोल माहिती देऊन आमची मानसिक तयारी उत्तम तऱ्हेने करवून घेतली. या तयारीचे प्रत्यंतर फ्रान्समध्ये सर्वांनाच प्रसंगोप्रसंगी आले. फ्रान्समध्ये, विशेषतः पॅरीसमध्ये, पायी खूप हिंडावे लागेल, हे मनावर वारंवार ठसविल्यामुळे वालचंदनगरला महिनाभर दररोज सकाळ-संध्याकाळ १२-१५ किलोमीटर चालण्याचा सराव ठेवला. त्याचा पॅरीसमध्ये अतोनात उपयोग झाला. पॅरीसचे गल्ली, बोळ, महामार्ग सारेच पायी हिंडून पाहता आले. कपडे व इतर वस्तू साऱ्या डबल घेतल्या. उदा. टूथब्रश. सहजासहजी जरी हरवला तर तेथे अमूल्य परकी चलन खर्ची पडले असते. अशा वस्तूंची यादी करून त्या सर्व गोळा करून ठेवल्या. तशी फारशी तसदी घ्यावी लागली नाही, ह्याचे कारण परदेशी जाणे म्हणजे काहीतरी असाधारण आहे, अवघड गोष्ट आहे, ही भावना फ्रान्स मित्रमंडळाने केव्हाच दूर केली होती.

जसजसा प्रयाणाचा दिवस जवळ आला तसा तयारीला वेग आला. हा तयारीचा व मनाचा संथपणा तेव्हा संपला जेव्हा ७४७ जंबो जेटच्या अंतर्भागात आयुष्यात प्रथम प्रवेश केला. विविध देशांतल्या नाना जातींच्या, वर्णांच्या परंतु रुबाबदार व्यक्तींचे दर्शन विमानात झाले तेव्हापासून विचारचक्र जलद चालू झाले. मला खिडकीजवळची जागा मिळाली होती. संपूर्ण प्रवास दिवसाउजेडी होता. त्यामुळे विमानातून का होईना परंतु पश्चिम आशिया व युरोपखंडाचा बराचसा भाग पाहायला मिळणार, ह्या एकाच विचाराने माझे मन रुईच्या म्हातारीसारखे तरंगू लागले. प्रत्यक्ष विमान उड्डाणाच्या वेळी कुठलीच एक्सायटेशन वाटली नाही. परंतु ह्या प्रवासापूर्वी डॉ. भावेंनी महाकवी कालीदासाच्या 'मेघदूता'चा विमानातून अभ्यास केलेला दूरदर्शनवरून पाहिला होता. आपला भारत देश कसा दिसतो, हे पाहण्याची दृष्टी डॉ. भावेंच्या कार्यक्रमातून लाभली होती. ज्या देशाच्या पृष्ठभागावरून आपण अनेकदा प्रवास केला तोच भूभाग ४०००० फूट उंचीवरून पाहताना विलक्षण मानसिक समाधान लाभले, परंतु जी जंगले आपण घनदाट समजतो ती उंचीवरून पाहताना विरळ भासली. जंगलतोडीमुळे आपण आपली सुजलाम, सुफलाम भूमी वाळवंटाकडे नेतोय, हे पर्यावरणतज्ज्ञ घसा फोडून सांगत आहेत. विरळ वृक्षसंपत्ती पाहून भविष्यात काय होईल याची अनामिक भीती त्या आगळ्या आनंदात असताना मनाला चाटून गेली. (पुढे युरोपमधली, विशेषतः

फ्रान्समधली, वृक्षसंपदा पाहून तुलनेमुळे अधिक दुःख झाले.)

दिल्ली विमानतळावर विमान संपूर्ण भरले. आणि इंदिरागांधी आंतरराष्ट्रीय तळावरून विमान पॅरीसच्या दिशेने झेपावले. ह्या क्षणी मनात आनंददायक विचार वेगाने उसळू लागले. विमानात खाणे-पिणे अव्याहतपणे चालू होते. एअरहोस्टेस व तिचा नवरा दोघेही नाशिकचे होते व त्यांचा परिचय झाल्यावर त्यांनी आमच्याकडे वैयक्तिक लक्ष देऊन हवाई प्रवासात सुखद धक्का दिला. मध्यपूर्वेतील वाळवंटावरील रखरखीत प्रवास संपल्यावर तुर्कस्थानपासून युरोपला सुरुवात झाली त्या क्षणापासून भूभागाचे सौंदर्य अधिकाधिक जाणवत गेलं. माझ्या सीटमागे एक फ्रेंच जोडपे बसले होते. साध्या नजरानजरेतून हळूहळू स्नेहबंध निर्माण झाले आणि त्या इन्स्टंट स्नेहातून एक उल्लेखनीय गोष्ट घडली– खिडकीतून पाहताना खालील भूभाग कोणता असावा, याचे चुकीचे अंदाज जेव्हा मी माझ्या मित्रास– श्री. गोविंद क्षीरसागर याला- वर्तवू लागलो त्या क्षणी ती फ्रेंच भगिनी सीट बदलून माझ्या जवळ येऊन बसली आणि थेट पॅरीस येईपर्यंत तिची रनिंग कॉमेंटरी चालू होती. त्यामुळे माझा सगळा हवाई प्रवास अत्यंत उद्‌बोधक झाला. विशेषतः आल्प्स पर्वतावरून विमान जात होते तेव्हा बर्फाच्या पांढऱ्या शुभ्र राशींशिवाय काहीच दिसत नव्हते. त्या बर्फाच्या अथांग महासागरातून जाताना अत्यंत सुखद लहरी मनात निर्माण झाल्या. निसर्गाचे इतके भव्य व धवल दर्शन यापूर्वी कधीच झाले नव्हते. स्वित्झर्लंडवरून विमान उडताना तर स्वर्गीय सुखाचा अनुभव आला. खरोखरच पंडित जवाहरलाल नेहरूंचे युरोपवर, विशेषतः स्वित्झर्लंडवर, का एवढे प्रेम होते हे तेव्हा उमगले. कुठल्याही कविमनाच्या व्यक्तीला भारावून सोडेल, असेच ते दृश्य होते. इटालीचाही काही भूभाग दिसला. निसर्गसौंदर्यानं नटलेल्या स्वित्झर्लंड, इटाली ह्या देशांचा क्षणभर हेवा वाटला. इटाली, स्वित्झर्लंड फ्रान्सच्या भूमीशी सलग असल्याने अजून इटालीवरूनच विमान चालले आहे ह्या भ्रमात असतानाच त्या फ्रेंच भगिनीने सांगितले की, 'नाऊ वुई आर फ्लाईंग ओव्हर फ्रान्स.' फ्रान्सचे ते अवर्णनीय भूवैभव पाहून हा सुंदर देश आता काही मिनिटांत जमिनीवरून पाहायला मिळणार, या विचाराने मनाला कमालीची उत्सुकता आली. फ्रान्सबद्दल विचार करीत असतानाच अनाउन्समेंटचे मंजूळ स्वर उमटले– 'नाऊ वुई आर लँडिंग ऑन शार्ल द गॉल इंटरनॅशनल एअर पोर्ट.' मी माझ्या आयुष्यात ऐकलेली ही पहिली अलौकिक (आकाश) वाणी होती.

त्या शब्दांचा नाद अजूनही कानात किणकिणतो आहे.

पॅरीसच्या भव्य, स्वच्छ विमानतळावर सारे सोपस्कार विद्युत्गतीने व विनासायास पार पडले. काचेच्या दाराबाहेर ४०-५० जणांचा समूह आमचे हात हलवून हर्षातिशयाने स्वागत करीत होता. त्याच फ्रेंचांनी माझे पॅरीसमधील वास्तव्य एखाद्या स्वप्नदृश्याप्रमाणे केले आणि त्या सुंदर पॅरीसच्या व फ्रान्सच्या इतर भागांतील २५ दिवसांच्या भटकंतीत अनुभवांची जी साठवण झाली त्या पुढील आयुष्यातील मधुर आठवणी म्हणून कायम राहिल्या.

o

# पॅरीस व पॅरीसियन,. . .

औद्योगिक व आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने फ्रान्सला आंतरराष्ट्रीय दृष्ट्या पाचवे स्थान आहे. अत्यंत प्रगत देशांच्या मालिकेतही फ्रान्सला मानाचे स्थान आहे. जगातील एक सुंदर देश, अशी ख्याती असल्याने पर्यटकांचे फ्रान्स हे महान आकर्षण आहे. तंत्रज्ञान, स्थापत्यशास्त्र, कला, फॅशन्स, विमान उद्योग, संस्कृती या साऱ्याच क्षेत्रांत फ्रान्सने फार मोठी आघाडी मारली आहे. लष्करी दृष्ट्याही फ्रान्स बलाढ्य राष्ट्रांच्या पंक्तीत आहेच. एकंदर फ्रान्स देश निसर्गाच्या अमाप उधळणामुळे एक सुंदर भूखंड म्हणून युरोपच्या माथ्यावर दिमाखाने मिरवत आहे. अशा फ्रान्सची राजधानी पॅरीसबद्दल जगभर विलक्षण आकर्षण आहे. 'पॅरीस' या शब्दातच जादू भरली आहे. एखाद्या स्वप्ननगरीप्रमाणे या शहराचा शृंगार, नखरा व तोरा आहे. जगातल्या सर्व अद्ययावत फॅशन्सचे माहेरघर म्हणून पॅरीसला रसिकांची मान्यता फार पूर्वीपासूनच आहे. थुई थुई नाचणाऱ्या व अनेक रंगांत चमकणाऱ्या कारंज्याच्या तुषारांचे सौंदर्य शब्दांकित करणे जितके अवघड, तितकेच पॅरीसचे सौंदर्य शब्दात व नजरेत पकडणे कठीण आहे. कॅलिडिओस्कोपमधील क्षणाक्षणाला बदलणाऱ्या रंगीबेरंगी आकृत्यांप्रमाणे पॅरीसचे सौंदर्य क्षणाक्षणाला तऱ्हेतऱ्हेचे मनमोहक रूप धारण करते. अशी ही यक्षनगरी, जगाच्या कानाकोपऱ्यातील लाखो पर्यटकांना दररोज आकर्षित करते. युरोप पाहणे म्हणजे सर्वप्रथम पॅरीसपासूनच सुरुवात करणे, हा संकेत फार पूर्वीपासून मानला गेला आहे.

रसिकांना पॅरीसदर्शन ही एक अलौकिक अनुभूतीच वाटेल. नाद, ध्वनी, गंध, लय, स्पर्श, रुची या सर्वांचा अखंड उत्सव म्हणजे 'पॅरीस' म्हणावे लागेल. आपल्याजवळील सौंदर्याचा अफाट खजिना पॅरीस शहर रसिकांना मुक्तपणे लुटू देते. ते सौंदर्य लुटता लुटता माणूस थकून जाईल, तरी पॅरीस हे नवनीतच राहील. पॅरीसचे बाह्य सौंदर्य जितके विलोभनीय आहे तितकेच तिचे अंतरंग सौंदर्यासक्त

मनास तृप्तता देणारे आहे. बागा, उपवने, बुलेवार्ड, राजवाडे, भव्य प्रासाद, नक्षीदार परंतु भव्य पूल, सीन नदी, संग्रहालये, मद्यालये, फॅशन केंद्रे, भव्य रस्ते, राष्ट्रीय स्मारके या सर्वांतून सौंदर्य अफलातून सामावले आहे. तिथले तरुण, तरुणी, मुले, मुली इतकेच काय, वृद्ध मंडळींतही सौंदर्याचा साक्षात्कार अनेकदा घडतो.

मात्र हे शोधण्यास दृष्टी हवी व वेळही हवा. पर्स्पेक्टिव्ह असियेन या पॅरीसस्थित संस्थेमार्फत मला पॅरीस १४ दिवस निवांतपणे पाहता आले. दररोज सकाळी ९ ते सायंकाळी १० वाजेपर्यंत, कित्येकदा रात्री २ वाजेपर्यंत पॅरीसमध्ये मनसोक्त भटकंती केल्यावर मला पॅरीसच्या सौंदर्याचा जो साक्षात्कार झाला, त्यामुळे मला पॅरीस स्वप्ननगरीच वाटते.

पॅरीसला प्रत्यक्ष जाण्यापूर्वी पॅरीसविषयी विविध लेखकांच्या अनुभवातले खूप वाचले होते. विशेषतः पु. ल. देशपांडे, रमेश मंत्री यांच्या शब्दातले पॅरीस मनाला भुरळ पाडणारेच होते. त्यामुळे आयुष्यात एकदा तरी पॅरीसला भेट द्यावी, शांज एलिझेच्या भव्य मार्गावरून, तुलरिझच्या बागेतून फेरफटका मारावा, पॅरीसचे स्पंदन जिथे जाणवते त्या सीन नदीच्या काठाने मंद पावलांनी फिरावे, आयफेलवरून पॅरीसदर्शन एका नजरेत घ्यावे, अशी स्वप्ने होती. पॅरीससंबंधी मन मोहरून टाकणाऱ्या गोड कल्पना मनात होत्याच. प्रत्यक्ष जेव्हा पॅरीसच्या भूमीवर पाय ठेवला, त्या क्षणी शरीराच्या पंचेंद्रियांनी जो अभूतपूर्व अनुभव घेतला तो अवर्णनीय होता.

जिथे नजर जावी तिथे सर्वत्र सौंदर्याचाच निखळ आनंद अनुभवला. सर्व वातावरणात काहीसा मंद परंतु मनास धुंद करणारा गंध, शरीरास सुखावणारा गारवा, डोळ्यांना नेत्रसुख देणारी हिरवीगार वृक्षराजी व लॉन, शिस्तबद्ध परंतु वेगवान वाहतूक, चकाकणाऱ्या रंगीबेरंगी कारगाड्यांचे थवे, अल्लडपणे चालणारे तरुण-तरुणी, हे सारे मनावर मोरपीस फिरवीत होते. या सर्वांतून प्रकटणारे हसरे, खळाळणारे; प्रसंगी झींग आणणारे पॅरीसचे रूप माझ्या मनात कायमचे कोरले गेले. 'प्रथम तुज पाहता. . .' हीच अवस्था झाली होती. ह्या प्रथम दर्शनाची आठवण हृदयाच्या नाजूक तारा अधूनमधून छेडीत असते आणि मग पॅरीस मला परत परत पाहावेसे वाटते.

पॅरीस शहराचे खरे दर्शन घडले उत्साही फ्रेंच मित्रमंडळींच्या सौंदर्यदृष्टीतून. मला पॅरीस दाखविले म्हणण्यापेक्षा अनुभवायला दिले ते मादाम दानिएल व मिस्टर

पिअर या शिक्षक दांपत्याने. ते दोघे व मी पॅरीसच्या गल्लीबोळांतून सुद्धा भटकलो. त्यातल्या त्यात मादाम दानिएल ह्यांना इंग्रजी बऱ्यापैकी येत असल्याने पॅरीसच्या पूर्ण वास्तव्यात कसलीच अडचण आली नाही. मादाम दानिएल ह्या शिक्षिका असल्याने पॅरीसची तपशीलवार माहिती तत्परतेने देत. मात्र मिस्टर पिअरना इंग्रजी येत नसल्याने अधून मधून मंदस्मित करणे, रस्ता ओलांडताना, मेट्रोमध्ये, बसमध्ये चढताना मदत करणे अशी निःशब्द कामगिरी तो आनंदाने करी.

दिनांक ११ मे रोजी बायोनहून रेल्वेने आम्ही १० भारतीय पॅरीसच्या ऑस्टरलिझ स्थानकावर उतरलो. उतरताक्षणीच १०-१२ फ्रेंच जोडपी प्लॅटफॉर्मवर आमचे स्वागत करायला उत्सुकतेने उभी होती. गाडीतून उतरताच बोंझूर मस्य ! बोंजूर मादामच्या गोड व मुलायम फैरी झडल्या. मी ज्या कुटुंबात वास्तव्य करणार होतो ते पिअर कुटुंब दिसेना. तेवढ्यात १२ वर्षांच्या हसऱ्या व गुबगुबीत मुलाने माझा हात हातात घेतला आणि इंग्रजीतून 'गुड इव्हनिंग शिरीष !' असे म्हटले. तत्क्षणी लक्षात आले, हा पठ्ठा माझ्या यजमानांचा मुलगा असावा. आणि पॅरीसच्या प्लॅटफॉर्मवर प्रथमदर्शनी नावासह स्वागत करणाऱ्या सार्जचे हात हातात घेऊन त्याच्याशी प्रदीर्घ हस्तांदोलन केले. सार्जच्या व त्याच्या आईच्या– मादाम दानिएलच्या– चेहऱ्यावर समाधानाची लकेर चमकून गेली. मादाम दानिएलने अभिवादन करून बरोबर चलण्याची विनंती केली. स्टेशनबाहेर कार होती. पुढील दरवाजा उघडून सार्ज अदबीनं उभा होता. तो छोटा असल्याने त्याला पुढे बसण्यास सांगितले. परंतु त्याने नम्रपणे नाकारले. कारण फ्रेंच रिवाजानुसार पाहुण्याला सन्मानाने पुढील सीटवर बसविले जाते. बघता बघता मादाम दानिएलने कार हमरस्त्यावर आणली. रस्ते वाहनांनी भरून वाहत होते. दानिएल कार १२० KM पर्यंत वेगाने नेत होती. तरी आमच्या कारला ओव्हरटेक करून वेगवान गाड्या चालल्या होत्या. सबवेमधून जाताना आगळेच दृश्य पाहायला मिळाले. चार रस्ते एका बाजूला, चार रस्ते दुसऱ्या बाजूला, असा आठ लेनचा तो हमरस्ता कित्येक किलोमीटर जमिनीखालून नेला होता. सोडियम व्हेपर लॅंपने सबवे उजळून निघाला होता. त्या उजेडात विशेषतः वळणावर एकामागून एक जाणाऱ्या चकाकणाऱ्या कार गाड्यांचे दृश्य विलोभनीय असते. पाऊण तासाच्या ड्रायव्हिंगनंतर 'शांपिनी' या उपनगरातील दानिएलच्या तीनमजली बंगल्यासमोर कार उभी राहिली.

घरात गेल्यावर आवरून मऊ अशा सोफ्यावर बसून रिमोट कंट्रोलने

वेगवेगळे चॅनेल टी.व्हीवर पाहत बसलो होतो. दानिएलने सर्व बंगला कौतुकाने दाखविला. पूर्वीच्या उमरावाच्या इस्टेटीतला एक हिस्सा म्हणजे हा बंगला होता व तो या दांपत्यानं नुकताच विकत घेतला होता. मी त्याचं कौतुक करीत होतो. खरोखरच 'घरकुल असावे अपुले छान' हीच भावना त्याच्यातही फ्रेंच आवृत्तीत दिसली. मी काही न विचारताच दानिएलने मोकळेपणाने सांगून टाकले की, त्यांनी ते घर कर्ज काढून घेतले होते व कर्जाचे हप्ते चालू होते. खरं तर काही विचारण्याअगोदरच भाबडेपणाने दानिएलने सर्व आर्थिक व्यवहार सांगून टाकले. हा फ्रेंच भाबडेपणा भारतीय स्त्रियांच्या भाबडेपणाहून फारसा वेगळा नव्हता.

घर पाहून झाल्यावर मी थोडासा विसावलो. तोच दानिएलने दारावर थाप दिली. मी 'आत या' म्हटल्यावर त्या आत आल्या. मला विचारले "शिरीष ! आर यू टायर्ड ?" क्षणाचा विलंब न लावता मी उत्तरलो, "नो मादाम, आय एम् नॉट टायर्ड ! आय एम क्वाएट फ्रेश !" तिने उत्तरादाखल स्मितहास्य केले आणि म्हणाली, "इफ यू डोंट फील टायर्ड वुई शॅल गो टू पॅरीस टू रिसिव्ह पिअर. . माय हसबंड. ही इज रिटर्निंग फ्रॉम ऑस्ट्रिया" मला तिचे बोलणे स्वर्गातून झालेली आकाशवाणीच वाटली. पॅरीसला जाण्याची उत्सुकता शिगेस पोहोचली होती. त्यात दानिएलच्या विनंतीला आज्ञा समजून मी तत्परतेने तयार झालो.

काही वेळातच आम्ही पॅरीसचा रस्ता धरला. घड्याळात सायंकाळचे सात वाजले होते. मी मुळात पॅरीसला पाच वाजता आलो आणि दोन तासात ३० कि. मी. वरील शांपिनीला जाऊन आवरून परत पॅरीसला निघालो. खरोखरच विलक्षण गती आहे ह्या जीवनाला. रस्त्यावर भरपूर उजेड होता. पॅरीसला पोहोचलो ते उजेडातच. सीन नदीशेजारील नोत्रदाम या जगविख्यात चर्चसमोरील कॅफे नोत्रदाम ह्या हॉटेलजवळ कार पार्क केली. पुण्याच्या चतुःश्रृंगीजवळील चतुःश्रृंगी अमृततुल्य, जोगेश्वरीजवळील जोगेश्वरी कटपीस हाऊस, आणि नोत्रदामजवळील कॅफे नोत्रदाम ह्या नावावरून देवदेवतांवरील श्रद्धेची धंद्याशी कशी सांगड घालायची, हे तंत्र दोन्हीकडे सारखेच आढळले.

कॅफे नोत्रदामचा परिसर अत्यंत गजबजलेला होता. हळूहळू अंधार पडू लागला होता. पॅरीसला रंग येऊ लागला होता. पॅरीसचे सौंदर्य खुलते ते रात्री, असं ऐकलं होतं. संधिप्रकाशाची वेळ होती. रस्त्यावर वाहने डीमलाईट लावून पळत होती. फूटपाथवर माणसांचे थवे दिसत होते. त्यात बहुसंख्य विविध देशांतले

पर्यटक होते. त्यात बहुसंख्य जर्मन होते, तसेच जपानी, इटालियन, अमेरिकन आणि जगातल्या नाना देशांतले, नाना वर्णांचे हौशी पर्यटक फूटपाथवर रेंगाळत फिरत होते. त्यांची भाषा वेगळी, राष्ट्रीयत्व वेगळे, वय सुद्धा भिन्न, पण ते सारेच पॅरीसच्या धुंद रात्रीत मश्गूल झाले होते. सारेच हसरे, उत्साही आणि रसरशीत. वृद्धत्वाच्या खुणाही त्या पॅरीसमधल्या अनोख्या वातावरणाने पुसल्या होत्या. मंद हास्यकल्लोळ, मिठ्या, उत्कट चुंबने, प्रेमी युगुलांची हातात हात घालून एकमेकांना रेलून संथपणे चालण्याची आगळी तऱ्हा, या सर्वांवर एक अद्‌भुततेची छटा आली होती निऑन साईनच्या प्रचंड साइन बोर्डनी. रात्र जशी होऊ लागली, तसे जाहिरातींचे रंगीबेरंगी, कलात्मक, साईन बोर्ड हलू लागले. जणू प्रकाशात चैतन्य निर्माण झाले होते. कॅफे, हॉटेलातून धुंद संगीत एकूण वातावरणाचा गडदपणा आणखीनच वाढवीत होते. नेत्रसुखांच्या जल्लोशाला पारावार राहिला नाही. त्यात सर्वत्र खास फ्रेंच सेंटचा दरवळ. दुधात साखर, त्यात केशर अशीच स्थिती जाणवली. तरुण-तरुणी क्वचित समूहाने गाणे गुणगुणत आपल्याच मस्तीत फिरत होती. कोकचे घोट घेत घेत दुकानांच्या काचेच्या पलीकडील सुंदर वस्तूंवर नजर टाकीत पर्यटक पॅरीसच्या धुंदीत स्वतःला झोकून देत होते. खरोखरच वातावरण चिरयौवनाने भरले होते. चिरयौवन लाभलेल्या त्या पॅरीसच्या रात्रीत साक्षात इंद्रही थबकला असता आणि पॅरीसच्या त्या अलौकिक जादूमय वातावरणाने मोहितही झाला असता.

लॅटिन पॅरीस परिसरात मादाम दानिएलने नेले. तो पॅरीसचा सर्वांत जुना भाग. जुन्या-नव्याचे विलक्षण मिश्रण तिथे आढळले. पुण्याच्या तपकीर गल्लीएवढ्या अरुंद बोळाही तिथे होत्या. परंतु वातावरण मात्र अगदीच वेगळे. छोटी छोटी दुकाने, हॉटेल्स, खाद्यपेयांची वेगळी दुकाने, खाली दगडी फरशी. त्यातून हौशी पर्यटक व पॅरीसियन यांनी दाटी केल्याने तर गर्दीतून हळूहळू पुढे सरकावे लागे. परंतु पायावर चप्पल पडणे, धक्का लागणे इत्यादी प्रकार नव्हते. होता फक्त खाद्यपदार्थांचा, सेंटचा धुंद करणारा गंध. असेच पुढे चालत गेलो. रस्त्याच्या कडेला कॅफेच्या खुर्च्यांवर फ्रेंच युवक-युवती, मध्यमवयीन, क्वचित वृद्ध जोडपीही मद्याचे घोट घेत शांतपणे रस्त्याच्या रहदारीकडे पाहत बसली होती. मंद स्वरात एकमेकांशी हितगुज करीत होती. पॅरीसमध्येच काय, परंतु फ्रान्समध्ये फूटपाथवर खुर्च्यांवर बसून मद्याचे घोट घेत तासन्‌तास बसणे हा एक शिष्टाचार वाटण्याइतका प्रकार दिसतो. रेस्तराँमध्ये

थोडेसे वेगळे दृश्य दिसते. दोन-चार स्त्री-पुरुष एका टेबलाभोवती बसून चविष्ट फ्रेंच पदार्थ खास फ्रेंच हावभावात गप्पा मारीत, आस्वादपूर्वक खाताना दिसतात. काटाचमचा, हात, डोळे, मान व खांदे सारे त्यांच्या हुकमतीत असल्याने खातखात बोलणारा फ्रेंच मनुष्य बघतच राहावा असे कित्येकदा वाटले. यापेक्षाही रेस्तराँमधली टेबलं, टेबलांवरील चकचकीत क्रोकरी, मंदप्रकाश योजना आणि त्याला साजेसे मंद परंतु धुंद करणारे संगीत, त्या तालावर चपळाईनं सर्व्हिस करणारे वेटर अथवा वेट्रेस हेही काय कमी आकर्षक नसतात. या सर्व देहभान विसरायला लावणाऱ्या वातावरणाचा आस्वाद घेत एखादे वृद्ध जोडपे फूटपाथवरील बाकावर शांतपणे बसलेले असते.


लॅटिन पॅरीस व नोत्रदाम परिसर ज्याने रात्री निवांतपणे हिंडून पाहिला आहे तो धन्य होय. सार्ज व दानिएल अधूनमधून मला विचारीत, 'कसं काय वाटतंय पॅरीस ?' त्यावर माझे एकच उत्तर असे, 'फंटॅस्टिक'. माझ्या उत्तरावर खूष होऊन दोघेही मला आणखी एखाद्या ठिकाणी घेऊन जात. त्यांनी सीन नदीवरील पुलावर नेले. रात्री तो पूल टिळक ब्रीजसारखा वाटला. परंतु त्यावर केवळ पादचारीच होते. पुलाच्या मध्ये बसायला बाक होते. पॅरिसियन बाकावर बसले होते. पर्यटक पुलाच्या कठड्यावरून नदीच्या पात्रातील प्रवासी बोटींची झगझगीत रोषणाई पाहत होते. आम्हीही त्यात सामील झालो. सारेच आनंदात. आनंदाने आनंद द्विगुणित होतो. अणुशक्तीएवढीच परंतु विधायक शक्ती या आनंदात आहे. त्यात फेसाळणारे यौवन ! त्या वातावरणाचे तुषार अंगावर झेलत आम्हीही परत तारुण्याचा अनुपम अनुभव घेत होतो. एखाद्या लेझीम पथकातील सारेच ढोलताशाच्या लयीत झिंगतात व देहभान विसरतात तसेच माझे होऊन गेले. मला हिरमुसलेले चेहरे, कपाळावर आठ्यांचे जाळे, त्वेषाने फुललेले चेहरे, रागाने वळलेल्या मुठी, डबलफास्ट धरायची लगबग, कुठेच त्या रात्री दिसली नाही. तेव्हा वाटले, रक्त आटवणाऱ्या दुर्मुख मनोवृत्तीपेक्षा क्षणाक्षणाला 'सरत्या' आयुष्याबरोबर 'चढणाऱ्या' तरुणाईची धुंदीच या पॅरीसियन्सना जीवनासक्त बनविते. त्यामुळेच की काय पॅरीसवासीयांच्या चर्येवर भोगलालसेऐवजी भुक्तपणाचे समाधानच अधिक ठळकपणे दिसले.

यामागे केवळ भौतिक समृद्धी कारणीभूत नसून क्षुद्र हेवेदावे, चिंता, समस्या, तेढ, वाद, मतभेद, वैर यांना अंधारात गाडून जीवनाचा निखळ आनंद शोधत पॅरीसच्या रात्री सार्थक करण्याची पॅरिसीयनांची चिरतरुण वृत्ती आहे. पॅरीसच्या त्या

रात्रीचे विलोभनीय दर्शन मला चिरस्मरणीय झाले आहे. कुठेही हिडीसपणा नाही. कामुक वृत्ती नाही, धावपळ नाही, धक्काबुक्की नाही. दिसला तो केवळ निखळ आनंदाने खळाळणारा, तरुणाईने भरलेला आयुष्यातील मौल्यवान क्षणांना अमरत्व देणारा तो कैफ ! ह्या कैफात दानिएल व सार्जबरोबर शांपिनील: रात्री दोन वाजता कधी पोहोचलो ते कळलेच नाही.

भू.प्रवास
५३८
२६५५८
१३।१२

# सीन नदी : पॅरीसचे स्पंदन



The Alexandre III Bridge and the Invalides

पॅरीस आणि सीन नदी, काय विलक्षण नातं आहे ह्या दोघांत. पॅरीसच्या एकूण सौंदर्यात सीन नदीने नुसती भर घातली आहे असे नव्हे, तर सीनच्या वर्णनाशिवाय पॅरीसचे वर्णन एकांगी होईल, इतके अतूट नाते पॅरीस व सीनचे आहे. एखाद्या गावाबाहेरील नदीचे आपल्याला किती अप्रूप वाटते. इथे सीन नदीतर चक्क पॅरीस शहराला दुभंगून संथपणे परंतु दुथडी भरून वाहते. पॅरीस शहरामधून नागमोडी वळणे घेत संथपणे वाहणारी सीन नदी जणू पॅरीसच्या बाहुपाशात बद्ध झाल्यासारखी वाटते. एखाद्या गौरकाय ललनेच्या मानेवरून लांबलचक वेणी शरीराला लपेटलेली असावी, तशी सीन पॅरीसला छानदार वळणांनी लपेटल्यासारखी वाटते. आयफेल टॉवरवरून सीन नदीचे विहंगम दृश्य नजर खिळवून ठेवते. एखाद्या स्वच्छ धुतलेल्या वस्त्रावर फिक्कट निळी शाई सांडावी तशी, सीन पॅरीसच्या पश्चिमोत्तर दिशेने वाहताना, क्षणभर भासते. आपण नद्यांना लोकमाता म्हणतो खरं, परंतु त्या नदीचा काठ छानपैकी बांधून तो रम्य करण्याचा प्रयत्न मात्र क्वचितच करतो. कारण फारतर दोन- चार महिने वाहणाऱ्या नद्यांना लोकमाता, गंगाभागीरथी ही विशेषणे बहाल केली की नदीचे व आपले संबंध संपले. पण इथे पॅरीसमध्ये सीन नदीचे जे लाड, कोडकौतुक फ्रेंचांनी केले आहे ते विलक्षणच आहे. सारे स्थापत्यकौशल्य एकवटून ह्या सीनचा इंच न् इंच काठ

इतका रमणीय केलाय की बस ! सुंदर कठडे, सुबक पायऱ्या, नक्षीकामाने डवरलेले अनेक पूल, प्रयत्नपूर्वक जोपासलेली काठावरची वृक्षराजी, या सर्वांमुळे सीनवर जो साज चढविला गेला आहे त्याचा जगभरच्या नद्यांनी हेवा करावा. कल्पक व सृजनशील फ्रेंच माणूस इथेच थांबला नाही, तर त्याने या नदीच्या परिसराचा मनोविनोदनासाठी इतका वैविध्यपूर्ण उपयोग केला आहे की विचारता सोय नाही.

मी पॅरीसमध्ये असेपर्यंत दररोज किमान एकदा तरी या सीन नदीचे दर्शन घेतले. ते प्रत्येक दर्शन विलोभनीयच होते. ह्या सीनच्या प्रेमात मी नकळत पडलो आणि पॅरीस सोडताना शेवटच्या दिवशी चक्क दोन तास सीनच्या कठड्यावर बसून तिच्या विशाल पात्रात माझ्या गत १४ दिवसांतील उत्कट आठवणींच्या लाटा उसळवीत होतो. वर्षभर काठोकाठ वाहणारी सीन मध्यमवयीन स्त्रीप्रमाणे शांत व संयमी वाटते. उच्छृंखलपणाचा खळखळाट नाही, तरी निर्जीवपणाचा अतिसंथपणा नाही. डोंगरदऱ्यातल्या निर्झराप्रमाणे पारदर्शक नाही, तरी प्रदूषणाने काळे दुर्गंधित झालेले मिथेनयुक्त पाणी नाही. सीनचा प्रवाह मंदपणे वाहताना जिवंतपणा कुठेच लोपलेला नाही. एखादी प्रवासी मोटरलाँच निघून गेल्यावर फेसाळलेले निळसर पांढरे पाणी सीनचे सौंदर्य आणखीनच द्विगुणित करते. काही ठिकाणी तिचे पात्र खोल असल्याने तिच्या निळसरपणाला डोळ्यांना सुखावणारा गडदपणा आला आहे. त्या गडद निळ्या पात्राला हिरव्या गर्द झाडींची किनार लाभल्याने सीन नदी ही नदी न राहता पॅरीसची रूपगर्विता झाली आहे. त्यामुळे आयफेल टॉवरच्या उंचीवरून ती फारच मोहक वाटते. मुळात सुंदर असलेल्या पॅरीसला सीन नदीची साथ मिळाल्याने पॅरीसच्या सौंदर्याला एक खास परिमाण आले आहे.

ह्या सीन नदीचा काठ लाल गुलाबी रंगाच्या पत्थरांनी भक्कमपणे बांधला आहे. अनेक ठिकाणी त्याला स्टेडियममध्ये असतात तशा पायऱ्याही बांधल्या आहेत. ह्या पायऱ्या लांबलचक बांधल्यामुळे भव्यपणाचा भास जरूर जाणवतो. काही ठिकाणी काठाला वाळू मुद्दाम पसरली आहे, तर काही ठिकाणी सदाहरित वृक्षांच्या रांगा हारीने उभ्या केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी वृक्ष शाबूत ठेवून मोटारीसाठी रस्तेही बांधून काढले आहेत. थोडक्यात, सीनचा काठ कुठेही गचाळ न राहण्याची पुरेपूर दक्षता घेतली गेली आहे. या सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे प्रवासी बोटींसाठी आकर्षक धक्केही राखून ठेवले आहेत. कल्पकतेची कमाल आणि स्थापत्यशास्त्राची परिसीमा सीनकाठी जाणवते. सीन नदीच्या काठावर

दिवसभर बसून राहिलो तरी वेळ कसा गेला कळायचं नाही. काठावर जे जे दिसते ते सर्व अलौकिक असते, सुखद असते. कित्येक वयस्कर माणसे हातात गळ, तोंडात चिरुट आणि हातात पुस्तक अशा तिहेरी कामगिरीत असतात. त्यांची मत्स्याराधना कित्येक तास अखंडपणे चाललेली असते. ते पाहून ते मासे कशासाठी पकडतात हे कोडे उलगडत नाही. खास फ्रेंच कॅप मधली ही स्थितप्रज्ञ मंडळी स्वतःच्या विश्वात इतकी मश्गूल असतात की बस ! यांच्या भोवताली काय चालले आहे, याचे काडीइतकेही त्यांना सोयरसुतक नसते. गळाला मासा लागला नाही, तरी त्यांची मुद्रा त्रासिक नसते. मत्स्याराधना ही तपस्वी वृत्तीने करणारी ही फ्रेंच माणसं सीनशी एक संवाद करीत असतात. त्यांच्या एकाकी जीवनात सीन दुथडी भरून वाहते. तिच्या सौम्य खळखळाटात आपले संथ एकाकी जीवन मिसळून टाकत असावेत. ही मत्स्यप्रेमी फ्रेंच मंडळी सीन नदीचे आजीव मित्र. यांच्या गळाला केव्हा मासा लागेल या उत्सुकतेत काही इतर मंडळी तासन्तास निरखत असतात. विशेषतः छोटी मुले अशा मस्त्यप्रेमीच्या एकूण कामगिरीकडे पाहण्यात सीनच्या काठी आपला फावला वेळ घालवतात. काही वेळा एखादं प्रेमी युगुल पायरीवर बसून निवांतपणे जाणाऱ्या-येणाऱ्या प्रवासी बोटी पाहत असते. बोटीतील पर्यटकांना हात हलवून प्रतिसाद देत असतात. हौशी पर्यटक पसरलेल्या वाळूत उघड्या अंगावर अधून-मधून येणारे सूर्यकिरण घेत सूर्यस्नानात दंग असतात. एखादा पेन्शनर वृद्ध शून्यात नजर लावून कसल्यातरी गहन, तरी सुखद विचारात चेहऱ्यावरील सुरकुत्यांची साय अधूनमधून हलवीत असतो. एखादी फ्रेंच माता आपल्या गुबगुबीत मुलाला हात उंचावून काही दाखवीत असते. ते छोटे मूल काही प्रश्न आपल्या आईला विचारीत असते. बिअरचे टीन फोडून त्यातल्या बीअरचे घुटके घेत पायावर पाय टाकून तरुण मंडळी पायऱ्यांना टेकून बसलेली असतात. पर्यटकांचे गट हसऱ्या चेहऱ्याने, हाताने अभिवादन करीत संथपणे पायऱ्यांवरून फिरत असतात. प्रत्येक जण सीनच्या काठावर आपल्याला जे भावते ते मनापासून करीत असतो. एखादी प्रवासी बोट आली की सीनचा काठ फडफडतो. सारेच क्षणभर झाडातल्या पाखरांप्रमाणे फडफडतात. बोट निघून गेली की परत जैसे थे. सीन नदीचा काठ माणसांनी कुंभमेळ्याप्रमाणे गजबजलेला जरी नसला तरी निर्मनुष्य कधीही नसतो. तिथे सदैव तुरळक प्रमाणात वर्दळ असते. केवळ संध्याकाळीच नदीकाठी जायचे हा देशी संकेत पॅरीसला अजूनही कळविलेला नसल्याने सीन नदी रात्री दोन वाजेपर्यंत

माणसांनी गजबजलेली असते.

सीन नदीचे खास आकर्षण म्हणजे तिच्यातील दोन छोटी बेटं. ह्या बेटांवर पुरातन पॅरीस वसले होते. आज पॅरीसचा विस्तार प्रचंड प्रमाणात झाला असला, तरी ह्या दोन बेटांवर अजूनही प्राचीन, अर्वाचीन इमारती, कॅथेड्रल दाटीवाटीनं उभ्या आहेत. ह्या बेटांना दाट वृक्षांची किनार असल्याने ती फारच सुरेख दिसतात. प्रत्येक परदेशी पर्यटक ह्या बेटाचे छायाचित्र आवर्जून घेतो. दोन बेटांना काठाशी जोडण्यासाठी, तसेच पॅरीसचे दोन भाग एकमेकांशी जोडण्यासाठी जे कित्येक डझन एकाहून एक सुंदर पूल बांधले गेले आहेत त्यांमुळे सीनचे सौंदर्य शतपटीने वाढले आहे. या पुलाच्या रचनेत, लांबी-रुंदीत आणि वापरलेले साहित्य यांत इतकी विविधता आहे की त्यामुळे एक पूल दुसऱ्या पुलाप्रमाणे नाही. काही पूल तर सौष्ठव, सामर्थ्य व सौंदर्य यांचे मूर्तिमंत प्रतीक आहेत. नदीच्या ह्या काठापासून त्या काठापर्यंत जायचे एक स्थापत्यशास्त्रीय साधन, पण त्यातली विविधता पाहून फ्रेंच मनोवृत्तीचे मनोहारी दर्शन घडते. यातील कित्येक पूल शंभर वर्षांहून जुने आहेत आणि पॅरीसच्या एकंदर अर्वाचीन तोंडवळ्याशी सुसंगती राखून आहेत. काही पूल लोखंडी तर काही दगडी, तर काही लाकडी पूलही आहेत. प्रत्येक पूल हा फ्रेंच स्थापत्यशास्त्राचा आविष्कार आहे. त्यांची कक्षा (स्पॅन)) एवढी मोठी व उंच असते की त्याखालून मोठ्या प्रवासी बोटी अलगदपणे जातात. सीन नदीवर कुठेही काँक्रीटचे अत्याधुनिक पूल बांधून संपूर्ण जुनाट पार्श्वभूमीला कुठेही गालबोट लावले नाही. सीन नदीवरून मेट्रोचेही पूल आहेत. पण तेही शंभर वर्षं जुने, तरी न कोसळता अखंड सेवा देत आहेत. काही पूल अत्यंत रुंद तर काही अत्यंत अरुंद, एखाद्या कॉजवेप्रमाणेही आहेत. मी त्या सर्व पुलांवरून पायी जाण्याचा प्रयत्न केला कारण प्रत्येक पुलावरचे दृश्य व पुलावरून सीनचे दिसणारे दृश्य काहीतरी वेगळा अनुभव देतात. काही पूल केवळ पादचाऱ्यांसाठी आहेत. त्यामुळे रेंगाळत, कोकच्या टीन मधल्या कोकचे घोट घेत घेत तरुण-तरुणी हातात हात गुंफून धुंद- फुंदपणे पुलावरून दिसणारी दृश्ये पाहताना बऱ्याचदा दिसतात. नोत्रदामजवळील एक असाच पूल. त्याचे मूल्य न अजमावता येणारे आहे. पॅरीसमधील चित्रकार त्या पुलावरून नोत्रदामचे व सीनमधील बेटाचे दिसणारे अप्रतिम दृश्य कॅनव्हासवर रंगीत रेषांनी उतरवीत असतात. त्यांच्या तल्लीनतेत सहभागी होणारे सुद्धा क्षणभर पुलावर रेंगाळतात. एरवी कुणाची काडीइतकीही दखल न घेणारी ही पॅरीसियन

मंडळी आपला स्वभावधर्म सोडून चक्क त्या चित्रकाराच्या कॅनव्हासकडे डोकावून बघतात. स्मितपूर्वक भुवया व खांदे उडवून त्या कलाकाराचे कौतुकही करतात. ह्याच पुलावर अशा चित्रांची विक्रीही चाललेली असते. पर्यटक आस्थापूर्वक चौकशी करतात. क्वचित ती चित्रे विकतही घेतात. एखाद्याकडे चित्रकलेचे साहित्य अथवा कॅनव्हास काही नसते. तो आपल्या नजरेने समोरचे दृश्य मुक्तपणे टिपत बराच वेळ उभा असतो. हा पूल म्हणजे सीनवरचा एक आर्टिस्ट पॉइंटच आहे.

पॅरीसच्या पुलावर नटलेले हे छोटेखानी कलादालन पर्यटकांचे हमखास लक्ष वेधून घेते. माझ्या होस्टने हा वैशिष्ट्यपूर्ण पूल आवर्जून दाखविला. तो कलाकारांचा आश्रयदाता पूल आठवला तरी सर्वांगातून सुखद लहरी लहरून जातात.

सीन नदीचा दिमाख रात्री काय वर्णावा ? यक्षनगरीचा भास व्हावा असे भव्य, दिव्य, झगझगीत रूप धारण करते सीन नदी. पॅरीसदर्शनाच्या जशा बसेस आहेत तसेच पॅरीसचे दर्शन रात्री घडविणाऱ्या अजस्र महाकाय बोटी सीनमधून फिरत असतात. सीनकाठच्या सुप्रसिद्ध प्रासादांची, स्मारकांची पर्यटकांना माहिती व्हावी म्हणून ह्या बोटी लक्षावधी वॅटच्या अत्यंत प्रखर दिव्यांचा प्रकाश इमारतींवर सोडतात. त्यामुळे एखादी बोट सीन नदीतून चालली की अक्षरशः वीज पडल्यावर डोळे दीपविणारा जो लख्ख प्रकाश क्षणभरच पडतो, तसा प्रकाश सर्व इमारतींना न्हाऊन काढतो. एरवी करड्या रंगानं अनाकर्षक भासणारा नोत्रदामचा कॅथेड्रल त्या प्रकाशात स्वर्गीय लावण्याचा प्रत्यय देतो. अशा वेळी सीन नदीतून समोरासमोरून दोन बोटी आल्या की त्यांच्या एकत्रित प्रकाशयोजनेचा अक्षरशः कल्लोळ उडतो. ती सीन नदी, काठावरच्या प्रेक्षणीय इमारती आणि आपण सर्वच एका अद्‌भूत यक्षनगरीत असतो. त्या यक्षनगरीचा क्षणिक भास सुद्धा इतका उत्कट व रोमहर्षक असतो की, त्याची आठवणही पॅरीसच्या दिशेने खेचून नेते. सीन नदीवर चाललेला प्रकाशोत्सव बघायला पुलापुलांवर, काठाकाठाने हजारो पर्यटक मूकपणे उभे असतात. सीनचे ते अनोखे रूप मनात साठवीत आवडते पेयांचे घोट रिचवीत 'ॲन इव्हनिंग इन पॅरीस' म्हणजे काय, याचा अनुभव घेत असतात.

दिवसा जेव्हा पर्यटकांच्या पॅरीसदर्शन बोटी सीन नदीतून संचार करतात तेव्हा त्या पर्यटकांना हात हलवून हॅलो, बायबाय करणारे हे प्रत्येक पुलाच्या काठावर बोट येताना दिसली की गर्दी करतात. अशी बोट त्या पुलाखालून गेली की, अशा बायबाय करणाऱ्यांच्या उद्‌गारांचा कल्लोळ उडतो. बोट निघून गेली की सर्व शांत.

या प्रकारात एक सौहार्द असते. क्षणापुरती मैत्री असते. एकदा दुपारी पुलावर फारशी वर्दळ नव्हती. एक माता आपल्या छोट्या मुलाला पुलाच्या काठावरून त्याच्या हट्टावरून अशाच एका प्रवासी बोटीच्या प्रतीक्षेत होती. तेवढ्यात एक महाकाय प्रवासी बोट आली. पुलावर रहदारीही नव्हती, बघेही नव्हते. त्यामुळे प्रवासी बोटीतले पर्यटक दुर्बिणीतून सीनचा परिसर न्याहळीत उभे होते. बोट येताच त्या चिमुकल्या मुलाचे चिमुकले हात त्या प्रवाशांसाठी हवेत फिरू लागले. प्रवाशांचे लक्ष वेधले गेले नाही. तो छोटा हिरमुसला. क्षणात त्या मातेने त्या छोट्या मुलालाच उंचावले. हे बोटीवरील, डेकवरील प्रवाशांच्या लक्षात येताच अक्षरशः ते दोन-तीनशे पर्यटक खाडकन उभे राहिले आणि त्या सर्वांनी हात उंचावून त्या मुलाला प्रतिसाद तर दिलाच, पण हातांतले कॅमेरे, दुर्बिणी, व्हिडीओ कॅमेरे, कोकचे टीन उंचावून त्या छोट्या मुलाला एक श्रेष्ठ मानवंदनाच दिली. एका छोट्या मुलाला संपूर्ण बोटीतील प्रवाशांनी उत्स्फूर्तपणे उभे राहून त्याच्या चिमुकल्या हातांनी केलेल्या अभिवादनाला दिलेली प्रचंड दाद कायम लक्षात आहे. त्यानंतर अशी मजा आल्याने तो छोटा मुलगा बालसुलभ हट्ट धरून बसला– 'पुन्हा एकदा'. हे 'पुन्हा एकदा' हात-पाय झाडून थेट भारतीय पद्धतीनं झालं. पण त्या स्त्रीने त्याचा हट्ट तात्काळ पुरवून फ्रेंचपणाची वेगळी छटा दाखविली.

सीनच्या सहवासात अशा अनेक क्षणांची साठवण दिवसागणिक वाढत गेली. नकळत त्या सीनचा निर्जीव परिसर चैतन्यपूर्ण भासू लागला. माझे पाय त्या सीनकडे दररोज वळू लागले. पुढे पुढे सीनशिवाय चैन पडेना. सीनच्या काठावर, सीनच्या पाण्यावर दिवस-रात्री चाललेला तो 'ऑपेरा' पाहणे हा माझा छंदच होऊन गेला. दररोज नव्या अनुभूतींचा भास, नव्या दृश्याचा साक्षात्कार. मानवी मनाचे खोलवर दडलेले उत्तम, उदात्त, उन्नत भाव त्या सीनच्या परिसरात विविध स्वरूपांत पाहायला मिळत, तेही एक फ्रँक खर्च न करता. माझ्यासारख्याला एखाद्या पबमध्ये जाऊन शँपेनचा एक चषक घेणे परवडणारे नव्हते. पण ह्या सीनच्या काठावर, पुलावर कोठेही उभे राहून त्या वातावरणात झोकून देऊन मनस्वीपणाने जे अनुभवले ते शँपेनच्या कैफापेक्षा सरस तर होतेच, परंतु चिरस्मरणीय होते.

पॅरीसचे रुपेरी-सोनेरी दर्शन त्या सीनच्या पात्रात डोळ्यांनी अनेकदा पाहिले. त्याहूनही तिच्या मंद खळखळाटात मला पॅरीसचे स्पंदन जाणवले. म्हणूनच सीनला पॅरीसचे स्पंदन म्हणण्याचा अनिवार मोह होतो.

# लूव्र : चित्रकलाप्रेमींची पंढरी. . .

आदल्या रात्री जागरण झाल्याने सकाळी जरा उशिराच उठलो. माझ्या खोलीच्या दारात श्रीयुत पिअर सुहास्य वदनाने सुप्रभात म्हणायला हजर. हा गृहस्थ वयानं चाळीशीतला जरी असला, तरी बालकाचा निरागस हसरा चेहरा घेऊन जेव्हा माझ्यासमोर उभा राहायचा तेव्हा त्याला नेमके इंग्रजी शब्द न आठवल्याने धावत डानिएलकडे जायचा, फ्रेंचमध्ये काहीतरी विचारायचा आणि परत येऊन म्हणायचा, 'हाऊ आर यू ?' स्वतःच्या वाक्यावर खूष होऊन मिष्कील हसायला आणि प्रांजळ कबुली द्यायचा, 'आय नो नो इंग्लीश, माय वूमन नोज वेल' मनातलं न्यूनत्व सांगून टाकून मोकळा व्हायचा. असा हा पिअर भोळा होता. खरंच, मला भेटलेली बरीच फ्रेंच माणसं सरळ मनाची होती. त्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेण्यास फारसा वेळ लागत नव्हता. विशेष म्हणजे चेहरे व मुखवटे हा प्रकार क्वचितच आढळला.

सकाळचा ब्रेकफास्ट हा एक सुखद अनुभव होता. संपूर्ण कीचन मादाम दानिएलने माझ्या ताब्यात सोपविले होते. गॅस, स्टोव्ह, फ्रीज, चहाचे भांडे, बागेत ब्रेड आणि लोणी यांच्या जागा माहीत करून दिल्या होत्या. दोघेही सर्व्हिस करीत असल्याने त्यांना प्रथमच मी सांगितले होते की माझा ब्रेकफास्ट स्वतःच तयार करीन. पाहुण्याच्या आवडीनुसार व्हावे म्हणून त्यांनी त्यास त्वरित होकार दिला होता.

ब्रेकफास्ट उरकून मी जरा विसावलो तोच दानिएल लिव्हिंगरूममध्ये आल्या. रविवार होता. सगळेच मोकळे होते. मनात काही वाक्यांची जुळवाजुळव करून दानिएल म्हणाली, "शिरीष, टूडे वुई आर गोईंग टू व्हिजीट लूव्र ! इट इज ए बीग म्युझियम, परहॅप्स द बिगेस्ट इन द वर्ल्ड' तिच्या ह्या वाक्यावर पियरचा फ्रेंचाभिमान फुलला व सहेतूक मिस्कील स्मित करून दुजोरा दिला. लूव्र पाहाण्यासाठी माझा प्राण तळमळत होता. त्याच दानिएलने लूव्रला जाण्याची तयारी

दाखविल्याने मी एकदम खूष झालो. जगातील एक अद्वितीय संग्रहालय पाहण्यास मन अधीर झाले. त्वरित आवरून मी लिव्हिंग रूममध्ये येऊन बसलो. दानिएल व्हीसीआरवर व्हिडीओ कॅसेट रिवाईंड करीत होती. व्हीसीआर मध्ये कॅसेट लावता लावता म्हणाली, "वुई हॅव सम कॅसेट अबाऊट लूव्र, यू वील वॉच देम फर्स्ट अँड देन वुई शॅल गो टू द म्युझियम बाय टेन ओ'क्लॉक ! ओके ?" मी त्यांच्या ह्या अनोख्या व डोळस पाहुणचाराने सर्दच झालो. पाहुण्याला मुझियमसाठी थोडा वेळ व बाहेर भेळपुरी जास्त वेळ देऊन इतिकर्तव्यता मानण्याची आपली वृत्ती व पाहुणचार कुठे आणि जगविख्यात लूव्रवरील कॅसेट दाखवून पूर्वज्ञान वाढविणारी डोळस व अभ्यासू आतिथ्यशीलता कुठे. मी तीन तासांत व्हिडीओ कॅसेट बघितल्या आणि लूव्रला जाण्याची इच्छा आणखीन तीव्र झाली. लूव्रची वाचलेली सर्व वर्णने मला व्हिडीओवर पाहायला तर मिळालीच होती आणि आता तर प्रत्यक्ष त्या कलापंढरीस जाणार होतो दानिएल व पियर ह्या सुहृदांबरोबर. खरोखर एकट्याने यात्रा करण्यापेक्षा सहकुटुंब यात्रा करण्यातला जो वेगळा आनंद असतो, तसाच अवीट आनंद या दांपत्याबरोबर लूव्रला जाताना अनुभवला.

ठीक अकरा वाजता आम्ही तिघे कारने निघालो. माझी सर्व गात्रे अदृश्य धाग्यांनी लूव्रकडे ओढली जात होती. पाऊण तास ड्रायव्हिंगमध्ये पिअर मला मोडक्या-तोडक्या इंग्रजीतून पॅरीसमधल्या इतर म्युझियमबद्दल माहिती देत होता. त्याचे मोडके इंग्रजी मागच्या सीटवरून दानिएल दुरुस्त करीत होती. तरी नेटाने आपले संभाषण पिअर करीतच होता. बघता बघता नोत्रदाम आले. कार पार्किंगला जागा मिळाल्याक्षणी अचानक धनलाभ झाल्याच्या आनंदाने पिअरने गाडी पार्क केली.

पूल ओलांडून लूव्र ह्या प्रचंड वाड्यासमोर उभे राहिलो. जगातील सर्वांत मोठ्या राजवाड्याचा विस्तार नजरेत मावत नव्हता. कित्येक शतके ऊन-पाऊस सोसूनही हा चिरतरुण राजवाडा दिमाखात हजारो पर्यटकांचं स्वागत करीत होता. प्रवेशासाठी लांबलचक रांग होती. परंतु शिक्षकांना वेगळ्या मार्गाने प्रवेश होता. प्रवेशद्वारावर सुहास्यवदना फ्रेंच तरुणी उभ्या होत्या. त्या दोघांनी आपली ओळखपत्रे दाखविली. तिने त्यांना लवून अभिवादन केले, परंतु मला मात्र नम्रपणे अडविले. तत्क्षणी मादाम दानिएलने माझे तिकीट त्या युवतीस दिले व म्हणाली, "MR. SHIRISH, INDIAN TEACHER" त्या क्षणी त्या सुहास्यवदना

तरुणीने मलाही लवून अभिवादन केले. शिक्षक म्हणून मला इतक्या आदरपूर्वक, फ्रान्समध्ये, तेही जगद्‌विख्यात लूव्रच्या प्रवेशद्वारावर, अभिवादन केलेले पाहून मन भरून आले. ज्या देशात शिक्षकांचा पदोपदी आदरसन्मान होतो तो देश खरा सुसंस्कृत म्हणायला हवा. त्याच वेळी मला पाच सप्टेंबर हा दिवस अकारण आठवला.

जिथे प्रवेशद्वार आहे तिथे प्रचंड आकाराचे काचेचे पिरॅमिड उभे केले आहे. त्रिकोणी स्टीलच्या फ्रेम्स एकमेकांना जोडून प्रचंड सुपर स्ट्रक्चर उभे केले असून फ्रेममध्ये काचा बसविल्या आहेत. लूव्रच्या प्राचीन बांधणीच्या पार्श्वभूमीवर हा अत्याधुनिक फ्रेंच स्थापत्यप्रकार काहीसा विरोधाभास वाटतो. तरी त्यात एक नावीन्य सामावले आहे. फ्रान्समध्ये, विशेषतः पॅरिसमध्ये अत्यंत आधुनिक, कित्येकदा अनाकलनीय रचना उभ्या आहेत. विशेष म्हणजे पॅरीसचे जुनेपण हरवू नये म्हणून काही मंडळी अशा बंडखोरींना प्रखर विरोधही करतात.

त्या ठिकाणी सरकत्या जिन्याने वरून आपण खाली उतरतो. अपंगांसाठी एक खास लीफ्ट आहे. अपंग आपल्या व्हीलचेअरसह लूव्रमध्ये प्रवेश करू शकतात. केवढा हा डोळसपणा.

काचेच्या पिरॅमिडखाली माहिती देणारी बरीच काउंटर्स आहेत. तिथे मोफत माहितीपत्रक, संग्रहालयाचा एकूण ले-आऊट, मिळते. ते घेऊन प्रथम कुठे जायचे हे निश्चित केले. मी पिअरला म्हणालो, मला चित्रदालन पाहायचे आहे. त्यानं त्वरित होकार देऊन नकाशात नेमका मार्ग शोधला आणि आत प्रवेश केला. खरोखरच हा राजवाडाच आतून पाहण्यासारखा आहे. भव्यपणा व कलाविष्कार दोन्ही थक्क करणारे आहे. विश्वास बसत नाही की हा राजवाडा ७९० वर्षांचा जुना आहे. नुकतेच बांधकाम पूर्ण झाले असावे असे वाटते. खाली चकचकीत संगमरवरी फरशी, उंच डौलदार खांब आणि नखशिखान्त नक्षीकाम. एकंदर लूव्रचे स्वरूप अवाढव्य असल्याने नकाशा हातात घेऊनच फिरावे लागते. नाना देशांतले नाना प्रकारचे कलारसिक लूव्रच्या दर्शनाने अवाक होतात. फक्त डोळे उघडे ठेवून जितके सौंदर्यसेवन करता येईल तितके करीत असतात. प्रत्येक जण आयुष्यातील मिळालेले लूव्रच्या सहवासातील क्षणन् क्षण सार्थकी लावण्यासाठी डोळ्यांत प्राण आणून कलाकृती पाहत असतात. सर्वत्र संपूर्ण शांतता. चर्चा नाही, हाका मारणे नाही, पुढे-मागे चुकलेल्यांना दटावणे नाही. सारे कसे शिस्तीत. एक गोष्ट

विशेषत्वेकरून आढळली. एक जपानी पथक ज्यात ३०-४० जण होते, अत्यंत शिस्तीने संग्रहालय बघत होते. बघता बघता पांगापांग होऊ नये व सर्वांनी एकत्र राहावे म्हणून त्या सर्वांची प्रमुख एक युवती होती, तिने जपानचा राष्ट्रध्वज उंचावून धरला होता. राष्ट्राभिमानाबरोबरच आपला ग्रूप नेमका कुठे आहे हे सर्वांना सहज लक्षात येई. ही व अशी अनेक दृश्येच रमणीय होती. शाळेतील छोटी मुले रांगेने व शिस्तीने शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली जिज्ञासेने आपल्या चिमुकल्या डोळ्यांत लूव्रचे अफाट कलासौंदर्य साठविण्याचा प्रयत्न करीत होती. छोटे-मोठे, स्त्री-पुरुष सारेच लूव्रच्या अप्रतिम कलावैभवास मधुमक्षिकेच्या वृत्तीने कणाकणाने वेचत होती.

आर्टगॅलरीत किंवा चित्रदालनात जगविख्यात चित्रकारांच्या उत्कृष्ट कलाकृती इतक्या मोठ्या संख्येने आहेत की त्यांना ओझरते पाहण्यासही एक दिवस लागेल. मग लुव्रमधली इतर कलादालने, शिल्पकलादालने पाहण्यास आणखी काही दिवस लागतील. माझ्याबरोबर दानिएल व पिअर होते. ते नेमके उत्कृष्ट कलाकृतीसमोर ज्यादा माहिती देत. सोबत माहितीपत्रके होतीच.

प्रथम नेपोलियनची गाजलेली तैलचित्रे पाहिली. दाविद या समकालीन चित्रकाराने नेपोलियनची जी तैलचित्रे कॅनव्हासवर काढलीत ती अजरामर झालीत. नेपोलियनच्या राज्याभिषेकाचे चित्र सर्वांत भव्य व चित्तवेधक आहे. नोत्रदाममध्ये झालेल्या राज्याभिषेक सोहळ्यातील लहानातील लहान तपशील दाविदच्या कुंचल्यातून विविध रंगांत न्हाऊन निघाल्याने हे चित्र मी बराच वेळ बघत तर होतोच, परंतु पुढे अनेकदा पाहिले. फ्रान्समध्ये नेपोलियनचा गौरव यथातथा आहे, तरी त्याच्या जीवनावरील पेंटिंग्ज बघण्यास मात्र मोनालिसाच्या खालोखाल गर्दी असते हे विशेष. नेपोलियनने लढलेल्या प्रसिद्ध संग्रामाची पेंटिंग्ज अप्रतिमच आहेत. त्यांतून त्या काळच्या असंख्य तपशिलांचे ज्ञान होते. सैन्याचे पेहराव, शस्त्रसामग्री, वेषभूषा इ. तपशील अधिक स्पष्टतेने जाणवतात. जणू आपण रणभूमीपासून दूर उंचावर उभे आहोत व रणकंदन पाहतो आहोत, असा भास होण्याइतपत जिवंतपणा या सर्व पेंटिंग्जमध्ये आढळल्याने मला सर्वच पेंटिंग्ज आवडली.

हॉलमध्ये पुरेशी व योग्य कोनातून प्रकाशयोजना, बसण्यासाठी मऊ आसने, सर्वत्र शांतता, गडबडीचा अभाव यांमुळे लूव्रमध्ये पेंटिंग्ज निवांतपणे एकाग्र चित्ताने पाहता येतात. हेच मला फार आवडले. छतावरील अप्रतिम पेंटिंग्ज पाहण्यासाठी

चक्क झोपून पाहण्याची सोय आहे. कलादालनात केवळ पेंटिंग्ज ठेवली नसून पाहणाऱ्यांच्या सुखसोईचा पूर्ण विचार केला आहे. लिओनार्दो-द-विंसी, राफेल, गॉध या जगप्रसिद्ध चित्रकारांच्या असामान्य प्रतिभेतून साकारलेल्या अजरामर चित्रांचा खजिना म्हणजे लूव्रची आर्टगॅलरी. जीवनातील उत्कट क्षण, मूड्स या महान चित्रकारांनी अचूकपणे टिपले, रंगसंगतीने त्या क्षणांना रंगीबेरंगी केले आणि रेषांच्या सामर्थ्याने त्यात सजीवता ओतली असल्याने प्रत्येक पेंटिंग मास्टरपीस ठरले आहे. मला चित्रकलेच्या तांत्रिक ज्ञानापेक्षा हृदयाचा ठाव घेणारी चित्रे पाहणे, कलाकाराच्या मनःस्थितीचा अंदाज घेत त्याला त्या चित्रातून नेमके काय सांगायचे आहे याचा तर्कसंगत विचार करणे हेच आवडते. सामान्य माणसे चित्रातील उत्कट भाव पाहूनच हरखून जातात. परत परत त्या चित्राकडे येतात, हेच त्या चित्रकाराचे यश असे वाटते. अर्थात चित्रकलेचे यथातथा ज्ञान असल्याने एखाद्या उत्कृष्ट चित्रकृतीकडे दुर्लक्षही झाले असेल.

एकामागून एक दालने पाहून झाल्यावर मोनालिसाचे जगप्रसिद्ध चित्र कुठे आहे, हे विचारले. लूव्रला येऊन मोनालिसा पाहिले नाही, असे होऊ नये म्हणून प्रत्येकजण दक्षता घेतो आणि या दक्षतेपायी काही जण समोरील एखाद्या अतिसुंदर चित्राकडेही दुर्लक्ष करतात.

मोनालिसाचे चित्र लिओनार्दो-द-व्हिंसीची श्रेष्ठ कलाकृती मानतात. दुर्मिळतेमुळे ह्या चित्रास अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. बाकीची पेंटिंग्ज भिंतीवर लावलेली आहेत, परंतु या पेंटिंग्जभोवती कडेकोट बंदोबस्त आहे. शिवाय काचेच्या कपाटात बंदिस्त केल्यामुळे व त्या काचेवर पडणाऱ्या दिव्याच्या प्रकाशामुळे हे चित्र विशिष्ट ठिकाणी उभे राहूनच पाहिल्यास स्पष्ट दिसते. मोनालिसाचे ते अस्फुट, रहस्यमयी स्मित प्रथमदर्शनीच जाणवते.

मोनालिसाचे तैलचित्र पाहून परत एकदा आवडलेली पेंटिंग्ज पाहायला जाण्याची विनंती मी दानिएलला केली. दानिएल व पिअर खूष झाले. आपल्या राष्ट्राचे गौरवस्थान आपल्या पाहुण्याला आवडल्याचे पाहून त्यांच्या चर्येवर समाधान तरळले. त्यानंतर दानिएलने प्रत्येक चित्रांचे बारकावे तपशीलवार समजावून सांगितले. यामुळे आजही मला लूव्रमध्ये मी ती पेंटिंग्ज पाहातोय असा भास होतो. आयुष्यात परत या कलापंढरीत येऊ अथवा न येऊ– हा मिळालेला क्षण अखेरचा समजून सर्व आवडलेली पेंटिंग्ज परत पाहिली. चार तास कुठल्यातरी

दुसऱ्या विश्वात जाऊन स्वर्गीय आनंदाचा अनुभव घेतल्यासारखे भासले. त्या चित्रकला विभागातून पाय हलत नव्हता. त्या सर्वांची स्मृतिचित्रे हृदयात साठवून बाहेर पडलो.

लूव्रचे कलावैभव अनेक विभागांत, अनेक दालनांत सुबकपणे मांडले आहे. मानवी पुतळे बघणे हा एक नेत्रसुखाचा सोहळाच आहे. मानवी शरीरशास्त्राचा अभ्यास करून संगमरवरी दगडातून घडवलेले एकाहून एक सरस पुतळे आहेत. सौष्ठव, चेहऱ्यावरील भाव आणि पुतळ्याच्या ठेवणीतून प्रकट होणारे भाव या साऱ्यांचा एकत्रित विचार केला की समोरचा पुतळा सजीवच वाटतो. त्यात परत विशिष्ट प्रकाशयोजनेमुळे त्या पुतळ्याभोवती वेगवेगळे मूडही जाणवतात.

तसेच एक जुना किल्ला जागेवरून उचलून जशाचा तसा वसविला आहे. एका संग्रहालयात तटाच्या वेशी, प्रवेशद्वार, तटाभोवतीचा रस्ता, फुटकी गटारे, पडझड झालेली तीन मजली घरे जशीच्या तशी मांडली आहेत. या किल्ल्यातून फिरताना क्षणभर आपण विसरतोच की आपण लुव्रच्या एका दालनात आहोत. सूर्यप्रकाशाइतक्या प्रकाशयोजनेमुळे तर तटाच्या सावल्या सुद्धा दिसतात. याउलट किल्ल्यातील वाड्यात वेगळीच, परंतु अनुरूप प्रकाशयोजना. या सर्वांमुळे एका जुन्या किल्ल्यात फिरल्याचा अनुभव मिळतो. लुव्रच्या एका दालनात एखाद्या किल्ल्याचे प्रदर्शन मांडण्यास मूळच्या लूव्रच्या रचनेत किती बदल करावे लागले असतील. स्थापत्यशास्त्रापुढील अवघड आव्हानच आहे !

याशिवाय इजिप्तीशियन विभाग फारच मनोरंजक आहे. हे सारे कलावैभव जगाच्या विविध भागांतून, युरोपमधील इतर शहरांतून तसेच फ्रान्समधले मूळचे कलाकृती संग्रह यांतून उभे केले आहे. विकसित मानवाने उन्नत संस्कृतिदर्शक अनेक खाणाखुणा स्वतः प्रतिभेतून, अविश्रांत परिश्रमातून निर्माण केल्या आहेत. त्या वस्तुसंग्रहालये होत. अशा वस्तुसंग्रहालयांचा विस्तार, विविधता, मांडणी आणि सोई यांचा एकत्रित विचार केला, तर लूव्र हे पॅरीसच्या शिरपेचातील एक मूल्यवान तुरा मानावा लागेल.

विशेष म्हणजे पर्यटकांचे आकर्षण लूव्र आहेच, परंतु युरोपातील इतर संग्रहालयेही उत्कृष्टच आहेत. त्यातही दररोज नवनवीन कलावस्तूंची, दालनांची भर पडतेच आहे. त्यांच्या तुलनेत लूव्र कमी पडू नये म्हणून फ्रान्स सरकार व पॅरीसचे व्यवस्थापन सतत सतर्क आहेत. लूव्रच्या नूतनीकरणाचे अत्यंत खर्चिक व अवघड

काम वेगाने चालू आहे. आणि लूव्रमध्ये साऱ्याच चित्रकलाकृतींना वाव नसल्याने ओर्से रेल्वे स्टेशनचे रूपांतर एका अवाढव्य संग्रहालयात केले आहे. तात्पर्य, संग्रहालये अद्ययावत व आकर्षक ठेवण्याची जिद्द व तळमळ मादाम दानिएल व मि. पिअर यांच्या बोलण्यातूनही जाणवली. फ्रेंच संस्कृतीचा सकसपणा अजमावयाचा असेल तर तिथली संग्रहालये अवश्य पाहावीत.

लूव्रहून आम्ही तिघे कारने शांपिनीला परतलो. थोडा वेळ विश्रांती घेऊन थोडे खाल्ले. सार्ज व सार्जचा भाऊ ऑलिव्हे यांनी डेकवर त्यांचे आवडते गाणे मला ऐकविले. तेव्हढ्यात पिअरने सुचविले की "उद्या सोमवारपासून शांपिनी ते पॅरीस व परत असा प्रवास मेट्रोने करायचा आहे. तेव्हा आज आपण रेल्वेने पॅरीसला जाऊ व तेथून परत येऊ म्हणजे तुला सराव होईल" कल्पना एकदम पटली. मी, सार्ज व दानिएल आवरून चालत नजीकच्या SNCF च्या रेल्वे स्टेशनवर गेलो. तत्क्षणी एका कार्यक्षम रेल्वेयंत्रणेशी संपर्क आला आणि पॅरीस सोडेपर्यंत SNCF, RER, METRO व RATP या आद्याक्षरांशी दररोज संबंध आला.

# ट्यूबरेल्वे ऊर्फ मेट्रो. . .

पॅरीसच्या रक्तवाहिन्या म्हणजे पॅरीस शहराच्या उदरात दडलेले METRO, RER चे जाळे. या सर्व SNCF या राष्ट्रीय रेल्वेच्या भगिनी आहेत. संपूर्ण पॅरीस शहराच्या खाली ट्यूब रेल्वेची व RER ची एक वेगळीच दुनिया आहे, याची पॅरीस शहराच्या पृष्ठभागावर फिरताना यत्किंचितही कल्पना येत नाही. पॅरीसचे रूप जितके मोहक त्याहूनही रोमांचकारी, अशी ट्यूबरेल्वेची दुनिया आहे. इंद्रनगरीच्या वैभवाचा थाट असलेल्या मेट्रो स्टेशनात व रेल्वेत सोई व सौंदर्याची रेलचेल आहे की त्यातून प्रवास करण्यासाठी मी सदैव आसुसलेला होतो. कित्येकदा कारण नसतानाही पॅरीसच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत अनेकदा गेलो.

ह्या ट्यूब रेल्वेची स्टेशन्स जमिनीखाली दोन-चार मजले होतील इतकी खोल असतात. विशेष म्हणजे या स्टेशनाचे जमिनीच्या पृष्ठभागावरील प्रवेशजिने सहजासहजी लक्षात न येण्याइतके अनाकर्षक असतात. METRO असा फलक दिसला की, त्याजवळील जिन्यातून आत उतरले की कुठल्यातरी मेट्रोच्या स्टेशनात आपण प्रवेशतो. आत एक वेगळेच वातावरण असते.

पॅरीस शहराखाली मेट्रोचे जाळे आहे. याच्या काही शाखा सीन नदीखालूनही गेल्या आहेत, तर एक-दोन नदीवरून गेल्या आहेत. ट्यूबरेल्वे साधारणपणे ५-६ M-७ प्रकारच्या अत्याधुनिक डब्यांची गाडी असते. सुरक्षितता, सोय, वेग, वक्तशीरपणा, स्वच्छता, सेवा या सर्वांचा कळस म्हणजे ही ट्यूबरेल्वे. ह्या विजेवर चालतात आणि विजेचा पुरवठा रुळातून होतो हे विशेष. अर्थात त्यामुळे प्लॅटफॉर्म रुळावरून कोणीही बदलत नाही.

ट्यूबरेल्वे स्टेशन्सही छान असतात. अर्धवर्तुळाकार छत असते. समोरासमोर प्लॅटफॉर्म्स असतात. प्लॅटफॉर्मच्या टोकांना टी. व्ही. स्क्रीन असतात. त्यात ड्रायव्हरला प्रत्येक डब्यासमोरील दृश्य दिसते. प्लॅटफॉर्मच्या भिंतीवर अत्यंत

आकर्षक जाहिराती असतात. तसेच काही स्टेशनच्या भिंतींवर सुंदर अशी म्यूरल्स असतात. उदा. बॅस्टील स्टेशन, लुव्र स्टेशन. प्रवाशांना बसण्यासाठी रंगीबेरंगी खुर्च्या असतात. येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्यांची वेळ अंतराअंतरावरील इंडिकेटर्सवर प्रदर्शित केली जाते. पॅरीसियनांचे सुदैव म्हणजे ही सर्व इंडिकेटर्स चालू असतात. सर्वत्र विपुल प्रकाशयोजनेमुळे दिवसाचा भास होतो. जमिनीखाली असल्याने काही ठिकाणी शुद्ध हवेचा पुरवठाही केला जातो, तर हिवाळ्यात हिटर्सच्या साहाय्याने स्टेशन्स उबदार ठेवली जातात. कुत्री, भिकारी, बेघर, बेवारशी यांचा मागमूसही कुठे नसतो. तिकीट काढून प्रवास करणे हे राष्ट्रीय कर्तव्य सारेच राष्ट्र मानते. त्यामुळे तिकीट तपासनीस हा भीतिदायक प्रकार कुठेच आढळला नाही. दर ९५ सेकंदांनंतर एक गाडी असल्याने व ती खात्रीशीर वेळेवर येणार असल्याने प्रवासी समप्रमाणात विभागले जाऊन एखाद्या गाडीला फारच गर्दी होणे हा प्रकार घडत नाही. पीक अवर्समध्ये डब्यांची संख्या वाढवितात तर कमी गर्दीच्या वेळी डब्यांची संख्या कमी करतात. रविवारी तर मी दोन डब्यांची मेट्रोसुद्धा पाहिली आहे. तात्पर्य, प्रशासकीय निर्णयात लवचिकता असल्याने 'अखिल पॅरिस प्रवासी संग्राम समिती' अशा उग्र संघटना व त्यांची जोरदार निदर्शने, घेराव असले कार्यक्रम दिसले नाहीत.

मेट्रोगाडी ही चकचकीत व आकर्षक असते. आत मुंबई लोकलप्रमाणेच परंतु फोमचे आच्छादन असलेली आसने असतात. पंखे नसतात, 'खिडकीबाहेर डोकावू नका', 'धूम्रपान मना है ।', 'यह रेल्वे राष्ट्रीय संपत्ती है ।' अशा बोधप्रद किंवा प्रतिबंधात्मक सूचनाही नसतात आणि त्याची लसही प्रवाशांना सार्वत्रिकपणे टोचली जात नाही. उलट प्रत्येक दाराच्यावर रेल्वेमार्गाचा नकाशा विशिष्ट रंगात (हाच रंग नकाशातील मार्गावर असतो.) असतो. ह्याची दारे बंद झाल्याशिवाय रेल्वे सुरू होत नाही व रेल्वे थांबल्याशिवाय दारे उघडत नाहीत. त्यामुळे फुटबोर्डवरून पडून अमूक लोक ठार झाले, ह्या बातम्या वृत्तपत्रात नसतात. शिस्त ही जशी प्रवाशांना आहे, तशीच प्रशासनालाही आहे. त्यामुळे स्वच्छ स्टेशन, सुरक्षित व जलद सेवा, कमी प्रदूषण (ध्वनीचे व हवेचे) येथे शक्य झाले आहे.

जेव्हा इंडिकेटरवर मेट्रोच्या आगमनाची वेळ येते त्या वेळी प्रवासी सावध होतात व सरावाने प्लॅटफॉर्मवर जमतात. रेल्वे आवाज न करता अलगदपणे प्लॅटफॉर्मवर येते. डब्यातून उतरणारे दाराजवळ थांबतात. स्टेशन आले की आतले दाराजवळचे बटण दाबतात. गाडी पूर्ण थांबली की दार उघडते. प्रवासी चटकन

खाली उतरतात. ते उतरेपर्यंत प्लॅटफॉर्मवरचे प्रवासी दादर-डोंबिवलीकरांप्रमाणे 'हर हर महादेव'च्या भावनेने घुसत नाहीत. सर्व प्रवासी उतरले की मग चटकन आत चढतात. दार आपोआप बंद होते. तत्पूर्वी मंद आवाजात एक शिट्टी वाजते. ट्यूबरेल्वे डौलाने निघते, पुढच्या ९५ सेकंदांनंतर येणाऱ्या रेल्वेला जागा देण्यासाठी. आपल्या इथे हाच प्रसंग रणकंदन उडवून देतो. दादर-डोंबिवलीला लोकल येण्यापूर्वी प्लॅटफॉर्मवरचे प्रवासी सर्व शक्तिनिशी, प्राण तळहातावर घेतल्याच्या भावनेने थांबू पाहणाऱ्या लोकलच्या दारावर ज्या कराल निश्चयाने तुटून पडतात, तो आविर्भाव पॅरीसच्या प्रवाशांच्या चेहऱ्यांवर नसतो. तसेच चपलेचा अंगठा घट्ट धरून, हातातल्या पिशवीची मुस्कटदाब करून, शर्ट-पँटचा खिसा सांभाळीत जोरदार मुसंडी मारून थेट पलीकडच्या दाराजवळ गार वाऱ्यासाठी जागा पटकवायची जीवघेणी स्पर्धा पॅरीसच्या प्रवाशांच्या नशिबी नाही. याउलट मिळेल ती जागा स्वीकारून अथवा उभे राहून शांतपणे दोन घडीचा प्रवास करतात. स्त्रियांना अदबीनं जागा देतात. चुकून धक्का लागला तर पार्दोमस्य, पार्दो मादाम या मधुर शब्दांची किणकिण मात्र ऐकू येते. पुस्तक काढून वाचन अथवा वॉकमनचे इअरफोन कानाला लावून श्रवण यात पुढील टप्प्यापर्यंत वेळ व्यतीत करतात. डब्यात सर्वत्र फ्रेंच सेंटचा सुवास दरवळत असतो. फ्रेंच प्रवाशांचे हे दैनंदिन सौख्य हेवा वाटायला लावते.

अर्थात ही स्थिती गर्दीच्या वेळीच आढळते. कमी गर्दीच्या वेळी ह्या रेल्वेत तुरळक प्रवासी असतात. आख्ख्या प्लॅटफॉर्मवर तर कधीकधी २-३ प्रवासीसुद्धा असतात. एखादी स्त्रीप्रवासी सुद्धा असते. परंतु तिला पूर्ण सुरक्षितता वाटते. हे सामाजिक निरोगीपणाचेच लक्षण नव्हे काय !

अशा कमी गर्दीच्या वेळात आपल्या गलेलठ्ठ कुत्र्यासह प्रवास करणारेही आढळलेत. अर्थात फ्रेंच कुत्री गुपचूप, बाकाखाली, कोणताही उपद्रव न देता स्टेशन आल्याची मालकाने सूचना देईपर्यंत पडून राहतात. एखादा मुलगा सायकलीसह प्लॅटफॉर्मवर येतो आणि मेट्रोत सायकलसह येतो. असे 'वीर' बऱ्याचदा आढळले. काही तरुण गटागटाने बसून मेट्रोत आपसात दंगामस्तीही करतात, मात्र इतरांना कसलाही उपद्रव न देता.

एका मेट्रोतून दुसऱ्या मेट्रोत जाण्यासाठी सबवेचे चक्रव्यूह समजायला एक-दोन दिवस लागतात. तरी असंख्य फलकांतून मार्ग दिग्दर्शित केलेले असतात.

नवख्याला मात्र नकाशाच्या साहाय्यानेच मार्ग शोधावा लागतो. वर-खाली जायचे असेल तर सरकते जिने असतात. त्यामुळे सबवेतून जाताना फारसे श्रम होत नाहीत. स्टेशनाबाहेर पडायचे असल्यास SORTIE सोर्ती ह्या फलकाच्या निर्देशनाप्रमाणे जायचे. सबवेमध्ये भिंतींवर सुंदर व आकर्षक जाहिराती असतात. काही ठिकाणी तरुण-तरुणी वाद्यवृंद सादर करताना दिसतात, तर काही वेळा किरकोळ विक्रेतेही असतात. तिथे कुणाला विचारावे लागत नाही. इतके असंख्य बोर्ड असतात. मात्र बोर्ड व नकाशा याकडे दुर्लक्ष करता कामा नये, नाहीतर चक्रव्यूहात चकवा लागल्याप्रमाणे परत परत त्याच ठिकाणी आल्याचाही अनुभव आला आहे.

नाहीतर आपल्या इथे दादर सेंट्रलहून दादर वेस्टर्नला जाताना दहा वेळा विचारत जावे लागते. इंडिकेटर्स हमखास चालू असतीलच असे नाही. अमूक अमूक फास्ट ट्रेन यापुढे स्लो ट्रेन म्हणून जाईल. अमूक ट्रेन दहा मिनिटे उशिरा धावत आहे. अशा मुंबईकरांची सत्त्वपरीक्षा पाहणाऱ्या रेल्वेच्या सूचना पॅरीसकरांना सुदैवाने ऐकाव्या लागत नाहीत. ऐन वेळी रेल्वेचा (लोकलचा) प्लॅटफॉर्म क्रमांक बदलून जिने चढण्या-उतरण्याचा माफक व्यायाम प्रवाशांना देण्याची लहर मेट्रोला येत नसते. प्रवाशांच्या गैरसोईच्या नव्या नव्या युक्त्या शोधून त्यांची होणारी फजिती बघण्याइतकी विनोदबुद्धीही मेट्रोपाशी नाही. उलट प्रवाशांची सोय जितक्या तऱ्हेने करता येईल यासाठी झटणारी S N C F कुठे आणि दिवसाकाठी सरासरी सात प्रवाशांचे प्राण घेणारी मुंबईची लोकल व्यवस्था कुठे ? S N C F च्या अधिकाऱ्यांना एकदा डोंबिवली-दादर डबलफास्टने दाराजवळ लटकून प्रवास करायला लावून आमच्या असंख्य प्रवाशांची तळहातावरची 'लाईफलाईन' किती स्ट्रॉंग असते याचा प्रत्यय द्यावा, असे गमतीने वाटले.

अर्थात, प्रचंड लोकसंख्या, पुरेशा निधीचा अभाव, प्रवाशांची बेशिस्त, प्रशासनाची सहानुभूतिशून्य भूमिका अशा अनेक कारणांच्या दलदलीत आपण सापडलो आहोत.

उलट पॅरीसमध्ये रस्त्यावर ट्रॅफिकजामचे प्रकार फार वाढल्याने, मोटारींमुळे होणारे प्रदूषण वाढल्याने मोटारमालकांची प्रवृत्ती मेट्रोने प्रवास करण्याची आहे. त्यामुळे मेट्रोवरील वाढीव ताणाचा अगोदरच विचार करून मेट्रोने नव्या अत्याधुनिक डब्याची योजना, RER सारख्या अत्यंत जलदगतीने धावणाऱ्या भूमिगत रेल्वेची योजना राबवीत आहे. सुसंस्कृत समाजास साजेशी सुविधा, मुक्त


सुरक्षित प्रवास साधन म्हणजे पॅरीसची बहुगुणी मेट्रो होय.

या मेट्रोच्या स्टेशनाबाहेरील दृश्येही माझ्या स्मृतीवर कायमची कोरली गेलीत. काही मेट्रोस्टेशनाचा वापर सर्वाधिक झाला. ते मेट्रो स्टेशन म्हणजे ऑपेरा. या ऑपेरा मेट्रोस्टेशनवर उतरून जिन्याने पृष्ठभागावर आम्ही येऊन ऑपेरा ह्या नाट्यगृहासमोर जमत असू. हळूहळू या ऑपेरा परिसराचे आणि माझे जन्माचे नाते जडले.

o

# ऑपेरा. . .

काही शहरांतल्या काही स्थळांची नावे वापरून वापरून गुळगुळीत होतात. तरी त्या स्थळांच्या नावांच्या उच्चाराबरोबर बऱ्याच स्मृती जाग्या होतात आणि त्या निर्जीव शब्दाभोवती आपले भावनाविश्व गुंफलेले असल्याने अनामिक संवेदना अनुभवायला येतात. पुण्यातील डेक्कन जिमखाना, गिरगावातील ऑपेराहाऊस किंवा फोर्ट या नावांच्या उच्चाराबरोबर त्या स्थळांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची प्रकृती व त्या स्थळांशी आपले जडलेले नाते या सर्वांच्या संमिश्रणातून एक विलक्षण रसायन तयार झालेले असते. पॅरीसमधील ऑपेराबाबत माझे असेच होते. ह्या स्थळासंबंधीच्या असंख्य आठवणींचे मोहोळ मनात जेव्हा उठते त्या वेळी एक सुखद संवेदना सर्वांगातून सळसळून जाते. ह्या ऑपेराची स्मृतिचित्रे माझ्या हृदयावर इतकी खोलवर उमटली आहेत की, त्याच्या विस्मरणाऐवजी त्याचे स्मरण अनेकदा होते. मन व्याकूळ होते. पॅरीसचा निरोप घेताना, अनेक फ्रेंच मित्र-मैत्रिणींचे निरोप घेताना मनात जे काहूर माजले तितकीच बेचैनी २३ मे रोजी सायंकाळी ऑपेराचा निरोप घेताना आली.


Avenue de l'Opéra

काही स्थळांची खास वैशिष्ट्ये असतात. त्यांची प्रकृती विशिष्ट वेळीच खुलते.

मरीन ड्राईव्ह दिवसा फारसा आकर्षक वाटत नाही, परंतु रात्री दिवे लागले की मुंबईचा मणीहार म्हणवून घेतो. रात्री दिव्यांच्या झगझगाटात व गर्दीच्या महापुरात गिरगाव चौपाटी खुलून दिसते. परंतु तीच गिरगाव चौपाटी दिवसा मलीन वाटते. पॅरीसमधल्या ऑपेरा परिसराचे तसे नाही. तिचे दिवसा व रात्री, दोन्ही वेळची रूपे मोहकच वाटतात. किंबहुना दिवसाच्या प्रत्येक प्रहरी बदलणारे तिचे रूप मनस्वीपणे पाहिले की ऑपेरा हा परिसर सर्वांगसुंदरच वाटतो. एका फॅशनशोमध्ये एका सडपातळ बांधेसूद तरुणीस विविध वेषांत पाहिले होते. प्रत्येक वेळी तिचे सौंदर्य अफलातून वाटले. फॅशन शो संपल्यावर तीच तरुणी फेडेड जीन्स घालून, ऐटदारपणे पर्स व मान हलवीत जिन्यावरून गेली त्या वेळीही ती सुंदरच वाटली. याचे कारण ती मुळातच सुंदर होती. ऑपेरा परिसराच्या बाबतीत हेच आहे. हा परिसर मुळातच सुंदर आहे.

हा परिसर मुख्यत: जगातील सर्वांत मोठ्या 'ऑपेरा' ह्या थिएटरभोवताली आहे. एका बाजूला गॅलरी लाफायेत आहे. चोहोकडून रस्ते येथे येऊन मिळतात. हे थिएटर चार्लस गार्निए या जगविख्यात वास्तुशिल्पीच्या प्रतिभेतून सन १८७५ साली निर्मिले गेले. जगातील सर्वांत मोठ्या ऑपेरात २२०० आसनांची सोय असून त्याच्या भव्य रंगमंचावर एका वेळी ४५० कलाकार कलाविष्कार करू शकतात. याचे बाह्य रूप मला तरी आकर्षक वाटले. दर्शनी भाग बराच रुंद असून लांबलचक पायऱ्या मात्र त्या वास्तूच्या सौंदर्यात फारच मोठी भर घालतात. माणसाहून भव्य पुतळे दर्शनी भागात पर्यटकांचे लक्ष आवर्जून वेधून घेतात.

या थिएटरमध्ये जगातील उत्कृष्ट दर्जाच्या अभिजात कलाकारांनी आपली कला पेश करून रसिक पॅरीसियनाच्या पसंतीच्या टाळ्या घेतल्या आहेत. जगातील, विशेषतः युरोपमधील गाजलेल्या कलाकारांचे एक स्वप्न असायचे की त्यांच्या कलेला पॅरीसियनांनी दाद द्यावी आणि त्यासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य परिश्रमांनी भरून टाकले. ह्या ऑपेरानं असंख्य रसिकांच्या व अभिजात कलाकारांच्या रंगलेल्या मैफली, नृत्यनाट्ये, जलसे पाहिले आहेत. अमीर-उमरावांच्या घोडागाड्यांनी एके काळी हा परिसर गजबजलेला असायचा. फ्रान्सच्या बादशहाचा दिमाख काय वर्णावा ? तो घोडागाडीसह त्याच्या खास आरक्षित बाल्कनीत जात असे. असा वैभवशाली इतिहास ह्या वास्तूस आहे.

याच्या भोवताली रस्ते आहेत. समोर छोटेसे मोकळे मैदान आहे. त्याच्यामध्ये

ऑपेरा ह्या भुयारी रेल्वेचे प्रवेशजिने आहेत. आजूबाजूच्या रस्त्यांपलीकडे खास फ्रेंच नमुन्याच्या चार-पाच मजली आलिशान इमारती दिमाखाने उभ्या आहेत. हरतऱ्हेची दुकाने, हॉटेल्स, मद्यालये, ऑफिसेस, कार्यालये यामुळे ह्या इमारती रंगीबेरंगी दिव्यांनी नटल्या आहेत. भारतीयत्वाच्या खाणाखुणा असलेले एअर इंडियाचे टुमदार ऑफीसही ह्या परिसरात वेगळेपण दाखवीत उभे आहे. खास भारतीय शिल्पकृतींने नटलेले, भव्य शिसवी दरवाजा, वाकून नमस्कार करणारा एअर इंडियाचा महाराजा, भारतीय मंडळीने भरलेले ते कार्यालय नजरेस अनपेक्षितपणे पडले की भारतीय माणूस हरखून जातो. एकंदर हा परिसर रमणीय व पॅरीसच्या एकंदर सौंदर्याशी सुसंगत असाच आहे.

आमचा भारतीयांचा ग्रूप पहिल्या दिवशी ऑपेराजवळ जमला होता. पॅरीसची नवलाई त्याचक्षणी जाणवली. सकाळचे कोवळे ऊन पडले होते. ऑफिसला जाणारे स्त्री-पुरुषांचे लोंढे ऑपेरा मेट्रो स्टेशनाच्या प्रवेशजिन्याबाहेर उसळत होते. रंगीबेरंगी, विविध ढंगी वेषभूषेमुळे एखादे रंगीत कारंजे उसळावे तशी गर्दी उसळत होती. प्रत्येकाची वेळेआधी कार्यालय गाठायची धडपड. त्यामुळे एक विलक्षण लगबग सगळ्याच ठिकाणी दिसत होती. मिनिटाआड रस्ता ओलांडण्यासाठी रस्त्याच्या कडेला माणसे दाटीवाटीने हिरव्या सिग्नलच्या प्रतीक्षेत दिसायची. पादचाऱ्यांना हिरवा सिग्नल मिळण्यापूर्वी मोटारचालकांना लाल सिग्नल मिळायचा. सर्व मोटारी झेब्राच्या अलीकडेच उभ्या, त्यामुळे पादचारी त्वरित रस्ता पार करून जात. फ्रेंच स्त्रियांचे ऐटबाज चालणे निश्चितच कुणालाही आवडेल, परंतु झेब्रा क्रॉस करताना ऐट थोडी सुद्धा न मोडता वेगाने जाताना ह्या फ्रेंच स्त्रिया विलक्षण सुंदर दिसतात. त्यांच्या लगबगीतही एक लय असते, एक ऱ्हिदम असते, एक ग्रेस असतो, मंद वाऱ्याच्या झुळकीनं लवलवणाऱ्या वेलीच्या हालचालीचा भास असतो. पुरुष मात्र एका हातात ब्रीफकेस, एक हात कोटावर अशा तऱ्हेने रुबाब कणभरही कमी न करता रस्ता ओलांडतात. झेब्रा ओलांडताना एखाद्या परिचितास स्मितपूर्वक बोंझूर म्हणण्याचे भानही राखले जाते.

हे सर्व मीच काय, माझ्यासारखे असंख्य पर्यटक ऑपेराच्या प्रशस्त व लांबलचक पायऱ्यांवर बसून एकटक पाहत सिगारेटचे झुरके घेत अथवा सँडवीच, चॉकलेटचे लचके घेत, आपला सकाळचा वेळ सार्थकी लावीत असतात. पर्यटक अनेक प्रकारचे. ऑपेराच्या सर्वांगाचे कौतुकाने निरीक्षण करीत असतात. आणि

ऑपेराच्या पार्श्वभूमीवर आपले छायाचित्र घेण्यास विसरत नाहीत. काही तरुण विमनस्क अवस्थेत स्वतःच्याच तंद्रीत तासन् तास बसून असतात. काहीसे गचाळ व अस्वस्थ असतात. पण खोलवर विचार केला तर त्यांची एक वेगळीच दुनिया असते. त्यात आपण नसतो. त्यामुळे ते आपल्याला परके वाटतात.

सकाळची वेळ ऑपेराच्या सहवासात प्रसन्न व टवटवीत वाटते. मुळात सकाळच्या वेळी उत्साह, उल्हास पुरेपूर असतोच, त्यात ऑपेराच्या परिसरात सकाळच्या वेळेला रुपेरी कडा येते. त्यात एखादी प्रचंड आकाराची 'क्रासबोहरर सेत्रा' ही प्रचंड प्रवासी बस आली की त्यातून पर्यटकांची एक टोळीच कॅमेरे, व्हिडिओ कॅमेरे सरसावत ऑपेराच्या पायऱ्यांवरून धावतच वर येते. ऑपेराच्या चोहोबाजूने भराभर फोटो काढून गटागटाने आपले फोटो काढते. एखाद्यास आपण सहजपणे बोन्झूर मस्य अथवा बोंझूर मादाम स्मितपूर्वक म्हटले की कमरेत वाकून गुडमॉर्निंग म्हणणार आणि जाताजाता हात किंचित उंचावून बाय बाय करणार. ग्रामदेवतेच्या उत्सवात जसे आपण येणाऱ्या-जाणाऱ्याला खिरापत वाटतो तसे सगळेच येणाऱ्या-जाणाऱ्याला आनंद वाटत असतात. आनंदाची ही उधळण मुक्तहस्त चाललेली असते. क्षणभर वाटले, आपल्या देशात बिनमोलाचे स्मित करायला आपण एवढे आढेवेढे का घेतो ?

हाच ऑपेरा सायंकाळी सरड्यासारखा एकदम रंग बदलतो. सकाळचा साज आता बदलतो. ह्याचा परिसर माणसांनी इतका फुललेला असतो की क्षणभर दादरच्या रानडेरोडसारखा, पुण्याच्या लक्ष्मीरोडसारखा, सोलापूरच्या नवीपेठेसारखा भासतो. उत्साहाचे, सळसळत्या तारुण्याचे फवारे उडू लागतात. यात भर म्हणजे वाहनांची गर्दी शिगेस पोहोचते. आता इथले चलनवलन क्लायमॅक्सला पोहोचलेले असते. लोकलमधून येणाऱ्या प्रवाशांमुळे जसा व्हीटीसमोरचा रस्ता दुथडी भरून वाहतो तसा हा परिसर दिसू लागतो आणि काही क्षणांत ही सर्व गर्दी मेट्रोच्या प्रवेशद्वारातून गडपही होते. हे लयबद्धपणे चालू असते. आश्चर्य म्हणजे आरडाओरडा, गलका, हॉर्नचे आवाज नसल्याने सर्व दृश्य सायलेन्सर बसविल्याप्रमाणे केवळ दिसते, ऐकू येत नाही.

चौकातील पोलिस स्थितप्रज्ञासारखा हातात शिट्टी घेऊन उभा असतो. सारे विलक्षण शिस्तीत यंत्रवत चाललेले असल्याने शिट्टी त्याच्या हातातच राहते. त्यामुळे तो वाहतूक नियंत्रण करीत असतो, असे म्हणण्यापेक्षा रस्त्याच्या कडेला

उभा राहून शांतपणे वाहतूक न्याहळत असतो. फेरीवाले, फूटपाथवर हरेक माल दोन रुपयेमें वाले, हातगाड्या रस्त्याच्या कडेला लावून त्यांवर ताणून देणारे हमाल, सर्कशीतल्या कसरती करणारे रिक्शावाले, सायकलींवर सहस्रलीला करणारे सायकलस्वार, रस्त्याच्या मधोमध फतकल मारून बसणाऱ्या गलेलठ्ठ गोमाता यांच्यापैकी कुणीच रस्त्यावर नसल्याने वाहतूक विशिष्ट वेगाने शिस्तीत सरकत असते. सायकलस्वारावर रिक्शावाल्याने, रिक्शावाल्यावर पीएमटीचालकाने आणि पीएमटीचालकावर बेदरकार पादचाऱ्याने आक्रमण करावे ह्या वाहतूक संस्कृतीचा अजून इथे प्रसार न झाल्याने पोलिसास काही काम नसावे असे वाटते. परंतु हे पोलिस नागरिकांना, पर्यटकांना, छोट्या मुलांना, वृद्धांना किंवा कुणाही गरजूला हसतमुखाने, प्रसंगी चेष्टामस्करी करीत मदतशील आढळतात. एखादे छोटेसे पोर पोलिसाची शिट्टीही मागून घेते. स्त्रियासुद्धा पोलिसांशी निःसंकोचपणे बोलत उभ्या दिसतात. एकंदर ऑपेराच्या परिसरात 'स्वारगेट पोलिस स्टेशन' किंवा 'पलटन रोड पोलिस स्टेशन' या धर्तीवर 'ऑपेरा पोलिस स्टेशन' असा बोर्ड दिसला नाही.

फूटपाथ केवळ पादचाऱ्यांसाठीच असल्याने, फूटपाथवर हरतऱ्हेच्या वस्तू विकणारे नसल्याने, ऑपेरा परिसरास तुळशीबागेसारखा तोंडवळा आलेला नाही. सायंकाळच्या वातावरणात बऱ्याच जणांच्या चर्येवर व हालचालींत काहीसा संथपणाही आढळतो. ही मंडळी कॅफेसमोरील मांडलेल्या खुर्च्यांवर बसून मद्याचे भरलेलं पेले टेबलावर ठेवून सिगारेटचे झुरके निवांतपणे घेत रस्त्यावरच्या रहदारीचे निरीक्षण करीत असतात. चेहरे प्रसन्न. क्वचित हसरे; पण दुर्मुखलेले, चिंताग्रस्त मुळीच नाहीत. त्यामुळे ऑपेरा परिसर सायंकाळी विलक्षणरीत्या नाट्यमय बनतो. ऑपेराचे सायंकाळचे रूप मला फार आवडले.

हाच ऑपेरा परिसर दुपारच्या वेळी आणखी वेगळ्याच मूडमध्ये असतो. वाहतूक तुरळक होते. पादचारी कमी होतात. मेट्रोंना फारशी गर्दी नसल्याने माणसांचे थवे दिसत नाहीत. ऑपेराच्या पायऱ्यांवर दोन-चार पर्यटक, भर उन्हाळ्यात दुपारी झाडाच्या सावलीत जसे पक्षी शांतपणे फांदीवर बसतात, तसे निवांतपणे बसलेले असतात. अशा वेळी ऑपेरा परिसर शांत वाटतो. सुनासुना वाटतो. मी अशा क्षणी बराच वेळ पायऱ्यांवर बसून तुरळक रहदारीकडे, त्यातल्या स्त्री-पुरुषांकडे अधिक बारकाईने पाहत बसायचो. त्यांचे वागणे, चालणे, आविर्भाव


आणि विकार यांचे निरीक्षण करण्यास सवड मिळे. तेव्हा या दुपारच्या निवांत वेळीही ऑपेरा परिसर मला आवडला.

माणसांचे अनेकविध नमुने विविध मूड्समध्ये, हालचालींमध्ये न्याहाळणे, त्यांच्या बाह्य दर्शनावरून अंतरंगाचा ठाव काढणे मला फार आवडते. क्षणाक्षणाला ऑपेराभोवतालचे बदलते कॉंपोझिशन मनात साठवायला बरे वाटते. स्थळ अथवा जागा एकच, परंतु दिवसाच्या भिन्नभिन्न प्रहरी त्याचे रंगरूप किती नाट्यमयरीत्या बदलतात. मूड्स कसे बदलतात, प्रकृती कशी बदलते ह्याचा अभ्यास हा फावल्या वेळातला तरी मनाला रिझवणारा एक खेळ आहे, एक सकस करमणूक आहे. त्याचा पुरेपूर प्रत्यय येथे आला. ऑपेरापरिसर कधी युवतीप्रमाणे अवखळ तरी आकर्षक वाटतो, तर कधी मध्यमवयीन पुरुषासारखा धीरगंभीर, तर खट्याळ मुलासारखा क्षणाक्षणाला रूप बदलणारा भासतो, तर क्वचित वृद्धासारखा शांतही दिसतो. ऑपेराचे प्रत्येक रूप मी मनाच्या कप्प्यात साठवत गेलो.

ऑपेरा थिएटरात एखादे भव्य नृत्यनाट्य अथवा संगीताचा भव्य कार्यक्रम पाहून व युरोपीय कार्यक्रमांची श्रेष्ठता अनुभवायची होती. दररोजच्या भरगच्च कार्यक्रमामुळे ते जमले नाही. युरोपमध्ये 'स्टेजप्रोग्राम' अप्रतिम असतात व ते त्या ऑपेरात घडत असतात हे माहीत असूनही काही कारणांनी त्या कार्यक्रमांचा व ऑपेराच्या अंतरंगाचा आस्वाद घेता आला नाही. शिवाय असे कार्यक्रम महागडेही असतात त्यामुळे तुटपुंज्या डॉलर्सच्या विचाराने, असे कार्यक्रमही बघता आले नाहीत.

परंतु ह्या ऑपेरा थिएटरबाहेर भव्य नेपथ्यासह जगातला सर्वांत मोठा, प्रदीर्घ 'ऑपेरा' विनामूल्य मी दररोजच पाहत होतो.

# आयफेल टॉवर



The Champ de Mars from the Trocadero Gardens

रसायनशास्त्रात मूलद्रव्यांना जशा संज्ञा असतात त्याच धर्तीवर प्रत्येक शहरासही एक संज्ञा असते. पर्वती म्हटले की पुणे, राजाबाई टॉवर म्हटले की मुंबई, स्टेट एम्पायर म्हटलें की न्यूयॉर्क तसे आयफेल टॉवर म्हटले की पॅरीस आपोआप स्मरते. किंबहुना पॅरीस शब्दापाठोपाठ कुणाच्याही जिव्हेवर आयफेल टॉवर हाच शब्द येईल. इतके त्या आयफेल टॉवरचे व पॅरीसचे घनिष्ठ साहचर्य आहे. जवळजवळ एक शतक. वादळवाऱ्यांना, युद्धांना, इतकेच काय, खुद्द पॅरीसियनांच्या प्रखर टीकेला तोंड देत, ७००० टनांचे प्रचंड ओझे पेलत कोट्यवधी रसिकांना आपल्या उंचीने व सौंदर्याने हर्षभरित करीत आहे. शाळेच्या पुस्तकातले आयफेल

टॉवरचे चित्र अनेकदा बालसुलभ वृत्तीने पाहिले होते. जाहिरातीत, चित्रपटांत, मासिकांतून आयफेल टॉवरचे छायाचित्र पाहून देखील कित्येकदा हरखून गेलो होतो. तो टॉवर प्रत्यक्ष पाहायला मिळणार या भावनेनेच मनात गोड गुदगुल्या होत होत्या.

पॅरीसमध्ये एअर इंडियाने उतरताना विमान जेव्हा पॅरीसवर घिरट्या घालत होते तेव्हा खिडकीतून आयफेल टॉवर दिसते का यासाठी आटोकाट प्रयत्न करीत होतो. तो जेव्हा अंधुकपणे दिसला त्या क्षणी अंगावर रोमांच उभे राहिले आणि भाबड्या मनाला खात्री पटली की, आपण आता पॅरीसला आलो. आपण मुळात प्रवासच फार कमी करतो त्यामुळे अमुक अमुक गाव, स्टेशन आले यावर अंतर्मनाचा त्वरित विश्वासच बसत नाही. त्या गावातील एखादी चिरपरिचित खूण, व्यक्ती, इमारत, नदी, डोंगर प्रत्यक्ष चक्षूस दिसत नाहीत तोपर्यंत आपण ते गाव, स्टेशन यायचे आहे ह्याच गाढ विश्वासात असतो. तसेच माझे झाले. 'नाऊ वुई आर लँडिग ऑन शार्ल द गोल इंटरनॅशनल एअरपोर्ट ऑफ पॅरीस' अशी अधिकृत घोषणा भारतसरकार अंगिकृत एअर इंडियाने दोनदा सांगून देखील खाली दिसणारे शहर पॅरीसच आहे हे मनास पटेना. निवेदनावर पूर्ण अविश्वास दाखवून जेव्हा मान वाकडीतिकडी करून खिडकीतून आयफेल टॉवर दिसले त्या क्षणी 'हेच ते पॅरीस' असा अंतर्मनाने निर्वाळा दिला व नकळत देशी संस्कारांनुसार शेजाऱ्यास ऐकविले "पॅरीस आलं बरं का." अर्थात तो सराईत प्रवासी असल्याने त्याने माझ्या महान शोधाबद्दल मिस्कील हास्य केले.

खरं तर आपल्या मध्यमवर्गीयांचं मानसशास्त्रच और आहे. प्रवास सुरू झाल्यापासून पॅरीस कधी येणार, ह्या कुतुहलमिश्रित चिंतेतच प्रवास संपवितो आणि प्रत्यक्ष पॅरीस आल्यावर प्रवास संपल्याची खंत मनात कुठेतरी खोलवर डाचत असते. एकंदर प्रवासाची, मग ती कुठल्याही स्वरूपाची असो, मौज क्षणाक्षणाला सग्यासोबत्याबरोबर कणाकणाने लुटण्याचे बाळकडू दिले न गेल्याने प्रवासातील अत्यंत मौलिक क्षण कायमचे निसटून जातात. माझेही थोडेफार असेच झाले. परंतु पुढे स्वानुभवाने बरेच काही शिकलो.

अशा त्या बहुचर्चित, रोमँटिक आयफेल टॉवरला पर्स्पेक्टिव्ह असीयेनच्या उत्साही फ्रेंच मंडळींबरोबर भेट द्यायला निघालो तो क्षण अजूनही ताजाच आहे. ही फ्रेंच मंडळी गाईडप्रमाणे मोजकीच परंतु तुटक माहिती देणारी नव्हती तर एका

जगप्रसिद्ध स्थळी आम्हाला भक्तिभावाने हात धरून नेणारी होती. आपला मुंबईचा मामा जसा प्रेमळपणाने चौपाटी, गेटवे ऑफ इंडिया दाखवितो, त्याच आपुलकीने ही फ्रेंच मंडळी आम्हाला आयफेल टॉवरला घेऊन आली होती.

१८८९ मध्ये पॅरीसला भरलेल्या जागतिक औद्योगिक प्रदर्शनात फ्रेंच स्थापत्य शास्त्राने जगाला दिपवून टाकण्यासाठी आयफेल या इंजिनियरने ३०० मीटर (९८४ फूट) उंचीचा अजस्त्र लोखंडी मनोरा उभा करण्यास सुरुवात केली आणि जगातील सर्वांत उंच व नावीन्यपूर्ण मनोरा साकारला. त्या क्षणी आयफेल आनंदातिशयाने म्हणाला, "जगातील सर्वांत उंच ध्वजस्तंभ असल्याचा दिमाख फक्त माझ्या मातृभूमी फ्रान्सलाच राहील." अर्थात जगात त्यानंतर इतरत्र स्कायस्क्रॅपर्स व दूरसंचार मनोरे ह्याहूनही उंच श्रेणीत बांधले गेल्याने आयफेलचा अभिमान तात्कालिक जरी ठरला तरी आयफेल टॉवरभोवतालची रोमांचकता किंचितही कमी झाली नाही. रसिकांच्या मनातील आयफेल टॉवरसंबंधीच्या कौतुकपूर्ण प्रेमाची उंची इतर मनोऱ्यांना कदापि लाभली नाही.

जगात अभिमानाने मिरवावे अशा प्रचंड, उंच, कलात्मक आयफेल टॉवरला फ्रेंच स्थापत्यशास्त्रज्ञ, लेखक, कवी व नागरिकांनी सुरवातीला तीव्र टीकेचे लक्ष्य केले होते, हे विसरता कामा नये. अर्थात पुढे ह्याच टॉवरवर लेखक, कवींनी फिदा होऊन लेखन-काव्य निर्माण केले. आयफेल टॉवरचा परिसर अतिशय रम्य आहे. एका बाजूला जवळजवळ एक किलोमीटर लांबीची व शंभर मीटर रुंदीची लॉनयुक्त बाग आहे. त्याकडेला उंच झाडांची रांग आहे. बागेतील लॉन चौरस तुकड्यांत विभागले गेल्याने जमिनीवरून ही बाग अतिसुंदर व विशाल दिसते. आयफेल टॉवरच्या पुढील बाजूस सीन नदीचे पात्र व त्यावर मोठा रुंद असा पूल आहे. पुलापलीकडे अर्धवर्तुळाकार भव्य व देखणा राजवाडा आहे. त्या राजवाड्यासमोर नयनमनोहर अशी कारंजी आहेत. एकंदर प्रयत्नपूर्वक आयफेल टॉवरचा परिसर अत्यंत रमणीय केला आहे. घनदाट झाडीमुळे आपण एखाद्या शहरात आहोत, हे क्षणभर विसरतोही.

आयफेल टॉवरजवळ जसे आपण पोहोचतो तत्क्षणी त्याच्या भव्यपणापुढे शरणागतीच पत्करतो. त्याचा तळ पाच-सात हजार माणसांचा जमाव आरामशीर बसू शकेल इतका विस्तृत आहे. त्याच्या तळाच्या कमानी अत्यंत भव्य व ५० मीटर (१६० फूट) उंच आहेत. आधाराच्या चार खांबांमध्येच तिकीट कार्यालये, स्नॅकबार

व लिफ्टरूम आहेत. इथे देशोदेशीच्या हजारो पर्यटकांचा जणू कुंभमेळाच भरलेला असतो. विशेषतः शाळकरी मुले व तरुण-तरुणींचा भरणा अधिक असतो. रंगीबेरंगी कपडे, बॅगा, खळाळणारे हास्य, अवखळपणा तसाच खट्याळपणा या साऱ्यांमुळे लोखंडी आयफेल टॉवरला एक चैतन्य प्राप्त होते. शाळकरी मुलेमुली, तरुणीतरुणी मुद्दाम गंमत म्हणून हा टॉवर नागमोडी पायऱ्यांनी चढतात, तर काही हौशी प्रवासी ८ F चे तिकीट काढून लिफ्टने वर जातात. मी आयफेल टॉवरवर एकदाच लिफ्टने ३५ F तिकीट काढून गेलो. त्यानंतर मात्र पायीच गेलो आणि एक अनुपमेय आनंद मिळविला. पहिला मजला ५४ मीटर उंच आहे. तेथून पॅरीसचे विहंगम दर्शन हा कुणाच्याही आयुष्यातला अविस्मरणीय क्षण असतो व तो सर्वांच्याच डोळ्यांत चमकताना दिसला. छोटी मुले दुर्बिणीत २ F टाकून तर काहीजण बायनाक्यूलरने सभोवतालचे निरीक्षण करतात. साध्या डोळ्यांनी दिसणारे पॅरीसचे रूप अप्रतिम आहे. सर्वत्र सरळ रेषेतील भव्य व रुंद रस्ते, भव्य बागा व लॉन, सीन नदीची वाकदार वळणे, हिरवीगार बुलेवार्डस् हे सारे डोळ्यांत साठवत कित्येक क्षण स्तब्ध उभा राहिलो. 'पॅरीस अॅट ए ग्लास' - 'दृष्टिक्षेपात पॅरीस' - आपण अनुभवू शकतो. एखादे शहर शहरातील रस्त्यावर फिरताना छान वाटते, परंतु तेच उंचावरून पाहिल्यास चांगले दिसेलच असे नाही. परंतु पॅरीसची रचना करतानाच १४ व्या लुई पूर्वी व नंतर आजतागायत साऱ्यांनीच पॅरीसची व त्याच्या विकासाची काळजी घेतल्याने आयफेल वरून पॅरीस चित्रसदृश Picturesque दिसते. मुंबईला एखादा असा टॉवर बांधला, तर त्यावरून झोपडपट्ट्यांसह दिसणारे ओंगळवाणे दृश्य बघवणारे नसल्याने तो टॉवर फक्त खालून बघण्यासाठीच ठेवावा लागेल. वरून खाली बघण्यास मनाई करावी लागेल. शहरे आपल्या राष्ट्राची वैभवस्थाने, गत इतिहासाचे मूक साक्षीदार आहेत, भावी पिढ्यांना प्रेरक आहेत, ही भावना मनोमन बाळगून त्यांच्या इंचन्इंच भागाच्या सौंदर्यासाठी झटणारे फ्रेंच कमालीचे रसिक व राष्ट्राभिमानी वाटले.

आयफेल टॉवरच्या दुसऱ्या मजल्यावर गेल्यावर पॅरीसचा आणखी अधिक विस्तार दृष्टिक्षेपात येतो आणि मन भराऱ्या मारू लागते. अक्षरशः स्वर्गीय आनंद त्या क्षणी असतो. १०४ मीटर म्हणजे ३४० फुटांवरून इतके सौंदर्यपूर्ण दर्शन होते, तर ३०० मीटरवरून कसा अनुभव येईल ? खरे तर ह्या उंचीवरूनच खाली वाकून बघितले तर पोटात गोळा उठतो, ३०० मीटर उंचीवरून काय अवस्था होईल याची

कल्पनाच १०४ मीटर उंचीवरून असह्य वाटते. अर्थात त्या उंचीवर ८० F देऊन जाणारेही असतात. मला त्या उंचीवरून दिसणारे पॅरीस आणि त्या मजल्यावरील छोट्या शाळकरी मुलामुलींचा मंजुळ गलका, तरुण-तरुणींचे उत्कट प्रेमाचे आविष्कार आणि या सर्वांकडे कौतुकाने बघणारे प्रौढ हे सारे अनुपमेय भासत होते. एखाद्या अलौकिक स्थळी जाणे आणि तिथल्या अलौकिकत्वाने दिपून गेल्याच्या भावनांचे विविध छटांमधील भावमुद्रा पाहण्याचे वेड असल्याने मला आयफेलच्या दुसऱ्या मजल्यावरून हलावेसे वाटेना.

तिथल्या छोट्या मुलांच्या हातांत कॅमेरे, चॉकलेट असत. ती छोटी छोटी मुलंही कोणत्या अँगलमधून फोटो चांगला येईल यासाठी त्या मजल्याच्या सर्व जागा हिंडून पाहत. एवढ्या छोट्या वयात सौंदर्यदृष्टीची जाण असावी, हे सुखद आश्चर्याचा धक्का देऊन गेले. तिथल्या हॉटेलांत, फुटकळ विक्रीच्या दुकानांत मुलंमुली बिनदिक्कतपणे पदार्थ, वस्तू खरेदी करीत असतात. परंतु न विसरता पैसे देताना व नको असलेली वस्तू परत जागेवर नीट ठेवताना त्यांचा प्रामाणिकपणा मनाला स्पर्शून जातो. शिर्डीला साईबाबांच्या, तिरुपतीला बालाजीच्या धातूच्या, प्लॅस्टिकच्या सुबक मूर्ती, स्टीकर्स, कीचेन्स विक्रीस असतात, त्याप्रमाणेच येथे आयफेल टॉवर्सची सुबक छोटीमोठी मॉडेल्स, स्टीकर्स, कीचेन्स यांची रेलचेल होती. सहलीतील मुलेमुली त्यावर तुटून पडायची. विक्रेती महिला अत्यंत ममत्वाने त्यांना काय पाहिजे, काय नको यांची चौकशी तर, करायचीच, परंतु एखाद्या मुलास एखादी वस्तू आवडली नाही म्हणून त्यानं जर नाक मुरडून वस्तू परत ठेवली तरी ती महिला विक्रेती त्याची कनवाळूपणे समजूत घालायची आणि त्याच्या पाठीवरून हात फिरवून चौकशी करायची. हे सगळं नेत्रसुख अनुभवत दुसऱ्या मजल्यावर बराच वेळ मी व्यतीत केला आहे.

खाली उतरताना जिने नागमोडी व लोखंडाचे आहेत. त्यांवरून ही मुलेंमुली न घाबरता, बेडरपणे झपाझप उतरायची. त्यांची धाडसी व बिनधास्त वृत्ती अशी हळूहळू जोपासली जाते. सौंदर्यदृष्टीस धाडसीपणाची साथ असल्यावर जगातली सर्व सुंदरता आयुष्यात पाहण्याची वृत्ती वाढीस लागते त्यामुळेच हे फ्रेंचच काय पण इतर पाश्चिमात्यही जगभर पर्यटनासाठी भ्रमंती करीत असतात. आयफेलवर गेल्यावर मनातले विचार सैरभैर होतात. नाना विचार उत्कटपणे मनात येतात. मनास एका प्रगल्भतेचा अनुभव येतो.

आयफेल टॉवरच्या खाली बसण्यासाठी बाके ठेवली आहेत. बरीच वृद्ध मंडळी त्यांवर शांतपणे विसावलेली असतात. सभोवताली आनंदाचे कल्लोळ उठत असतात. तारुण्य सळसळत विविध आविष्कारांत प्रकट होत असतं. याकडे प्रसन्नपणे पाहून आपल्या आयुष्याच्या संध्याकाळीही तारुण्याचा अनुभव घेत असतात. शांतपणे बसून कोकचे अथवा टीनमधून बीअरचे घोट घेत कित्येक तास बसणारे तरुण-तरुणीही पाहिलेत. त्यांची विमनस्कता, नैराश्य सहजपणे जाणवते. प्रचंड समृद्धीस ही एक एखादी दुःखद छटाही असते.

आयफेल टॉवर जर हवामान स्वच्छ असेल तर ६७ किमी अंतरावरूनही दिसतो किंवा टॉवरवरून तेवढ्या टापूतला भूभाग दिसतो. वाऱ्यामुळे जेव्हा हा टॉवर हलतो तेव्हा तो १२ सेंमी इतका टोकाला हलतो आणि तापमानाच्या फरकामुळे ह्याची उंची १५ सेंमी किंवा ६ इंचापर्यंत वाढू शकते. ह्याचा सेफ्टी फॅक्टर हा जगातील सर्वात अत्युच्च मानला जातो इतके भक्कम बांधकाम केले आहे. २५ लक्ष रिव्हेट्सनी याची जुळणी केली आहे. मध्यंतरी याच्या रचनेतले ज्यादा असलेले लोखंड कमी केले. ज्या कंत्राटदाराने ते काम केले त्याने त्या लोखंडातूनच आयफेल टॉवर्सच्या प्रतिकृती करून विकून लक्षावधी फ्रँकची संपत्ती मिळविली.

आयफेल सारेच बघतात, आयफेलवरून पॅरीस प्रत्येक जण बघतो, परंतु फ्रान्स मित्र मंडळाच्या सदस्यांना पर्स्पेक्टिव असिएनच्या सदस्यांनी आयफेलवरून पॅरीस इतक्या तपशिलात शिरून सांगितले की तेवढी माहिती साधारण प्रवाशांना मुळीच नसते. ला दिफाँ (La de defensc) मधील प्रचंड कमान, आर्क द् त्रूंफ व लूव्र यांचा अक्ष कसा एकच आहे ही विलक्षण रचना आयफेलवरून जितकी सहज समजते तशी इतर स्पष्टीकरणांनी समजणार नाही. रेडिओ फ्रान्सची इमारत, युनेस्कोची इमारत, लूव्र, आर्क द त्रूंफ, बॅस्टिल, प्लास द कॉंकॉर्ड, नोत्रदाम, ऑपेरा, लॅटिन क्वार्टर, सीन नदीची वळणे, इनवालिद आणि कित्येक स्थळे पक्ष्याच्या नजरेनं पाहाण्याचं भाग्य फ्रेंच मित्रांमुळे मिळालं. संपूर्ण पॅरीसची ठेवण, दिशानिदिशांचे सम्यकज्ञान झाल्याने पुणे जसे आपल्याला दक्षिणोत्तर व पूर्वपश्चिम चांगलेच ठाऊक आहे तसे पॅरीसच्या बाबतीत झाले होते. त्यामुळे मी पॅरीस शहर मेट्रो, बस व पायी यांनी जवळजवळ ९०% पाहिले याचे सारे श्रेय आयफेलने दिलेले पॅरीसचे विहंगम दर्शन व फ्रेंच मित्रांनी सांगितलेले सारे तपशील यांना मी प्रांजळपणे देतो.

# फॅशन शो. . . .

पॅरीस तसे रंगेलपणाबद्दल प्रसिद्ध किंबहुना पॅरीस या नावातच रंगेलपणाचा वास येतो. सेंटचा खुशबू रंगेलपणा आणखीच भडक करतो. त्यामुळे पॅरीसमध्ये नाईटक्लब्ज, सेक्स शॉप्स वारेमाप असावीत आणि प्रत्येक पॅरिसियन हा प्रत्येक चतुर्थीला आपण गणपतीला जावे तसा नेहमीच नाईटक्लब्जमध्ये जात असावा, असा समज बऱ्याच जणांचा आहे मला पहिला धक्का बसला की पॅरीसमध्ये नाईटक्लब्जना न गेलेलेही अनेक आहेत. माझ्या यजमानाने अजूनही नाईट क्लब पाहिला नव्हता. अर्थात नाईटक्लब्जना भेट देणे, चार तास विरंगुळा करून घेणे म्हणजे चारित्र्याला कलंक लागला, अशा खुळचट कल्पनाही तिथे नाहीत हे स्पष्ट केले पाहिजे. अर्थात अशा ठिकाणी पैसे दणकून मोजावे लागतात आणि येथे जाणाऱ्यांत पर्यटकांचेच प्रमाण जास्त असते. माझ्या यजमानाने त्याच्या पत्नीसमोर नाईटक्लबचे लाजत लाजत परंतु साभिनय वर्णन केले, ते वर्णनात रंगलेत हे पाहून मादाम दानिएल चटकन विषय बंद करीत म्हणाली, "दे आर व्हेरी एक्स्पेंसिव."

अर्थात पर्स्पेक्टिव्ह असिएनने फॅशन शोसाठी खास वेळ राखून ठेवली होती व जगविख्यात Fete Du printemps या फॅशन शोला कार्यक्रम पत्रिकेवर ठळक स्थान दिले होते. आदल्या दिवशी घरोघर परतताना फ्रेंच मित्रांनी दुसऱ्या दिवशी फॅशन शोला जायचे आहे याची आवर्जून आठवण तर करून दिलीच, परंतु 'इटस् अ गुड प्रोग्रॅम यू मस्ट नॉट मिस ईट' अशी शिफारसही केली.

पॅरीसमधील फॅशन शो अप्रतिम असतात. हजारो पर्यटकांना आकर्षित करून आपल्या तयार कपड्यांची नावीन्यपूर्ण जाहिरात करतात. पृथ्वीवर रंभा, उर्वशी, मेनकादी अप्सरांसह स्वर्गाचा भास व्हावा, असे हे फॅशन शोज बघण्यासारखे असतात. आम्ही सर्व नऊ वाजता 'ऑपेरा' जवळ जमलो. त्या दिवशी जो तो विलक्षण खुषीत होता. विशेषतः मिस्टर बुशर हे साठ वर्षांचे फ्रेंच गृहस्थ आज

खुशीतच चिरुट ओढत होते. चालताना त्यांचा पदन्यासच त्यांच्या खुषीची चुणूक दाखवीत होता. त्यांना सहज विचारले, "आर यू इंटरेस्टेड इन फॅशन शो ?" त्यावर तात्काळ उत्तर दिलं, "येस आफ कोर्स ! एव्हरी फ्रेंच मॅन इज इंटरेस्टेड इन फॅशन शो ! अँड आय एम ए यंग मॅन, डोंच यू थिंक ?" उलट मलाच प्रश्न केला. बुशर हा टिपीकल फ्रेंच होता. तारुण्य हे पार पाडलेल्या उन्हाळ्यापावसाळ्यांवर न मोजता तारुण्यसुलभ वृत्तीवर मोजावे. बुशरमुळे आमचा उत्साह वाढला. गॅलरी लाफायेतपाशीच Pritemps या महाकाय डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये फॅशन शो होता. एका टोलेजंग इमारतीत प्रवेश केला. दारावर सुहास्यवदनेने स्मितपूर्वक स्वागत केले आणि तिच्यापाठोपाठ येण्याची विनंती केली. सरकत्या जिन्यांनी दालनामागून दालने व मजले जाऊ लागलो. जिकडे-तिकडे नावीन्यपूर्ण रंगीबेरंगी कापडांचे सहस्रावधी नमुने,अंतराअंतरावर गौरकाय सुंदर विक्रेत्या. झगझगीत प्रकाशामुळे तर त्या बाहुल्याच वाटत होत्या. त्यांच्याकडे सहजासहजी दृष्टादृष्ट जरी झाली तरी बिनाका स्माइलने बोंझूर हळुवारपणे म्हणताना ओठांची, डोळ्यांची हालचाल इतक्या माफकपणे करायच्या की बस. पर्यटकांचे रूपांतर ग्राहकांत करण्याची जबरदस्त ताकद त्या स्मितात होती.

आम्ही एका प्रशस्त गोलाकार सभागृहात पोहोचलो. फॅशन शो जिथे होणार होता, त्या लांबलचक प्लॅटफॉर्मशेजारील चाळीस आसने 'पर्स्पेक्टिव्ह असियेनच्या सभासदांसाठी राखीव' अशा लेबलने आरक्षित केली होती. स्थानापन्न झाल्यावर सहज नजर टाकली. वर घुमटाकार रचना असून रंगीबेरंगी काचेने आच्छादलेले होते. तुरळक युरोपीय पर्यटक होते. शांततेत सर्वजण साडेनऊंची प्रतीक्षा करू लागलो. हळूहळू नऊवीस पासून पर्यटक मोठ्या संख्येने येऊ लागले. बघता बघता चारशे-पाचशे आसन व्यवस्था असलेले सभागृह भरले. सर्वांच्या नजरा स्टेजवर. किंचित कुजबूज होती आम्हा भारतीय गटातच. बाकीचे शांतपणे रसिक नजरेने स्टेजवर काय घडणार याकडे लक्ष ठेवून होते. मंद दिवे आणखी मंद झाले. नऊ अठ्ठावीसला मधुर स्वरात 'बोंझूर'चे स्वर उमटले. एका महिलेने स्टेजच्या कोपऱ्यातून माईक हातात धरून मधुर कंठांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि काही क्षणांतच फॅशनशोला सुरुवात होईल, असे जाहीर केले. तत्क्षणी सर्वजण सावरून बसले आणि त्या अंधुक प्रकाशाच्या सभागृहात यक्षाची कांडी फिरावी असे अद्भूत घडले. हजारो वॅट्सचे दिवे एकदम उजळले. युरोपमध्ये गाजलेल्या

'लोंबाडा' ह्या कॅसेटवरील मादक तरी कर्णमधुर गाणे लागले आणि स्टेजवर प्रकाशाचा महापूर लोटला. संगीताच्या तालावर चार सुंदर, कमनीय बांधा असलेल्या तरुणी हृदयाचे ठोके चुकविणारा पदन्यास करीत स्टेजवर अवतरल्या. त्याच क्षणी ते सभागृह आमच्या साऱ्या प्रेक्षकांसह अंतराळात गेल्यासारखे वाटले. सौंदर्य, संगीत, लय, प्रकाश आणि कडकडून टाळ्या, या साऱ्यांमुळे काही क्षण यापूर्वी कधीही न अनुभवलेल्या संवेदना निर्माण करून गेल्या. त्या तरुणी दिसायला हसऱ्या व सुंदर तर होत्याच, परंतु त्यांचे शरीर एखाद्या थोर कलावंताने घडवावे इतके कमनीय व बांधेसूद होते. त्यांचा पदन्यास आणि अंगविक्षेप इतके अप्रतिम होते की नजर हालत नव्हती. त्यांच्या हालचालीत विलक्षण लय होती. हातांची, पायांची, मानेची आणि एकूण शरीराची हालचाल इतक्या सहजतेने व सहेतुक करीत होत्या, त्याचे वर्णनच अशक्य आहे. या भूतलावरच्या जणू अप्सराच. बिकीनीची जाहिरात संपल्यावर साऱ्या प्रेक्षकांकडे बघून अत्यंत लाघवीपणे हसल्या आणि हाताने बाय बाय करून स्टेजमागे लुप्त झाल्या. आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसमवेत एक-दोन मिनिटांचा तो शो झगझगीत प्रकाशात सुमधुर संगीताच्या लयीत पाहिला आणि फॅशनबद्दलची उत्सुकता वाढली.

त्यानंतर आणखी दोघी वेगळ्या पोषाखात आल्या. पहिल्या चौघींपेक्षा ह्या अधिकच स्मार्ट वाटल्या. त्यांनी झुपकेदार स्कर्ट व नव्याच फॅशनचा शर्ट घातला होता. काहीसा पुरुषी पोषाख वाटत असला तरी त्यांच्या स्त्रीसुलभ नाजूक हालचालींमुळे तो पोषाख मनात निश्चितच भरला. त्यानंतर एक पुरुष आला व नव्या पोषाखाचे त्याने अत्यंत देखणेपणाने प्रदर्शन केले. पुरुष असूनही पदन्यासात, लयीत तो पुरुषार्थ न गमावता त्या सुंदर तरुणींइतकाच छाप मारून गेला. त्यानंतर एकाहून एक सुंदर कॉंबीनेशन्समध्ये त्या तरुणी व तरुण स्टेजवर येत होते, एकाहून एक अद्ययावत फॅशन्सचे कपडे आपल्या तनूवर दाखवीत होते.

त्या साऱ्यांच्या चेहऱ्यावरचे प्रसन्नपण, हातांच्या विलक्षण अर्थपूर्ण हालचाली, चालण्यातली ऐट, प्रेक्षकांना अभिवादन करण्याची अत्यंत प्रत्ययकारी पद्धत आणि एकूण प्रोफेशनल परिपक्वता यांमुळे स्टेजवर जे क्षणामागून क्षण जायचे ते ताज्या व उत्कट आनंदाचे, तृप्ततेचे क्षण होते. साऱ्या सभागृहाला आपल्या ऐटदार चालीवर डोलायला लावणाऱ्या त्या लावण्यवती फ्रेंच ललना, तिथले ते कर्णमधुर पार्श्वसंगीत, नेत्रदीपक प्रकाशयोजना, ती रसिकांनी दिलेली दाद, हे सारे आठवले

तरी अंगावर रोमांच उभे राहतात. सौंदर्य, लय, ताल, नवोन्मेषवृत्ती व रसिकता या साऱ्यांचा उत्सवच जणू तासभर चालला होता. पहिल्यापेक्षा दुसरा शो चांगला वाटायचा, उत्तानपणा नाही, तरी माफक मादकता, भडकपणा नाही, तरी पुरेसा झगमगीत थाट, त्यामुळे मला फॅशन शो म्हणजे कलावृत्तीचा एक बंदा आविष्कार वाटला. खरं तर फॅशन शो म्हणजे जाहिरातच. परंतु ग्राहकाच्या हृदयावर मोरपीस फिरवत त्याला उपभोक्ता (Consumer) बनविणारी प्रतिभाशाली कलाकृती म्हणजेच फॅशन शो. क्षणभर वयस्करांनाही तरुणाईत न्हाऊन काढण्याचे तंत्र विस्मयकारी वाटले. सर्वांत शेवटी त्या तरुणीतील सर्वांत सुंदर तरुणी व तो एकुलता एक तरुण 'वेडिंग गाऊन' पेहरून हसतमुखाने एकमेकांच्या हातात हात गुंफून आले आणि त्यांनी प्रेक्षकांना मनःपूर्वक अभिवादन केले. त्या क्षणी सर्व प्रेक्षकांनी पसंतीच्या ज्या टाळ्या वाजवल्या त्या अजूनही माझ्या कानात ऐकू येतात. कुणाही प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर आंबटशौकीनपणा नाही, अभुक्तपणाचा लवलेश नाही. उलट जे नेत्रसुख घेतले त्याचे पूर्ण समाधान चेहऱ्यावर होते. स्वप्नदृश्याप्रमाणे तो फॅशन शो संपला. स्टेजवर काही क्षणांपूर्वी स्वर्गीय अनुभव देणारा फॅशन शो संपला होता. आम्ही सर्व हळूहळू निःशब्द होऊन खुर्च्यांच्या रांगांतून वाट काढत दाराबाहेर पडलो. काही वेळ त्यात गेला. आलेल्या मार्गाने सरकत्या जिन्याने जाऊ लागलो. तोच त्या फॅशन शो मधल्या चार उंच्यापुऱ्या, हसऱ्या पऱ्या फेडेड जीन्स घालून पर्स हालवीत खाली सरकणाऱ्या जिन्यावरूनही धावत उतरत होत्या. त्या विद्युल्लतेंना पाहिले होते विविध नावीन्यपूर्ण वेषांत आणि तेही प्रखर प्रकाशात. आता त्या होत्या फेडेड जीन्समध्ये. तरी त्या तितक्याच सुंदर वाटल्या जितक्या त्या स्टेजवर वाटल्या. कारण मुळातच त्या सुंदर होत्या. त्यांचे सौंदर्य त्यांच्या लयबद्ध हालचालीत, नाजूक पदन्यासात आणि शेलाट्या शरीरबांधणीत व हसऱ्या चेहऱ्यात होते. बहुसंख्य फ्रेंच स्त्रियांबाबत हाच अनुभव आला.

फॅशनशोची क्षणचित्रे मनःपटलावर वारंवार यायची आणि संगीताचे ताल आठवले की ती क्षणचित्रे जिवंतपणे साकारल्याचा भास होत होता. एक हलकासा, उत्साही मूड निर्माण झाला होता. अशा मनःस्थितीत पुढील कार्यक्रमावर नजर टाकली. पुढील कार्यक्रम होता मतिमंद मुलांच्या शाळेस भेट. शाळा आणि त्यात मतिमंद मुलांची शाळा हे काय 'प्रेक्षणीय' स्थळ आहे का, असाच सूर बहुतेकांनी लावला. परंतु आम्ही काहीजणांनी त्या शाळेस भेट देण्याची उत्सुकता दाखविली.

फॅशन शोचा परिणाम अजून ताजा असतानाच आम्ही मतिमंद शाळेस भेट देण्यास दहा जणांच्या ग्रूपने निघालो.

बरोबर फ्रेंच मंडळी होतीच. त्यांचा उत्साह दांडगा होता. विलक्षणच होती ती मंडळी. कुठल्यातरी मंत्रानं भारल्यासारखी काम करीत होती. फॅशन शोला घेऊन जाताना त्यांचा उत्साह, त्यांची धडपड मतिमंद मुलांच्या शाळेस भेट देतानाही कायम होती. मेट्रोस्टेशनाबाहेर आलो. तेथे एक मिनीबस बरोबर एक निग्रो व फ्रेंच असे दोघे वाट पाहत उभे होते. दोघांनी आमच्या ग्रूपचे मनःपूर्वक स्वागत केले आणि मिनी बसने चलण्याची खास फ्रेंच अदबीनं विनंती केली. ते दोघे व आम्ही दाह जण असे एकूण बारा जण झालो. त्या बसची आसनक्षमता ड्रायव्हरसह अकरा होती. प्रसंग ओळखून तो निग्रो चटकन मागे राहिला व आम्ही त्या फ्रेंच सद्गृहस्थासह बसमध्ये चढलो. अर्थात तो फ्रेंच गृहस्थ ड्रायव्हिंग करीत होता. रस्त्यावरची दृश्ये न्याहाळता न्याहाळता त्या शाळेच्या संबंधी विचार मनात येऊ लागले. पुण्याची 'कामायनी' - मतिमंदांसाठी असलेली शाळा - पाहिली होती. निसर्गाच्या क्रूर चेष्टेमुळे मतिमंद झालेल्या मुलांची परवड व त्यावर अखंड व श्रद्धापूर्वक प्रयत्नाने मात करणारे शिक्षक डोळ्यासमोर होतेच. आर्थिक कमकुवतीमुळे आपल्या देशात लाखो मतिमंद मुले समाजाच्या दयेवर मृत्यूपर्यंत जगत असतात आणि आपणही मतिमंद मुले समाजाचे एक घटक आहेत हे मानतच नाही आणि त्यांच्यासाठी काही करण्याची गरजही भासवू देत नाही.

तेवढ्यात एका मोठ्या लोखंडी फाटकापुढे मिनी बस थांबली. केस खांद्यापर्यंत वाढविलेला, अस्ताव्यस्त दाढी राखलेला काहीसा गबाळा ड्रायव्हर खाली उतरला आणि फाटक उघडून बस शाळेच्या भव्य आवारात उभी केली. खाली उतरण्याची विनंती करून तो फाटक लावण्यास गेला. शाळेत स्वागतास कुणीच आले नव्हते. तुरळक संख्येने छोटी मुले-मुली आवारात खेळताना दिसत होती. तेवढ्यात त्या ड्रायव्हरने फाटक नीट लावले व आमच्यापाशी येऊन म्हणाला, "आय एम प्रिन्सीपॉल ऑफ दिस स्कूल, हॅव ए प्लेझर टू वेलकम ॲन इंडियन ग्रूप" त्या क्षणी आम्ही जागेवरच थंडावलो, गोठून गेलो. किती साधा गृहस्थ, बस ड्रायव्हिंगही करत होता, फाटक उघडणे, लावणे हेही काम करीत होता आणि आमचं स्वागत प्राचार्य या नात्यानं करीत होता. सारंच विलक्षण, मती गुंग करणारं. श्रमप्रतिष्ठेला अत्युच्च स्थान देणारं राष्ट्रच दरसाल दरडोई हजारो डॉलर्स निर्माण

करू शकतं. हे प्राचार्य न कळत आम्हाला पहिला धडा शाळेबाहेर सहजपणे शिकवून गेले.

त्या शाळेत पन्नास मुले-मुली होत्या, परंतु शिक्षक जवळजवळ चाळीस होते. प्राचार्यांसह सर्व शिक्षक तळमळीनं अध्यापनाचं कार्य करीत होते. प्राचार्य व शिक्षकांतले मधुर संबंध स्पष्टपणे जाणवत होते. स्वतः प्राचार्य आम्हाला शाळा दाखवू लागले. मतिमंद मुलांच्या एकूण समस्याच वेगळ्या असतात. त्या समस्या सांभाळत त्यांना शिक्षण द्यायचे. किती जिकीरीचं व सहनशीलतेनं करायचं काम आहे. परंतु जेव्हा आम्ही वर्गावर हिंडलो तेव्हा हे असाध्य काम सहजतेनं, प्रेमानं व समर्पित वृत्तीनं चाललेलं दिसलं. अशा शाळांना, अनाथाश्रमांना भेट देणारे हा विचार करीत नाहीत की, ती मुले म्हणजे प्राणिसंग्रहालयातले प्राणी नव्हेत, आपल्यासारखीच माणसं आहेत. त्यांच्यावर दयेची नजर टाकून एखादी देणगीची पावती फाडून आपली कणव दाखवून आपले सामाजिक ऋण फिटले असे समजण्याची वृत्ती आपल्याकडे आहे. पण तिथे वेगळेच दृश्य. जिथे प्रत्यक्ष अध्यापन चालले होते तिथे प्राचार्यांनी दूर उभे राहून खालच्या स्वरात माहिती दिली आणि जिथे वर्गात कुणी नव्हते त्या वर्गात नेऊन शैक्षणिक साधने (त्यांत कॉम्प्युटर्स होती), मुलांनी केलेली साधने दाखविली, विस्तृत विवेचन केले. प्रत्येक वेळी त्या त्या अध्यापकाची किंवा अध्यापिकेची ओळख आत्मीयतेने करून देत होते. आमच्या वर्गावर्गावरून हिंडण्याची दखल कुणीच घेत नव्हता कारण जो तो आपल्या कामात गर्क— शिक्षकही आणि मतिमंद मुलेही.

एक एक वैशिष्ट्यपूर्ण अध्यापनाच्या अत्याधुनिक पद्धती व शैक्षणिक साधने पाहिल्यावर अफाट समृद्धीस मतिमंदांच्या उत्थानासाठी वळविण्याचे भान फ्रेंच समाजास, राष्ट्रास आहे हे खूप समाधानकारक वाटले. बाहेर पटांगणात रस्ते, चौक, झेब्रा क्रॉसिंग, ट्रॅफिक सिग्नल यांचे छोटेसे परंतु खरेखुरे प्रदर्शन होते. प्राचार्यांच्या म्हणण्यानुसार तिथल्या मुलांसाठी खेळण्यातल्या मोटारी (पायाने चालवायच्या) होत्या. त्या साहाय्याने मुलांना रहदारीचे, वाहतूक नियंत्रणाचे प्रत्यक्ष धडे दिले जात होते. दैनंदिन जीवनात ते अत्यंत आवश्यकच आहे. त्यांच्या खेळण्याची जागा पाहिली. त्यांचे हॉबी वर्कशॉप पाहिले. मतिमंद मुलांना कुठल्या ना कुठल्या कामात तरबेज करण्याचे प्रयत्न चाललेले होते. पुढील आयुष्यात स्वतःच्या पायावर उभे राहावे, समाजास ओझे वाटू नये म्हणून ह्या मुलांना समर्थ, स्वयंसिद्ध घडविणाऱ्या

छंदशाळा, तिथली साधनसामग्री थक्क करून सोडणारी होती.

हे सर्व पाहताना फ्रेंच पदार्थांचा सुवास दरवळू लागला. जेव्हा आम्ही प्राचार्यांना विचारले "इथे कुठे कँटीन अथवा हॉटेल आहे का ?" प्राचार्य समाधानपूर्वक हसले व म्हणाले, "वेल, नाऊ वुई वील व्हिजीट द प्लेस." आम्ही सर्व प्राचार्यांपाठोपाठ एका भव्य कीचनरूममध्ये गेलो. तिथे अनेक ओव्हेन, गॅस शेगड्या, कुकर्स, हॉटप्लेट, सुबक क्रोकरी, स्वयंपाकाची आणखी काही साधने होती. काही पदार्थ तयार स्थितीत प्लेट्समध्ये भरून ठेवले होते. ती त्या मुलींची प्रयोगशाळा होती. प्रात्यक्षिकासाठी एवढा सारा पसारा तिथे होता. प्राचार्यांनी सर्व दाखविले आणि म्हणाले, "आपण सर्व येणार आहात हे कळल्यावर आमच्या विद्यार्थिनींनी ह्या सर्व पाकक्रिया केल्या आहेत." मतिमंदांनी केलेल्या पदार्थांचा गंध इतरांनी केल्या पदार्थांच्या पेक्षा सरसच वाटला. आम्ही सर्वांनी त्यांचे व विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शक शिक्षकांचे मनापासून, भारावून जाऊन कौतुक केले. कौतुकाचा स्वीकार नम्रपणे करून प्राचार्य सांगू लागले, "ह्या मुलांना आत्मविश्वास यावा, सामाजिक जीवनाची आवड निर्माण व्हावी म्हणून आठवड्याच्या शेवटच्या दिवशी त्यांना आम्ही पैसे देतो. ही मुलं सुपरमार्केटमध्ये, रस्ते-रहदारी पार करून जातात. यादी— जी त्यांनीच केलेली असते— नुसार वस्तूपदार्थ खरेदी करतात आणि इथे येऊन कीचनमध्ये त्यांना हवे ते पाकनमुने तयार करतात आणि त्यांचा स्वाद सर्वजण एकत्रितपणे अनुभवतात. जीवनातील, सहजीवनाचे धडे इतक्या प्रत्ययकारी पद्धतीने इथे दिले जातात. मतिमंद असूनही ती मुले त्यांना मिळणाऱ्या शिक्षणामुळे भाग्यवान वाटतात, विशेष म्हणजे त्यांच्यात काही न्यूनत्व आहे, हे भासवू न देता.

ती शाळा सविस्तरपणे पाहिली आणि मग सर्वांनाच भोजनास आमंत्रित केलं गेलं. भोजनगृहाकडे जाता जाता वाटेत प्राचार्यांनी कीचनमध्ये नेलं. तिथे दोघीजणी स्वयंचलित यंत्रावर भांडी, प्लेट्स स्वच्छ करीत होत्या. त्या शाळेचे प्राचार्य त्यांच्याशीही सलगीनं व आदरपूर्वक बोलत होते. आपल्याच संस्थेतील हलकी कामे करणाऱ्याशी सुद्धा समान पातळीवर लेखून वागणाऱ्या प्राचार्यांचे कौतुक वाटले. जेव्हा आम्ही भोजनगृहात खुर्च्यांवर विराजमान झालो तर आमच्या बरोबर भोजनास प्राचार्य, दोन अध्यापिका, तो निग्रो ड्रायव्हर आणि त्या पाकशाळेतील दोन सेविकाही होत्या. कुठेच भेदभाव नव्हता, आपपरभाव नव्हता. विशेष म्हणजे भोजन होईपर्यंत (फ्रेंच पद्धतीनं सुमारे दोन तास) त्या दोघी व ड्रायव्हर आमच्या

संभाषणात उत्साहाने भाग घेत होते. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात भोजन चाललेलं होतं. प्रत्येत पदार्थ स्वादिष्ट होता. आम्ही त्या दोघींचे स्वादिष्ट भोजन तयार केल्याबद्दल स्तुती करू लागलो. त्यावर त्यातील एकींनं नम्रपणे सांगितलं की ते बहुतेक पदार्थ मतिमंद मुलांनी केले होते. हे ऐकून आम्ही कमालीचे भारावून गेलो. त्या मुलींच्या चिमुकल्या हातांनी तयार झालेल्या पदार्थात जो स्वाद होता तो ते ऐकल्यावर सहस्रपटीने जास्त वाढला. ते भोजन आता महाभोजन झाले होते.

जेवणानंतर प्राचार्य आम्हाला सोडायला, निरोप द्यायला शाळेच्या प्रांगणातून नेत होते. आम्ही शेवटची नजर शाळेवर टाकली. तोच एक अकरा-बारा वर्षांची मतिमंद मुलगी दिसली. जराशी स्थूल होती. कपडे, केस यांचे फारसे भान नव्हते. तिच्यापाशी प्राचार्य गेले. त्यांनी जवळचा टिश्यू पेपर काढला. तिचे गळणारे नाक स्वतःच्या हाताने स्वच्छ केले. केस हात फिरवून व्यवस्थित केले, कपडे नीटनेटके केले आणि पाठीवर हात फिरवून तिला तिच्या खोलीवर जाण्यास अत्यंत प्रेमाने सांगितले.


आपल्या शाळेतल्या विद्यार्थिनीचे गळणारे नाक स्वच्छ करणाऱ्या प्राचार्यातील महामानवाविषयी अपार आदर बाळगून आम्ही त्यांचा निरोप घेतला.

त्या क्षणी तरी फॅशन शोची आठवण पूर्णपणे विसरून गेलो होतो. फॅशन शोच्या चमकदार दृश्यावर मतिमंद शाळेतील हृद्य दृश्ये सुपर इंपोज होत होती. अजूनही मला ते प्राचार्य बस ड्रायव्हिंग करताना, फाटक उघडताना, जेवत असताना ड्रायव्हर व सेविकांशी मृदु संभाषण करताना आणि मुलीचे नाक साफ करताना दिसतात व प्रत्येक दृश्यागणिक मी त्यांना मनातून सादर प्रणाम करीत असतो.

o

# नोत्रदाम. . .

पॅरीसमधील मुक्कामात एक शब्द वारंवार ऐकला, आयफेल टॉवरच्या नावापेक्षाही अनेक वेळा, तो शब्द होता नोत्रदाम. नोत्रदाम हा पॅरीसच्या गळ्यातील मणीहार आहे. पॅरीसच्या सौदर्यात, अद्‌भूततेत आणि



Notre-Dame from Viviani Square

अनोखेपणात नोत्रदामचे योगदान अनन्यसाधारण आहे. आयफेल टॉवरच काय परंतु मोमाँत्र, अगदी लूव्रहूनही पूर्वीपासून सीन नदीच्या किनाऱ्यावर गगनचुंबी कॅथेड्रलने हा नोत्रदाम पॅरीसियनच्या हृदयात अढळपद प्राप्त करून राहिला आहे. माझ्या यजमानाच्या घरी सोफ्यावर बसून त्यांचा मुलगा सार्ज पॅरीसचा नकाशा समजावून सांगताना सर्वप्रथम नोत्रदामच्या चित्रावर बोट ठेवून अत्यंत नम्रतेने म्हणाला, “धीस इज व्हेरी गुड प्लेस, डू यू वाँट व्हीजीट ?” मी चटकन उत्तरलो, “ऑफ कोर्स, आय वुड लाईक टू व्हीजिट.” त्या क्षणी धावत जाऊन त्याने दानिएलला सांगितले की मला नोत्रदाम दाखव. इतकं त्या नोत्रदामविषयी आस्था, प्रेम, छोट्या मुलांनाही आहे. खरोखर पॅरीसच्या मुक्कामी अनेकदा लोहचुंबकाकडे आकर्षिला जावं तसं त्या नोत्रदामकडे आकर्षिला गेलो.

इ.स. ११६३ मध्ये या भव्य व अतिसुंदर कॅथेड्रलची बांधणी झाली. वेळोवेळी

त्यात सुधारणा व दुरुस्त्या झाल्या तरी आजचे नोत्रदामचे स्वरूप आकर्षक तर आहेच, परंतु त्याभोवती व आत पॅरीसियनांचे भावनाविश्व गुंफले गेले आहे. येथेच जगज्जेता युरोपचा बादशहा चक्रवर्ती नेपोलियनचा राज्याभिषेक १८०४ साली संपन्न झाला. पॅरीसच्या पार्श्वभूमीवर गाजलेल्या चित्रपटाचे नावही होते- 'हंचबॅक ऑफ द नोत्रदाम.' पॅरीसच्या जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे नोत्रदाम.

नोत्रदामनजीक सीन नदीवर एक चिंचोळा पूल आहे. त्या पुलावरून नोत्रदामचे दर्शन कुणालाही लुभावणारेच आहे. सीनचे निळे पाणी, त्यावर हिरवी गर्द झाडी, हिरव्या झाडांवर डौलाने उभी नोत्रदामची वास्तू, त्या वास्तूवर सुईप्रमाणे निमुळते होत गेलेले गगनचुंबी कॅथेड्रल आणि वर निळे आकाश. ही पार्श्वभूमी इतकी सुंदर आहे की, आजवर हजारो चित्रकारांच्या चित्राचा विषय होऊन राहिली आहे. अगदी हौशी चित्रकारही ह्या देखाव्याचे रेखाटन करतात आणि ते रेखाचित्रही देखणेच असते. लाखो, कदाचित कोट्यवधी कॅमेऱ्यांनी आजवर या अप्रितम देखाव्यास बंदिस्त केले आहे. लक्षावधी रसिक पर्यटकांनी ह्या पार्श्वभूमीवर आपले व आपल्या प्रेयसीचे छायाचित्र घेतले असेल आणि ते छायाचित्र बघताना नोत्रदामच्या आठवणीनं गहिवरला असेल. कारण रोमँटिक पॅरीसमध्ये प्रेयसीच्या हातात हात घालून फिरावं, फिरता फिरता सीन नदीवर यावं आणि नोत्रदामला पार्श्वभूमीवर ठेवून प्रेयसीबरोबर एक छायाचित्र घ्यावं असं घडलेलं सारं त्या क्षणी आठवतं आणि म्हणून तो गहिवरतो. माझ्या यजमान व यजमानीणीने जे काही माझ्यासाठी केले त्याचे ऋण या जन्मी फेडणे अशक्य आहे. आम्ही तिघे फिरत फिरत नेमक्या ह्याच स्पॉटला आलो आणि त्या दोघांना आठवण म्हणून त्या नोत्रदामच्या पार्श्वभूमीवर छायाचित्र देण्यास विनंती केली. त्यांनी ती तात्काळ मानली. दोघेही शेजारी शेजारी उभे राहिले. नोत्रदामच्या पार्श्वभूमीवर आपला भारतातील मित्र फोटो काढतोय या कल्पनेनंच त्यांच्या डोळ्यांत दिसणारा आनंद माझ्या डोळ्यांच्या अंतर्भागात कॅमेऱ्याच्या अगोदर उमटला होता.

नोत्रदामचे मूल्य शिल्पकलेच्या दृष्टिकोनातूनही श्रेष्ठच आहे. भव्यपणाबरोबरच त्याच्या अंगाप्रत्यंगावरील कोरीव काम युरोपीय व फ्रेंच कलाश्रेष्ठतेचं द्योतक आहे. विशेषतः दर्शनी भागावरील कोरीव काम त्यातही मानवी पुतळे रेखीव तर आहेतच, परंतु त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव अधिक सूक्ष्मतेने कोरले आहेत. मला मदुराईच्या मीनाक्षी मंदिराच्या प्रवेशद्वारावरील लक्ष्मीविष्णूच्या

विवाह प्रसंगीच्या सजीव वाटणाऱ्या शिल्पकृती आठवल्या. आपल्या शिल्पकृती निश्चितच जगात श्रेष्ठ ठरतील, परंतु पाश्चात्त्यांकडेही कौतुक करण्याइतपत कलाकृती निश्चित आहेत. आपल्या शिल्पकामावर हवामानाचा, वेळोवेळी झालेल्या आक्रमणांचा, त्याहूनही आपल्या राष्ट्रीय ऐतिहासिक ऐवजाचे स्वधनाइतक्याच आत्मीयतेने जतन करण्याच्या भावनेचा अभाव या सर्वांचा परिणाम होऊन त्यांचा काही प्रमाणात नाश तर काहींच्या बाबतीत मूळचे सौंदर्य हरपणे, असे झाल्याची उदाहरणे अनेक आहेत. नोत्रदामच्या कुठल्याही भागावर नजर टाकली तरी मन प्रसन्न होते. आंतरभागात तर वेगळेच परंतु धीरगंभीर वातावरण, हजारो पर्यटकांच्या उपस्थितीतही स्तब्धता, अतिउंच छत, उंचच उंच खिडक्यांवरील काचेवरची रंगीत परंतु प्रसन्न व भावूक मुद्रेची चित्रे हे सर्व एका विश्वात घेऊन जाते. क्वचित ऑर्गनचा सूर गंभीरतेला भक्तीची जोड देतो. नोत्रदामच्या बाहेर जितके रमणीय वाटते तितकाच आत गंभीर भक्तिभाव दाटून येतो.

पॅरीसला येणारा प्रत्येकजण नोत्रदामला आवर्जून भेट देतो. विशेषतः शाळेच्या सहली गटागटाने नोत्रदामपाशी गर्दी करतात. जागा अपुरी असल्याने जत्रेचे स्वरूप बऱ्याचदा येते. दर्शनी भागावरील शिल्पकाम आपल्या विद्यार्थ्यांना समजावून सांगणारे शिक्षक-शिक्षिका, प्रवासी बसमधून येणारे पर्यटक यांनी हा परिसर सदैव गजबजलेला असतो.

नोत्रदामसमोरील सीन नदीच्या कठड्याशेजारी नोत्रदामच्या छायाचित्रांचे प्रदर्शन आणि विक्री पाहिली. नोत्रदामची इतकी छायाचित्रे विविध कोनांतून, अंतरावरून घेतली होती की, त्या प्रदर्शनाकडे खूप व्यक्ती आकृष्ट झाल्या होत्या.

नोत्रदामच्या पटांगणात मध्यभागी एक पितळी गोलाकार तबकडी जमिनीत पक्की बसविलेली आहे. फ्रान्समधील सर्व अंतरे त्या ठिकाणाहून मोजली जातात, असे माझ्या यजमानाने सांगितले होते. म्हणजेच नोत्रदाम हे सर्व फ्रान्सच्या अंतर मोजण्याचा आरंभबिंदू आहे. खरोखरच प्रत्येक फ्रेंच व्यक्तीच्या हृदयात नोत्रदामविषयी पवित्र भक्तिभावच आढळला. म्हणजे नोत्रदाम शेवटी फ्रान्सच्या जनतेच्या हृदयातला केंद्रबिंदूच आहे.

ह्या नोत्रदामच्या काही हकीगती मजेदार व मनोरंजक आहेत. २००० वर्षांपूर्वी या ठिकाणीच पॅरीसच्या धार्मिक प्रार्थना होत. सुरुवातीला गॅलो रोमन देवालय होते. पुढे ख्रिस्ती प्रार्थनास्थळात रूपांतर झाले. आणि सध्याचे रोमन पद्धतीचे चर्च

११६३ साली लुई सातव्याच्या कारकीर्दीत बांधणे सुरू केले. हजारो गवंडी, सुतार व सामान्य माणसे धार्मिक भावनेने झपाटले गेले व याचे बांधकाम केले. पण आश्चर्य म्हणजे १३४५ साली म्हणजे १८२ वर्षांनी बांधकाम पूर्ण झाले. सन १८४१ साली व्हीक्टर ह्युगोच्या जगप्रसिद्ध 'हंच बॅक ऑफ नोत्रदाम' कादंबरीने नोत्रदामकडे लक्ष वेधले व तेव्हाच्या सत्तेने जीर्णोद्धाराचे काम सुरू केले. त्यानंतर २३ वर्षांनंतर नोत्रदाम परत नव्या रूपात पॅरीसियनना दिसू लागले.

याच्या अवाढव्य अंतरंगामुळे (१३० मीटर x ४८ मीटर) ९००० व्यक्ती यात जमू शकतात. याचे गगनाला भिडणारे मनोरे इतके निमुळते आहेत की याचे बांधकाम कसे केले हे एक कोडेच आहे. ९० मीटर म्हणजे २९५ फूट उंचीच्या मनोऱ्याच्या बांधकामासाठी ५०० टन ओकचे लाकूड व २५० टन शिसे वापरले गेले. त्यामुळेच वादळवाऱ्याला तोंड देत नोत्रदामचे मनोरे दिमाखाने उभे आहेत.

याच कॅथेड्रलमध्ये ख्रिश्चन जगातील अत्यंत वंदनीय येशू ख्रिस्ताला चढविण्यात आलेला काटेरी मुकुट जतन करून ठेवण्यात आला आहे. तसेच ख्रिस्ताच्या खांद्यावर दिलेल्या व नंतर त्याला ज्यावर खिळे ठोकून टांगले त्या क्रूसाचा एक तुकडा सुद्धा इथे भाविकांच्या दर्शनासाठी ठेवला आहे. यामुळे आणि त्याच्या धार्मिक महत्त्वामुळे नोत्रदाम हे पवित्र ठिकाण प्रत्येक पॅरिसियनास अभिमानास्पद वाटते. म्हणूनच माझ्या यजमानाच्या चिरंजीवांनी— सार्जने मला सर्वप्रथम नोत्रदाम दाखविण्याचा आग्रह त्याचा आईला का केला हे उमगले.

# व्हर्साय. . .

पॅरीसला गेल्यावर बघण्यास विसरू नये, असे पर्यटनस्थळ म्हणजे व्हर्सायचा जगविख्यात राजवाडा होय. व्हर्सायचा मोठा व छोटा असे दोन राजवाडे आणि जवळचे सुंदरसे उपवन पाहाण्यास टूरिस्ट कंपन्या अर्धा दिवस देतात. परंतु मला हा राजवाडा अगदी सविस्तरपणे पाहायचा होता. आणि माझी फारा दिवसांची इच्छा पर्स्पेक्टिव्ह असिएनच्या अभ्यासू व तळमळीच्या कार्यकर्त्यांमुळे पूर्ण होऊन व्हर्सायचे चिरस्मरणीय दर्शन झाले. आदल्या दिवशी फ्रेंच मित्रांनी बजावले होते की, हा राजवाडा दाखविण्यासाठी खास त्यातली जाणकार मंडळी येणार आहेत तेव्हा जागरण, मेट्रो वेळेवर न मिळणे ही सबब सांगू नका.

नेहमीपेक्षा मी अर्धा तास अगोदरच शांपिनीच्या माझ्या यजमानाच्या घरापासून निघालो. वाल-द-मार्न ह्या SNCF च्या जमिनीवरील रेल्वे स्टेशनवर पोहोचल्यावर पॅरीसच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वेत बसलो. तेथून ३ स्टेशन्स गेल्यावर वाल-द-फाँतने ह्या स्टेशनवर उतरून भुयारी मार्गावरील RER ह्या अत्यंत वेगवान रेल्वेने न्यास्यो (NATION) ह्या भुयारी स्थानकावर उतरलो. तेथून सबवेच्या चक्रव्यूहातून मेट्रोचेच, परंतु भुयारी प्लॅटफॉर्म गाठले. तेथून शार्ल द गोल मेट्रो स्टेशनची मेट्रो पकडली. त्या स्थानकाबाहेर पडून आर्क द त्रूंफच्या समोरील शांझएलीझेच्या हमरस्त्याच्या कडेला इतर मित्रांची वाट पाहत उभा राहिलो. आज घरून लवकर निघाल्याने व सबवेच्या चक्रव्यूहात कुठेच न अडकल्याने किंवा चकवा न लागल्याने अर्धा तास अगोदर पोहोचलो होतो. रस्त्यावरच्या सर्व जाहिराती त्या दिवशी बदलल्यामुळे नव्या आकर्षक जाहिराती पाहत हिंडत हिंडत वेळ घालविला. हळूहळू सारे मित्र पॅरीसच्या वेगवेगळ्या भागांतून एकत्र जमले. जवळच व्हर्सायला घेऊन जाणारी आलिशान आरामगाडी उभी होती. पॅरीस मुक्कामात आरामगाडीनं प्रवास करण्याचा पहिलाच प्रसंग. खिडकीजवळ जागा

मिळाली कारण ६० आसन व्यवस्थेच्या बसमध्ये आम्ही ३० जणच होतो. मोठ्या काचेच्या खिडक्यांमुळे सहज सीटला टेकून जरी बसलो तरी सर्व दृश्ये नीट दिसत होती. मी पॅरीसमध्ये बस, मेट्रो, रेल्वे किंवा कार कशानेही प्रवास केला तरी विंडोसीट कायम मिळविली. अगदी मुंबई-पॅरीस व परतीच्या प्रवासात सुद्धा. त्यामुळे डोळ्यांनी जेवढी दृश्ये पाहाता येतील तेवढी पाहून घेता आली.

आज सारेच खुशीत होते. बंगलोरचा चंद्रशेखर चक्क कानडी गाणे गुणगुणत होता. एरवी गंभीर असणारा चंद्रशेखर आज विलक्षण खुशीत होता. बस ड्रायव्हरने बस सुरू केली. त्याच्या शेजारी उत्साही फ्रेंच मार्गदर्शिका (अर्थात पर्स्पेक्टिव्ह असियेनची सदस्या) बसून छानपैकी गप्पा मारत होती. 'गाडी चालू असताना ड्रायव्हरशी बोलू नये,' ही एस. टी. महामंडळाची कडक सूचना पाठ होती. आणि इथे फ्रान्समध्ये तर ड्रायव्हिंग करतात की गप्पा मारतात हे न कळण्याइतक्या गप्पा नेहमी चाललेल्या पाहिल्या होत्या. आपल्या इथे रस्त्यावर माणसं, जनावरं, खड्डे, स्पीडब्रेकर्स, खडी, मुरमाचे ढीग, ब्रेकडाऊन गाड्या इतक्या विपुलतेनं असतात की, ड्रायव्हरला पापणीसुद्धा मिटायची मारामार, तिथे गप्पा कुठे मारणार ? याउलट फ्रान्समध्ये रस्त्यावर ठराविक वेगाने जाणाऱ्या वाहनांशिवाय काहीच नसल्याने गप्पा मारणे परवडते. आपल्या व इथल्या वाहतुकींचे विचार करता करता पॅरीस शहर मागे पडले आणि रम्य वनश्रीचा अंमल सुरू झाला. नेत्रसुख काय असते ते इथे कळले. इंचन् इंच जमिनीचा तुकडा एक तर वनविभागातील विविध वृक्षांनी किंवा हिरव्यागार लुसलुशीत गवतानं व्यापला होता. विशेष म्हणजे या सर्वांची सतत काळजी घेणारी खास पथके तिथे आहेत. तळहाताच्या फोडाप्रमाणे इथली वनश्री जपली गेल्याने रस्त्याच्या कडेला न संपणाऱ्या हिरव्यागार वृक्षांच्या रांगा— नव्हे, तर राशीच दिसल्या. पॅरीस ते व्हर्साय हा रस्ता इतका स्वच्छ व सुंदर आहे की त्यावरचा प्रवासच संपू नये असे वाटते. अधून मधून लाल रंगाची, उंच मनोरा, तटबंदी असलेली (शॅटो) जुनी गढी नजरेस पडायची. निसर्गरम्य ठिकाणी राहण्याची फ्रेंचांची हौस प्रवासात अनेकदा नजरेस पडते.

जसजसे व्हर्साय जवळ येऊ लागले तसतसे अंगात एक नवे चैतन्य, उत्सुकता सळसळू लागली. काही मिनिटांत आपण जगविख्यात राजप्रासादाचे दर्शन घेणार, हा विचार अस्वस्थ करू लागला. मी कि. मी.चे बोर्ड पाहू लागलो. व्हर्साय ३ K.M. उरले होते. पॅरीस ते व्हर्सायचा अर्ध्या तासाचा परंतु प्रसन्नपणे केलेला प्रवास

संपायला थोडाच अवधी होता. व्हर्सायच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर बस उभी राहिली. सारे जण प्रवेशद्वारातून आत गेलो आणि जे पाहिले ते अवर्णनीय होते.

तेथे दिसले एक प्रचंड उपवन, ज्यात तीनशे वर्षांपूर्वीच्या डौलदार गगनचुंबी वृक्षांच्या रांगा हारीने उभ्या होत्या. सर्वत्र हिरवेगार लॉन, त्या लॉनवर तांबडी, पिवळी, जांभळी, रानफुले डवरली होती. त्यांतून तांबूस रंगाची नागमोडी पायवाट तांबड्या रंगाच्या पायघड्या घातल्यासारखी वाटत होती. वृक्षाच्या पानांचा रंगही सौम्य हिरवा, क्वचित पोपटी असा असल्याने आल्हाददायक वाटत होता. विविध पक्ष्यांचे मधुर कूजन आसमंतातील निरव शांतता ढवळीत होते. अशा ह्या रम्य परिसरात बालकवी ठोंबरेंचे किंचित काळ जरी वास्तव्य झाले असते, तर मराठी वाङ्मयात निसर्ग-कवितांचा एखादा खंड निर्माण झाला असता. इतके सुंदर स्थळ प्रतिभावंताच्या स्फुल्लिंगाला चेतविण्यास पुरेसे आहे. अशा सुंदर उपवनात सकाळच्या कोवळ्या उन्हात पायपीट करता करता आम्ही सर्व थबकलो. समोर मारी आंतान्वेतचे घर (हंटिंग लॉज) होते. मार्गदर्शकाच्या सांगण्यानुसार पॅरीसच्या दरबारी रीतीरिवाजाला व शहरी वातावरणाला कंटाळल्यावर मारी आंतान्वेत अशा रम्य स्थळी यायची व राहण्यासाठी टुमदार दुमजली घरही बांधून घेतले. आजही ते घर त्या वेळी होते त्या स्थितीत जपले आहे. त्या घराला हिरव्या उंच वृक्षाची पार्श्वभूमी लाभल्याने त्याच नजीकच्या तळ्यातील प्रतिबिंब हुबेहूब दिसते. मूळचे घर व त्याचे प्रतिबिंब पाहताना जो सौंदर्याभास झाला तो मारी आंतान्वेतला अनेकदा झाला असेल. व्हर्सायपूर्वी हे निर्माण झाले. व्हर्साय पूर्ण झाले तरी हे घर जपून ठेवले गेल्याने पर्यटकांचे एक आकर्षण झाले आहे.

फ्रेंच बादशहांना चैनीत व ऐषारामात राहण्याच्या वेडामुळे दोन गोष्टी घडल्या. एकतर व्हर्सायसारखा अप्रतिम, भव्य राजवाडा निर्माण झाला, ज्याला जगात तोड नाही. दुसरी गोष्ट– या चैनीच्या व ऐषारामाच्या अतिरेकातूनच फ्रेंच राज्यक्रांती झाली. व्हर्सायमुळे पर्यटकांची सोय झाली. फ्रेंच राज्यक्रांतीनं तर जगाला स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाची अमोल भेट दिली. अशाच कलाप्रेमी कर्तबगार लुई १४ने व्हर्साय बांधायचा आदेश दिला. २०,००० मजूर कित्येक वर्षे या बांधकामावर खपत होते. व्हर्सायचा एकूण आवाका पाहिला की ही वस्तुस्थिती वाटते. पाण्यासारखा पैसा खर्चून विविध देशांतून मूल्यवान दगड, संगमरवर आणून जगातील एक अद्वितीय शिल्प व परिसर निर्माण झाला.

सर्वप्रथम छोटेखानी ट्रियाननचा राजवाडा उभा राहिला. गुलाबी रंगाच्या संगमरवरी दगडांच्या विपुल वापरामुळे हा गुलाबी रंगाचाच राजवाडा वाटतो. ह्या वाड्यात व मुख्य वाड्यात मूल्यवान ऐतिहासिक वस्तू जशा होत्या तशा जपून ठेवल्या आहेत आणि त्याच्या देखभालीसाठी खास तरुण-तरुणींची योजना केली आहे. काळा-निळा ब्लेझर घेतलेले, खास प्रशिक्षित तरुण-तरुणी सर्वत्र आढळतात. त्यांचे काम म्हणजे मूल्यवान ऐतिहासिक वस्तूंचे रक्षण करणे. पण येथे येणाऱ्या पर्यटकांनाही एक 'संस्कृती' असते त्यामुळे हे 'रखवालदार' निवांतपणे परंतु सतर्कवृत्ती ठेवून कुठेतरी उभे किंवा बसलेले असतात. दालन चुकलेल्या पर्यटकास यथायोग्य मार्गदर्शन सस्मित करतात.

ट्रिआननच्या छोट्या राजवाड्यात दालने असून प्रत्येक दालनाशी निगडित असलेला रोमहर्षक इतिहास आमचे पर्स्पेक्टिव्ह असियानचे मार्गदर्शक तळमळीने व तितक्याच अभिमानाने सांगत. त्यातल्या एका दालनात रशियाचा झार व नेपोलियन यांची भेट कशी झाली याबरोबरच युरोपचा नकाशा बदलण्याचे नेपोलियनचे विचारही त्याने ओघात सांगितले. या वाड्यात लुई राजे थोडा काळच राहिले. नेपोलियनने मात्र या वाड्याचा थोडा बहुत वापर केला. या वाड्याभोवताली सुंदर बाग आहे. भौमितिक रचनाद्वारे असामान्य सिमीट्री साधून तयार केलेल्या बागा खास फ्रेंच धर्तीच्या असून त्यांचे नियोजन ला नोत्र या उद्यानविशारदाने ह्यांच्या निर्मितीच्या वेळीच केले आहे. सुप्रसिद्ध ट्रिआननचा करार येथेच झाल्याचेही त्याने सांगून जगातील महाशक्ती अलीकडच्या काळात या वास्तूत येऊन गेल्या आहेत.

ट्रिआनन बघण्यात नियोजित वेळेपेक्षा जास्त वेळ गेल्याचे भान येताच सर्वांना झटपट बाहेर येण्यास सांगितले कारण मुख्य राजवाडा तेथून २-३ कि. मी. होता व ते अंतर चालायचे होते.

मुख्य राजवाडा व त्याभोवतालची उपवने, उद्याने, कारंजी, कालवे, जलाशय यांची निर्मिती म्हणजे सूर्यपुत्र लुई १४ चे खरेखुरे स्मारक आहे. मुळात हा भूभाग दलदलीचा म्हणून वनस्पतीच्या वाढीस योग्य नव्हताच. ही नैसर्गिक अडचण प्रचंड प्रमाणात दुसरीकडून माती आणून टाकून दूर केली. २०,०००, मजूर ६००० घोडे जवळजवळ अर्धशतक राबत होते. तिथे सुरुवातीस १४०० कारंजी होती. आज मितीस ६०० कारंजी आहेत. कारंज्यांचे लुई १४ ला विलक्षण वेड होते. एवढ्या

कारंज्यांना पाणी अफाट प्रमाणात लागणार म्हणून बिएव्र नदीचे पात्रच त्याने हजारो मजूर लावून वळविले आणि ३७,००० एकरांत पाणीतर खेळविलेच परंतु १४०० कारंजी थुईथुई उडायला लावली. केवढे अवाढव्य स्वप्न आणि त्या स्वप्नपूर्तीसाठी केवढी अजस्त्र यंत्रणा व पैसा उभा केला.

व्हर्सायचा राजवाडा, बाग व उपवन यांनी एकूण सदतीस हजार एकर जमीन व्यापली आहे. ह्या निसर्गवेड्या लुईने दरवर्षी दीड लाख नवी रोपे लावण्याचे व जगविण्याचे हुकूम दिले. लुई १४ ने लावलेले वृक्ष आजही सर्व परिसरास हिरवेकंच करून सोडतात. त्यांतील एका झाडाच्या सालीचा तुकडा मी येताना भारतात आणला होता.

ही सारी अवाढव्य, विस्तृत तरी सौंदर्यपूर्ण रचना करताना तरुण स्थापत्यविशारद हरदोइ-मॅन्सर्ट (३१ वर्षे) यांच्या प्रतिभेला आव्हान होते, त्याने लबून ह्या सजावटकार, ल नोत्र उद्यानविशारद यांच्या साहाय्याने जगातील एक एकमेवाद्वितीय भव्य व कलात्मक राजवाडा निसर्गसौंदर्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण केला.

मुख्य राजवाड्याच्या दर्शनी भागात सध्या लुई १४ चा भव्य अश्वारूढ पुतळा आहे. पुतळ्यासमोर व्हर्सायचा राजवाडा दिमाखानं उभा आहे. यात शेकडो दालने, सभागृहे, ऑपेरा थिएटर, चर्च, शयनकक्ष, खलबतखाने समाविष्ट आहेत. त्यातील बऱ्याचशा वस्तू १७८९ च्या राज्यक्रांतीच्या वेळी लिलावात तरी विकल्या गेल्या किंवा लुव्र ह्या संग्रहालयात हलविल्या गेल्या. तरी आज जे तिथे दिसते तेच समृद्धीचे सारे संकेत धुडकावणारे आहे, तर प्रत्यक्ष लुई १४ व्याच्या वैभवशाली काळात तिथे किती वस्तू असतील, यांचा अंदाजच थक्क करणारा आहे.

मला सर्वच दालने आवडली कारण उंची फर्निचर्स, इटालियन संगमरवरी फरशीचे आच्छादन, उंची टॅपेस्ट्री, अप्रतिम तैलचित्रांनी भरलेल्या भिंती, हंड्या-झुंबरे ह्या साऱ्यांनी लुई १४ व्या पासून माझ्यासारख्या पर्यटकाला तोषविले आहे. ते जपून ठेवण्याची फ्रेंच राष्ट्राची भावनाच मला प्रकर्षाने जाणवली. काय बघायचे ते जुने वाडे, फर्निचर ? काय उपयोग आहे त्याचा आज ? त्यानं काय बेकारीचे-अन्नवस्त्रांचे प्रश्न सुटणार आहेत काय ? असे अनेक प्रश्न आपल्या इथे उपस्थित होतात. पण आपण हे प्रश्न सोडविले पाहिजेतच, पण त्यासाठी राष्ट्रधर्माची भावना निर्माण व्हायला हवी. तसेच संस्कृतीची उच्च मूल्येही जोपासली गेली

पाहिजेत. गत इतिहासातून वर्तमानकाळातील आव्हाने स्वीकारण्यास कुठे चेतावणीची ठिणगी सापडते का, हेही बघायला पाहिजे. या बाबतीत फ्रान्सचे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. मलाच काय परंतु सर्वांना आवडलेला, चिरकाल स्मरणात राहील असा व्हर्सायचा तुकडा म्हणजे हॉल ऑफ मिरर. ज्याचं नाव जगातील अत्युच्च व्यक्तींशी निगडित आहे, सजावटीच्या परमोच्च कल्पना जिथे साकारल्यात तो हॉल ऑफ द मिरर मी बराच वेळ पाहत होतो.

इथेच लुई १६ व्याचा मेरी आत्वानेतशी विवाहसोहळा संपन्न झाला. इथे ब्रिटिश सम्राज्ञी राणी व्हिक्टोरिया राहिली. रशियाचे अत्युच्च नेते ब्रेझनेव्ह इथेच विरामले होते. राणी एलिझाबेथ इथे दोन वेळा येऊन गेली. १९१९ साली सुप्रसिद्ध व्हर्सायचा तह त्याच सभागृहात ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी यांच्या समवेत झाला. आता तर परराष्ट्रांच्या राष्ट्रप्रमुखांचे भेटण्याचे ते अधिकृत ठिकाणच झाले आहे. असा गौरवास्पद इतिहास असलेल्या त्या भव्य सभागृहाचे (पंचाहत्तर मीटर x दहा मीटर) प्रकाश नियोजन सतरा भव्य खिडक्या व त्या समोरील सतरा भव्य आरशांमुळे तसेच चाळीस हंड्या-झुंबरांच्या प्रकाशाने होते. ह्याच्या भिंतींचा व छताचा इंच न् इंच भाग लव्रूने सजविला आहे. ह्या हॉलमध्ये एका वेळी पाचशे-सहाशे पर्यटक सारे सौंदर्य न्याहाळत असतात. सतरा आरशांत त्यांचे परावर्तन झाल्याने फारच प्रचंड गर्दी असल्याचा भास होतो. एक एक आरसा दहा फूट रुंद व पंधरा फूट उंच आणि त्याची सोनेरी पिळदार लाकडाची फ्रेम सुद्धा प्रेक्षणीय आहे.

हा हॉल ऑफ द मिरर पाहिल्यावर जगातील सर्वोच्च वैभवाचे, लुई १४ चे भव्य स्वप्नपूर्तीच्या विचाराने आपण पुण्याहून इथवर येण्यासाठी जे परिश्रम घेतले, आपल्या परिश्रमास ज्या फ्रान्स मित्रमंडळाने हलके केले, त्या सर्वांच्या ऋणाचा भार असह्य वाटू लागला. आयुष्यात आपण कधी हॉल ऑफ द मिररमध्ये फिरू शकू, यावर स्वतःचा विश्वास नव्हता. पण तो क्षण आज प्रत्यक्ष साकार झाला होता.

हे सर्व पाहताना तिथल्या विविध देशांतल्या पर्यटकांचे नमुने, त्यांची पाहण्याची व आकलनाची कुवत, शांतता व शिस्तीचे कसोशीने पालन करण्याची वृत्ती आणि हे करीत असताना परस्परांशी सौहार्दपूर्ण स्मित हास्य हे सुद्धा मला विलोभनीय व अनुकरणीय वाटले. विशेषतः शाळेतील शिक्षक ज्या तळमळीने आपल्या विद्यार्थ्यांच्या गटांना गत इतिहासाचे एक एक पान उलगडून दाखवीत असत आणि विद्यार्थीही विलक्षण तन्मयतेने ते ग्रहण करीत असत. जिथे युवा

पिढीवर इतिहासाचे योग्य ते संस्कार करणारे शिक्षक, इतिहास वस्तूरूपाने जतन करण्याची तीव्र राष्ट्रीय भावना जिथे आहेत, ते देश जगाच्या इतिहासात सामर्थ्यानं, दिमाखानं मिरवणारच.

व्हर्सायचं सर्वांत जबरदस्त आकर्षण होतं, अपोलोचं कारंजं. एका भव्य वर्तुळाकार तलावाच्या मध्ये अपोलो देवता आपल्या रथावर स्वार झाली आहे. त्याने उधळणाऱ्या उमद्या घोड्यांचे लगाम खेचल्याने घोडे पुढील पाय उंचावून झेप घेण्याच्या आविर्भावात आहेत. अपोलोचे पिळदार शरीर, खांद्यावरून भुरभुरत उडणारे वस्त्र, भुरभुरणारे केस हे सारे तपशील पंचधातूच्या रसातून साकार झालेले पाहताना शिल्पकाराला नकळत दाद दिली जाते. पर्यटकांची गर्दी असली की त्या तलावातून अजस्त्र तसेच नाजूक कारंजी एकदम उसळी घेतात तेव्हाचे दृश्य पर्यटकांना खिळवून टाकते. कारज्यांच्या तुषारांमुळे एक धूसर वातावरण तयार होते. त्या धूसर वातावरणात अपोलो देवता, त्याचे रथ व उधळणारे अश्व या साऱ्यात एक गतीचा भास होतो आणि आपण एका स्वर्गीय दृश्याकडे पाहतो असे वाटते. आपल्या सौंदर्यदृष्टीस एक नवेच लेणे गवसते. हे पाहण्यासाठी इतक्या दूरवरून यावे लागले आणि तेही आयुष्यात एकदाच पाहायला मिळाले, तरी सौंदर्याच्या परमसीमाचे अंधुक ज्ञान झाले. मन तृप्त झाले. पण ही फ्रान्समधली छोटी मुले लहानपणापासून इतके सौंदर्य पाहत व अनुभवत आली आहेत. त्यामुळे त्यांचा मानसिक विकास अत्यंत निकोपपणे झाला आहे. जीवनात कुरूपता पदोपदी, क्षणोक्षणी भरली आहे, तरी सौंदर्याविष्काराचे असंख्य क्षणही मानवाने निर्माण केले आहेत. फ्रान्समध्ये फिरल्यावर जीवनातील सौंदर्यच वेचण्याची वृत्ती निर्माण झाली. कुरूपतेकडे काणाडोळा करण्याचा स्वभावही येथेच घडला. त्यामुळेच की काय मला सर्वत्र चांगलेच दिसले. ते सर्व टिपण्याचा प्रयत्न केला.

व्हर्सायचा विस्तीर्ण परिसर, ३०-४० दालने, जिने चढताना, उतरताना, पाहताना पायाला गोळे येऊ लागले. आणि येथून परत मूळच्या प्रवेशद्वारावर २-३ कि.मी. चालत जाण्याच्या कल्पनेनेच मरगळ आली. परंतु आम्हाला व्हर्सायचा राजवाडा व तिथला अफाट परिसर दाखविणाऱ्या मार्गदर्शक फ्रेंचांचा उत्साह तिळमात्र कमी झाला नव्हता. अखंड उत्साह हा ह्या मंडळींचा स्थायीभावच असावा. सभोवतालच्या रमणीय परिसरामुळे, हवामानामुळे त्यांच्या गात्रांना कधी थकवा येतच नसावा. परतीच्या वाटचालीत एक सुंदर उपवन लागते. एकाहून सुंदर,

रेखीव व घोटीव संगमरवरी पुतळ्यांची रांगच दिसली. स्त्री-पुरुषांच्या सौंदर्याचे तपशील अचूकपणे शिल्पांमध्ये कोरले होते. पायवाटेच्या कडेने पाच-सहा इंच जाडीचे हिरवेगार लॉन होते. थोडेसे ओलसर असल्याने जो-तो पायवाटच बरी म्हणून पराभूत सैनिकांप्रमाणे गळून गेल्यासारखे स्वतःला फरफटत होते. आमच्या एका फ्रेंच मित्राने मात्र आग्रहपूर्वक लॉनवरून चालण्याची विनंती केली. इतरांनी त्याकडे काणडोळा केला. मी मात्र बूट ओले झाले तर झाले बघूयात तरी काय मजा असते ती, असे म्हणून त्या फ्रेंच सद्गृहस्थांबरोबर लॉनवरून चालण्यास सुरुवात केली. मऊ मऊ लॉनवरून चालताना अक्षरशः पर्शियन गालीच्यावरून चालण्याचा अनुभव तर आलाच परंतु शिणवटा केव्हाच पळून गेला होता. दिवसभराच्या पायपिटीमुळे तर आमच्यातल्या काही जणांनी काही वेळा फतकलच मारले होते. परंतु ह्या लॉनवरून चालताना परिश्रम कुठल्या कुठे पळाले. मनाला व शरीराला एक तजेला आला. त्या फ्रेंच गृहस्थाबरोबर व्हर्सायच्या इतिहासाची चर्चा करता करता मुख्य प्रवेशद्वार कधी आले ते, कळालेच नाही.

मुख्य प्रवेशद्वाराबाहेर पडताना सूर्यराजा लुई १४ व्याच्या स्वर्गीय प्रासादातून, उद्यानातून जो अमृतानुभव घेतला त्याच्या उत्कट आठवणीने मनावर समाधानाच्या गुलाबपाण्याचा सौम्य शिडकाव झाला. त्यामुळे बसमध्ये बसून पॅरीसला परतताना सकाळपेक्षा उत्साह दुप्पट झाला होता.

o

# ला दि फाँ. . .

पॅरीस शहराचा तोंडवळा अर्वाचीन आहे. चार-पाच मजली फ्रेंच पद्धतीच्या इमारती, रुंद रस्ते, राजवाडे, पूल, कारंजी आणि स्मारके यांमुळे पॅरीसला प्राचीनपणाची झाक आहे. इमारतीसुद्धा काही शतके जुन्या असल्याने सर्वच इमारती करड्या रंगाच्या वाटतात. पॅरीसचे हेच रूप सर्वांना प्रिय असावे. त्यामुळे न्यूयॉर्कसारख्या गगनचुंबी सिमेंट कॉंक्रीटच्या इमारती अभावानेच आढळतात. अपवाद डुराक येथील एक गगनचुंबी इमारत. आयफेलवरून पॅरीसच्या अर्वाचीन पार्श्वभूमीवर ही इमारत विसंगत वाटते. धोतर, कुडता, पागोटे घालून गळ्यात नेकटाय बांधल्यासारखं वाटतं. पॅरीसीयनांचा टोलेजंग इमारती बांधण्यास सक्त विरोध असायचं कारण त्यांना अशा कॉंक्रीटच्या जंगलामुळे शहराच्या सौंदर्याचा समतोल बिघडेल, ही साधार भीती वाटते.

म्हणूनच पॅरीसपासून दूर एका विभागात एकाहून एक उंच अशा गगनचुंबी इमारती बांधल्या गेल्या आहेत. त्या विभागाला ला दि फाँ (Le defense) असे संबोधतात. आमच्या फ्रेंच मित्रांनी गमतीने म्हटले, "Le defense is Nariman point of Paris" स्काय स्क्रॅपर्सना विरोध करणाऱ्या फ्रेंचांना आजकाल ला दि फाँच्या अत्याधुनिक स्वरूपाचा अभिमानही वाटू लागला आहे. पॅरीसच्या वातावरणात आपल्या नजरेत एक विशिष्ट चित्र व अपेक्षा पॅरीसबद्दलच्या निर्माण झालेल्या असतात. ला दि फाँला गेल्यावर एक आगळे-वेगळेच वातावरण दिसते. सर्वच आखीव-रेखीव. चौरस, आयत या भूमितीच्या दोन रूपांतच सारे ला दि फाँ बंदिस्त केले आहे. त्यामुळे बांधकामातील विविधता, चोखंदळपणा, अभिरुचीची छाप हे दिसून येत नाहीत. तरी मला हा भाग वैशिष्ट्यपूर्ण वाटला.

तिथल्या FIAT ह्या प्रचंड काळ्या रंगाच्या पन्नास मजली इमारतीच्या सर्वांत वरच्या मजल्यावर आमच्या ग्रूपला भेट देण्यासाठी आमंत्रण होते. लिफ्टमध्ये बसून

आम्ही काही क्षणांतच शेवटच्या मजल्यावर पोहोचलो. आश्चर्यकारकच वाटते. आपल्या इथे एवढ्या उंचीवर लिफ्टने जायचे असेल तर वृत्तपत्राचा अग्रलेखही त्या प्रवासात वाचून होईल. त्या लिफ्ट इतक्या वेगाने जात असूनही शरीरावर गुरुत्वबलाने जो विशिष्ट परिणाम जाणवतो तोही जाणवला नाही, हे विशेष. दररोजच अशा उंच इमारतीत अनेकदा जावे लागते. दर वेळी होणारा वेळेचा अपव्यय आणि दर वेळी चढता-उतरताना शरीरास होणाऱ्या गुदगुल्या फ्रेंचांना परवडणारे नसल्याने विज्ञानाचा उपयोग करून उत्कृष्ट लिफ्टची यंत्रणा विकसित केली आहे. मानवी सुखाच्या परिसीमा गाठताना फ्रेंच माणसं अपरंपार कष्ट करताना दिसतात.

सर्वच मजल्याचे वैशिष्ट्यं म्हणजे मोठ्या खिडक्या. तिथल्या व्यवस्थापकाने सांगितले की, मोठ्या खिडक्यांमुळे भरपूर सूर्यप्रकाश येतो व त्यामुळे विजेची बचत होते. विजेचा वापर हरघडीला आपल्यापेक्षा शेकडो पटीने जास्त करतानाही शक्य तिथे विजेचा वापर टाळण्यास मात्र फ्रेंच विसरत नाहीत. तसेच ज्या खोलीत कुणी नाही किंवा तिचा वापर नाही तिथले दिवे मालवण्याची सवय प्रत्येक फ्रेंचाला असल्याचे अनेकदा दिसून आले. 'फियाट' इमारतीवरून पॅरीसचे व ला दि फाँ विभागाचे विहंगम दर्शन झाले. दोन परस्परविरोधी प्रकृतीची पॅरीसची दोन रूपे शहराच्या दोन टोकाला आहेत. लॅटीन क्वार्टरचे अगदी १७व्या शतकात नेणारे दृश्य आणि ला दि फाँचे एकविसाव्या शतकात नेणारे दृश्य विस्मयकारी आहेत.

ला दि फाँ हे कार्यालयांच्या केंद्रीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवरील एक सुंदर उत्तर आहे. मुंबईत फोर्ट विभागात साऱ्याच कार्यालयांची गर्दी झाल्यामुळे वाहतूक व्यवस्थेवर कमालीचा ताण पडून त्या अनुषंगाने इतरही अनेक समस्या उभ्या राहिल्या आहेत. पॅरीसच्या बाबतीतही हेच अनुभवास आल्यामुळे ला दि फाँ हा भाग वसविला असून अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांची अवाढव्य कार्यालये या ठिकाणी वसली असून RER, METRO, RATP यांच्या अत्यंत जलद भूमिगत रेल्वे सेवा व पृष्ठभागावरील बससेवा यामुळे कार्यालयीन कामासाठी ह्या भागात येणे सहजशक्य झाले आहे. म्हणून पॅरीसचे 'पॅरीस'पण शिल्लक राहिले आहे.

ह्या ला दि फाँच्या परिसरात एक औद्योगिक प्रदर्शन एका अवाढव्य इमारतीत भरले होते. त्या इमारतीचे वैशिष्ट्य म्हणजे आधाराचा एकही खांब नसताना फूटबॉलचे मैदान झाकले जाईल इतके विस्तीर्ण सिमेंट कॉँक्रीटचे छप्पर होते.

लोखंडाचे काय, सिमेंट काँक्रीटचे काय, महाकाय राक्षसी रचना करण्यात फ्रेंच इंजिनिअर्स, आर्किटेक्ट जगात प्रसिद्ध आहेत.


याच प्रदर्शनात जर्मनीच्या प्रसिद्ध बर्लिन भिंतीचे सिमेंट काँक्रीटचे प्रचंड तुकडे ठेवले होते. बर्लिनची भिंत तुकड्याच्या स्वरूपात का होईना, परंतु पॅरीस मुक्कामात पाहायला मिळाली, याचा अतिशय आनंद झाला. त्या भिंतीच्या एका बाजूला खूप काही लिहिले होते, रेखाटने केली होती. ते बहुधा निषेधाचे किंवा 'विजय असो' अशाच प्रकारचे मजकूर असावेत. आश्चर्य म्हणजे त्या भिंतीच्या दुसऱ्या बाजूला काहीही मजकूर नव्हता. माझ्या बरोबरच्या फ्रेंच मित्राने हे कोडे सहजपणे उलगडले. "ज्या बाजूला खूप काही लिहिले आहे ती भिंतीची बाजू पश्चिम जर्मनीची आहे, कारण तिथे लोकशाही आहे, अभिव्यक्तीचे पूर्ण स्वातंत्र्य आहे आणि याउलट. . ." त्याने पुढे काही सांगण्याअगोदर आमच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. नकळत का होईना परंतु लोकशाहीचा उदोउदो आपल्याकडून झाल्याचे समाधान त्या फ्रेंच मित्राच्या चेहऱ्यावर दिसले.

बहुचर्चित असे एका कमानीचे बांधकाम तिथेच चालू होते. आर्क द त्रूंफ हे पॅरीसमधले सर्वात उंच व अवाढव्य दगडी स्मारक. नेपोलियनने हे विजयस्मारक बांधले. त्याच्या उंची, रुंदी व भव्यपणाबद्दल पॅरीसीयनना अभिमानही आहे. परंतु हे आर्क द त्रूंफ आख्खे आतमध्ये मावेल अशी चौकोनी कमान बांधली जात आहे याचा सर्वांना विलक्षण अभिमान आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेतून आर्किटेक्ट ठरविले गेले व त्यांचे आता जगातील सर्वांत भव्य कमाननिर्मितीचे काम चालू आहे.

आधुनिक युगातही फ्रेंच आर्किटेक्ट व इंजिनियर्सना त्यांच्या प्रतिभेस पॅरीसीयनच्या पुराणमतवादी वृत्तीमुळे खुद्द पॅरीस शहरात वाव राहिला नाही. काही अंशी योग्यही आहे. परंतु गगनाला गवसणी घालणाऱ्या फ्रेंचांच्या प्रतिभेला ला दि फाँ येथे मुक्त वाव मिळाला आहे. त्यामुळे पॅरीसच्या सौंदर्याच्या खजिन्यात ला दि फाँ हा बंदा नग दाखल झाला आहे हे पर्यटकांचं महाभाग्य !

o

# मालमेसाँ...



The Dome Church

आख्ख्या युरोपला तलवारीच्या धारेवर धरून युरोपचा नकाशा पुसून मनाप्रमाणे नवा नकाशा तयार करण्याची स्वप्ने पाहाणारा चक्रवर्ती नेपोलियन बोनापार्ट हा अनेक ग्रंथांचा नायक झाला आहे. कॉर्सिका बेटावर जन्मलेला हा पोर स्वतः दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर फ्रान्सचे तख्त मिळवून फ्रान्सचा बादशहा म्हणून तुलरीझच्या व फॉन्तेन्वलच्या राजवाड्यात राजवैभव उपभोगू लागला. नियतीच्या एका फटक्यात भणंग होऊन एलबाला खितपत पडला आणि अक्कलहुशारीने हा नरशार्दूल तेथून सटकून चिखलाने भरलेल्या पायानं पुन्हा फ्रान्सच्या तख्तावर विराजमान झाला. जगाच्या रंगभूमीवर इतकं नाट्यमय जीवन जगलेल्या नेपोलियनचे पॅरीस पाहिले, त्याची स्मारके पाहिली आणि माझ्या आवडत्या नेपोलियनच्या मातृभूमीचे दर्शन घेतले.

फ्रान्सला जाण्याची प्रेरणा नेपोलियनच्या चरित्रातूनच घेतली. फ्रेंच

राज्यक्रांतीची रोमहर्षक हकीगत अनेकदा वाचली होती. 'टेल ऑफ टू सिटीज', 'स्कार्लेट पिंपरनेल' ह्या कादंबऱ्या अभ्यासल्या होत्या. त्यातील स्थळवर्णने वाचून कधी फ्रान्स पाहीन, असे झाले होते. तेव्हा पॅरीसमध्ये असताना नेपोलियनसंबंधीच्या सर्व जागा पाहण्याचे ठरविले. त्यानुसार नेपोलियन जेथे बराच काळ राहिला त्या मालमेसाँला जाण्याचा दिवस उजाडेपर्यंत पॅरीसचा मुक्कामच संपला.

पॅरीसमध्ये प्रत्येक गोष्ट महाग. युरोपमधले अत्यंत महागडे शहर समजले जाणाऱ्या पॅरीसमध्ये मी जितकी म्युझियम्स पाहता येतील तेवढी पाहिली. नेहमीची आवर्जून पाहावीत अशी ठिकाणं म्हणजे आयफेल टॉवर, लूव्र, नोत्रदाम ही स्थळे बऱ्याचदा पाहिली. शेवटचे चार दिवस वेगळ्याच पद्धतीनं पॅरीस पाहायचं ठरवलं. मुळात फ्रान्स दौरा हा नशिबानं घडला होता. त्यात पॅरीसमधला ११ दिवसांचा मुक्काम स्वतःच्या पैशानं कधीच शक्य नव्हता. परंतु पर्स्पेक्टिव्ह असिएनमुळे अशक्य ते शक्य झाले. १९ मे रोजी पॅरीस मुक्काम अधिकृतरीत्या संपला. पॅरीस सोडायला मन तयार होईना. परत परत पॅरीस, त्याचे रस्ते, बागा, उपवने पाहावीत असे वाटे. पॅरीसचा इंचन् इंच भाग पायी फिरून बघावा, काही अपूर्व क्षण कॅमेऱ्यात बंद करावेत आणि आयुष्यभरची शिदोरी जमवावी असा जोरदार विचार मनात आला. परंतु ह्या पॅरीसमध्ये राहायचे कुठे ? कारण १९ मे रोजी पिअर यांच्या घरचा मुक्काम हलवायचा होता. बाहेर हॉटेलमध्ये चौकशी केली. राहाणे, जेवण, नाष्टा यांचे आकाशाला भिडणारे दर पाहून एक दिवसही राहाणे शक्य नव्हते. त्याच वेळी पॅरीस शहरावर नकळत मी प्रेम करू लागलो होतो. मला त्या शहरात रस्तोरस्ती पाय फुटतील तसे भटकावे, कुठल्यातरी पुलाच्या कठड्यावर विसावून रहदारी, माणसं न्याहाळत तासन् तास बसावे, रात्र होईपर्यंत जे जे बघता येईल ते पाहावे आणि रात्रीच्या त्या यक्षनगरीत तरंगत संगीत, लय, गती, गंध यांचा आस्वाद घेत हिंडावे असे तीव्रतेने वाटू लागले.

अशाच विचारात रात्री शांपिनीला पिअर कुटुंबात गेलो. त्या रात्रीचे जेवण शेवटचे जेवण होते. रमत-गमत, गप्पा मारत गेल्या ११ दिवसांतील उजळ क्षणांची उजळणी करीत मी, पिअर व मादाम दानिएल बऱ्याच उशिरापर्यंत जेवत होतो. दोघेही तोंडी परीक्षा घेतल्याप्रमाणे मी पॅरीसमधले काय काय लक्षात ठेवलेय याची चाचपणी करीत होते. त्यांनी सहज प्लास द कॉंकार्डचा विषय काढला. मी त्यांना

प्लास द कॉंकर्ड पासून गार द ऑस्टरलिझ पर्यंत चालत कसा गेलो हे जेव्हा सांगितलं तेव्हा ते हबकूनच गेले. मी निम्म्याहून अधिक पॅरीसची पायपीट एका दिवसात केली होती. तो माझा 'ट्रेक' त्यांना आश्चर्यकारक वाटला. पण त्यांचा विश्वास बसेना. पिअरने लिव्हिंगरूममधल्या एका मोठ्या नकाशासमोर मला नेलं आणि विचारलं, 'व्हेअर ईज प्लास द कॉंकर्ड ?' मी चटकन त्यांना ते ठिकाण दाखविलेच परंतु तेथून मी कसा गार द ऑस्टरलीजपर्यंत चालत गेलो हे सांगून वाटेतल्या साऱ्या ठिकाणांची माहिती दिली, तेव्हा तो गारच पडला. माझ्या भटकंतीवर विलक्षण खूष झाला. विशेष म्हणजे 'रुई दी बोनापार्टे' हा रस्ता जेव्हा त्याला दाखविला— जो त्याला पॅरीसमध्ये राहूनही माहीत नव्हता— त्या क्षणी त्याने माझे दोन्ही खांदे धरून हलविले आणि आनंदाने धावत मादाम दानिएलकडे जाऊन माझ्या पॅरीसभ्रमंतीचं कौतुक करू लागला. आजपर्यंत त्या दोघांचं फ्रेंच संभाषण बिलकूल कळत नव्हतं. परंतु आज कळालं. नव्हे, थेट हृदयाला भिडलं. माझ्याबद्दलचे कौतुक दोघांच्या डोळ्यांत चमकताना पाहिलेला क्षण माझा मोठा मिळकतीचा ठेवा आहे. इथे माझे दैव हसले. माझ्या गेल्या २४ दिवसांच्या फ्रान्समधला तपश्चर्येला फळ आलं. कारण त्या दोघांनी चर्चा करून मला सुचविलं की मी आणखीन दोन दिवस त्यांच्याकडे राहून उरलेली ठिकाणं पाहून घ्यावीत. तत्क्षणी मी लंडनला जाण्याचे मनातल्या मनात रद्द केले आणि २४ मेला म्हणजे ४ दिवसांनी एअर इंडियानं रोम मार्गे भारतास परतायचं निश्चित केलं.

त्या दिवशी रात्री मी फार आनंदात झोपी गेलो. पॅरीसच्या एकाहून एक सुंदर स्वप्नात ती रात्र कशी सरली ते कळलेच नाही. सकाळी जागा झालो, परंतु एका वेगळ्या विचाराने थोडासा नर्व्हस झालो. आपण ह्या कुटुंबाला गेले अकरा दिवस आपल्या सोईसुविधांसाठी पहाटे पाचपासून रात्री अकरा तर कधी कधी पहाटे तीन वाजेपर्यंत तोशीस दिली. आता आणखी चार दिवस का त्रास द्यायचा. त्यापेक्षा आपण लंडनला निघून जावे असे वाटू लागले. पण त्याच वेळी पॅरीसचा मोह आवरत नव्हता. नेपोलियनचा मालमेसॉं पाहायचा होता. ह्या विचारांच्या गर्तेत मी गटांगळ्या खात अंथरुणात पडून राहिलो. सकाळचे आठ वाजले होते. दररोज साडेपाच वाजता उठून कामाला लागायची सवय. आज त्यात खंड पडला तो द्विधा मनःस्थितीमुळे. विशेषतः माझ्यामुळे त्या भोळ्याभाबड्या पिअर दांपत्याला होणाऱ्या त्रासाच्या विचारामुळे. तोच दार वाजले. मी उठून दार उघडले तर मादाम

दानिएल हसतमुखानं समोर उभी. "गुड मार्निंग ! मिस्टर शिरीष ! यू आर सो लेट ? आज पॅरीसला जाणार नाही का ?" मी काही उतर देणार तेवढ्यात तीच म्हणाली, "कम ऑन गेट रेडी ! आय हॅव प्रिपेअर्ड फूड फॉर यू !" मादामने माझ्या मनावरील दडपण क्षणात दूर केलं. मी बराच वेळ आवरत होतो. माझ्यापाशी डॉलर्स व फ्रँक दोन्ही नव्हते. ट्रॅव्हलर चेक होते. ते वटवून फ्रँक घेऊन मेट्रोचे तिकीट काढणे प्राप्त होते. पण बँक कुठे हुडकायची आणि फ्रँकशिवाय एक पाऊलही टाकता येत नव्हते. हे सर्व कसं करायचं ह्या विचारात असतानाच मादाम दानिएलने मला जुने सिझन तिकीट मागितले आणि खाली उतरून गॅरेजमधून कार बाहेर काढली. पंधरा-वीस मिनिटांत तिने मला आठवड्याचे मेट्रोचे तिकीट काढून आणून दिले आणि परत बजावून म्हणाली, 'कम ऑन हरी अप. गो टू पॅरीस अँड एन्जॉय !" पाहुणचाराची इतकी उंची यापूर्वी अनुभवली नव्हती.

मादाम दानिएलने माझ्या बॅगेत मिनरल वॉटरच्या दोन बाटल्या, ज्यूसची एक बाटली, बिस्किटाचा पुडा, सॅडवीचेस, सफरचंद आणि योगुर्तचे एक टीन भरले. माझ्या दिवसभरचे खाणे ती अशा तऱ्हेने दररोज सकाळी देत असे. त्या बॅगेबरोबर मेट्रो, पॅरीसचा नकाशा, टेलिफोनचे कार्ड, रेल्वे तिकीट आणि स्वेटर असायचे. एवढ्या तयारीनिशी मी थेट ला दि फाँ ह्या RER ह्या अतिजलद भूमिगत रेल्वे स्टेशनवर गेलो. स्टेशनाबाहेर पडून १५८A ही बस कुठे सापडते, हे शोधू लागलो. ह्या वेळी मात्र सबवेच्या चक्रव्यूहात जाम सापडलो. काही केल्या बसस्टॉपच येईना. शेवटी वैतागून समोरची गाडी धरून परत पॅरीसला जाण्याचा प्रबळ विचार मनात आला. परंतु नेपोलियनच्या वस्तुसंग्रहालयास जाण्याची तीव्र इच्छा होती. आणखी एकदा प्रयत्न करू, म्हणून शेवटचा निकराचा प्रयत्न केला. आणखी अर्धा तास धडपडूनही परत परत त्याच ठिकाणी येत होतो. शेवटी वैतागून एका बाकावर सुन्नपणे बसून राहिलो. रहदारी जवळजवळ नव्हतीच. परंतु सुदैवाने समोरून दोन काळे तरुण आले व मला विचारले, "१५८ बसस्टॉप कुठे आहे ?" मी त्यांना इंग्रजीतून माझी कहाणी सांगितली, तेव्हा त्यांनी सुचविले, आपण तिघं मिळून शोधू. नशीब म्हणजे पाच मिनिटांतच भुयारी बसस्टॉपसमोरच येऊन ठेपलो. भुयारी रेल्वे ठाऊक होती, परंतु भुयारी बसस्टॉप असेल, अशी कल्पनाच नसल्याने इतका वेळ वाया गेला होता. चौकशीअंती कळले की, १५८A ने प्रथम जायचे व कॅसानोव्हा स्टॉपवर उतरायचे. बसमध्ये तीन-चारच प्रवासी होते. स्टॉप कधी येणार, हे

विचारायला सोईस्कर म्हणून मी ड्रायव्हरच्या जवळच बसलो. कॅसानोव्हा नेमका कोणता स्टॉप, हे ठाऊक नसल्याने अस्वस्थपणे मी प्रत्येक स्टॉपला अधीर व्हायचो. माझी अधीरता पाहून ड्रायव्हरने मध्ये एकदा 'बरेच पुढे आहे कॅसानोव्हा' अशा अर्थाची खूण केली. शेवटी ड्रायव्हरने पुढच्याचा पुढचा स्टॉप, असे खुणेने सांगितले. त्याप्रमाणे मी खाली उतरलो व फूटपाथवरून चालू लागलो. आश्चर्य म्हणजे ती बस त्याने फूटपाथच्या कडेने माझ्यामागे आणली आणि आत येण्याची खूण केली. तात्काळ माझ्या लक्षात आले की, मी एक स्टॉप आधीच उतरलो आहे. मी परत बसमध्ये चढलो. परंतु त्या थोर ड्रायव्हरचे आभार कसे मानावेत, हेच कळेना. त्यानंतर योग्य स्टॉप येताच त्याने बस थांबवली व रस्ता ओलांडून पलीकडे जाण्याची खूण केली. एक स्मितहास्य करून तो ड्रायव्हर पुढील प्रवासास निघून गेला. माझ्यासारख्या परदेशी प्रवाशाची इतकी सौजन्यपूर्ण सेवा अनुभवून मी कृतकृत्य झालो. आपल्या इथे ह्याऐवजी 'काय राव शिकलेले दिसता. . .' अशासारखी अनेक उपहासात्मक वाक्येच कंडक्टरनी ऐकवली असती.

वाटेत मालमेसाँ कुठे आहे, हे कुणालातरी विचारावे म्हणून इकडेतिकडे पाहिले. रस्त्यावर शुकशुकाट. फ्रान्समध्ये माणसेच कमी. तरी सुदैवाने समोरून एक मुलगा व मुलगी येत होते. त्यांना अडवून इंग्रजीत मालमेसाँ कुठे आहे हे विचारले. त्या मुलाने खांदे उडवून हाताची विशिष्ट हालचाल करून माहीत नाही, असे फ्रेंचमध्ये सांगितले व तो पुढे चालू लागला. पण लगेचच त्याने त्या मुलीला बोलावले व मला सांगितले की तिला आग्ले म्हणजे इंग्रजी येते. तिने मोडक्यातोडक्या इंग्रजीतून जे सांगितले, त्या अनुरोधाने अर्धा तास चाललो तरी मालमेसाँ येईना. वाटेत एक पोलिस भेटला. त्याला विचारले असता, "सरळ जा" असेच सांगितले. शेवटी पंधरा मिनिटांनी बोर्ड दिसला— 'मालमेसाँ'. समोर भव्य लोखंडी फाटक होते. त्या फाटकापलीकडे विस्तीर्ण बाग होती व बागेपलीकडे जो भव्य दगडी वाडा दिसला तोच मालमेसाँचा किल्ला होता. घड्याळात दोन वाजले होते. अडीचला संग्रहालय उघडणार होते. तिथेच हिरवळीवर बसून जेवण केले.

ठीक अडीच वाजता सात फ्रँक देऊन तिकीट काढले. हा मालमेसाँचा किल्ला किंवा वाडा जोसेफाइन बोहारने हिचा होता. तिच्या नवऱ्याची गिलोटीनखाली कत्तल झाल्यावर ती विधवा येथे राहत होती. तिच्यावर नेपोलियनचे मन बसले व ते विवाहितही झाले. नेपोलियन सुरुवातीच्या काळात येथे नेहमी येई. पुढे घटस्फोट

घेतल्यानंतर तो थेट वाटर्लूच्या लढाईनंतर सेंट हेलीना बेटावर रवानगी होण्यापूर्वी काही दिवस येथे होता. पुढे ह्या वाड्याचे रूपांतर १९०६ साली संग्रहालयात झाले. नेपोलियनच्या अनेक वापरलेल्या वस्तू आठवणी म्हणून येथे ठेवल्या आहेत. जगज्जेता नेपोलियन ज्या वास्तूत राहिला, तेथे आपण आज प्रवेशणार, यातच माझे मन प्रफुल्लित होते.

लूव्र, इनव्हालिद यांच्या तुलनेने पर्यटक कमी होते. परंतु जे आले होते ते नेपोलियनविषयी वाटणाऱ्या अपार प्रेमापोटी. जगातील विविध राष्ट्रांतील नेपोलियनप्रेमींचे छोटेसे सम्मेलनच त्या छोटेखानी दोन मजली किल्लावजा वाड्यात भरले होते. मी एकटाच असा होतो की ग्रूपबरोबर नव्हतो. मी एका ग्रूपमध्ये सामील झालो. मार्गदर्शक फ्रेंच व इंग्रजीतून माहिती अतिशय रसभरित पद्धतीने सांगत होता. नेपोलियनच्या वैयक्तिक वापराच्या वस्तूंच्या दालनात एक कमी जाडीची परंतु पसरट पेटी होती. त्यात शस्त्रक्रियेसाठी लागणारी सर्व उपकरणे, शस्त्रे होती. सैन्यामध्ये वैद्यकीय पथक कार्यक्षमतेने राबविणारा नेपोलियन हा जगातला पहिला सेनानी. त्याच्या सर्व वस्तू जशाच्या तशा जतन केलेल्या होत्या. त्याच्या दाढीचा ब्रश, दाढीचा वस्तरा, आरसाही एका ठिकाणी ठेवलेला होता. नेपोलियनच्या चेहऱ्याशी ज्यांना सलगी करायला मिळाली त्या वस्तू पाहून नेपोलियनचे चरित्र आठवू लागले.

पॅरीसच्या नागरिकांनी सोन्याचे पाणी दिलेली जेवणाच्या उपकरणाची चकचकीत भांडी पद्धतशीरपणे मांडून ठेवली होती. एका दालनात नेपोलियनची झोपण्याची खोली होती. रणांगणावर भर धुमश्चक्रीतून घोड्यावर बसल्या बसल्या झोप काढणाऱ्या महान योद्ध्याचे शयनकक्ष पाहून मन गलबलले. ज्याने अविश्रांत परिश्रम करून फ्रान्सची कीर्ती वाढविली त्याला या शयनगृहात किती रात्री निवांतपणे झोपता आले असेल ? इतिहासाप्रमाणे सेंट हेलिना येथे अंतिम प्रवासास निघण्यापूर्वी येथे काही अस्वस्थ रात्री त्याने व्यतीत केल्या होत्या. त्याची पहिली लाडकी पत्नी जोसेफाईनही नव्हती, दुसरी पत्नी मारिया हीतर बापाकडे ऑस्ट्रियातच राहिली. नेपोलियनसोबत ह्या शयनगृहात होते, फक्त इटालीच्या मोहिमेचे नेत्रदीपक यश, ऑस्टरलीझच्या लढाईची, फ्रान्सच्या भवितव्याची रंगीत स्वप्ने आणि त्याच्या आठवणी. ह्या शयनगृहात त्याला झोप लागली असेल का ? हे सारे विचार मनात येत होते. पुढे एका ठिकाणी नेपोलियनने युद्धात वापरलेले

नकाशे-टिपणे व्यवस्थित मांडली होती. हा थोर योद्धा चांगलाच भूगोलतज्ज्ञ होता. युरोपचा सारा भूगोल त्याच्या नजरेत होता म्हणूनच शत्रूला नेहमी स्वतःला हव्या त्या ठिकाणी युद्ध करण्यास भाग पाडे आणि थोड्याशा सैन्यबळावर नेत्रदीपक विजय मिळविले.

जोसेफाईनचे शयनगृह, तिने वापरलेली टेपेस्ट्री हेही नीटनेटके ठेवले होते. जोसेफाईनवर नेपोलियनचे अतोनात प्रेम होते. तो तिला व्याकूळ होऊन अनेक प्रेमपत्रे पाठवी. त्यातून नेपोलियनचे निर्व्याज प्रेम प्रकट होते. नियतीस हे पसंत नव्हते. पुढे त्याचा रीतसर घटस्फोट झाला. जोसेफाईन सन १८ मध्ये मरण पावली. तिचे अत्यंत सुंदर असे पोर्ट्रेट येथे आहे. नेपोलियनचेही तैलचित्र या संग्रहालयात आहे.

संग्रहालय साधे आहे. नेपोलियनच्या दैनंदिन वापरातल्या वस्तू येथे आहेत. येथून जवळील दुसऱ्या वाड्यात नेपोलियनची सुप्रसिद्ध टोपीसुद्धा आहे. जी टोपी वाटर्लूच्या लढाईत धुळीत पडली होती. त्याच्या वस्तू पाहताच त्याचे सारे जीवनच डोळ्यासमोर येऊ लागले. मी ह्या संग्रहालयात अतिशय भावनाविवश झालो. नेपोलियनविषयी जिथे वाचायलाच फारसे मिळत नाही, तिथे त्या ठिकाणी राहून आयुष्यात कधी नेपोलियनचा अनेकदा स्पर्श झालेल्या वस्तूंच्या अगदी जवळ जाता येईल, असे स्वप्नातही वाटले नव्हते. त्यामुळे मालमेसाँला मी स्वप्नात असल्यासारखाच वावरलो. वाड्याबाहेर खास नेपोलियनची घोडागाडी ठेवली आहे, ज्यातून तो काही वेळा ऑपेरा पाहण्यासही गेल्याचे आठवले.

जवळच जोसेफाईनने लावलेली गुलाबाची बाग आहे. आवारात जुन्या परंतु पर्णसंभाराने डवरलेल्या वृक्षराजीमुळे वाड्याचा आसमंत अत्यंत रमणीय होता. पर्यटक तुरळकपणे हिंडत होते. नेपोलियनच्या प्रत्येक वस्तू पाहताना त्याच्यात आस्था स्पष्टपणे जाणवत होती. मी तसा थकलो होतो. जेवणही खच्चून केले होते. जोसेफाईनच्या गुलाबाच्या ताटव्याशेजारी एका वृक्षाखाली झाडाला टेकून बसलो. अशा ठिकाणी झोपले, तर कोण काय म्हणतील, याचा अंदाज घेण्यासाठी इकडे-तिकडे पाहिले. समोर झाडाखाली एकाने ताणून दिली होती. मीही माझ्या ह्या पॅरीसभेटीच्या कार्यक्रमात त्या वृक्षाखाली अर्धा तास छानपैकी झोप काढली. जाग आल्यावर बघितले— पाच वाजले होते. सर्वत्र निरव शांतता होती. पर्यटकांचे छोटे छोटे गट बागेमध्ये फिरत होते. मी जड अंतःकरणाने नेपोलियनच्या राहत्या

वास्तूचा निरोप घेऊन विचारांच्या तंद्रीतच निघालो. त्यात मी वाट चुकलो. चालत चालत बरेच अंतर गेलो. तिथे हजारो स्त्री-पुरुषांच्या टाळ्यांचा गजर ऐकला. कुतूहलाने वळसा घालून जिथून जमावाचा गलका ऐकू येत होता तिथे गेलो. आश्चर्याची व भाग्याची गोष्ट म्हणजे तेथे अश्वारोहणाच्या (Equastrian) स्पर्धा चालल्या होत्या.

o

# अश्वारोहण. . . .

मला अश्वारोहणाचा श्वास रोखून धरायला लावणारा खेळ पाहायला अतिशय आवडते. टी.व्ही. वर एशियाड व ऑलिंपिकच्या वेळी जो दोन-चार मिनिटे तो खेळ पाहिला तेवढाच. त्यामुळे हा रोमहर्षक क्रीडाप्रकार पाहण्याचे चान्सेस भारतात कमीच. त्यात आपला दर्जा जगजाहीरच. त्यामुळे अस्सल स्पर्धा कधी ह्या जन्मी पाहायला मिळतील, असे स्वप्नातही वाटले नव्हते. परंतु तो योगायोग सहजपणे नियतीनं जुळवून आणला.

एका रम्य उपवनात मोकळ्या जागी अश्वस्पर्धा होत्या. त्या मैदानाभोवताली लाकडी फळ्यांचे सर्कशीत जसे बांधतात, तसे स्टेडियम बांधले होते. त्याच्या अलीकडेच ओळीनं चाळीस-पन्नास विशिष्ट प्रकारचे तंबू ठोकले होते. त्यांतील काहींत घोडे होते ह्याचा अर्थ ते घोड्यांचे तंबू होते. स्टेडियममधील स्त्री-पुरुष, मुले-मुली टाळ्या वाजवून अश्वारोहकांचे कौतुक करीत होते. स्टेडियमवर खच्चून गर्दी असल्याने जेथून लोक उभ्याने बघत होते त्या गर्दीमागे असा उभा राहिलो की, तेथून मला संपूर्ण मैदान तर दिसतच होते, शिवाय जेथून स्पर्धा सुरू व्हायच्या ती जागाही दिसत होती.

उंच, धिप्पाड, देखणे घोडे व त्याहूनही मर्दानी दिसणारे अश्वारोहक स्पर्धेच्या तयारीत घोड्यावरून एका रिंगणात स्टेपिंग करीत होते. हेल्मेट घातल्याने योद्ध्याप्रमाणे भासत होते. मुळात फ्रेंच पुरुष देखणे, त्यांचे नाक तरतरीत असते. चेहऱ्यावर शांत, परंतु निश्चयी भाव, मैदानातील अडथळ्यांकडे एकाग्र नजर. या सगळ्यामुळे प्रत्येक अश्वारोहक मला नेपोलियनच्या सैन्यातला शूर शिपाईच वाटे. खूण होताच हलकासा पदन्यास करीत घोडा मैदानाकडे येई. त्या वेळी घोड्याची चाल पाहण्यासारखी असे. अश्वारोहकाने त्या घोड्याला हलकीशी थाप दिली की, घोडा एकदम मैदानावर झेप घेई आणि पावले मोजून टाकल्यासारखी पळत

अडथळा येताच विद्युतवेगाने त्यावर झेप घेई. लीलया अडथळा पार करून दुसऱ्या अडथळयाचा वेध घेई. दुसरा अडथळा पहिल्या अडथळयाहून उंच. घोडा जजमेंटनं त्यावरूनही उडी मारे. उडी मारून जमिनीवर टेकताना अश्वारोहक अक्षरशः घोड्यावरून उडत असे, परंतु क्षणात लीलया घोड्यावर स्वार होई. घोड्याला दूरदृष्टी दोष आहे. त्यामुळे त्याला जवळचे नीट दिसत नाही. म्हणून अश्वारोहक अडथळा दूर असतानाच चाल मंद करून घोड्याला अडथळा नीट पाहू देतो आणि घोडा तो अडथळा पाहून ठेवतो, स्वाराने लगाम ओढताच भरधाव निघतो. अडथळा टप्प्यावर आला की, स्वार विशिष्ट चेतना देतो आणि घोडा स्मरणशक्तीच्या व त्याच्या स्वतःच्या (अश्व) शक्तीच्या जोरावर स्वारासह त्या अडथळयांवरून झेप घेतो. घोडा व घोडेस्वार यांचे घनिष्ट साहचर्य, सराव व घोड्याची स्वामिभक्ती, त्याच्या जोडीला स्पर्धा जिंकण्याची तीव्र इच्छा (killing spirit) या सगळ्यांची परमसीमा गाठली जाते तेव्हाच प्रत्येक अडथळा पार करता येतो. खरोखरच जनावराची शक्ती व माणसाची बुद्धी यांच्या पूर्ण समन्वयातूनच हा मर्दानी खेळ साकारतो. स्पर्धा ऐन त्वेषात आलेली असताना अश्व व अश्वारोहक हे एकजीव झालेले असतात. अश्वारोहकाने दिलेले प्रशिक्षण व स्वामीच्या यशासाठी जीवाची पर्वा न करता स्वामीसह अडथळयांवरून झेप घेण्याची अश्वाची पात्रता यांचा कसच लागतो या स्पर्धाप्रकारात. त्यातूनही अपयश आल्यास दोघांचीही जबाबदारी समप्रमाणात राहते. असा हा खेळ रंगात आला होता. शेवटचा अडथळा पार केला की, प्रेक्षक टाळ्या वाजवून शाबासकी देत. मात्र घोड्याने प्रत्यक्ष उडी मारल्यानंतरच टाळ्या वाजवीत. घोडा अडथळयाकडे भरधाव पळताना मात्र स्टेडियममध्ये पूर्ण स्तब्धता असे. कारण टाळ्यांमुळे ऐन अडथळा पार करताना घोड्याची एकाग्रता भंग होऊ नये म्हणून प्रेक्षकही आपला धर्म पाळत होते. जनावराचीही कदर करणारे प्रेक्षक मी पहिल्यांदाच पाहिले होते. नाहीतर क्रिकेट मॅचमध्ये क्षेत्ररक्षकावर वस्तू फेकणारे प्रेक्षक कुठे आणि घोड्याची एकाग्रता भंग होऊ नये म्हणून शांत राहणारे हे प्रेक्षक कुठे. एखादा अश्व व अश्वारोहक सर्व अडथळे पार करून शेवटच्या अडथळयात दुर्दैवाने अयशस्वी ठरला, तर प्रेक्षक जोरदार टाळ्या वाजवून त्याचे कौतुक करीत. जिथे अपयशही यशाइतकेच टाळ्या घेते, तिथे खिलाडूपणा जन्म घेतो. प्रत्येक अपयशामागे यश असते, हीच खात्री खेळाडूला टाळ्यांच्या गजरात देणारे प्रेक्षक कुठे, तर क्रिकेटचा दौरा अपयशी झाला म्हणून विमानतळावर

निषेधपर घोषणा देणारे आपण कुठे ?'

असा हा जल्लोष चालला असता एक विलक्षण दृश्य दिसले. एक फ्रेंच युवती जीन शर्ट व पँटवर घोड्यांवर स्वार होऊन स्पर्धेसाठी तयार होती. त्या गोऱ्यापान नाजूक युवतीच्या चेहऱ्यावर विलक्षण करारीपणा दिसला. नजर अडथळ्याकडे एकाग्र. घोड्यावर थाप मारून जेव्हा तिचा उंच व धिप्पाड घोडा भरधाव दौडला, तो क्षण अविस्मरणीय होता. हा असला अवघड खेळ करणाऱ्या त्या युवतीचं मनोमन कौतुक वाटलं. फ्रान्समध्ये स्त्री-पुरुष हा भेद केव्हाच नष्ट झाला आहे. पुरुषांच्या जोडीनं अश्वारोहणात भाग घेणाऱ्या त्या फ्रेंच युवतीस पाहिल्यावर मला जोन ऑफ आर्कचीच आठवण झाली.

एखादा अश्वारोहक अडथळे पार करू न शकल्याने जेव्हा टाळ्यांच्या कडकडाटात मूळच्या जागी मागे येई त्या वेळी घोडा घामाने त्या थंडीतही निथळलेला असे. असाच एक पराभूत अश्वारोहक आला. त्याचा घोडा घामाने निथळत होता. पराभूत झाला असला तरी तो घोड्याला प्रेमाने मानेवर हात फिरवून शाबासकी देत होता. त्याची पत्नी धावत आली. तिने आपले गाल त्या घोड्याच्या मानेला, अंगाला प्रेमातिशयाने घासले. त्या क्षणी घोडाही विशिष्ट तऱ्हेनं खिंकाळला. काय प्रेम होतं त्या अश्वारोहकाचं त्या अश्वावर. पराभूत होऊनही तो व त्याची पत्नी त्या घोड्याला जणू धीर देत होते. जेव्हा माणूस व जनावर यांच्यात इतके प्रेम निर्माण होते तेव्हाच अडथळे पार केले जातात. ते दृश्य माझ्या डोळ्यासमोर अजूनही ताजे आहे. त्या प्रेक्षकांची दाद देण्याची सुसंस्कृत रीत मनावर कोरली गेली. अवचितपणे हा अश्वारोहण स्पर्धा पाहायला मिळाल्या. त्या अनुषंगानं फ्रेंच प्रेक्षक, फ्रेंच अश्वारोहक, इतकेच काय, फ्रेंच घोड्यांचेही आज एक नवेच रूप पाहायला मिळाले.

o

# विमान प्रदर्शन . . .

एअर बस ३२० च्या बंगलोर अपघातानंतर वृत्तपत्र, टीव्हीतून आपल्या सर्वांना कळलं की फ्रान्स हा एअरबसचा निर्माता आहे व जगात विमाननिर्मितीत कल्पकता, वेग व इंधनकार्यक्षमता यात फ्रान्सने लक्षणीय प्रगती केली आहे. फ्रान्सची मिराज विमाने आपल्या हवाईदलात विश्वासू संरक्षक म्हणून कामगिरी करीत आहेत. अशा पार्श्वभूमीवर पॅरीसमध्ये विमानांचे भव्य प्रदर्शन किंवा संग्रहालय असल्याचे व पर्स्पेक्टिव्ह असिएनने तिथे भेट ठरवली असल्याचे जेव्हा कळले तेव्हा आम्हा सर्व बत्तीस जणांना अत्यानंद झाला. परंतु फक्त पाच जणांनाच परवानगी मिळाली व त्यांत माझा समावेश होता. पॅरीसपासून दूर अशा ठिकाणी हे संग्रहालय आहे. जगात असे भव्य संग्रहालय फक्त वॉशिंग्टनला असल्याचे कळले.

शेकडो एकर जागेत प्रचंड हँगर्सखाली हे संग्रहालय पूर्णपणे पाहायला तीन-चार किलोमीटर चालावे लागते व हजार-बाराशे पायऱ्या चढाव्या-उतराव्या लागतात. म्हणजे हे अद्वितीय प्रदर्शन पाहायला श्रमही तेवढेच घ्यावे लागतात.

सर्वप्रथम मैदानावर कॉंकार्ड विमान ठेवले होते. ज्याचे नाव व पराक्रम केवळ ऐकला होता, ते बहुचर्चित कॉंकॉर्ड विमान प्रथमच पाहायला मिळाले. जगात फ्रेंच तंत्रज्ञान गाजले ह्या कॉंकॉर्डमुळे. पॅरीस-मुंबई नॉनस्टॉप उड्डाणामुळे बोईंग ७४७ चे अतोनात कौतुक वाटले. मुंबई-पॅरीस किंवा पॅरीस-मुंबई एकदाही न थांबता, इंधन न घेता हे ७४७ बोईंग कोणतीही तांत्रिक अडचण येऊ न देता सर्व साडेतीनशे प्रवाशांना सुखरूपच नव्हे, आरामशीर कसे नेते याचे कौतुक आम्ही करीत होतो. पण हे कॉंकॉर्ड सवाई ठरले. पॅरीस-सिडनी हे अंतर नॉनस्टॉप तोडणारे विमान अजबच म्हटले पाहिजे. इतके अंतर नॉनस्टॉप तोडायला हे विमान स्वनातीतच असायला हवे. त्याचा आवाज मानवाला सहन होत नसल्याने फ्रेंचांच्या सुपीक बुद्धीतून निर्माण झालेले पहिले कॉंकॉर्ड दुर्दैवाने एअर म्युझियममध्ये केविलवाणे

होऊन उभे होते. आत शंभर एक प्रवासी बसण्याची सोय असून ७४७ च्या तुलनेत खूपच लहान व अरुंद आहे. त्याचा आकारच हृदयाला धडकी देणारा आहे. हवा कापत ताशी १६०० KM वेगाने जेव्हा हे उड्डाण करते तेव्हा सर्व वातावरणात थरकाप होतो. असे हे कॉंकॉर्ड अत्यंत अभिमानपूर्वक आमचे फ्रेंच मागदर्शक दाखवत होते. सलामीलाच कॉंकॉर्ड दाखवून त्यांनी फ्रेंच तंत्रज्ञानाने चकित केले. त्यानंतर हँगरमध्ये गेलो. विल्बर राईटने अमेरिकेत जे विमान जगात पहिल्यांदा हवेत उडविले त्याच्या समकालीन विमानाने प्रदर्शनास सुरवात होते. जसजशी विमानब्रांधणीत प्रगती होत गेली आणि एकाहून एक उत्कृष्ट विमानांची मालिका गेल्या पंच्याऐंशी वर्षांत झाली त्याचे प्रत्ययकारी प्रदर्शन होते ते. काही विमानात चक्क वेताच्या खुर्च्याही होत्या. काही विमानांचे पंख तारांनी बांधलेले होते. काही विमानांत चालकांची जागा नगण्य व अत्यंत गैरसोईची होती. हळूहळू विमानाच्या आकारात वाढ होत गेली. पंखांचा विस्तार वाढत गेला. आतील बैठक व्यवस्था विस्तृत व आरामदायी होत गेली. काही विमानांत आपल्या नॅरोगेज रेल्वेस्टेशनवर असतात तसे बाक होते. पुढे फिरणारे पंखेसुद्धा सुरुवातीस लहान होते. काहींचे लाकडी पंखे होते. पुढे ते मोठे होत गेले. पूर्वी आकारात बराच बेढबपणा होता. पुढेपुढे त्यात सौंदर्यदृष्टी व एरोडायनामिक्सची जोड मिळून दर्जेदार आकार आले. त्यात प्रचंड महाकाय मालवाहू विमानेही होती. तसेच हिटलरच्या म्हणजेच गोअरिंग जगप्रसिद्ध विमानांच्या ताफ्यातील स्वस्तिक चिन्हाची बॉंबफेकी विमानेसुद्धा ह्या प्रदर्शनात समाविष्ट आहेत.

दुसऱ्या महायुद्धानंतर जेटचे युग सुरू झाले. मग वेगाची स्पर्धा सुरू झाली. आकार लहान होत गेले, वेग वाढत गेला. इंधनक्षमता सुधारत गेली आणि मानवजातीचे दुर्दैव ! संहारक्षमता पराकोटीस पोहोचली. हे सारे हे प्रदर्शन पाहताना जाणवले. कारण प्रत्येक विमानाशेजारी त्याच्या तांत्रिक गोष्टी लिहिलेल्या वाचल्या की हे सारे लक्षात येई. तिथे एक पूर्ण काचेचं विमान होतं. विद्युत दिव्यांच्या साहाय्यानं विमानाचं कार्य छान दाखविलं होतं. हँगर्स अतिशय उंच होती. काही विमानं दुकानात आकाश कंदील टांगावेत तसे टांगलेले होते आणि विशेष म्हणजे त्या विमानांचं जवळून निरीक्षण करता यावं म्हणून वर प्लॅटफॉर्म बांधले होते. अर्थात तिथे पोहोचायला पायऱ्या चढाव्या लागत.

परंतु ह्या विमान संग्रहालयात फारशी गर्दी नव्हती. चार तास आम्ही प्रदर्शन

पाहत हिंडत होतो. तेवढ्या काळात दहा-पंधरा शाळेच्या मुलांचा एक गट तेवढा दिसला. एक तर हे संग्रहालय पॅरीसपासून खूप दूर आहे व सर्व संग्रहालय पाहायला पायपीट मात्र खूप करावी लागते. तरी संग्रहालय आवर्जून पाहण्यासारखे आहे.

ह्या संग्रहालयाशेजारीच Air Port De Paris किंवा ADP चे प्रचंड वर्कशॉप आहे. जिथे जगातील बहुतेक सर्व विमानकंपन्या आपली विमानं दुरुस्तीसाठी, देखभालीसाठी येथे आणतात. आपल्या गावात जसा एखादा मिस्त्री कौशल्यामुळे प्रसिद्ध होतो व सर्व कामे त्यालाच मिळतात तसं जागतिक पार्श्वभूमीवर फ्रान्सचं तंत्रज्ञान नावाजलेले असल्याने बहुतेक विमानकंपन्या इथेच विश्वासपूर्वक दुरुस्तीस येतात. हे ठिकाण पाहायला आम्हा पाच भारतीयांनाच परवानगी होती. चार महाकाय हँगर्समध्ये दुरुस्तीसाठी मोठी विमाने उभी होती. मी तिथल्या इंजिनिअरला विनंती केली की मला एअरबस ३२० चे कॉकपीट बघायचे आहे. त्याने तात्काळ माझी विनंती मान्य केली व एअरबस ३२० चे हाय टेक्नॉलॉजीने युक्त असे कॉकपीट पाहायला मिळाले. विमान- दुरुस्तीचे काम करणारे कामगार आपापल्या कामातच व्यग्र होते. आमच्याकडे कुणी ढुंकूनही पाहिले नाही. अर्थात हा भाग खास संरक्षित असल्याने आम्हाला फारसे पाहाता आले नाही. मात्र आम्हाला जी सौजन्यपूर्ण वागणूक दिली गेली ती मात्र लक्षात राहील.

एकंदर फ्रान्सचे विमाननिर्मितीतील वर्चस्व मान्यच कराव लागते. तिथे असेही कळले की एअरबसचे वाढीव आसनव्यवस्था असलेले सुधारित मॉडेल लवकरच जागतिक बाजारपेठेत येणार आहे. आपल्या इंडियन एअरलाईन्सच्या ताफ्यात एअर बसचा मोठा वाटा आहे, तो काही उगाच नाही, हे इथले तंत्रज्ञान पाहून पटले.

o

# फेरफटका

प्रत्येक शहराला एक प्रकृतिमान असते. त्या शहरातील गल्लीबोळांतून, भव्य रस्त्यांवरून कलंदराप्रमाणे भटकले की हळूहळू प्रकृतिमानाचा अंदाज येऊ लागतो. पॅरीसमध्ये प्रवासी बसमधून केवळ नजरेने, तेही ओझरत्या, पॅरीसचे दर्शन घेण्यापेक्षा रस्तोरस्ती मुक्तपणे भटकणे यासारखे सौख्य नाही. आपल्या इथे पुण्यात डेक्कनवर, मुंबईला फोर्ट भागातून, सोलापूरला नवी पेठेतून आणि कोल्हापूरला रंकाळ्यावर भटकताना जो आनंद मिळतो त्याहून शतपटीने ज्यादा आनंद पॅरीसमध्ये कुठेही भटकताना मिळतो. कारण अशी कलंदराप्रमाणे भटकंती करणारे देशविदेशचे तरुण-तरुणी, आबालवृद्ध पॅरीसमध्ये रस्तोरस्ती आढळतात. रस्त्यावरची वाहतूक, रस्त्याच्या दुतर्फा उभी रंगीबेरंगी चकचकीत दुकाने, कॅफे, मद्यालये, माणसांची वर्दळ या सर्वांच्या मिश्रणातून क्षणाक्षणाला बदलणारे रूप मनात साठवत मनाला भावेल तसे भटकत राहाणे, थकल्यास रस्त्याच्या कडेला चार क्षण विसावणे आणि परत भटकंतीला सुरुवात करणे याचे अपूर्व समाधान अनेकदा घेतले. त्यातल्या त्यात लूव्हरपासून निघून तुलरिझमार्गे प्लास द कॉंकॉर्डला पोहोचणे, तेथून सुरू होणाऱ्या जगद्विख्यात शांज एलीझे राजपथावरून आर्क द त्रूंफला पोहोचणे यातली वैविध्यता, झींग काही औरच आहे. या संपूर्ण मार्गावर चाललेला उत्साहाचा उत्सव टिपता टिपता त्या उत्सवात सामील होणे, हे नकळत होते.

जगप्रसिद्ध लूव्हर राजवाड्याबाहेर आपण पडतो ते कॅरोसेलच्या भव्य कमानीतून. सोनेरी पाणी दिलेल्या ह्या भव्य, तरी नाजूक कलाकुसरीने नटलेल्या कमानीकडे माना उंचावून पाहणारे पर्यटक क्षणभर थबकतात. कॅमेऱ्याच्या फ्रेममध्ये संपूर्ण कमान आणण्याचा सर्वांचा प्रयत्न चाललेला असतो. इथली सर्वच जमीन दगडांनी आच्छादलेली आहे. शेकडो वर्षे त्यावरून पर्यटकांची वर्दळ झाल्यामुळे

ती गुळगुळीत झाली आहे. त्यावरून चालताना गंमत वाटतेच, पण एक जुनेपणाचा भास कायम् राहातो. अशा फरसबंद जमिनीवरून रेंगाळत गेलो की आपण तुलरिझ उद्यानात येतो. इथल्याच राजवाड्यात नेपोलियन बोनापार्टने काही काळ वास्तव्य केले होते. इथली सुप्रसिद्ध 'तुलरिझ जार्दीन' म्हणजे बाग ल ब्रून या विख्यात उद्यान ि...ारदाने केवळ राजघराण्यासाठी निर्माण केली. प्रसन्न हिरव्यागार लॉनच्या कडेने गर्द हिरव्या झाडीमुळे येथे मंद पावलांनी चालणे हे महान सौख्य आहे. जेव्हा हे उद्यान पूर्ण झाले, ते इतके अप्रतिम झाले की, ह्या वैभवशाली उद्यानाचा उपयोग केवळ राजघराण्याच्या व्यक्तींनीच करायचे ठरविले गेले. एका अप्रतिम उद्यानाला सारे जग वंचित झाले असते, परंतु तात्कालिन चार्ल्स ह्या लेखकाच्या अथक प्रयत्नांना यश येऊन हे उद्यान तमाम नागरिकांना खुले झाले. त्या चार्ल्सचे मनोमन आभार मानत आपण तुलरिझ बागेत गत इतिहासाची पाने चाळत फिरताना अशी काही खास दृश्ये नजरेस पडतात की त्यामुळे तुलरिसचा फेरफटका सार्थकी लागतो. जगातील एका अद्वितीय बागेत, जगातील विविध भागांतील पर्यटक वेगवेगळ्या मूड्समध्ये स्वच्छंदपणे भटकताना भेटतात. जीवनातल्या मूल्यवान क्षणांचा आकंठ उपभोग घेण्याच्या अनिवार इच्छेनं ही मंडळी मनाला जे आवडेल ते करतात. समोरासमोर नजरानजर होते, किंचित वाकून नजरांची नजरभेट होते. स्मितांची देवाणघेवाण माफक प्रमाणात घडते. कोण कुठले, काय संबंध, पण ते सर्व आनंदयात्री मधुरस्मित उधळत चाललेले असतात. हे अनपेक्षित सुखद स्मित स्वीकारत पुढे सरकत राहातो. तिथल्या झाडाखाली—झाडाआड मुळीच नाही—काही प्रणयी जोडपी प्रणयाराधनेत मग्न असतात. चुंबनाच्या वर्षावात एकमेकांना न्हाऊ घालतात. या जगात आपल्याशिवाय कुणाचेच अस्तित्व नाही, या ठाम विश्वासानं ती जोडपी प्रेमवार्तालापात मश्गूल असतात. केवढं अभय दिलंय फ्रेंच संस्कृतीनं त्यांना ! विशेष म्हणजे त्यांच्या प्रणयाराधनेत कुठेच बीभत्सपणा किंवा आंबटशौकीनपणा नसतो. तारुण्याच्या उसळत्या उन्मादाला इतकं अभिरुची-संपन्न पाहून वाटलं, नीती-अनीतीच्या कालबाह्य कल्पनांमुळे आपण तारुण्याचा बहर बंदिस्त करतो आणि त्यामुळेच तो बहर वेगळयाच विकृत स्वरूपात समाजाचं स्वास्थ्य बिघडवतो. स्वातंत्र्य संयमित असेल तर त्याचा आविष्कार प्रेमाराधनेतही सुंदरच दिसतो. त्यामुळेच की काय अशा एखाद्या प्रेमात मश्गूल जोडप्याशेजारीच एखादा तरुण स्वतःच्याच धुंदीत चिमण्यांना ब्रेडतुकडे खाऊ घालत बसलेला

असतो. त्याचे शेजारचे तरुण जोडपे काय करते इकडे त्याचे यत्किंचितही लक्ष नसते. इतकी निर्विकार वृत्ती येण्यामागे निवृत्तीची भावना नसून प्रवृत्तीची भुक्तवृत्ती आहे. तिथेच एखादा धिप्पाड जर्मन गृहस्थ वृत्तपत्र तोंडावर ठेवून ताणून देतो. एखादी फ्रेंच माता आपल्या मुलाशी चेंडू खेळत असते. या सर्वांच्या उपस्थितीमुळे त्या तरुण जोडप्याच्या प्रणयाराधनेत कुठेही खंड पडत नाही किंवा संकोचाने इतरांचे ओशाळणे सुद्धा नाही. चालत जाणारे अशा दृश्याकडे ढुंकूनही पाहत नाहीत. जो तो आपल्याला मिळालेले क्षण स्वतःच्या पसंतीने सत्कारणी लावण्याच्या धडपडीत असतो.

अशा मुक्त तरी संयमित वातावरणात फ्रेंच संस्कृतीचा एक अदृश्य धागा गवसतो. असे एक एक धागे सापडल्याच्या आनंदात चालताना एक सुंदर गोलाकार तळे लागते. त्या तळ्याकाठी कदाचित नेपोलियनची प्रेयसी जोझेफाईन आपल्या रूपाचे प्रतिबिंब पाहत असेल. तिथे आज शेकडो पर्यटक गर्दी करतात व त्या तळ्यातील प्रतिबिंबाचे छायाचित्र दुसऱ्याला घेण्याची विनंती करतात. इथे कॅमेऱ्याची अदलाबदल करून हजारो प्रतिबिंबं कॅमेऱ्याच्या निगेटिव्हमध्ये साठवून आपापल्या देशाला नेतात. ह्या तळ्यापासून जवळच प्लास द कॉंकॉर्ड हा पॅरीसमधील सर्वांत भव्य चौक आहे. टूलरिझ उद्यान जिथे संपते तिथेच एक अतिभव्य लोखंडी प्रवेशद्वार आहे. त्या दाराच्या दोन्ही अंगाला ल बूने निर्मिलेली टेरेस गार्डन आजही उभी आहेत, दमलेल्या पर्यटकांना विरंगुळा देण्यासाठी. या टेरेस गार्डनच्या बाकावर बसून पॅरीसचा बराच भाग नजरेखाली येतो. समोर प्लास द कॉंकार्डचे विस्तीर्ण चौक, त्यावरील प्रचंड कार वाहतूक, एका बाजूला ग्रॅंडपॅलेस, पिति पॅलेस, नजरेसमोर विश्वविख्यात शांजइलिसेचा धूसर परिसर सारे मन मोहून टाकते. इथे काही वेळ विसावून आपण प्लास द कॉंकार्डच्या विस्तीर्ण चौकात येतो. या चौकाचा भव्य विस्तार नजरेत मावत नाही. मध्ये चौक, चौकात भव्य कारंजी, चौकाच्या कडेला रुंद रस्ते, तसेच अनेक भव्य संगमरवरी पुतळे यांनी प्लास द कॉंकर्ड फुललेला आहे. लाल सिग्नल मिळताच तुंबणाऱ्या मोटारी आणि बांध फुटल्याप्रमाणे झेब्रावरून वाहणारे माणसांचे थवे. हिरवा सिग्नल मिळताच यंत्रवत थांबणारे माणसांचे थवे व सुसाट सुटणारे कारचे ताफे, हे सर्व एका लयीत चाललेले असते. त्यात गोंगाट कुठेच नसतो. इथल्या सर्वच सार्वजनिक उपक्रमांना, व्यवहारांना सौजन्य, शिस्तीचं वंगण पुरेपूर घातले असल्याने आरडाओरडा, गोंधळ,

गोंगाट कुठेच आढळत नाही. एवढा थोरला प्लास द कॉंकर्ड, प्रचंड रहदारी तरी कारगाड्यांच्या टायरचा रस्त्याशी आलेल्या संबंधामुळे जो काही ध्वनी निर्माण होईल तोच तेवढा आवाज. बाकी सर्व कॉम्प्युटर प्रोग्रॅमिंग तंत्रानुसार पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे चालू. कुठेही विस्कळीतपणा नाही. भोंगळपणा नाही. प्लास द कॉंकार्डचा परिसर रात्रीच्या रोषणाईत न्हाऊन निघतो. अशा वेळी कारगाड्यांचा तांडा सुसाट पळताना वितळलेली शुभ्र चांदीच जणू रस्त्यावर वाहते आहे, असा भास होतो. चौकाच्या मध्ये अनेक धारांनी उसळणारी कारंजी आहेत. ह्या कारंज्यातले पाणी थुई थुई नाचत परत हौदात पडताना, थेंबाथेंबातून प्रकाश परावर्तित झाल्याने दिसणारे दृश्य प्लास द कॉंकॉर्डचे सौंदर्य आणखीनच द्विगुणित करते. एखादी तरुणी त्या कारंज्यांचे तुषार अंगावर घेत, हौदातल्या पाण्यात हात फिरवीत बसलेली असते, तर एखादे वृद्ध जोडपे किलकिलत्या नजरेने कारंज्याचे कौतुक करीत असते. ह्या चौकात आज सतत उत्साहाची कारंजी रंगीबेरंगी रूपात उसळत जरी असली तरी इतिहासातील अत्यंत अमानुष घटना इथेच घडली आहे. हजारे निरपराध फ्रेंचांना काळालाही थरकाप व्हायला लावणाऱ्या गिलोटीनखाली यमसदनास पाठविले ते ह्याच चौकात. जगाच्या इतिहासात जाहीररीत्या अत्यंत क्रूरपणे आबालवृद्धांची कत्तल केल्याचे हे एकमेव उदाहरण आहे. पण त्या कटू आठवणींना काळाच्या उदरात गाडून ह्याच ठिकाणी अतिशय भव्य व सुंदर असे पुतळे उभे केले आहेत. तो रक्तरंजित इतिहास ह्याच स्थळी घडलाय हे आजचे तिथले सौंदर्य पाहून अविश्वसनीय वाटते. मानवी जीवनात कुरूपता अतोनात आहे. ती कुरूपता गाडून टाकून तिथं आनंदाची कारंजी करावीत, हेसुद्धा उच्च संस्कृतिमूल्य आहे. नेमक्या ह्याच संस्कृतिमूल्याचा प्रत्यय गतकालाचा इतिहास व सध्याची प्लास द कॉंकॉर्डची स्थिती पाहून येतो.

प्लास द कॉंकॉर्ड ओलांडले की शांज एलीझेचा परिसर सुरू होतो. ज्या शांज एलिझेचे संपूर्ण जगाला आकर्षण वाटते तो एक रुंद असा राजमार्ग आहे. आर्क द त्रूंफ पासून लूव्हरपर्यंतचा एक सरळ रस्ता आहे. त्यातील प्लास द कॉंकॉर्ड ते आर्क द त्रूंफ यामधील रस्त्याला शांज एलीझे असे संबोधतात. या नावाचा अस्सल फ्रेंच उच्चारसुद्धा कर्णमधुर वाटतो, तर तो परिसर कसा असेल ? पॅरीसला आल्यावर शांज इलिझेवरून चक्कर न मारणे म्हणजे खरेखुरे पॅरीस न पाहिल्यासारखे आहे. हा युरोपमधील सर्वाधिक रहदारीचा रस्ता मानला जातो. रस्त्यावर मोटारकारची

वर्दळ सर्वाधिक असते. रस्ता प्रशस्त तर आहेच, परंतु रस्त्याच्या दोन्ही बाजूला रुंद फूटपाथ असून फूटपाथपलीकडे वृक्षांच्या समांतर रांगा इतक्या शिस्तशीरपणे उभ्या आहेत की भौमितिक रचनाप्रमाणे त्यांची मांडणी वाटते. हरतऱ्हेच्या फुलझाडांमुळे हा परिसर अत्यंत रम्य वाटतो. अशा रस्त्याकडेच्या बागेत अधूनमधून प्रशस्त कॅफे, स्नॅक बार आहेत. तिथे खूप खुर्च्या असतात. त्या खुर्च्यांवर बसून गरम कॉफीचे घोट सावकाश घेत रहदारी न्याहाळणे हा एक मोठा नेत्रसोहळा असतो. याशिवाय फूटपाथवर बाक आहेत, पाय दमले तर त्यावर थोडा वेळ टेकायचं. मी असाच एका बाकावर बसलो. शेजारी एक वयस्कर जर्मन स्त्री होती. तिच्याशी बोलावे असे वाटले, पण ती शिष्ट असेल तर उगीच अपमान नको ह्या विचाराने काही क्षण तसेच घालविले. रस्त्यावर, फूटपाथवर अव्याहत वाहतूक चालली होती. मी नकळत त्या वेगवान वाहतुकीकडे, उत्साह प्यालेल्या, पॅरीसच्या धुंद वातावरणात दंग झालेल्या स्त्री-पुरुषांच्या समूहाकडे.पाहत होतो. तेवढ्यात 'इट्स् व्हेरी फँटॅस्टिक !' असा शेरादर्शक उद्‌गार शेजारून आल्याक्षणी माझी तंद्री भंगली. त्या जर्मन स्त्रीने आपणहून संभाषण सुरू करून मैत्रीचा हात पुढे केला. त्यानंतर मी तिच्यापाशी जर्मनीच्या भरभराटीची स्तुती केली. तिने खांदे उडवून त्याचा स्वीकार केला. त्यानंतर मोडक्यातोडक्या इंग्रजीतून आमची वाक्‌गंगा धो धो वाहू लागली. शांज एलिझेच्या साक्षीने आम्ही इंग्रजीची मनसोक्त कत्तल केली. मात्र तिने ऑफर केलेल्या चॉकलेटची गोडी अवीट होती. असे अकस्मात भेटणारे आणि जाता जाता मनाला चटका लावून जाणारे इथे खूप. ह्या शांज एलिझेच्या रस्त्याच्या दोहो बाजूला मद्यालये, कॅफे, वेगवेगळ्या कंपन्यांची कार्यालये, विमान कंपन्यांची ऑफिसेस खच्चून भरलेली आहेत. विशेष म्हणजे इथे नाईटक्लब भरपूर आहेत. पॅरीसची सर्वांत उच्चभ्रू वस्ती इथंच आहे. त्यामुळे जेव्हा रात्री सर्व दिवे लागतात, त्या वेळी प्रखर दिवे व रंगीबेरंगी निऑनसाईनमुळे ह्या भागात प्रत्यक्ष इंद्रनगरीचा भास होतो. प्रकाशाला चैतन्य प्राप्त होते. तरुण-तरुणींचे हसत-खिदळत भटकणारे देशोदेशींचे घोळके वातावरणाची रंगत आणखीनच वाढवतात. सर्वत्र उत्साहच उत्साह. वृद्धाचाही कायाकल्प घडविण्याची किमया या वातावरणात आहे. असह्य डोकेदुखी असलेल्याने शांज एलिझेच्या हमरस्त्यावर एक फेरफटका मारला तर त्याची डोकेदुखी क्षणात दूर होईल.

लूव्हर ते शांज एलिझेचा फेरफटका शरीराला दमविणारा जरूर आहे, परंतु

मनाला तजेला देणारा निश्चित आहे. पॅरीसियनांपेक्षा पर्यटकच इथे जास्त असतात कारण शांज एलिझेचे आकर्षण पर्यटकांना अतोनात असते. या पर्यटकांत जर्मन, डच, ब्रिटिश, स्पॅनिश, इटालियन, जपानी आणि कित्येक देशांतल्या सर्व वयोगटांतील व्यक्ती असतात. शांज एलिझेच्या रंगीबेरंगी वातावरणात देशाच्या खुणा बुजतात आणि सर्वच आनंदयात्री बनून शांज एलिझेच्या परिसरात आपल्या सुदैवाने मिळालेल्या क्षणांचा पुरेपूर उपभोग घेतात. पॅरीसच्या ज्या रंगीबेरंगी आठवणी मनात साठल्यात, त्यांतील काही आठवणींचे रंग विटू लागले आहेत, परंतु लूव्हर ते शांज एलिझेच्या फेरफटक्यात अनुभवलेले रंगीबेरंगी क्षण जसेच्या तसे ताजे, टवटवीत आहेत.

मराठी
भू. प्रवास
७३५
२६५५४
संग्र
११३/८२

# पॅरीसचा चौर्यकलेचा नमुना

पॅरीस शहराविषयीचे वर्णन एकांगी होऊ नये म्हणून माझा एक कटू प्रसंग लिहावासा वाटतो. पॅरीस शहरात दररोज हजारो पर्यटक येतात-जातात. पॅरीसची मजा लुटतात, मौज करतात आणि खिसा रिकामा झाला की तेथून पाय काढतात. कारण पॅरीस अतिशय महागडं शहर आहे. मी एकदा आयफेल टॉवरपाशी सहज पायपीट करीत होतो तोच चार भारतीय स्त्री-पुरुष दिसले. भारतीय म्हटल्यावर परदेशात साहजिकच एक आपुलकीची भावना उफाळून येते. त्यांच्याशी मी आपणहून बोललो. ते त्याच दिवशी सकाळी पॅरीसमध्ये उतरले होते आणि दुसऱ्या दिवशी रात्री ॲमस्टरडॅमला जाणार होते. तेवढ्या वेळात जे पाहता येईल ते पाहणार होते. दोन दिवसांत– तेही पायी, काय पाहणार होते कुणास ठाऊक ! मी त्यांना जितके मार्गदर्शन करता येईल तेवढे केले. मला पॅरीसविषयी असलेली माहिती पाहून त्यातला एकजण चकित झाला आणि त्याने विचारलं, "कितने दिन हुए आप पॅरीसमें हो ?" मी सहज म्हटले, "कुछ ग्यारह दिन हुए है पॅरीसमें रहते हुए !" माझ्या उत्तराने तो जागेवरच उडाला आणि म्हणाला, "क्या आप टूरिस्ट है ?" त्यावर त्याला मी ज्या योजनेतून आलो ती योजना व इतर तपशील सांगितले तेव्हा तो उत्स्फूर्तपणे आपल्या ग्रूपकडे पाहून म्हणाला, "आप बहोत लकी हो ।"

खरोखरच मी लकी होतो. मला फक्त चांगलेच दिसले, चांगुलपणाच लाभला आणि मनसोक्त भटकताना काहीएक त्रास झाला नाही. पण एके दिवशी जबरदस्त फटका बसला आणि डोळ्यांसमोर अंधारी आली आणि ज्या पॅरीसच्या दर्शनाने भारावून गेलो होतो, तेच पॅरीस मला नकोसे वाटू लागले.

मी, माझे चार मित्र व श्री. बुशर यांनी विमान संग्रहालयाच्या हिरवळीवर जेवण केले. जेवण जरा जास्तच झाल्याने डुलकी येऊ लागली. हिरवळीवर झोपण्यासाठी डोक्याखाली हॅवरसॅक घेतली. दहा-पंधरा मिनिटांनी आम्ही सर्व मेट्रोनं गार द

लिऑनला आलो व तेथून एक विज्ञानसंग्रहालय पाहण्यास गेलो. विज्ञानसंग्रहालयाचे तिकीट काढण्यासाठी रेक्झीनची छोटी बॅग हॅवरसॅकमधून बाहेर काढली. त्यातून फ्रँक काढण्यासाठी हात घातला, तर हातच थिजला, कारण त्यात ठेवलेले ५० फ्रँक १० डॉलर्स व मुख्य म्हणजे पॅरीस-मुंबईचे विमानतिकीटच नव्हते. क्षणभर गरगरायला लागले. सर्व हॅवरसॅक शोधली. अनेकदा शोधली, परंतु पैसे व विमानाचे परतीचे तिकीटच गायब. तशी माझी बॅग अजागळच होती. मनीपर्स मी त्याच्या तळाशी ठेवायचो. त्यात सर्व पैसे व इतर मूल्यवान कागदपत्रे ठेवायचो. त्यामुळे कुणी काढून घेणे शक्य नव्हते. परंतु ते घडले होते. तशा थंडीतही घाम फुटला. इतरांनी थोडा धीर दिला. श्री. बुशरना मात्र वाईट वाटले. आपल्या पाहुण्याचे तिकीट चोरीस जावे व त्याला प्रचंड मनस्ताप व्हावा, या घटनेनं ते व्यथित झाले. आता भारतात परत जायचे कसे? तिकिटाला तेवढे पैसे आणायचे कुठून? इतरांकडे पैसे मागायचे कसे? अशा नाना प्रश्नांनी मला भेडसावले होते. तरी बुशरनी मला धीर दिला. त्यांना जे काही करता येईल ते सर्व करतील, असे सांगून सिनेमाचे तिकीट काढून आम्ही सिनेमाला गेलो. चित्रपट अर्थात वैज्ञानिक होता. चित्रपट पाहून झाल्यावर मी अत्यंत खिन्न मनाने शांपिनीला जायला निघालो. वाटेतील रंगीबेरंगी दृष्ये विरून गेल्यासारखी भासत होती. इतके दिवस छान गेले, आजच असं का घडलं. पॅरीसच्या चोरांविषयी अतोनात संताप आला. संतापण्यापलीकडे काय करणार होतो. रात्री दहा वाजता यजमानांच्या घरी जड पावलाने पोहोचलो व बेल वाजविली. मादान दानिएल व मिस्टर पियर यांनी तत्परतेनं दरवाजा उघडला. मला पाहून सानंद हसले आणि 'वुई होप यू हॅड अ नाईस टाईम' असे नेहमीप्रमाणे म्हणाले. मी वरवर हो म्हणत डायनिंग टेबलावर मटकन बसलो. माझी नेहमीपेक्षा वेगळी चर्या व आविर्भाव पाहून त्यांनी सचिंतपणे विचारले, "व्हॉट इज रॉंग वुइथ यू?" त्यानंतर त्यांना मी सर्व हकीकत सांगितली. दोघेही विलक्षण नाराज झाले. त्यांची नाराजी मला पाहवेना. बरेच क्षण निःस्तब्धतेत गेले. पिअर चटकन उठला आणि दानिएलला फ्रेंचमध्ये काहीतरी सांगून फोन करायला गेला. दानिएलने छानपैकी चहा केला. मी ब्रेड व चहावर भागवले. कारण मन कमालीचे अस्वस्थ होते. पिअरने भराभरा पर्स्पेक्टिव्ह असिएनच्या सर्व जबाबदार सदस्यांना घडलेली घटना सांगितली. मुख्य म्हणजे मादाम मारी आक्सीतोगी ह्या पॅरीस युनिटच्या प्रमुख होत्या. त्यांना त्यांनी सारी हकीकत

सविस्तर सांगितली. फोनवरून त्या म्हणाल्या, "काही काळजी करू नकोस. उद्या सकाळी बघू. हॅव ए नाईस टाईम." सारं आकाश कोसळलं होतं. साऱ्या आनंदावर विरजण पडलं होतं. तरी ती बाई म्हणत होती, "हॅव ए नाईस टाईम." किती धीर आला मला. फ्रेंच मंडळींबद्दल अपार आदर वाटू लागला. मादाम दानिएलनं सांगितलं की काही काळजी करू नकोस. पिअरनं सर्वांना कळविलंय. उद्या ते सर्व बघतील. हे तिनं आत्मविश्वासपूर्वक सांगितलं. माझा मूड बदलला. मणाचं ओझं क्षणात दूर झालं. हलकं वाटू लागलं. शिवाय दानिएल म्हणाली, "वुई विल हेल्प यू इन ऑल रिस्पेक्ट टू गेट फ्रेश टिकेट फॉर इंडिया, ओ. के. ?" यावर खुदकन हसण्यापलीकडे मी काहीच करू शकलो नाही. जाता जाता 'शुभ रात्री' म्हणायला दोघेही विसरले नाहीत. मी माझ्या बेडरूममध्ये गेल्यावरही ते फ्रेंचदांपत्य बराच वेळ बहुधा माझ्या प्रॉब्लेमविषयी बोलत बसले होते. त्यांच्या सौहार्दाच्या विचारात मी तिकीट हरविल्याचं विसरून गाढ झोपी गेलो.

रात्र छान गेली. जागा झालो तर तिकीट हरवल्याची घटना आठवून परत नर्व्हस झालो. एक वाजता ऑपेरापाशी जमायचं होतं. दानिएलने जेवणाचे सर्व पदार्थ तयार करून बॅगेत भरून माझ्या हातात आणून दिले. आज तिने माझ्या मनःस्थितीचा विचार करून भरलेली बॅग भरून माझ्या खोलीत आणून दिली. दुसऱ्याच्या मनःस्थितीचा विचार इतक्या बारकाईने करणारे फ्रेंच आतिथ्य आज जरी आठवले तरी मनाला समाधान लाभते. त्या दिवशी मला सोडायला दोघे फाटकापर्यंत आले. काही काळजी करू नकोस, असे वारंवार सांगून 'हॅव अ नाईस टाईम' असे आज वेगळ्याच पद्धतीने म्हणाले. त्यात मनःपूर्वकपणे आलेला भाव होता. त्यांच्या त्या उल्हसित करणाऱ्या वाक्याच्या बळावर मी ऑपेराला कसा पोहोचलो कळलेच नाही. तरी मनात वाईट विचार यायचेच. पण हे सुहृद फ्रेंच मित्र पाठीशी असताना घाबरायचं कारण काय, असाही विचार मनात यायचा.

ऑपेरापाशी सर्वांनी मला घेरलं. सर्वांना रातोरात माझं तिकीट हरवल्याचं कळलं होतं व सर्वजण व्यथित झाले होते. परंतु प्रत्येक जण काळजी करू नये, हे मात्र सांगत होता.

ठीक साडेदहाला एअर इंडियाच्या ऑफिसात गेलो. तेथे पाच-दहा भारतीय व्यापारी तिकिटाच्या कामासाठी आले होते. त्यांना जेव्हा माझी हकीगत कळली तेव्हा ते म्हणाले, "यू हॅव टु बी व्हेरी केअरफूल इन पॅरीस. पर्टिक्युलरली इन धीस

ऑफिस.' त्यांच्या या विधानाने मला पॅरीसचे रूप भेसूर दिसू लागले. अर्थात त्यामुळे माझी समस्या संपणार नव्हती. यथावकाश माझा नंबर आल्यावर सावळ्या रंगाच्या कॉम्प्युटरवर काम करणाऱ्या भारतीय महिलेसमोर बसून तिला मी घडलेले थोडक्यात कथन केले. तिने निर्विकारपणे कागद दिला व त्यावर अर्ज लिहिण्यास सांगितले.

बाजूला बसून अर्ज लिहिला व तो नेऊन देईपर्यंत ती बाई जागेवरून उठून इतरत्र कामाला गेली होती. मी माझा अर्ज तिच्याच शेजारच्या फ्रेंच स्त्रीकडे दिला. तिने अर्ज काळजीपूर्वक वाचला आणि आस्थापूर्वक सस्मित म्हणाली, "प्लीज गीव्ह मी सम इनफॉर्मेशन. सो इट वील बी प्रॅक्टिकली इझी टू हेल्प यू" तिने तिकीट कुठून, केव्हा काढले ते विचारले आणि काही वेळ थांबण्याची नम्र विनंती केली. जेव्हा आपण वैतागलेले, त्रासलेले असतो तेव्हा समोरच्यानं कणभर इतकी जरी सहानुभूती दर्शविली तरी फार बरे वाटते. इथे परत फ्रेंच सौहार्दाचा अनुभव आला.

काही वेळेनंतर ती मूळची भारतीय महिला परत जागेवर येऊन बसली आणि मला हाक मारली. मी तिच्यासमोर बॅग हातात घट्ट धरून बसलो कारण थोड्याच वेळापूर्वी भारतीय व्यापाऱ्यांनी दिलेली सूचना पूर्ण लक्षात होती. ती केरळी महिला-बॅचवरून पिल्ले हे नाव कळले— म्हणाली, "नाऊ आय शॅल कॉन्टॅक्ट पुणे, इफ पुणे हॅस कॉम्प्युटर लिंक यू विल गेट युवर टिकेट व्हेरी सून." आकाशवाणी व्हावी, असे तिचे शब्द मला ऐकू आले. माझ्या सर्वांगातून एक सुखद संवेदना लहरून गेली. सारे जग विशेषतः पॅरीस मला परत मोहक वाटू लागले. थोड्याच वेळात पुण्याहून माझ्या सुदैवाने माझ्या तिकिटाचे सारे तपशील आले. तिने भराभर तिकीट तयार करून माझ्यासमोर ठेवले व म्हणाली, "धिस इज युवर टिकेट, प्लीज बी व्हेरी केअरफुल !" त्या क्षणी मला जो आनंद झाला तसा आनंद यापूर्वी आयुष्यात कधीच अनुभवला नाही. कारण प्रचंड नैराश्यानंतर आलेला तो सुखद अनुभव होता. नवे तिकीट देताना त्यांना जो पॅरीस-पुणे कॉम्प्युटरलिंकवरून जो व्यवहार करावा लागला त्याचे मूल्य व कदाचित दंड अशी किती रक्कम होईल याच्या विचाराने मनात थोडेसे दडपण निर्माण झाले. मी तेही विचारले, "हॅव आय टू पे ॲस सर्विस चार्जेस ?" त्यावर त्या मादाम पिल्ले हसत म्हणाल्या, "नो, वुई डोंट चार्ज एनिथिंग." एअर इंडियाबद्दल विलक्षण आदर वाटला. आपण एअर इंडियानेच प्रवास केला हे योग्यच होते, हे जाणवले. माझ्या आनंदाला पारावर

नव्हता. कुठे कालचे मनावरचे विलक्षण दडपण, नैराश्य आणि कुठे त्या क्षणीचा आनंद. मध्ये फक्त एक रात्र होती.

मी तिकीट नीट पाहिले. त्यावर जोडलेल्या चिठ्ठीवर विमान प्रवासाची तारीख, उड्डाणाची वेळ, टर्मिनल क्रमांक सर्व काही होते. मी मादाम पिल्लेंचे मनःपूर्वक आभार परत परत मानले आणि त्यांना विचारले, "आपण केरळमधल्याच का ?" त्यावर त्या सस्मित म्हणाल्या, "होय, मी केरळचीच. इथे नोकरीनिमित्त आले आहे." त्यावर माझ्या शेजारी बसलेला भारतीय दूतावासात काम करणारा तरुण हळूच माझ्या कानात म्हणाला, "प्रसिद्ध व्यंगचित्रकार शंकर पिल्लेंची कन्या आहे." हे ऐकून मी चटकन म्हणालो, "सो यू आर डॉटर ऑफ ग्रेट इंडियन कार्टूनिस्ट मिस्टर शंकर पिल्ले !" "आय एम व्हेरी ग्लॅड यू मीट यू !" तिने नम्रतापूर्वक आभार मानले.

माझे मन उचंबळून आले. पॅरीसमध्ये खिसेकापू, चोर निश्चित आहेत. त्यांचे चौर्यकर्म अव्याहतपणे चालू असते. परंतु त्याच वेळी संकटकाळी मदत करणारेच अधिक आहेत. यंत्रणा कार्यक्षम आहे. त्यामुळे मनस्ताप जरी झाला तरी फ्रेंच मंडळींच्या सौहार्दपूर्ण सहकार्यामुळे तो मनस्ताप केव्हाच दूर झाला. आता मला पॅरीस परत रंगीबेरंगी वाटू लागले. दुष्टांपेक्षा सुष्टांचे प्रमाण जास्त आहे हे जाणवले आणि म्हणून सकाळी मादाम दानिएल व मिस्टर पियर 'हॅव ए नाईस टाईम' कशाच्या भरवशावर म्हणाले हे जेव्हा लक्षात आले तेव्हा पॅरीसचा आणखी एक चमकदार पैलू ध्यानात आला.

o

# पॅरीस व दारिद्र्य

पॅरीसमध्ये सर्वत्र सुबत्ताच दिसते आणि श्रीमंतीच्या श्रेणीत फ्रान्स जगात बऱ्याच उच्च स्थानावर असल्याने सर्वत्र सुबत्ताच दिसते. भारतात जेव्हा मी तिथल्या सुबत्तेची वर्णने केली तेव्हा मला बऱ्याच जणांनी विचारले की, फ्रान्समध्ये गरीब माणसे दिसली का ? झोपडपट्ट्या होत्या का ? पर्स्पेक्टिव्ह असिएनच्या लोकांनी केवळ स्वच्छ, श्रीमंत भागच जाणीवपूर्वक दाखविल्याने तिथले दारिद्र्य त्यांनी लपविले तर नाही ? मी तिथे जातानाच हे प्रश्न घेऊन गेलो होतो. पॅरिस व पॅरीसबाहेर सतत ह्याच प्रश्नांची उत्तरे शोधत होतो.

दारिद्र्य हे सापेक्ष असते आणि त्याची व्याख्या व व्याप्ती स्थळ, काळाप्रमाणे बदलते. म्हणून आपल्या इथे ज्याला दारिद्र्य म्हणतो किंवा ज्या व्यक्तीला दरिद्री म्हणतो, त्या कल्पना इतरत्र बदलणार. तसेच प्रथमदर्शनी मला आढळून आले. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य ह्या जर आधुनिक काळातील मूलभूत गरजा मानल्या, तर मला पॅरीसमध्ये व पॅरीसच्या आसपास सर्वसाधारणपणे ह्या गरजा पुरविल्या गेल्या आहेत. लोकसंख्यावाढीचा वेग अत्यंत मर्यादित असल्याने तिथल्या नियोजनकाराचे प्रयत्न निष्फळ ठरत नाहीत. समाज सुशिक्षित, किमान साक्षर असल्याने सर्वच पातळीवर जागरूकता आहे. बेकारांसाठी २००० फ्रँक दरमहा बेकारभत्ता मिळत असल्याने समाजाचा मोठा वर्ग दारिद्र्यापासून दूर राहिला आहे. तरी तिथे गरिबीचे दर्शन होते. ते आपल्या श्रीमंतीपेक्षा अधिक समृद्ध असते. म्हणून दारिद्र्य नीट समजावून घेणे आवश्यक आहे.

माझे यजमान श्री. पिअर हे कम्युनिस्ट कार्यकर्ते आहेत. गरिबांसाठी त्यांच्या पक्षाचे अविरत प्रयत्न चालू आहेत. एकदा त्यांना म्हणालो की, मला झोपडपट्टी किंवा (स्लम एरीया) पाहायचा आहे. त्यांना झोपडपट्टी किंवा स्लम एरिया ही संकल्पनाच समजली नाही. बरेच प्रयत्न करून कमी उत्पन्नवाले किंवा गरीब

लोकांची वस्ती पाहायची आहे, असे सांगितल्यावर त्यांनी आनंदाने तिथे न्यायचे कबूल केले. रविवारी सकाळी आम्ही कारने सहकुटुंब निघालो. पॅरीसच्या उत्तरेला एका वस्तीत त्यांनी नेले. पुण्याला नव्या हाऊसिंग कॉलनीत जसे चार-पाच मजली ओनरशिप फ्लॅटस् आहेत तशा चार-सहा मजली इमारती येथे होत्या. सभोवताली बागकाम चाललेले होते. एकंदर परिसर रम्य वाटत होता. फरक एवढाच होता पॅरिसमध्ये घरांची दाटी इथल्याइतकी नव्हती.

पिअरने मला त्याच्याबरोबर येण्याची खूण केली. त्याने त्यातील दोन-तीन इमारतींमध्ये फिरवले. तो कम्युनिस्ट पक्षाचं मुखपत्र काही ठराविक लोकांना देत होता व त्यांच्याकडून त्याचे मूल्यही घेत होता. बरचंसं हिंडून झाल्यावर त्याला विचारले, “हीच का गरिबांची वस्ती ?” त्यावर तो गरीब शब्द न वापरता ‘कमी उत्पन्न गटातील लोक’ हा अधिक अर्थपूर्ण शब्द वापरून ‘होय’ म्हणाला. माझे समाधान झाले नाही. लगेचच एका घरात मुखपत्र देऊन बाहेर आल्याबरोबर म्हटलं, “मला एखाद्याचं घर आतून दाखवाल का ?” तो चटकन हो म्हणाला आणि ज्या घरातून तो बाहेर आला होता त्याच्याच दारावर थाप मारली. दार उघडून आतला गृहस्थ बाहेर आला. पिअरने माझी ओळख करून दिली. त्यानं खास फ्रेंच शैलीत माझी ओळख करून घेतली. त्याचे घर बघण्याची इच्छा व्यक्त केल्यावर त्याने आनंदाने संमतीदर्शक स्मित करून मला आदरपूर्वक घरात नेले. चार खोल्यांचे ते घर तिसऱ्या मजल्यावर होते. घरात मोठा कलर टी.व्ही., वॉशिंग मशीन, चांगलासा डेक, फ्रीज, बऱ्यापैकी फर्निचर, कपडेलत्ते, इतकेच काय, बाल्कनीत फुलझाडेही होती. मात्र घरामध्ये सामानसुमान भरपूर असल्याने थोडी दाटी भासत होती. एवढे न्यूनत्व सोडले तर आपल्या इथे डेक्कनवर, दादर भागात राहणाऱ्या उच्च मध्यमवर्गीयांशी तुलना करता येईल अशी स्थिती त्या घराची होती. मी आभार मानून घराबाहेर पडलो आणि पिअरला चटकन म्हणालो, “ही इज नॉट पुअर, ही इज रीच.” यावर काहीसा उसळून व रागाने पिअर म्हणाला, “ऑफ कोर्स, ही इज पुअर, लुक, ही हॅस नो लिफ्ट इन द बिल्डिंग !” थोडेसे थांबून अधिक त्वेषात म्हणाला, “ही हॅस नो कार !” आणि शेवटी उद्वेगानं, “अँड ही हॅस नो डॉग !” म्हटलं. खरंच फ्रान्समध्ये दारिद्र्याची अशी व्याख्या प्रथमच ऐकली आणि विचारविन्मुख झालो. त्या गृहस्थाला अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या सर्व मूलभूत गरजा राष्ट्राने पुरविल्या होत्या. घराला लिफ्ट, फिरायला कार आणि पाळायला कुत्रा नाही हे

तिथल्या समाजव्यवस्थेप्रमाणे समृद्धीच्या, श्रीमंतीच्या मानदंडाप्रमाणे न्यूनत्व असेल. म्हणून त्यांच्या तुलनेत तो गरीब असावा. तो मूलभूत गरजा भागविता भागविता श्रान्त झालेला नसल्याने कला-संगीत-साहित्य ह्यातही रस घेत असावा. म्हणजेच तो 'संस्कृती'चा देखील विचार करीत असावा. याच तुलनेत आपण आपल्या झोपडपट्ट्या डोळ्यांसमोर आणल्या, तिथल्या लोकांचे जिणे आठवले तर आपण जगाच्या किती मागे आहोत हे कळेल. आपल्या इथे दारिद्र्य खूप आहे तसे वेगळ्या स्वरूपात का होईना पॅरीसमध्येही आहे. परंतु मि. पिअर हा जसा कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मूलनासाठी सतत प्रयत्नशील आहे, तसे आपण नाही. कारण दारिद्र्याबद्दल आपल्याला काही वाटत नाही, हीच मोठी शोकांतिका आहे.

तसेच गरिबी शोधण्याच्या प्रयत्नात भिकारी कुठे दिसतात, याचा आटोकाट प्रयत्न केला. भिकारी म्हटल्याबरोबर आपल्या इथले जे चित्र डोळ्यासमोर येते ते कुठेच म्हणजे कुठेच आढळले नाही. तरी काही भिकाऱ्यांचे (?) दर्शन दुर्मिळपणे झाले ते विस्मरणीय आहे. या देशात भीक मागण्यास कायद्याने पूर्ण बंदी आहे. तसेच भीक मागण्यासाठी आवाज करणे, हातवारे करणे, भिकेचे आवाहन करणे हे कुठेच आढळत नाही. त्यामुळे भिकारी शोधणे जिकीरीचे होते, तरी काही भिकारी (?) शोधलेच.

गार द लियॉन स्टेशनबाहेर दानिएलने कार पार्क केली आणि आम्ही सर्व एका प्लॅटफॉर्मवर जाऊन पॅरीस-जिनिव्हा टी.जी.व्ही. ह्या अत्यंत वेगवान रेल्वेच्या वेळापत्रकाची माहिती करून घेतली. दहा-पंधरा मिनिटांत कारपाशी माघारी आलो. कारची साफसफाई एक ग्रीस देशाचा तरुण करताना दिसला. मला श्रमाधिष्ठित मूल्याचे कौतुक वाटले. दानिएल कारमध्ये जेव्हा बसू लागला तोच तो तरुण धावत दानिएलपाशी आला व अत्यंत अजिजीच्या स्वरात फ्रेंचमध्ये काही सांगू लागला. प्रथम दानिएलने त्याकडे दुर्लक्ष केले, परंतु तो आणखीनच काकुळतीनं, आर्जवपूर्वक काहीतरी पटवून देऊ लागला. दानिएलने पर्स काढली. त्यातून दहा फ्रँकचे (सुमारे तीस-पस्तीस रुपये) त्याच्या हातावर ठेवले. त्याने मनःपूर्वक 'मर्सी मादाम' म्हटले आणि चटकन पुढे पार्क केलेल्या कार पुसण्याचे लटके नाटक करू लागला. मी मादामला विचारले, "हू इज ही ?" ती गालात हसली. सांगू का नको अशा विचारात एक-दोन क्षण घालवून म्हणाली, "ही इज ए काईंड ऑफ बेगर." हे

म्हणताना तशी ती नाखूष होती. भीक मागताना तो आपली कर्मकहाणी सांगत होता. बोलण्यातील गोडवा व हृदयात्त हात घालण्याचे त्या फ्रेंच भिकाऱ्याचे सामर्थ्य पाहून मला तर तो पट्टीचा नट वाटला. त्याचे कपडे व इतर वेशभूषा सर्वसामान्य फ्रेंच माणसाप्रमाणेच होती. परंतु तो खास पॅरीसचा 'श्रीमंत भिकारी' होता. कारण एका वेळी त्याला तीस-पस्तीस रुपये भीक मिळत होती. वरवर ही रक्कम फार मोठी वाटते, परंतु पॅरीसच्या महागाईच्या तुलनेने (चाळीस रुपयास एक कप कॉफी) त्याला मिळालेले दहा फ्रँक विशेष नव्हते.

एकदा मी मोंपरनास भागात साधारण निर्जन रस्त्यावर भटकत होतो. वेळ सायंकाळची होती. चौकाच्या कोपऱ्यात माझे लक्ष गेले. तिथे एक गोरीपान फ्रेंच स्त्री काळ्या गाऊनमध्ये फूटपाथवर चक्कर येऊन पडल्यासारखी दिसली. पॅरीसमध्ये चौकात एक स्त्री चक्कर येऊन पडली आहे आणि लोकांनी तिला मदतही करू नये, याचा मला राग आला. रस्त्यावर येणारे-जाणारे मान तिरकी करून बघायचे, पुढे जायचे. माझा राग आणखीनच वाढला. मी जवळ जाऊन निरीक्षण करू लागलो. गोरीपान अशी मध्यमवयीन स्त्री होती. तिचे डोळे मिटलेले होते. दूर तिची टोपी उलटी पडली होती. तेवढ्यात समोरून काळे कपडे घातलेली कॅथालिक नन आली. तिने तिच्याकडे अपार सहानुभूतीने पाहिले. मला वाटले, तिच्या मदतीने दवाखान्यात तिला पोहोचवावी. पण घडले वेगळेच. तिने काही पुटपुटत पर्स उघडून त्यातून दोन फ्रँकचे नाणे अलगदपणे त्या टोपीत टाकले व पुढे निघून गेली. चक्कर येऊन पडलेल्या स्त्रीने डोळे किलकिले करून इकडे-तिकडे पाहिले आणि ते दोन फ्रँकचे नाणे उचलून घेतले. आपल्या छानपैकी लपविलेल्या पर्समध्ये ते नाणे टाकले. पर्स कपड्याआड लपवून जैसे थे पडून राहिली. अशीही भिकारीण पाहिली आणि धन्य झालो.

गार द लियॉनच्या भव्य व चकाकणाऱ्या स्टेशन्सवर मी, पिअर, दानिएल व सार्ज विंडो शॉपिंग करीत संथपणे फिरत होतो. नंतर लक्षात आले— मादाम दानिएल मागे राहिली आहे आणि काळा सूट, पांढरा शर्ट व नेकटाय घातलेला एक गौरवर्ण तरुण मादाम दानिएलशी काहीतरी बोलतोय व ती त्याला टाळते आहे. मादाम दानिएलच्या मागे तो तरुण परत परत येत होता व अत्यंत सभ्य व रिफाइन्ड पद्धतीनं बोलत होता. आम्ही मादाम येण्याची वाट पाहत थांबलो. शेवटी मादामने पर्समधून एक नाणे त्याला दिले. तो मादाम दानिएलला लवून 'मर्सी बुक्' म्हणाला आणि

परत काही सांगून रुबाबात गर्दीत नाहीसा झाला. मी अंदाज केला हा भिकारी असावा, परंतु डेक्कन क्वीनमध्ये पहिल्या वर्गातून प्रवास करणाऱ्या रुबाबदार प्रवाशासारखा सभ्य गृहस्थ भिकारी कसा असेल या तर्कावर मी स्वस्थ राहिलो. दाग्निएलला काही विचारले नाही. पण मागे राहिल्याने आमचा खोळंबा झालेला तिला पटले नाही आणि आपणहून क्षणभर विचार करून शांतपणे म्हणाली, "ही इज ए बेगर, बट नॉट एक्झॅक्टली बेगर. वुई हॅव मेनी सच पीपल टेलिंग देअर ग्रीवन्सेस अँड फोर्सिंग अस टू गीव्ह समथिंग." त्याला नेमका भिकारी म्हणता येणार नाही, परंतु स्वतःची दुरवस्था सांगून अर्थसाहाय्य करण्यास भाग पाडणारा एक नमुना आहे. अशा रुबाबदार, देखण्या, टाय घातलेल्या भिकाऱ्याचे ( ?) दर्शन अपूर्वच होते.

वॅस्टील मेट्रो स्टेशनबाहेर पडताना एकदा पायऱ्यांवर एक तरुण जीनची पँट, ओव्हरकोट घालून गुडघ्यांत डोके खुपसून बसला होता. केस विस्कटलेले, दाढी बऱ्याच दिवसांत न केलेली, असे त्याचे रूप होते. एका हातात पुस्तक होते आणि दुसऱ्या हाताने तो आपल्या गुबगुबीत कुत्र्यास कुरवाळत होता. कुत्राही कोणावर न भुंकता जीभ बाहेर काढून गर्दीकडे पाहत होता. हे सर्व पाहून मला विशेष वाटले नाही. असे अनेक तरुण पॅरीसमध्ये आढळतात. परंतु जरा दूरवर ठेवलेली वेताची टोपली दिसली. मी त्यात वाकून पाहिलं— हरतऱ्हेची फ्रेंच नाणी त्यात होती. आता डोक्यात प्रकाश पडला. भीक मागणाऱ्याची कमाल होती. तो तोंडाने ब्र शब्दही बोलत नव्हता. शिवाय गुबगुबीत केसाळ कुत्राही त्याच्यापाशी होता. नेहमीच त्याला पाहणाऱ्या पॅरीसियनांना तो भिकारी असावा, हे अनुभवाने माहीत असल्याने त्याला भिक्षा देत होते. काय विलक्षण मनुष्य होता तो ! लोकांकडे बघतही नव्हता, पण भीक मात्र व्यवस्थित मिळत होती.

हे सारे फ्रेंच पुरुष, स्त्रिया भिकारी जरी असले तरी त्यांचे काही गुण आवडले. त्यांच्याविषयी घृणा निर्माण व्हावी, असे काहीही करीत नव्हते अथवा तसा पेहराव, अंगविक्षेप करीत नव्हते. आपल्या अस्तित्वाने रहदारीस, वाहतुकीस कोणताही व्यत्यय आणीत नव्हते. समृद्ध व सुंदर पॅरीसमध्येसुद्धा भिकारी दिसले. त्यांना भिकारी म्हणणेदेखील जीवावर येते, अशी त्यांची सांपत्तिक स्थिती होती. दिवसाकाठी शंभर फ्रँक जरी मिळाले (तेवढे पैसे मी नजरेने मोजलेही होते) तर आपल्या हिशोबाने साडेतीनशे-चारशे रुपये होतात. पॅरीसमध्ये साडेतीन फ्रँकला

एका बागेत (मोठा ब्रेड) मिळतो. पंचवीस फ्रँकला अर्धा किलो लोणी मिळते. आठ फ्रँकला नेस्लेचे मोठे चॉकलेट मिळते. जर काटेकोरपणे फ्रेंच भिकाऱ्याचे बजेट तयार केले, तर तो चार बागेत ब्रेड, पावशेर लोणी, दोन लीटर दूध, दोन नेस्लेचे चॉकलेट, दोन कोकचे टीन त्यातून खरेदी करून चाळीस फ्रँक इतर खर्चाला ठेवू शकतो. परंतु ह्यासाठी पॅरीससारख्या शहरात सर्व लाज सोडून युक्त्या करून 'भिकारी' हा शिक्का स्वतःच्या माथी मारावा लागतो.

भिकारीसुद्धा ज्या शहरात सुसंस्कृत, मृदुभाषी, रुबाबदार असतात त्या पॅरीसबद्दल आणखीन आस्था, प्रेम, आपुलकी वाटू लागली.

# पॅरीस असेही. . .

पॅरीसमध्ये प्रेक्षणीय असे खूप आहे. शेकड्याच्या आसपास संग्रहालये, तेवढ्याच बागा, असंख्य स्मारके आणि यापूर्वी ज्यांचे वर्णन केले ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आयफेल टॉवर, लूव्र इ. पॅरीसच्या देखणेपणात निश्चितच भर घालतात. या सर्वांमुळे पॅरीस प्रत्येक पर्यटकावर आपला एक प्रभाव निर्माण करते. पॅरीसमध्ये यापेक्षाही वेगळे असे खूप पाहण्यासारखे आहे. त्यांची माहिती कुठल्याच माहितीपत्रकात किंवा प्रवासी मार्गदर्शकात नसते. ते आपल्या पंचेद्रियांनी अनुभवायचे असते. चौदा दिवसांच्या भटकंतीत असे काही प्रसंग, क्षण, व्यक्ती, अपघात अनुभवास आले की, त्यांच्या स्मृती आयफेल टॉवर, लूव्रचे संग्रहालय, सीन नदी यांच्या स्मृतीइतक्याच उत्कट आहेत.

फ्रान्समध्ये बेकारीचा प्रश्न त्यांच्या दृष्टीने गंभीर समस्या आहे. तीस लाख तरुण बेकार असल्यामुळे मादाम दानिएलला अनेकदा अस्वस्थ झाल्याचे मी पाहिले होते. सरकार या प्रकरणी 'सिक्युरिटी सोश्याल' (Security Sociale) या राष्ट्रव्यापी योजनेद्वारा बेकारांना बेकारभत्ता देते. तरी या बेकार तरुणांचे प्रश्न पूर्णपणे सुटलेले नाहीत. काही तरुण-तरुणींनी हा प्रश्न काही प्रमाणात मजेदारपणे सोडविला आहे. काही मेट्रो स्टेशनात मोठाले भूमिगत हॉल आहेत. तेथे प्रवाशांना विसावण्यासाठी रंगीबेरंगी खुर्च्या रांगेने मांडलेल्या असतात. अशा मोकळ्या खुर्च्यांसमोरील मोकळ्या जागेत सात-आठ तरुण-तरुणी वाद्यवृंद सादर करतात. कुणी गिटार तर कुणी सेक्साफोन तर कुणी ऱ्हिदम गिटार तर कुणी फ्ल्यूट घेतलेला असतो. त्यातील एक जण ऑर्केस्ट्रा कंडक्टर असतो. त्याच्या इशाऱ्यावर सर्वजण तन्मयतेने आणि सांघिक सहकार्याने सरस गाणी अथवा वाद्यसंगीत सादर करीत असतात. त्यांचे एकमेकांचे सहकार्य वाखाणण्यासारखे असते. शेजारीच ॲम्प्लीफायर असतो. त्या हॉलमध्ये आवाज घुमल्यामुळे त्यांनी निर्माण केलेले

संगीत वातावरण एकदम धुंद करते. प्रवासी कितीही गडबडीत असला, तरी चाल मंद करून शक्य तेवढे श्रवणसुख घेतोच. शक्य असेल, मेट्रो ट्रेनला वेळ असेल तर काही मिनिटे खुर्चीवर विसावून आस्थापूर्वक त्यांचे वादन ऐकतो. काही जण तर बराच वेळ केवळ ऐकायला बसल्यासारखे ठाण मांडून खुर्चीवर बसतात, तर काही उभ्या उभ्या त्यांनी वाजवलेली धून ऐकण्यात एका पायावर जोर देऊन दुसऱ्या पायाने ताल धरतात. एखादा छोटा छोकरा आपल्या आईला त्याचे वाद्यवृंद उभे राहून बघण्याचा हट्ट धरतो. असे रसिक श्रोत्यांचे विविध प्रकार असतात. श्रोतेही मजेदार असतात. काहीजण 'छान वाजविलेत हं !' असं नुसतं चेहऱ्यानं दर्शवून निघून जातात, तर काही खुशीनं खिशातून चिल्लर काढून त्यातले मोठ्यातले मोठ्या किमतीचे नाणे दूर ठेवलेल्या टोपीत अलगद ठेवतो. ते नाणे टोपीत भिरकावत नाहीत. कारण भीक टाकल्याची भावना त्यात नसते, तर त्यांच्या बेकारीच्या व्यथेवर हळुवार फिरवलेला जणू हातच असतो. त्यात कणव नसते तर बेकार तरुणाबद्दलची, त्यांच्या क्रियाशीलतेबद्दलची खोल जाणीव असते. काहीजण त्या ग्रूपने विक्रीस ठेवलेल्या ध्वनिफितींची (कॅसेटस्‌ची) आस्थापूर्वक चौकशी करतात, तर काहीजण त्या खरेदीही करतात. बाजारात जगप्रसिद्ध वादकांच्या उत्कृष्टपणे ध्वनिमुद्रित केलेल्या कॅसेट्स सहजपणे उपलब्ध असताना या हौशी तरुण बेकारांच्या कॅसेट्स खरेदी करून ते आपली सामाजिक जबाबदारी पार पाडण्याबरोबर त्या तरुणांच्या कलेचे आर्थिक यशात रूपांतर करतात. केवढी महान कृती असते त्यांची ! श्रोत्यांशीसुद्धा हे नेत्रपल्लवीने संवाद साधतात, हितगुज करतात. त्यात सहजपणा असतो. मदत करा असा भाव नसतो. एकामागून एक धून वाजवीत हे तरुण ग्रूपस्‌ पॅरीसच्या सबवेमधून, वेटिंग हॉलमधून प्रवाशांची अखंड करमणूक करतात. सबवेमधून जाताना कुठे ना कुठेतरी अशा वाद्यवृंदांची गाठ पडतेच. मीही एकदा त्यांचे वाजविणे ऐकले व दोन फ्रँकचे नाणे त्यांच्या टोपीत अलगद ठेवले. पॅरीसच्या ह्या तरुणांबद्दल मला अपरंपार सहानुभूती व प्रेम निर्माण झाले. त्यांची आठवण जरी झाली तरी सबवेमध्ये ऐकलेल्या धून कानात ऐकू येऊ लागतात.

काही वेळा एखादा तरुण एकटाच वाद्य घेऊन सबवे मध्ये जिथे दोन-तीन जिने एकत्र येतात अशी मोक्याची जागा हुडकून तिथे ॲम्प्लिफायरसह उभा असतो. एकाग्र चित्तानं वाद्य वाजवीत असतो. सबवे नळीसारखा लांबलचक

असल्याने दोनशे मीटर लांबीच्या सबवेमध्ये वाद्यांचे सूर छान ऐकू येतात. ध्वनिऊर्जा नष्ट न झाल्यामुळे एक विशिष्ट परिणाम होऊन ते वाद्यसंगीत सबवेमध्ये असे काही छान ऐकू येते की बस. ते ऐकत ऐकत सबवे केव्हा संपतो हे कळत नाही. विशेष म्हणजे हे वादक फक्त वाजवायचे काम करतात. कुणाला कणव आली तर तो एखादे नाणे त्याला प्रेमाने देतो. हे नाणे घेताना वाद्यवादन खंडित होऊ नये म्हणून नेहमीप्रमाणे एक टोपी असतेच.

एकदा तर मी रात्री उशिरा मेट्रो स्टेशनवर मेट्रोची वाट पाहत खुर्चीवर बसलो, कारण समोर चक्क खुर्चीवर बसून एक वयस्कर मनुष्य सेक्साफोन वाजवीत होता. समोर एका स्टँडवर नोटेशनचा कागद लावून तो गृहस्थ त्या नोटेशनप्रमाणे वाद्यवादन करीत होता.

अशी ही पॅरीसच्या सबवेमधली संगीताराधना प्रवांशाचे मन रिझविते आणि प्रवासीही तितक्याच रसिकतेने त्यांना दाद देतात. वाद्यवादक तरुणांची, ते ऐकणाऱ्यांची वृत्ती मला खूप काही शिकवून गेली. आपल्या इथं संगीतक्लासला भक्तिभावानं जाणारी अनेक मुले-मुली असतात. परंतु त्यातून एकत्रित येऊन फ्रेंच तरुणांप्रमाणे कलेतून द्रव्यार्जन कधी करणार नाहीत कारण त्यांना प्रोत्साहित करण्याइतके आपण मोठी माणसे अजूनही प्रगल्भ झालेलो नाही, हेच खरे.

पॅरीसमध्ये एकपात्री प्रयोग करणारेही पाहिले. आपल्या इथे कलेचा अस्सल आविष्कार जसा बऱ्याचदा रस्त्यावर दिसतो तोच प्रकार येथेही आढळला. नोत्रदामच्या पुलावर जेथे केवळ पादचारीच त्या पुलाचा वापर करतात, तेथे असे एकपात्री पपेटशो पाहायला मिळतो. रात्रीच्या वेळी म्हणजे बारा ते एक वाजता अशा पुलावर एखादा कलाकार सायकलीवर येतो. काळ्या कापडाचा छोटेखानी स्टेज तो सायकलवरच स्टीलच्या कांड्या वापरून तयार करतो. अत्यंत बोलक्या मुखवट्यातून विनोदी प्रसंग सादर करतो. प्रसंगातील विनोद जेव्हा फुलतो त्याला हलकीशी करुणेची झालर लावतो. मी जो एक प्रसंग पाहिला त्यात बेकारीला कंटाळलेला तरुण आत्महत्येसाठी दोराचा फास गळयाला लावतो. त्याच्या मुद्राभिनयातून व मागे वाजणाऱ्या पार्श्वसंगीतातून करुण रस निर्माण होतो. आता फास लावणार आणि मरणार, तितक्यात तो फास काढतो व हात पुढे करून पैसे मागतो. त्या क्षणी प्रेक्षकांत हास्यकल्लोळ उडतो. अशा कार्यक्रमांत मुखवटे बोलके असतात, पार्श्वसंगीत पोषक व प्रभावी असते. रस्त्यावरही अत्यंत दर्जेदार कार्यक्रम

होऊ शकतात, मग महागड्या ऑपेरा थिएटरात का जायचे, म्हणून तीस-चाळीस जण चक्क जमिनीवर मांडी ठोकून बसलेले असतात. कार्यक्रम संपायला आला की, आपापल्या कुवतीनुसार त्या कलाकाराला पैसे देतात. त्यानंतर तो कलाकार पैसा गोळा करू लागतो. काही सज्जन त्याचे व्यक्तिशः कौतुकही करतात. जमलेले पैसे व लोकांनी केलेले कौतुक दोन्ही स्वीकारून काळया पडद्याचा रंगमंच घडी घालून, टेप बंद करून सायकलीला अडकवून तो कलाकार अशाच एका पुलाच्या प्रेक्षकांच्या शोधात निघून जातो. येथे उत्कट कलाप्रयोग करणारेही आहेत, त्यांना दाद देऊन त्यांना पैसे देणारे रसिकही आहेत. आपल्या इथे अशा कलाकारांचे कार्यक्रम फुकट पाहणारेच जास्त. शेवटी पॅरीस ही रसिकांचीही नगरी आहे. तेव्हा येथे कलाकार, मग तो रस्त्यावरचा का असेना, कधीही उपेक्षित राहणार नाही.

ऑपेराच्या चौकात एके सायंकाळी मी निवांत बसलो होतो. तेवढ्यात गारुड्याभोवती लोक जमावेत, तसे एका काळी पँट, काळा कोट व काळी फेल्ट हॅट घातलेल्या तरुणाभोवती स्त्री-पुरुष जमू लागले. त्याने कॅसेटप्लेअरवर अत्यंत कर्णमधुर अशी धून लावली आणि त्या धूनच्या पार्श्वभूमीवर तो चार्ली-चाप्लीनचे अजरामर पीसेस करून दाखवू लागला. प्रेक्षक देहभान हरपून त्याचा अभिनय पाहत होते. गर्दीत लोकांची भर पडायची तसेच आपली वेळ झाली की लोक शांतपणे, इतरांना धक्काही न लावता व त्या कलाकाराची तन्मयता न मोडता निघूनही जात होते. तो कलाकार जमलेल्या प्रेक्षकांच्या हृदयाचा ठाव घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. ऑपेरा परिसर तसा वाहत्या गर्दीचा. ह्यानं फूटपाथवर हा प्रयोग सुरू केल्यानंतर गर्दी आणखीनच वाढली. परंतु प्रेक्षकही सुज्ञ. फूटपाथवर रहदारीला जागा मोकळी टेवून त्या बेतानं उभे होते. पोलिस दुरून गालात हसत हे सारं पाहत होता. प्रयोग संपल्यावर प्रेक्षक त्या कलाकारानं न मागता त्याला फूल ना फुलाची पाकळी देत.

असे हे पॅरीसमधील प्रेक्षणीय प्रसंग सुदैवाने मला अनेकदा पाहायला मिळाले. ह्या सर्वच कलाकारांत प्रेक्षकांना लुबाडण्याची, बनविण्याची वृत्ती नसते; तर गरिबीमुळे रस्ता हेच थिएटर समजून आपल्या कलेच्या साह्याने रसिकांना तृप्त करायचे हेच एक ध्येय असते. त्यामुळे अर्ध्या प्रयोगानंतर छोट्या पोराला अथवा पोरीला प्रेक्षकांतून फिरवायची येथे कलाकारांची वृत्ती नसते. त्याचे मोठेपण व त्याची कलाराधना जाणून प्रेक्षकही प्रयोग संपायच्या आधी एक-दोन मिनिटे पसार

व्हायच्या वृत्तीचेही नसतात. कलाकार प्रत्येक प्रेक्षकाने काही ना काही द्यावे, ही इच्छाही बाळगत नाही. आपल्यावर काही ना काही देण्याची सक्ती नाही, याची जाणीव ठेवून देणारे भरपूर म्हणजे दहा फ्रँकचे नाणेही (जवळजवळ दोन डॉलर किंवा चाळीस रुपये) स्वखुषीने त्यास देतात. परस्परविश्वासावर, परस्पर-समजुतीवर चाललेले असल्याने हे छोटे छोटे कार्यक्रम मला फार आवडले. तीन तास एखाद्या आलिशान थिएटरात बसून एखादा दर्जेदार कार्यक्रम बघण्यापेक्षा पुलावर, रस्त्यावर, सबवेमध्ये, मैदानावर चाललेले, थोडा वेळ विरंगुळा देणारे कार्यक्रम कुणालाही आवडतील. यात मानवी स्वभावाचे सूक्ष्म दर्शन होते ते वेगळेच. पॅरीसमधील ही जिवंत प्रेक्षणीय स्थळे मला आयफेल टॉवर, लूव्र यांच्याइतकेच आवडले व दीर्घकाळ लक्षात राहिले. पर्स्पेक्टिव असिएन मार्फत गेल्यामुळेच असे कार्यक्रम आवर्जून दाखविले गेले म्हणून माझ्या अनुभवविश्वात पॅरीसमधील ह्या सौंदर्यस्थळांची ज्यादा भर पडली.

पॅरीस मुक्कामात बहुतेक वेळ प्रवासात, प्रेक्षणीय स्थळ बघण्यात व विश्रांतीत गेला. पण हे करीत असताना अनेक छोटे छोटे प्रसंग आले ज्यांतून कायम आठवणी निर्माण झाल्या. पॅरीस म्हणजे केवळ प्रेक्षणीय स्थळांचे शहर नाही. तिथे नानाविध जातींचे, धर्मांचे, पंथांचे, वर्णांचे लोक आहेत. त्यांनी आपल्या स्वभाववैशिष्ट्यांनी माझ्या पॅरीस मुक्कामाची रंगत वाढविली. किंबहुना निर्जीव वास्तूशी आलेला संबंध मूक होता. उलट व्यक्तींशी आलेला संबंध बोलका होता. त्यातून बरंचसं शिकण्यासारखं होतं. फ्रेंच संस्कृती जगात आदरली जाते. त्या लोकोत्तर संस्कृतीचे कण अशाच छोट्या छोट्या प्रसंगांतून चमकून दिसतात.

मेट्रोमधल्या प्रवासाचा पहिलाच दिवस. आदल्या दिवशीच मिस्टर पिअरने सारं समजावून देऊन सकाळी एका कागदावर सर्व काही लिहून दिलं. तो कागद रस्त्यानं वाचत वाल-द-मार्न ह्या sncf च्या स्टेशनवर गेलो. मनावर दडपण होतेच. तरी इतरांप्रमाणे मॅग्नेटीक टेप असलेले तिकीट प्लॅटफॉर्मच्या प्रवेशद्वारावरील खाचेत घातलं, पण प्रवेशदार उघडेना. परत एकदा खाचेत तिकीट सरकवलं; पण व्यर्थ, दार उघेडना. क्षणभर वाटलं, ते बिघडलं असेल, म्हणून दुसऱ्या प्रवेशद्वारावर तोच प्रयत्न केला तरी दार उघडेना. बराच वेळ तेच करीत राहिलो. जिथे दार बिघडले आहे असे वाटले तिथून इतर प्रवासी तिकीट खाचेत घालून जात होते. प्रथम ग्रासे मक्षिका. . . हा प्रकार झाल्याने खूप टेन्शन आले. आता काय करायचे, या संभ्रमात

असतानाच एक महिला माझ्यापाशी आली व तिने माझे तिकीट मागितले. कुणीतरी मदतीला आले म्हणून जरा धीर आला. तिने एक-दोन प्रवेशदारांवर तिकीट खाचेत घालून पाहिलं, पण दार उघडेना. ती महिला सुद्धा बुचकळ्यात पडली. ती माझं तिकीट घेऊन बुकिंग विंडोवर गेली. तिथे त्याने तिकीट पाहिले व फ्रेंच महिलेस काहीतरी फ्रेंचमधून सांगितले. त्याने जे सांगितलं ते मला ती इंग्रजीतून सांगू शकली नाही. तिने पर्स उघडली. त्यातून एक तिकीट माझ्या हाती दिले आणि खाचेत घालायला सांगितले. ते तिकीट खाचेत घालताच दार उघडले. माझ्या जीवात जीव आला. मी शब्दांची जुळवाजुळव करून 'मर्सी मादाम' असं म्हणालो. त्यावर स्मितपूर्वक इंग्रजीतून 'हॅव ए नाईस टाईम'असे म्हणून ती गर्दीत लुप्त झाली. बराच वेळ कृतज्ञतेने तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पाहत होतो.

नोत्रदाम कॅथेड्रलच्या इथं स्वतःचा एक फोटो काढावा असं वाटलं. एवढ्या जगविख्यात चर्चसमोर काढलेला एक फोटो संग्रही असावा, असं तीव्रतेनं वाटलं, परंतु स्वतः कसा फोटो काढणार ? आणि दुसऱ्याला सांगावं तरी कसं, या विचारात एक तास गेला. बाकावर बसून बसून कंटाळलो. शेवटी निघायचा विचार केला. दुसऱ्या दिवशी भारतात परतणार होतो. म्हणजे नोत्रदामची परत एकदा भेट दैवाधीन होती. माझे दैवच त्या क्षणी मदतीला आले. एक अमेरिकन युवती माझ्यापाशी येऊन म्हणाली, "विल यू प्लीज टेक अ फोटोग्राफ फॉर मी ?" ही संधी चांगली आहे, असे समजून मी त्वरित होकार दिला. माझा कॅमेरा बॅगेत ठेवला. तिने तिच्या कॅमेऱ्याच्या साऱ्या ॲडजस्टमेंट करून कॅमेरा माझ्या हाती दिला. मी विशिष्ट पार्श्वभूमी मागे यावी म्हणून ठराविक ठिकाणी उभं राहण्यास सांगून उंच असलेला मनोरा कॅमेऱ्याच्या फ्रेममध्ये यावा म्हणून जमिनीवर बसून तिचा फोटो काढून दिला. तिचे अनेकदा कमरेत वाकून आभार मानले. त्यानंतर मी माझा फोटो काढण्याची विनंती केली. माझा छोटा हॉटशॉट टाईप कॅमेरा होता. तिने माझा फोटो काढला व कॅमेरा सगळीकडून बघितला. मी माझ्या हलक्या कॅमेऱ्यामुळे ओशाळलो. कॅमेरा परत करता करता "लिटल बट ब्यूटिफुल कॅमेरा" असे खांदे उडवत, डोळे मिचकावत म्हणाली. नाहीतर आपल्या इथं वेगळाच संवाद, "अय्या ! हलका कॅमेरा दिसतोय, याने फोटो चांगले येत नाहीत" ऐकायला मिळाला असता. दुसऱ्यांच्या छोट्या गोष्टीतही मोठं शोधायची त्या अमेरिकन युवतीची वृत्ती पॅरीसच्या पार्श्वभूमीवर प्रेरक वाटली.

R E R या द्रुतगती रेल्वेनं प्रवास करीत होतो. माझ्यासमोर थेट केरळी वाटणारा तरुण बसला होता. का कुणास ठाऊक त्याच्याशी काही बोलावे, असे वाटले. पण परत विचार केला आपण जरी बोललो, तरी तो कदाचित तुटकपणा दाखवील. म्हणून बोलण्याची जोरदार ऊर्मी येऊनही मी गप्प बसलो. तोही अधूनमधून माझ्याकडे पाहात होता. शेवटी मीच त्याला विचारले, “आर यू फ्रॉम केरला ?” त्यावर माझी आपुलकी ओळखून तो पुढे वाकला आणि म्हणाला, “नो, आय एम फ्रॉम पाँडीचरी.” आमच्यातील भिडस्तपणा क्षणात संपला. गप्पांचा ओघ सुरू झाला. पॅरीसविषयीचं माझं मत ऐकून तो सुखावला. मी पाँडेचरीला गेल्याचं व ते गाव अतिशय आवडल्याचं जेव्हा सांगितलं तेव्हा तो खूष झाला. त्यानं माझी आस्थेनं चौकशी केली. मला त्याचं व्हिजीटिंग कार्ड दिलं आणि घरी सांबार-भात जेवणाचं अगत्यपूर्ण आमंत्रणही दिलं. पॅरीसमध्ये आणि सांबारभात ! कल्पनाच रम्य वाटली. आश्चर्य म्हणजे पॅरीसमध्ये तांदूळ, मसाल्याचे सर्व पदार्थ, तूरडाळ वगैरे सर्व काही मिळते. गार द नोर्द या भागात पुष्कळ भारतीय (तामीळ) लोक असल्याचं त्यानं सांगितलं. त्याचं स्टेशन आलं. गप्पा ब्रेक लागल्याप्रमाणे थांबल्या. जाता जाता त्याच्या चेहऱ्यावर, डोळयांत जे आपुलकीचे, स्नेहाचे भाव तरळले ते पाहून मनात त्या तामीळ युवकाची स्मृती कायम राहिली. पॅरीसमध्ये राहूनही तो भारतीय राहिला होता, तरी पॅरीसची खास गुणवैशिष्ट्ये घेऊनच.

मी व माझा पुण्याचा मित्र गोविंद क्षीरसागर मेट्रोनं गार द लियॉनहून निघालो. मला वाद द फाँतनेस उतरून sncf ची गाडी धरणं आवश्यक होतं, परंतु त्याच ट्रेननं शांपिनी हे स्टेशन येत असल्याचं ठासून सांगितलं. गप्पा मारत शांपिनी स्टेशन आलं म्हणून उतरलो. शांपिनी उपनगरात जरी राहत असलो, तरी वाल-द-मार्न ह्या स्टेशनाजवळ माझ्या यजमानाचं घर होतं. त्यामुळे शांपिनी स्टेशनवर उतरून मी जवळजवळ दोन तास घर हुडकण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. भयंकर वैताग आला. पाय दुखू लागले. मी एका बसस्टॉपवर थांबलो. पूर्णपणे भांबावून गेलो होतो. फ्रेंच बोलता तर येत नव्हतं. कुणी काही सांगू शकेना. असाच विमनस्कपणे सिगारेट ओढत उभा होतो. समोरच्या बसस्टॉपच्या रेलिंगवर चौदा-पंधरा वर्षांची फ्रेंच शाळकरी मुलगी बसली होती. ती रेलिंगवरून उतरून केस उडवीत माझ्यासमोर उभी राहिली व फ्रेंचमधून काहीतरी म्हणाली. मला वाटलं, मला काय हवंय ते विचारते आहे. मी तिला नकाशा काढून माझ्या यजमानाचं घर दाखवून तिथे कसं

जायचं हे विचारू लागलो. तिने सिगारेट तोंडात धरली व खुणेनं लायटर मागू लागली. चौदा-पंधरा वर्षांच्या मुलीनं सिगारेट शिलगवायला मला लायटर मागण्याचा आयुष्यातला पहिलाच प्रसंग. त्यात मी पेशानं शिक्षक. ती दहावीतल्या मुलीएवढी होती. तसं आमचं नातं शिक्षक-विद्यार्थिनीसारखं होतं, त्यामुळे तिच्या धीटपणामुळे मीच गांगरून गेलो. तिला लायटर दिला. तिने आरामात लायटर पेटवून सिगारेट शिलगावली. एक झुरका मारून लायटर माझ्या हातात देऊन 'मर्सी मस्य' म्हणून केस उडवीत निघून गेली. तिथली मुलं-मुली सिगारेट ओढतात. त्यांची चोरी करून लपवून ओढण्याची भावना नसते. उघडपणे मनाला पटेल ते करायचं हाच तिथल्या संस्कृतीचा एक भाग आहे. अजून ती लायटर मागणारी मुलगी मला आठवली की मीच मनात ओशाळतो.

एके संध्याकाळी लादिफाँ या आलिशान भागातील उंचच उंच इमारती न्याहाळत बसलो होतो. त्यातील फियाट ही पंचावन्न मजली सुरेख इमारत माझ्या कॅमेऱ्याच्या व्ह्यू फाइंडर मध्ये मावेना, म्हणून चार-पाच स्थळांवरून मी प्रयत्न करून बघितला. शेवटी जमिनीवर ओणवा पडून फोटो काढण्यासाठी एक कोन निवडला. तोच त्या इमारतीजवळ काळ्या युनिफॉर्ममध्ये चार धिप्पाड व रुबाबदार पोलिस आले. मला वाटलं, बरं झालं. इमारतीबरोबर पोलिसांचाही फोटो येतोय. भारतात गेल्यावर फ्रेंच पोलिस कसे दिसतात, हे दाखविता येईल या विचाराने हर्षही झाला आणि फोटो काढला. तोच त्यातल्या एका पोलिसाने मला पाहिले. त्याने तिघा पोलिसांना काय सांगितले कुणास ठाऊक, ते चौघे माझ्याकडेच चाल करून येऊ लागले. ते चार धिप्पाड निश्चल देह माझ्या दिशेने सरकत जवळ येऊ लागले, तसे उगीचच मनात भीतीचे कापरे भरले. परंतु आपण भेदरलेले आहोत हे जरासुद्धा लक्षात आलं की मग भारतीय पोलिसांच्या अनुभवावरून, काही खरं नाही ह्या समजुतीनं मी निर्विकारपणे तसाच बसून राहिलो. त्या चौघांतील एकानं शांत स्वरात फ्रेंचमध्ये काहीतरी विचारलं. मी फ्रेंच येत नसून इंग्रजी येते, हे इंग्रजीतूनच सांगितले. मी त्या पोलिसांशी बोलताना इतर तिघे माझ्याकडे निरीक्षून पाहत होते. चौकशी न करताच चार थोबाडीत देऊन, शिव्यांची लाखोली वाहून "चल चौकीवर, मग दाखवतो थर्ड मेथड" असे मनात येऊन आपल्या इथले दृश्य आठवून सर्वांग गार पडू लागले. तरी ह्या भयानक प्रसंगातून सोडविण्यासाठी परमेश्वराची आठवण केली. माझ्या सांगण्याचा परिणाम न झाल्याने त्याने खिशातून एक कार्ड काढले व

ते मला बाजूला घेऊन वाचायला सांगितले. त्यात नाव, राष्ट्रीयत्व व येथे येण्याचा उद्देश, असे शीर्षक होते. मी ती माहिती दिली. मग त्याने पासपोर्ट कुठे आहे असे विचारले. अगोदर विमान तिकीट चोरीस गेलं होतं म्हणून मी पासपोर्ट आणायचा टाळायचो. पासपोर्ट आणला नाही, तो घरी ठेवलाय, हे मी कितीही प्रयत्न करून सांगितले तरी त्यांना ते समजेना व ते अधिकच संशयानं बघू लागले. माझी बोबडी वळणंच शिल्लक राहिलं. अचानक लक्षात आलं की SNCF रेल्वेचं आयडेंटीटी कार्ड माझ्यापाशी होतं. त्यावर माझा फोटो, राहण्याचा पत्ता व रेल्वेचे तिकीट हे शांपिनी स्टेशन मास्तरच्या सही-शिक्क्यानिशी होतं. ते मी त्याला दाखविलं. त्या चौघांनी एकदम निरखून पाहिलं आणि काहीतरी फ्रेंचमध्ये पुटपुटून ते कार्ड मला साभार परत केलं. माझी महत्त्वाची ( ?) दहा मिनिटं घेतल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून ते पोलिस तिथेच उभे राहून एका महिलेला जी माहिती हवी होती ती सविस्तरपणे समजावून सांगत होते. मी तिथेच पाच-दहा मिनिटं बसून मग तेथून निघालो. महान संकटातून (आपल्या इथल्या पोलिस खात्याच्या चौकशीच्या अजब चौकशीच्या हिशोबाने) सुटल्याच्या आनंदात एक सिगारेट काढून शांतपणे ओढली, पण त्या पोलिसांची कर्तव्यं बजावीत असताना सौजन्यपूर्ण वागण्याची व लहान-सहान मुद्द्यावरून (पासपोर्ट जवळ न बाळगणे) गुद्द्यावर न येण्याची पद्धत मला फार आवडली. फ्रेंच पोलिससुद्धा एका संस्कृतीच्या धाग्यात ओवले गेल्याने पॅरीसमधील हा पोलिसांचा आलेला अनुभव वेगळाच म्हणून लक्षात राहील.

एके दिवशी मी एका 'ताबाक' (Tabac) मध्ये सिगारेटचे पाकीट मागितले. नेमका ब्रँड सांगता येत नसल्याने जुने संपलेले पाकीट जपून ठेवत असे. ते दाखवून मला हवी ती सिगारेट मागायचो.

माझ्या ह्या युक्तीस गालात किंचित हसून त्या फ्रेंच विक्रेत्या स्त्रीनं दाद दिली. माझे पाकीट मला दिले व मी दहा फ्रँकचे नाणे समोरच्या तबकात ठेवले. तिथे हाताने हातात पैसे द्यायची पद्धत नाही. किंबहुना तसे करणे अयोग्य समजतात. ते नाणे तिने घेऊन तीन फ्रँक व काही सेंटीम त्या तबकातच ठेवले. पाकीट खिशात ठेवण्याच्या नादात मी ते पाहिले नाही व हात पुढे केला. तिने तबकात पैसे ठेवल्याचे खुणेनेच सांगितले. क्षणभर काहीतरी चुकल्यासारखे वाटून मी हात मागे घेऊन त्या तबकातले सुटे पैसे घेतले. यात माझी काहीतरी गैरसोय झाली किंवा पुढे केलेला हात मागे घ्यावा लागला. तिने अत्यंत लीनतेने 'फर्दो मस्य' म्हणून क्षमा मागितली.

इतक्या साध्या गोष्टीतही पाळला जाणारा शिष्टाचार मन सुखवून गेला.

मी व माझा मित्र चंद्रशेखर ऑपेराहून बसने लूव्रला निघालो होतो. पॅरीसमधील साऱ्याच इमारती अवाढव्य व त्यांना अनेक टोलेजंग प्रवेशद्वारं. त्यामुळे लूव्र कधी येते आहे, हे खिडकीतून पाहत अंदाज करीत होतो. रिव्होली भागात बस आली आणि लूव्र समजून उतरण्यासाठी उभे राहिलो. शेजारी बसलेल्या स्त्रियांनी लूव्र आणखीन पुढे आहे, असे सांगितल्याने परत खाली बसलो. कोपऱ्यात बसलेल्या सूटबूट व टाय घातलेल्या एका अद्ययावत पोशाखातील तरुणाने ओळखले की आम्ही नवखे आहोत. स्टॉप येताच त्यानं नेत्रकटाक्षानं उतरण्याची खूण केली. खाली उतरून इकडे-तिकडे पाहू लागलो. तो रुबाबदार तरुण आमच्यापाशी येऊन म्हणाला, "फॉलो मी." आम्ही मंतरल्याप्रमाणे त्याच्या मागे जाऊ लागलो. भामटे सुद्धा कधी कधी अद्ययावत पोशाखात येऊनच फसवतात. हा कोणाचा तरी देशी हितोपदेश अकारण त्या वेळी मदतीस आला. तरी आम्ही त्यापाठोपाठ रस्ते, झेब्रा क्रॉसिंग ओलांडत गेलो. भव्य प्रवेशद्वारातून आत गेलो. समोर लूव्रचे सुप्रसिद्ध काचेचे पिरॅमिड दिसताच त्या सद्‌गृहस्थाबद्दल अकारण गैरसमजूत करून घेतल्याबद्दल मनस्ताप तर झालाच, परंतु स्वतःचा मूल्यवान वेळ (पॅरीसमधले नागरिक नेहमी कुठल्या ना कुठल्या कामात 'असतात) खर्चून आम्हाला इष्ट स्थळी आणण्याचे कष्ट घेतल्याबद्दल आभार कोणत्या शब्दात मानावे, हेच न कळल्याने आम्ही 'थॅंक यू व्हेरीमच' असं मनःपूर्वक म्हणालो. त्यावर तो तरुण म्हणाला, "इटस् माय ड्यूटी टू हेल्प यू" आणि तरातरा निघून गेला. आपल्या इथे नागरी कर्तव्याचे धडे पुस्तकातच राहतात आणि व्यवहारात उरतो निव्वळ अनागरीपणा. छोट्या छोट्या प्रसंगांतूनच एखाद्या शहरातील नागरिकांचे, त्या राष्ट्राचे दर्शन घडते. केवळ 'फॉलो मी' आणि 'इट्स माय ड्यूटी टू हेल्प यू' या दोन वाक्यांत त्यानं आमची मनं जिंकली होती. असे मदत करणारे अनेक फ्रेंच पुरुषच काय परंतु स्त्रियाही अनेक प्रसंगी भेटल्या. मेट्रोतून उतरून काचेच्या दारातूनही काही ठिकाणी बाहेर पडावे लागते. ही दारे हैड्रॉलिक लिवरची असल्याने ढकलायला किंवा ओढायला श्रम पडतातच. पण ते दार ढकलायचे का ओढायचे हे कित्येकदा कळत नाही. एकदा मी असाच दार ढकलत होतो, पण ते उघडेना. तत्परतेने एक वृद्ध फ्रेंच स्त्री पुढे आली आणि तिने दार ओढून धरून ठेवले आणि मला पुढे जाण्याची डोळ्यानेच खूण केली. मी दारातून पुढे गेलो तोच पुढून एक

जण आला. तो येईपर्यंत तिने दार हाताने धरूनच ठेवले. त्याने तिचे आभार तर मानलेच, परंतु त्याच्याही मागून येणाऱ्या गृहस्थासाठी त्याने दार किंचित वेळ धरून ठेवले. दार उघडायचं, उघडलेलं दार धरून ठेवायचं क्षुल्लक काम पण ह्या कामातून माणसाला माणूस जोडला जातो. अशा साध्या साध्या क्षणातून माणसं जोडून खऱ्या अर्थानं राष्ट्र बनतं. लोकसंख्येचा भला मोठा आकडा म्हणजे राष्ट्र नव्हे, तर माणसामाणसांतले बंध किती प्रसंगानं जुळतात आणि बळकट होतात यावरच राष्ट्र संकल्पनेला आकार येतो. दूरदर्शनवर राष्ट्रप्रेम प्रेरित करणारी दृश्ये, गीते, वचने प्रेक्षकांना दाखवून राष्ट्रांचा पाया कधी भक्कम होत नसतो, हे इथे प्रकर्षाने जाणवले. मेरा भारत महान, आय लव्ह इंडिया अशी स्टीकर्स वाहनांवर लावल्याने राष्ट्रप्रेम जागृत होत नसते, फक्त स्टिकर्स तयार करणाऱ्याचा धंदा मात्र तेजीत येतो.

o

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. न

# पॅरिसियन. . .



पॅरीसचा हरेक नागरिक रंगेल, गुलहौशी व फॅशनेबल असावा, असे कथा-कादंबऱ्यांत वाचून प्रत्येकाने मनात पक्के ठरविलेले असते. कमालीच्या आर्थिक सुबत्तेमुळे तो विलासी व ऐषारामी असावा, असा तर्क करण्यात आपण फार पुढे जातो. नाईटक्लब हे पॅरीसियनांचे वर्दळीचे ठिकाण असावे, असा आपला कयास असतो. शँपेन, कोन्याक या मद्यांचा प्याल्यासह तो दिवसातला बराच काळ

घालवीत असावा, असाही दृढ समज चित्रपट माध्यमातून होत असतो. एकूण पॅरीसियनांविषयीच्या आपल्या कल्पना कमालीच्या भडक असतात. पॅरीसियनबद्दलच्या आपल्या कल्पनांना खतपाणी घातले जाते चित्रपट, कथा, कादंबऱ्या किंवा क्वचित प्रवासवर्णनातील भडक वर्णनांमुळे. पर्स्पेक्टिव्ह असिएन ह्या पॅरीसच्याच संस्थेमार्फत कुटुंबाकुटुंबातून दोन आठवडे मुक्काम केल्यामुळे आम्हा सर्वांच्या अनुभवांचे संकलन केल्यावर पॅरीसच्या सर्वसाधारण मध्यमवर्गीय माणसाचे व्यक्तिचित्र अतिशय हवेहवेसे वाटते. तो आपला दूरचा बंधूच वाटतो. मूळ मानवी स्वभाव इथून-तिथून सारखा. प्रेम, लोभ, मत्सर, हेवा ह्या मूलभूत मानवी विकारांचे दर्शन सर्वत्रच होणार. परंतु समृद्धीमुळे, अर्थपूर्ण शिक्षणामुळे, सामाजिक जाणिवेमुळे, मुख्य म्हणजे राष्ट्रीय भावनेमुळे मूळ मानवी स्वभावास वेगळाच साज चढविला गेला आहे. त्यामुळे प्रत्येक मानवी प्रवृत्ती इथे वेगळ्या आवृत्तीत आढळते. त्याला आपण फ्रेंच आवृत्ती म्हणू. त्यामुळे इथल्या सर्वसामान्य पॅरीसियनचे व्यक्तिमत्त्व लुभावणारे आहे. खोलवर डोकावून पाहिल्यास त्यात काही शल्ये, व्यथासुद्धा आढळतात. त्यांनासुद्धा परत 'फ्रेंच' छटा आहेच.

माझे यजमान श्री. पिअर व मादाम दानिएल असणार हे मला पूर्वीच कळले होते आणि त्यांच्या कुटुंबात तब्बल चौदा दिवस काढायचे होते. एका आगळ्यावेगळ्या संस्कृतीतील, धर्मातील कुटुंबात कसे ॲडजेस्ट व्हायचे, त्यांच्या स्वभावाशी कसे जुळवून घ्यायचे, हे विचार प्रथम अस्वस्थ करीत. परंतु ऑस्टरलिझ रेल्वे स्टेशनवर गौरकाय, मध्यमवयीन, किंचित स्थूल, गालातल्या गालात हसणाऱ्या मादाम दानिएलने जेव्हा डोळे, भुवया, खांदे, हात माफक प्रमाणात उडवून माझे अकृत्रिम स्वागत केले तो क्षण अविस्मरणीय आहे. तिच्या डोळ्यांतून अमर्याद स्नेहभाव ओसंडत होता. एक फ्रेंच स्त्री, स्वारगेट एस.टी. स्टँडवरील कोणत्याही पुणेरी स्त्रीप्रमाणे माझे स्वागत करीत होती. ह्याच मादाम दानिएलने अत्यंत आपुलकीने माझे आतिथ्य करून माझे पॅरीसमधले चौदा दिवस अविस्मरणीय केले. तिचे यजमान श्री. पिअर हे थोडेसे गबाळेच होते. परंतु मनाने डोहातील स्वच्छ पाण्याप्रमाणे पारदर्शी.

दोघेही शिक्षक होते. त्यांचे मासिक उत्पन्न बावीस हजार फ्रँक म्हणजे सुमारे ऐंशी हजार रुपये इतके होते. आपल्या शिक्षकांच्या तुलनेने पंधरा ते वीस पट उत्पन्न असल्याने सर्व सुखांच्या राशी त्यांच्या घरात लोळत असाव्यात असे वाटेल. पण

ते 'फ्रेंच' दर्जाच्या राहणीमानाप्रमाणे कनिष्ठ मध्यम वर्गात मोडत होते. त्यांचं राहतं घर हे त्यांनी उपनगरात विकत घेतलं होतं, तेही बँकेकडून कर्ज काढून. त्यांना मी एकदा म्हणालो, "तुमचं घर छान आहे. पुढे-मागे बागबगीचा, गॅरेज सर्व काही आहे." त्यावर चटकन मादाम म्हणाल्या, "पण बँकेचे मोठे हप्ते पगारातून गेल्यामुळे ओढाताण होते." आपल्याइथलीच, कसेही करून घर बांधणे आणि H.D.F.C. च्या मोठ्या हप्त्यामुळे दमून जाणे, ही मध्यमवर्गीयांची खास हौस इथेही जशीच्या तशी आढळली.

दोघेही नोकरीनिमित्त सकाळी बाहेर पडत. मि. पिअरची शाळा रेल्वेस्टेशनजवळ असल्याने तो कारऐवजी रेल्वेचा वापर करी, तर मादाम दानिएल त्यांच्या रेनॉ ह्या आलिशान कारने कामास जात. बहुतेक नोकरी करणारे स्वतंत्र कार ठेवतात. परंतु पिअर कुटुंबाने एका कारमधूनच थोडी काटकसर करून स्वतंत्र, स्वतःच्या बंगल्याचे स्वप्न पुरे केले होते. घरात वॉशिंग मशीन, व्ही.सी.आर. व्हिडिओ कॅसेटची मोठी लायब्ररी, समृद्ध ग्रंथालय, मिनिटेल, फोन, कार, मोठा कलर टी.व्ही. फ्रीज हे होतेच. परंतु त्यांच्या घरी भांडी घासायचे मशीन नव्हते. तसे वॉशिंग मशीन सर्वसाधारण सर्वांकडे असते, परंतु पिअर कुटुंबाने अजूनही ते घेतले नव्हते. चालू परिस्थितीप्रमाणे सर्व अत्याधुनिक सोई त्यांनी एक एक वस्तू घेऊन क्रमाक्रमाने पूर्ण केल्या होत्या. त्या सर्व essential मध्ये मोडणाऱ्या होत्या. त्यात सोय साधणे हे महत्त्वाचे होते. ऐषाराम कुठेच नव्हता.

दोघेही नवरा-बायको साधे राहत. परंतु मादाम दानिएल अधिक नीटनेटक्या राहत. फ्रेंच स्त्रिया सदैव नीटनेटक्या राहतात. स्वयंपाक करताना, बेसीन व डिशेश धुताना आणि घरात एरवी. त्यामुळे बाहेर निघण्यापूर्वी तास दोन तास 'आवरणे' हा, आपल्याकडील दीर्घ प्रतीक्षा करायला लावणारा प्रकार मला एकदाही आढळला नाही. पिअरला तर 'आवरणे' हा प्रकारच फारसा माहीत नव्हता. आमच्या पॅरीसमधील एका गेट-टु-गेदरला पन्नास फ्रेंच कुटुंबांना आमंत्रित केले होते. आपल्याकडील रिसेप्शन कार्यक्रमासारखाच. मादाम दानिएल व मि. पिअर हे सुद्धा आमंत्रित होते. आश्चर्याचा धक्काच बसला दोघेही नेहमीच्याच वेशभूषेत आलेले पाहून. ठेवणीतले कपडे, दागिने, पर्स, गजरा, इतकंच काय हेअरस्टाईल ह्या सर्वांच्या प्रदर्शनाची पर्वणी म्हणजे असले कार्यक्रम, अशा समजुतीत आयुष्याची बेचाळीस वर्षे काढल्याने, प्रथम सखेद व नंतर सुखद धक्का बसला. आपल्या इथे

कपडे, दागिने ह्यांच्याच विचारात तुलनेत आपण रिसेप्शनला आनंदाचे क्षण लुटण्याऐवजी दुःख, खेद, हेवा, ईर्षा यांनाच जास्त निर्माण करतो.

मद्य हे फ्रेंचांचे आवडते पेय. पण आश्चर्य हे की, आपण चहाचे जितके कप दिवसाकाठी घशाखाली लोटतो, त्याच्या निम्म्यानेही ते मद्य घेत नाहीत. जेवणापूर्वी माफक प्रमाणात मद्य घेतलं जातं. त्यात चोखंदळपणा अवश्य असतो. विविधता असते. वेगवेगळ्या मद्यप्रकाराबद्दल तितकीच प्रीती असते. 'वडिलांनी 'यलो लेबल चहा' वापरला म्हणून मी माझ्या मुलांनाही तोच चहा देते, असं अभिमानानं सांगत यलो लेबलचे लेबल कायमचे कुटुंबावर लावण्याची विलक्षण हौस मद्यप्रकारांबद्दल नसते. ज्याला हवं ते हवं तितकं घ्यावं. निवांतपणे प्यावं. सुदैव हे की कुठं थांबायचं हे त्यांना कळतं, म्हणून सर्वत्र मद्य असूनही मद्यपी हे विशेषणच त्यांच्या शब्दकोशात नसावं.

पॅरीसियन हे कमालीचे कष्टाळू वाटले. फ्रान्सच्या एकूण लोकसंख्येपैकी १८ टक्के लोकसंख्या पॅरीसमध्ये एकवटली तर एकूण उत्पादनाच्या ४० टक्के उत्पादन पॅरीस व परिसरात होते. यामुळे राहण्याच्या जागेचा प्रश्न आपल्याहून बिकट झालाय. त्यामुळे उपनगरांची वाढ केंद्रोत्सारी पद्धतीने झाली आहे. त्यामुळे प्रत्येक पॅरीसियन पॅरीसपासून दूर दूर चाललाय. त्यामुळे प्रत्येकाकडे कार असणे अत्यावश्यक झाले आहे. परंतु 'कार बूम' झाल्यामुळे दहा लाख कार्सपैकी नऊ लाख कार्स रस्त्यावर असतात. ह्या अतीव रहदारीच्या घनतेमुळे ट्रॅफिक जाम प्रकार वारंवार घडतात. वाहतूक पोलिस पायाला भिंगरी लावून ह्या ट्रॅफिक जामचा गुंता हसतमुखाने सोडवितात. हातात डायरी व तोंडात शिट्टी अशा अवतारात कोपऱ्यात कुठेतरी लुप्त होण्याची प्रवृत्ती नसल्याने 'ट्रॅफिक जाम' हे असह्य दुखणे थोडेतरी सुसह्य झाले आहे. या सर्व प्रकारांवर 'मेट्रो' हे सुरक्षित व जलद उत्तर पॅरीसच्या प्रशासनाने विकसित केल्याने 'मेट्रो'वर बरेचसे पॅरीसियन विसंबून राहतात. त्यामुळे पॅरीसपासून दूर राहणारे बराच काळ मेट्रोतच असतात. त्यामुळे गमतीने 'यू वील फाईंड पॅरीसीयन आयदर इन हिज ऑफिस ऑर मेट्रो अदरवाईज ॲट होम' म्हटल्याचं अनेकदा ऐकलं. म्हणजे पॅरीसियनाच्या व डोंबिवली-बोरीवलीच्या प्रवाशांच्या भाग्यरेषा कुठेतरी तंतोतंत जुळतात.

भांडीवाली, धुणंवाली, केर-फरशी इ. कामाला कुणी मोलाने नोकरचाकर ठेवू शकत नाही. म्हणजे आपल्या नोकरी करणाऱ्या महिलांपेक्षा अधिक काम ऑफिस,

शाळा, कारखान्यात करून शिवाय घरची सर्व वरील कामं स्त्रियांना करावी लागतात. याशिवाय घराला रंग, घरदुरुस्ती, बागकाम, कित्येकदा फर्निचरनिर्मिती ही कामंसुद्धा पॅरीसीयन पतीपत्नी घरी करतात हे विशेष. मी तर शांपिनी ह्या उपनगरात दररोज एका कुटुंबाला घराचे बांधकाम करताना बघितलेय. नवरा-बायको बांधकामसाहित्य (वाळू, सिमेंट, खडी) कॉंक्रीट मिक्सरमध्ये तयार करून स्लॅब ओतीत तर त्यांचे वृद्ध वडील बादलीने पाणी आणीत. हे बांधकाम मी आठवडाभर चाललेलं दररोज बघायचो व मग रेल्वे गाठायचो. ही हकीगत जेव्हा मी पिअरला एक अद्‌भुत घटना या आविर्भावाने सांगितली तेव्हा त्याने सहजपणे सांगितले की त्यांच्या नव्या विकत घेतलेल्या घराचे पेंटिंग, फ्लोअरचे लाकडी आच्छादन हे सर्व त्यानेच केले होते. धकाकीचं जीवन जगताना, मेट्रोची मर्जी सांभाळताना; भांडी घासणे, स्वयंपाक करणे ह्यात दानिएलला दररोज मदत करताना घराची रंगरंगोटी, डागडुजी करणारा पिअर ह्या पॅरीसीयनला ऐदी व ऐषारामी समजणे हा गुन्हाच वाटू लागला. हे सर्व करण्यामागे पैसा वाचविणे हा हेतू कुठेच नसून श्रमप्रतिष्ठेला दिलेले महत्त्व आहे.

एवढे कष्टमय जीवन जगल्यावर विरंगुळा म्हणून नाईटक्लबला जाणे आपण एक हक्क समजू. परंतु पिअरने आयुष्यात एकदाही पॅरीसचा नाईटक्लब बघितला नव्हता. पुढे तरी कळाले की कित्येक फ्रेंच पुरुष नाईटक्लबना जात नाहीत. नाईटक्लब हे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठीच मुख्यतः आहेत. एकदा पिअरला नाईटक्लबबद्दल विचारले असता त्यानं खांदे उडवून 'दे आर टू एक्स्पेंसिव्ह' असं उत्तर देऊन नाईटक्लब हा विषयच संपवून टाकला. ज्यांची जीवनपद्धतच मुळी झिंग आणणारी आहे त्यांना नाईटक्लबमध्ये जाण्याची आवश्यकताच काय ?

सर्वसाधारण फ्रेंच माणसे आपले दैनंदिन जीवन 'नाकासमोर चालणे' या पद्धतीने जगताना दिसली. तरी त्यांच्या सामाजिक, राष्ट्रीय जाणिवा सूक्ष्म व तरल वाटल्या. मी बरं, माझं कुटुंब बरं, ह्या कोषात राहण्यापेक्षा आपल्या पलीकडे पाहण्याची वृत्ती पदोपदी आढळली. त्यात राष्ट्रीय सामाजिक समस्यांबद्दलच्या जाणिवा खोलवर रुजल्याचे खास करून जाणवले.

घटस्फोट, बेकारी या समस्यांबद्दल प्रत्येक फ्रेंच माणसाला काहीतरी खोलवर जाणवते. फ्रान्समध्ये घटस्फोटांचे प्रमाण चिंतनीय असल्याची खंत व्यक्त करणारे उद्‌गार मादाम दानिएल नेहमी काढी. आमच्या देशात साधारणपणे एक तृतीयांश

वयस्क मंडळी घटस्फोटित आहे हे सांगताना एरवीचा तिचा हसरा चेहरा गंभीर व्हायचा. घटस्फोट हा कुचेष्टेचा, टीकेचा विषय नसून सर्वांच्याच सहानुभूतीचा विषय आहे, असे तिच्या बोलण्यावरून जाणवे. तिच्या बोलण्याला चेहरा किंचित कडवट करून पिअर दुजोरा देई. खरं तर पिअर व दानिएल हे अखंड अठरा वर्षे वैवाहिक जीवन सुखानं जगत असूनही घटस्फोट-घटस्फोटितांबद्दल त्यांच्या मनात कुठेही कडवटपणा जाणवला नाही. उलट व्यक्तिस्वातंत्र्याच्या अतिरेकीपणाचा घटस्फोट हा परिणाम आहे, असे त्यांचे म्हणणे होते.

पॅरीसमध्ये जवळजवळ एक तृतीयांश वयस्क स्त्री-पुरुष पतीपत्नीच्या नात्यानं एकत्र राहतात, परंतु विवाहबद्ध न होता. त्यांचे एकत्र राहणे हे मित्रत्वाच्या नात्यासारखे असते. पुढे-मागे सूर जुळले की विवाहितही होतात, तर सूर जुळले नाही, तर कुठलाही तणाव, त्वेष, संताप व्यक्त न करता अलग होतात. घटस्फोटित वृद्ध स्त्री-पुरुष एकाकी जीवन जगत जरी असले तरी जीवनाच्या प्रत्येक अंगाचा उत्कट अनुभव घेतच असतात. एकंदर पिअर कुटुंब वैवाहिक जीवन स्नेहपूर्ण वातावरणात जगत जरी असले, तरी घटस्फोट या विषयावर त्यांचे विचार हळुवार व सहानुभूतीपूर्ण होते. पॅरीसचा माणूस दैनंदिन जीवनाच्या धकाधकीत 'माणूसपण' टिकवून आहे.

तसेच बेकारीबद्दल आकडेवारीसकट दोघेही बोलत. बेकारी हा विषय मोर्चा, धरणे, आश्वासने यांनी सुटणारा नसून सक्रिय साहाय्यातून तो हलका होईल, असेच त्याचे विचार दिसले. आपण रोजगार हमी योजनेसाठी कर भरतो तो काहीसा नाखुषीनेच, कारण त्या कराची रक्कम भ्रष्टाचारातच गडप होते. उलट प्रत्येक फ्रेंच मनुष्य आपल्या पगारातून ठराविक रक्कम राष्ट्रीय कर्तव्य म्हणून भरतो. ह्या रकमेतूनच बेकार तरुणांना बेकारभत्ता, वृद्धांना योग्य ती शुश्रूषा यांचा लाभ तर मिळतोच, पण नोकरी गमावल्यावरही काही प्रमाणात भत्ता मिळतो. त्यामुळे तरुण, मध्यम, वृद्धावस्था या काळातील विवंचना नाहीशा झाल्या आहेत.

एकूण फ्रेंच स्त्री-पुरुष समंजस, धीरोदात्त व राष्ट्रभावनेने प्रेरित असेच वाटले. प्रथम राष्ट्र मग मी, हेच त्यांच्या जीवनाचे सूत्र आढळले.

कविमनाला काव्य स्फुरेल असं सौंदर्य असलेल्या पॅरीसला सदैव सुंदर, आकर्षक ठेवण्याचे प्रयत्न इतर महानगरपालिकांनी विशेषतः मुंबई-पुणे इथल्या महानगरपालिकांनी, तिथल्या नगरसेवकांनी जाणून घ्यावेत. आपल्या इथे बंगलोर

शहरच प्रयत्नपूर्वक स्वच्छ व सुंदर ठेवण्याचे प्रयत्न केल्याचे जाणवते. बाकी इतर शहरांबद्दल काय बोलावे. पुण्याच्या पर्वतीच्या निम्मा भाग झोपडपट्ट्या वाढल्यामुळे विद्रूप झाला आहे. पॅरीस शहर हे आपले शहर आहे, ही भावना सर्वांच्या हृदयात असल्याने 'महापौरांचा संदेश' खर्चिक फलकावर लिहिण्याची गरज तिथे नाही. प्रत्येक नागरिक हा नगरसेवक असतो, महापौरच असतो आणि महापौर व नगरसेवक हे सुद्धा स्वतःला पॅरीसचे नागरिकच समजतात. त्यामुळे पॅरीसचे सौंदर्य सदैव जपले गेले आहे. जनतेच्या सौंदर्यासक्त वृत्तीला प्रामाणिकपणा, सार्वजनिक स्वच्छतेचं बाळकडू आणि राष्ट्रप्रेम यांची जोड मिळाल्यानं व अशाच जनतेतून स्वच्छ प्रतिमेचे नगरसेवक, महापौर निवडून जात असल्याने दुग्धशर्करा योगच दिसून येतो.

पॅरीसचे सध्याचे महापौर हे फ्रान्सचे माजी पंतप्रधान आहेत हे केवढे भाग्य त्या शहराचे. एवढा मोठा उच्चपदस्थ पॅरीसचा महापौर असल्यामुळे त्यांचा सर्वांना अभिमान वाटतो. आमच्या बरोबरची सर्व फ्रेंच मंडळी महापौरांबद्दल अत्यंत आदराने बोलत. ही त्यांच्या कार्याची पावतीच होती. पॅरीस महापालिकेच्या सर्व नगरसेवकांचे मी मनात खूप कौतुक करायचो. कारण कुठल्याही ठिकाणी 'वॉर्ड क्र. .. चे उमेदवार' अशा मजकुरासकट एकही भिंत मला पॅरीस मुक्कामी दिसली नाही. पॅरीसच्या पाणीपुरवठा खातेप्रमुखांना अभिनंदनाचा संदेश पाठवावा, असे फूटपाथवरून फिरताना नेहमी वाटे. तिथल्या आरोग्यप्रमुखांना शहरातील स्वच्छता कायम राखल्याबद्दल धन्यवाद द्यावेसे वाटे. नको तिथे पुढाऱ्यांचे, महर्षींचे पुतळे उभे करून सौंदर्य वाढविण्याऐवजी शहरातील सर्वाधिक अनास्थादर्शक स्थळे निर्माण न केल्याबद्दल किताब द्यावासा वाटतो. एकंदर आपल्या मागे आपले 'कार्य' जनतेत चिरंतन राहावे म्हणून पालिकेच्या, जनतेच्या करातून स्मारके, बोडकी उद्याने उभारण्याची पद्धत पॅरीसच्या नगरसेवकांना नाही हे विशेष.

रस्त्यावर डिव्हायडर नाहीत, परंतु वाहनचालक कधीच पांढऱ्या पट्टीपलीकडे जात नाहीत. झेब्रा क्रॉसिंगवर पादचाऱ्यांच्या हक्कांची जाणीव ठेवून मोटारी झेब्राअलीकडेच थांबविल्या जातात. वाहतुकीच्या सिग्नलचा आदर सर्वांकडून एकाच वेळी केला जातो, म्हणून येथील वाहतूक शिस्तीत आहे. महापालिकेचे रस्तादुरुस्तीचे कंत्राटदार प्रामाणिकच असतात म्हणून खड्डे, उंचवटे कुठेच दिसत नाहीत.

रस्त्याच्या कडेला खांबावर जाहिराती लावण्यासाठी फलक कायमस्वरूपी आहेत. त्यांवर जाहिराती ठराविक मुदतीनंतर बदलल्या जातात. म्हणून जाहिरातीत नावीन्य तर राहतेच, परंतु भिंती, घरांचे दर्शनी भाग, पुलांचे कठडे, फ्लायओव्हरचे कॉँक्रीटचे खांब, सिटीबसेस यांवर जाहिराती कधीच चिटकवलेल्या दिसत नाहीत. त्यामुळे नुकतेच आंघोळ केल्यावर जसे निरामय वाटते, तसे शहरात कुठेही नजर टाकली तरी तसे वाटते.

शहरात दिव्यांचे ओतीव लोखंडांचे खांब आहेत. त्यांना इतके नक्षीदार केलेले असते की प्रत्येक खांब हा कलाकृतीचा नमुना तर वाटतोच, परंतु रस्त्याची शोभा वाढवितो. वीज मंडळ, टेलिकॉम खाते यांनी आपला तारांचा संसार भूमिगत केल्याने सर्वदूर नजर फिरली तरी गचाळ असे कुठेच दिसत नाही. रस्त्याच्या कडेला प्रचंड वृक्ष आहेत. विद्युततारांना टाळण्यासाठी रस्त्याच्या कडेच्या झाडांची मनमानी तोड न झाल्याने झाडांनाही सौष्ठव प्राप्त झाले आहे. प्रचंड क्रेनच्या साह्याने प्रचंड वृक्ष छाटून एका ओळीत असल्याचा भास निर्माण केला जातो. तसेच ट्रकवर बसविलेल्या यंत्रांद्वारे झाडांच्या पानांवर औषधी द्रव्यांची फवारणी केली जाते. वृक्षप्रेम हे रक्तातच असल्याने छोट्या वृक्षांना अमूल्य लोखंड खर्चून गार्डस् बसविलेले व त्या अनुषंगाने कंपन्यांची जाहिरात केल्याचे कुठेच दिसले नाही. उलट आळयांच्या तळाला खड्डा असतो तो जाड लोखंडी ग्रीलने झाकून ग्रील व फूटपाथचा पृष्ठभाग एकाच पातळीवर आणला जातो. त्यामुळे नक्षीदार ग्रीलमुळे फूटपाथच्या सौंदर्यात भर पडते आणि पाणी घालणेही शक्य होते. इमारती व वृक्ष यांचा समन्वय राखण्याचा आटोकाट प्रयत्न 'सुंदर पॅरीस हिरवे पॅरीस' ही घोषणा कुठेही न लावता केले जातात. यात परिपक्व व राष्ट्रप्रेमी नागरिकांचा वाटा स्पष्ट दिसतो.

कचऱ्याच्या कुंड्या प्लॅस्टिकच्या किंवा फायबर ग्लासच्या असून त्यांना झाकण असते. ह्या कुंड्या कधीच भरून वाहत नाहीत. लोकही तिथपर्यंत (कुंड्यांपर्यंत) जाऊन त्यांत कचरा टाकण्याची दक्षता घेतात. महापालिकेच्या गाड्या हा कचरा वेळेवर उचलून नेतात. त्यामुळे शहर एकदम स्वच्छ वाटते. संपूर्ण शहरात कचरापेट्या इतक्या विपुल आहेत की स्वच्छता राखण्याची ऊर्मी जेव्हा येते तेव्हा जवळच कचराकुंडी असते. म्हणजे स्वच्छता राखणे हे नागरिकांच्या कडून अपेक्षिले जाते, तसेच कचराकुंड्या मुबलकपणे सर्वत्र पुरविणे हे आपले कर्तव्य आहे, असे

महापालिकेलाही वाटते. थोडक्यात, स्वच्छता ही नागरिक व महानगरपालिका यांची संयुक्त जबाबदारीच आहे.

पॅरीस हे पर्यटकांचे शहर आहे. कुठल्याही दिवशी एक लाखापर्यंत पर्यटक पॅरीसचे तात्पुरते नागरिकच असतात. अर्थात या पर्यटकांनी नागरी धर्म थोडा जरी सैल केला, तर पॅरीसच्या स्वच्छतेत लक्षणीय फरक पडेल, ते गलिच्छही होईल. पण आश्चर्य असे की हे पर्यटकही पॅरीसच्या वास्तव्यात असेपर्यंत, मग ते कुठल्याही देशाचे नागरिक असोत, नागरी धर्म कसोशीने पाळतात. आणि जर चुकून एखाद्या-दुसऱ्या पर्यटकाने कुठे अस्वच्छता केली, तर ती अस्वच्छता दूर करण्यास पॅरीसची यंत्रणा सज्ज आहे. एकदा बसमधून उतरल्याबरोबर अनावधानाने बसचे तिकीट चुरगाळून हातातून खाली टाकले. माझ्यामागून येणाऱ्या गृहस्थाने उचलून ते जवळच्या कचरापेटीत टाकले. असेही नागरिक कमी नाहीत या शहरात.

याउलट लाखो पर्यटक आपल्या शहरात येतात. सौंदर्यस्थळे, ऐतिहासिक स्थळे पाहतात. संग्रहालयांना भेटी देतात. तेव्हा आपली संग्रहालये, सौंदर्यस्थळे जगात श्रेष्ठ असावीत, ही तळमळ सर्व पॅरीसियनांना आहे. त्याचेच प्रतिबिंब निवडलेल्या नगरसेवकांच्या, महापालिकेच्या कार्यात स्पष्टपणे दिसून येते. हेच ह्या पॅरीस महापालिकेचे वैशिष्ट्य आहे.

पॅरीसमधील विद्यार्थी अत्यंत जागरूक आहेत. तसेच तेथे तऱ्हेतऱ्हेची निदर्शनेही होत असतात. विद्यार्थ्यांचा, निदर्शकांचा उद्रेक घोषणांतून जसा व्यक्त होतो तसा लिखाणातूनही व्यक्त होतो. मात्र त्याचे प्रमाण अत्यल्प होते तरी ते दिसले. RER च्या रेल्वे डब्यांच्या आत रंगीबेरंगी मजकूर विशिष्ट प्रकारच्या ब्रशनं रंगविलेला दिसला. अर्थात असे लिखाण फार गिचमिड असते, परंतु मोजक्या शब्दांत असते हे विशेष. त्यामुळे उपनगरी डबे काहीसे खराब झालेले दिसतात, पण हे फ्रेंचांच्या स्वच्छताप्रेमाला गालबोट लागावे इतकेच. शेवटी ते लोकशाही राष्ट्र आहे आणि मतप्रदर्शनास मुक्त वाव आहे. त्यात संयमच जास्त दिसतो. एखादे शहर स्वच्छ राहण्यात निदर्शकांच्या संयमाचा वाटा मोठा आहे. आपल्या इथे '...चा विराट मोर्चा', '...चे जाहीर भाषण', '...निषेध दिन', '... भाववाढ विरुद्ध...', '...विद्यार्थी संघटनेचा विजय असो', 'सचिवालयावर...' '...कामगारांचा मेळावा', असे असंख्य, न पुसलेले, भिंतीवरील मजकूर वर्षा-दोन वर्षातील मोर्चे-चळवळींचे इतिहास सांगतात. मुंबईत गेल्या वर्षभरात किती निदर्शने झाली,

यांचा हिशोब तमाम भिंतींचे सर्वेक्षण केले तरी पूर्णपणे मिळेल. नेमके हे पॅरीसमध्ये भान ठेवून न केले गेल्यामुळे पॅरीस बरेच सुंदर वाटते.

पॅरीसमध्ये जाहिरातीत स्त्रियांच्या शरीराचे प्रदर्शन केलेले आढळले, तर नेमक्या नको असलेल्या भागावर पांढरे कागद चिकटविण्याची मोहीम करणाऱ्या स्त्रीसंघटना अस्तित्वात आहेत हे विशेष. म्हणजे नुसती स्वच्छता नाही, तर त्या जोडीला अभिरुची सुद्धा आहे. निदान वाईट अभिरुचीला विरोध करण्याचे धाडस तरी आहे.

पॅरीस शहराची काळजी साऱ्यांनीच घेतल्याने हे शहर अन्य शहरांप्रमाणे अनेक नागरी समस्यांमुळे मेटाकुटीस आलेले नाही. आपल्या राष्ट्राची राजधानी हरित असावी, सुंदर असावी, चिरतरुण असावी असा संकल्प तमाम नागरिकांनी जन्मतःच केलेला असावा आणि त्यामुळेच नागरी समस्या किमान पातळीवर ठेवून त्यांनी स्वतःचे आणि पर्यटकांचे जीवन निरामय केले आहे.

o

# पॅरीस आणि प्रदूषण. . .

प्रदूषणाच्या विषारी विळख्यातून कोणते राष्ट्र सुटले आहे? एखादे राज्य जितके प्रगत— विशेषतः औद्योगिकदृष्ट्या— तितकी प्रदूषणाची समस्या अधिक, हे सर्वमान्य समीकरण झाले आहे. युरोपमधील एक अत्यंत प्रगत राष्ट्र म्हणून फ्रान्सचा लौकिक आहेच, त्यामुळे सर्व प्रकारच्या प्रदूषणांच्या दुष्परिणामास तोंड देण्यास त्यांना तयार राहावे लागले आहे. प्रदूषणाचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा शहरी विभागांत जास्त असते. त्यामुळे पॅरीसला इतर शहरांप्रमाणे प्रदूषणास, तोंड द्यावे लागले आहे. पॅरीस शहराच्या व उपनगराच्या विविध भागांत हिंडल्यावर प्रदूषणाचे विषारी परिणाम फारच कमी भासले.

शहरांची नियोजनशून्य, अवाढव्य, बेशिस्त वाढ ही प्रदूषणाची पहिली पायरी आहे. भविष्यकालीन गरजा व समस्यांचा विचार न करता शहरांचा विस्तार हा प्रदूषणास मागील दाराने आमंत्रित करतो. उदाहरण आपल्या मुंबईचेच देता येईल. परंतु पॅरीसची वाढ ही केंद्रोत्सारी पद्धतीनं झोन मधून झालेली असल्यानं प्रदूषणास फारसा वाव मिळाला नाही.

हवेचे प्रदूषण होण्यास मुख्यतः कारखानदारी मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. औद्योगिक क्रांती व त्यानंतरची प्रगती फ्रान्समध्ये फार पूर्वी झाली. त्यामुळे औद्योगिक वाढीचे दुष्परिणाम लक्षात घेऊन कारखानदारी शहराबाहेर दूर नेली आहे. पॅरीस शहर (बृहन्पॅरीस) मध्ये रासायनिक अथवा प्रदूषणास पूरक असे कारखाने क्वचितच आहेत. हे सर्व कारखाने वीस-तीस किलोमीटर लांबवर आहेत. त्यामुळे धुराने, विविध वायूने भरलेले वातावरण येथे नाही. म्हणून पॅरीसियन शुद्ध हवेत श्वासोच्छ्वास करू शकतात. घनदाट उपवने, मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण, विस्तीर्ण बागा, मैदाने (ह्यांना शहराची फुफ्फुसे म्हणतात.) यामुळे प्रदूषणास फार मोठ्या प्रमाणात रोखले आहे. मोटारकार प्रचंड प्रमाणात रस्त्यावर धावत असतात.

त्याने होणारे प्रदूषण लक्षणीय आहे, याचे भान पर्यावरणतज्ज्ञांबरोबर सर्वसामान्य पॅरीसियन्सना आहे हे विशेष. मोटारींच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी रुंद मार्ग, जलद वाहतूक, पर्यायी मार्ग, रिंग रुट, फ्लाय ओव्हर, भूमिगत रस्ते हे सारे उपाय येथे जाणीवपूर्वक केलेले आढळतील. सरळ रेषेतील, एका ठिकाणाहून सर्व बाजूंनी जाणारे मार्ग असल्याने व द्रुतगती मार्ग (ऑटोरूट) ही असल्याने वाहने खोळंबणे, मंदगतीने जाणे कमी झाले आहे. तरी ट्रॅफिक जामचे प्रकार वाढतच आहेत. ह्यालाही पर्याय म्हणून मेट्रोची कार्यक्षम यंत्रणा उभी केली आहे. RER ह्या अतिजलद भूमिगत रेल्वेमुळे पर्यायी योजना आणखीनच प्रभावी झाली आहे त्यामुळे बरेच कारचालक कार्यक्षम व विश्वसनीय मेट्रो RER सेवेवर बिनघोरपणे अवलंबून आहेत. प्रदूषणास-- मग ते हवेचे, ध्वनीचे असो-- आळा बसला आहे. पृष्ठभागावरील RATP ही बससेवा उत्कृष्ट सेवा देत असल्याने अधिकाधिक लोक वैयक्तिक वाहनांपेक्षा कार्यक्षम सार्वजनिक सेवेवर विसंबून राहत आहेत. ध्वनीचेल, हवेचे प्रदूषण अशा तऱ्हेने बरेच नियंत्रित केले गेले आहे.

ध्वनिप्रदूषण वेगवान वाहतुकीमुळे पॅरीसमध्ये निश्चित जाणवते. परंतु त्यालाही छान आळा घातला आहे. ऑटोरूटवर तुफान वाहतूक चाललेली असते. ऑटोरूटच्या कडेला मातीचे भराव घालून त्यावर लॉन लावलेले आहेत. निसर्गसौंदर्याबरोबर ध्वनिप्रदूषणास काही प्रमाणात आळा बसला आहे. जिथे हे शक्य नसेल तिथे प्रचंड खर्च करून काचेच्या भिंती उभ्या केल्या आहेत. त्यामुळे ऑटोरुटवरची वाहतूक व ध्वनीप्रदूषण सभोवतालच्या लोकांना किमान उपसर्ग देते. शहरात वाहनांना वेगमर्यादा आहे. ती मर्यादा सर्वच जण पाळतात आणि कुणी जर पाळत नसेल तर प्रतिबंध करणारी कार्यक्षम पोलिस यंत्रणा सज्ज आहे. धूर ओकत पळणाऱ्या गाड्या मला कुठेही दिसल्या नाहीत, कारण गाड्यांच्या देखभालीची सर्वांना असलेली जाणीव. जुन्या गाड्या रिकंडिशनिंग करून पळवायचीही प्रवृत्ती येथे मुळीच नाही. रस्त्यानं गाड्या हाकताना हॉर्न वाजवायची येथे पद्धत नाही, याचे मला फार आश्चर्य वाटले. चौकशी व निरीक्षणाअंती असे आढळले की रस्त्यावर पादचारी, जनावरे नाहीत. ओव्हरटेक करण्याची गरजही नाही, प्रवृत्तीही नाही, हॉर्न वाजवून ध्वनीचे प्रदूषण वाढवण्याची इच्छाही नाही. या सर्व प्रकारामुळे मोटारगाड्यांची प्रचंड संख्या असूनही त्या मानाने हवेचे व ध्वनीचे प्रदूषण कमी प्रमाणात होऊन पॅरीसियनाच्या आयुष्यावर घातक परिणाम होण्याचे

प्रमाण अत्यंत कमी आहे. जाणीवपूर्वक तपशिलात खोलवर जाऊन केलेले सामूहिक प्रयत्नच प्रदूषण रोखण्यास कारणीभूत झाले आहेत.

पॅरीसियन उंच इमारती बांधण्याच्या सक्त विरोधात आहेत. त्यामुळे कॉंक्रीटचे जंगल म्हणजे पॅरीस हे घडू दिले नाही. त्याचीही प्रदूषण रोखण्यास बरीच मदत झाली आहे. इमारतींच्या मानाने पॅरीसमध्ये वृक्षराजी विपुल आहे. त्यामुळे नेत्रसुखाबरोबर कार्बन-डाय-ऑक्साईडचेही प्रमाण रोखले जाते. पॅरीसच्या जवळ एके ठिकाणी ऑटोरूटवर कॉंक्रीटचे आच्छादन करून त्यावर हरितपट्टा तयार केला आहे. ह्यासाठी प्रचंड पैसा खर्च झाला असणार. समृद्धीस मानवी कल्याणासाठी राबविण्याची त्यांची प्रवृत्ती निश्चितच कौतुकास्पद आहे. मैलापाणी सरळ नदीत सोडून न देता त्या पाण्यावर प्रक्रिया करूनच मग ते नदीत सोडले जाते. त्यामुळे नदीच्या पाण्यातील वनस्पती, प्राणी यांना सुखेनैव जगता येते. विमानतळ देखील शहरापासून खूप दूर आहेत. ओर्ली, शार्ल द गोल ही दोन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विमानतळं शहरापासून खूप दूर आहेत. त्यामुळे कुर्ला-घाटकोपर-विलेपार्ले येथे विमाने उतरताना, उड्डाण करताना ध्वनीचा जो त्रास तिथल्या रहिवाशांना होतो तो इथे अजिबात नाही. मी पॅरीसच्या चौदा दिवसांच्या मुक्कामात एखादे जंबोजेट नोत्रदामच्या माथ्यावरून फिरते आहे, असे कधीच पाहिले नाही. सायकलींचा वापर हळूहळू वाढू लागला आहे. त्यामुळे प्रदूषण आणखीनच कमी होईल, असा विश्वास तिथल्या नागरिकांना आहे.

प्रदूषणाचा त्रास सर्वांनाच होणार असतो. तेव्हा प्रदूषणावर मात करण्याची जेवढी जबाबदारी येते ती कसोशीने पार पाडण्याची वृत्ती सरकारपाशी आहे. दळणवळण खात्यापाशी आहे. मेट्रो RER RATP यांच्यापाशी आहे. कारखानदारांपाशी आहे. सर्वसामान्य जनतेपाशी तर सर्वांअगोदर आहे, म्हणून प्रदूषणाचे काळे ढग पॅरीसवर दिसत नाहीत व कदाचित पॅरीसियनांच्या दूरदृष्टीमुळे भविष्यातही दिसणार नाहीत.

पॅरीसच्या भटकंतीत पॅरीसच्या विविधांगी सौंदर्याने मनाला अगदी प्रसन्न वाटले. जगातील एका महान नगरीचे दर्शन इतके विलोभनीय असेल असे वाटले नव्हते. स्वर्ग व नरक या पृथ्वीवरच आहेत असे म्हणतात. मग त्या स्वर्गाचा भास व्हावा, अशी अनेक स्थळे, प्रसंग अनुभवले. तिथली समृद्धी, शिस्त, सौंदर्य व सौहार्द पाहून धडपड्या फ्रेंच राष्ट्राचे कौतुक वाटले. शाळेत असताना फ्रेंच राज्यक्रांतीवर

आधारित चार्लस् डीकन्सची 'टेल ऑफ टू सीटीज्' ही कादंबरी सविस्तर अभ्यासली होती. त्या वेळच्या अमीर-उमरावांच्या, लुई राजांच्या ऐषारामी व विलासी जीवनाचे वर्णन वाचले होते. ते काळाच्या ओघात बरेचसे विस्मृतीत गेले. परंतु पॅरीसमधल्या गरीब वस्तीतल्या दारिद्र्याचे चित्रदर्शी वर्णन मनावर कोरले गेले होते. मादाम द फार्जच्या दारूच्या दुकानासमोर गळणाऱ्या दारूच्या पिंपातली दारू चाटून पिणारे दरिद्रीनारायण त्या वेळी होते. त्या पिचलेल्या, गांजलेल्या दारिद्र्यामुळे कंगाल झालेल्या फ्रेंचांचे वर्णन अत्यंत हृदयस्पर्शी आहे. त्या कादंबरीचा अभ्यास एस.एस.सी. परीक्षेत केला व त्या वयात फ्रेंच दारिद्र्याचे वर्णन मनावर विलक्षण परिणाम करून गेले. त्या कादंबरीतील फ्रान्सचे वर्णन अत्यंत प्रत्ययकारी असल्याने पॅरीसचे डोळ्यासमोर जे चित्र होते त्याला प्रत्यक्ष पॅरीस पाहिल्यावर तडा गेला. कुठे ते राज्यक्रांती काळातील पॅरीस, कुठे आजचे पॅरीस. जमीन-अस्मानाचा फरक आहे. ही किमया घडली कशी ? जादूची कांडी फिरल्याने हे स्थित्यंतर झाले का ? ह्या प्रश्नांची उत्तरे शोधत जेव्हा पॅरीस पाहिले, त्यावर विचार केला तेव्हा काही उत्तरे सापडली. या पॅरीसच्या कायाकल्पाचे मर्म हळूहळू उलगडत गेले.

दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेला जर्मनी राखेतून परत उभा राहिला. अणुबॉम्बने वाताहत झालेला जपान परत श्रीमंतीचे उच्चांक करू लागला. छोटा इस्त्राइल देखील वाळवंटात व आक्रमकांच्या छायेत राहून विस्मयजनक प्रगती करू शकला. या सर्वांच्या दिङ्मूढ करणाऱ्या प्रगतीचे मर्म आहे राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय वृत्ती. प्रखर राष्ट्रभक्तीमुळे ह्या देशातील जनसमूह समृद्धीचे नवे नवे उच्चांक प्रस्थापित करू लागलेत. हे राष्ट्रप्रेमच त्यांच्या प्रत्येक कृतीत, जीवनमूल्यात भरलेले आहे. फ्रान्सच्या बाबतीत हेच खरे आहे. 'फ्रेंच' ह्या एका शब्दावर संपूर्ण फ्रान्सला नेपोलियन बोनापार्टने झुलविले. इतके विलक्षण प्रेम 'फ्रेंच' ह्या शब्दावर या देशातील जनतेचे आहे. हीच संजीवनी फ्रान्सचा कायापालट करू शकली. ही राष्ट्रीय भावना मला विविध प्रसंगांतून, व्यक्तिमत्त्वांतून दिसली.

मुळात या राष्ट्राने राज्यक्रांतीत, पहिल्या महायुद्धात, दुसऱ्या महायुद्धात असंख्य पुत्रांची आहुती दिली आहे. राष्ट्रदेवतेला आपल्या लाडक्या पुत्रांचे अर्घ्यच प्रिय असते, त्यांच्या रक्तानेच ती संतुष्ट होते. फ्रान्सने हे अर्घ्य देताना मागेपुढे पाहिलेले नाही. आपल्या राष्ट्राच्या जडणघडणीत लाखो पुरुषांना धारातीर्थी पडावे

लागले आहे, याची तीव्र जाणीव प्रत्येक फ्रेंच हृदयावर कोरली आहे. त्यातूनच राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे मूल्य खरेखुरे कळते. एकदा राष्ट्राचे, राष्ट्राच्या अस्मितेचे मूल्य कळले की आपोआप राष्ट्रीय वृत्ती फोफावते. ही राष्ट्रीय, राष्ट्राच्या स्वातंत्र्याची वृत्ती सर्वच जीवनास व्यापून राहिली आहे. प्रामाणिकपणा, सार्वजनिक जीवनातील चारित्र्य, वक्तशीरपणा, कष्ट करण्याची वृत्ती आणि सतत राष्ट्राचा विचार करण्याची वृत्ती या सर्वांचा कणा आहे राष्ट्रीय भावना (National charactor). म्हणून या गुणांच्या जोरावर फ्रेंच जनतेने राज्यक्रांतीच्या वेळच्या दारिद्र्यास,ल विषमतेस काळाच्या ओघात समूळ नष्ट केले आहे.

पॅरीसमध्ये रस्त्याच्या कडेला भव्य दुकाने आहेत. समृद्धीमुळे वस्तूंची इतकी रेलचेल असते की, दुकानातील असंख्य वस्तू दुकानाबाहेर फूटपाथवरही मांडलेल्या असतात. एका मोठ्या दुकानात एखादाच विक्रेता कुठेतरी कोपऱ्यात फक्त पैसे गोळा करीत असतो. परंतु कोणीही केव्हाही त्या वस्तू उचलून नेत नाही. त्या दुकानदाराचा केवढा विश्वास आपल्या ग्राहकांवर. प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये कुबेराला लाजवेल इतका माल असतो, परंतु देखरेख करायला चिटपाखरूही नाही. ग्राहक आपल्याला हवे ते घेतो आणि त्याचे बिल न चुकता देतो. शाळेतली मुलेसुद्धा सहलीस आलेली असताना छोट्या छोट्या वस्तू घेण्यासाठी दुकानावर झुंबड करतात. पण कुणीही वस्तू पैसे न देता घेत नाही. एकदा एका शाळेची मुले आयफेल टॉवरजवळ आली होती. ती बाहेर मांडलेली आयफेल टॉवरची प्रतिकृती फारच आवडायची म्हणून घ्यायची. दुकानदाराकडे अथवा शिक्षिकेकडे जायची व किंमत विचारून घेऊ का, असे विचारायची. अफाट किमतीमुळे शिक्षिकेनी पैसे खर्चू नको, असे सांगितले तर ती मुलं ती वस्तू मूळच्या जागी ठेवायची. बालमनाला एखादी वस्तू आवडली की त्यांचे त्यावर किती प्रेम असते हे आपण जाणतो. तरी मनाला मुरड घालून ती वस्तू जागच्या जागी ठेवायच्या बाळकडूतच राष्ट्रीय वृत्तीचे बीजारोपण होते. प्रामाणिकपणाचे विलक्षण अनुभव सर्वत्र येतात. तिकिटाशिवाय प्रवास करणे शक्य आहे पण कुणी करीत नाही. रेल्वे-बसमधील गुबगुबीत फोमच्या गाद्या आजच टाकल्या असाव्यात असे वाटण्याइतक्या व्यवस्थित वापरलेल्या असतात. सावर्जनिक स्वच्छतागृहे ही खरी एखाद्या राष्ट्राची मनोवृत्तीदर्शक असतात. येथील स्वच्छतागहे स्वच्छ तर असतातच, परंतु अत्यंत सुशोभितही असतात. आपल्या वर्तनाने इतरांना त्रास होईल

असे वर्तन न करण्याचे बाळकडूच साऱ्यांना मिळते. नोत्रदामच्या परिसरात एका ठिकाणी दोन ते तीन वर्षांच्या बालकांचे छोटेसे क्रीडांगण आहे. तिथला दोन-तीन वर्षांचा एक छोटासा मुलगा चॉकलेट खात होता. चॉकलेट खाऊन झाल्यावर दुड्दुड् पळत गेला, हिरव्या रंगाच्या एका डब्यात त्याने चॉकलेटचे रॅपर टाकले. त्यांना सांभाळणाऱ्या दाया बाजूला गप्पा मारत होत्या. एवढा छोटा मुलगा ज्या शहरात, स्वच्छतेचे प्राथमिक धडे, कुणी सांगायला आणि बघून कौतुक करायला मौजूद नसताना, गिरवतो, तेच स्वर्गनगरी म्हणून जगात दिमाखाने तळपू शकते. आपल्या इथे प्रामाणिकपणास पारितोषिके असल्याने प्रामाणिकपणा व पारितोषिक असा संबंध नकळत निर्माण झाला आहे. प्रामाणिकपणा हा स्वभावाचा, चारित्र्याचा एक भागच आहे, हे इथल्यांच्या रक्तात भिनल्यामुळे अंधारातही प्रामाणिकपणा लुप्त होत नाही.

आपण जुनीच जीवनमूल्ये एकतर घट्ट धरून ठेवतो किंवा कस्पटासमान लेखून ती मूल्ये टाकून देतो. दोन्ही प्रकारांमुळे आपले जीवनमान सुधारत नाही. जुनी जीवनमूल्ये खरोखरच आदर्श आहेत. ज्या परिस्थितीत ती मानली गेली, निर्माण झाली, त्यांतील कांही जीवनमूल्ये मानवी जीवन असेपर्यंत अमूल्यच राहणार यात शंका नाही. चारित्र्य, प्रामाणिकपणा, समाजऋण फेडण्याची वृत्ती, वडीलधाऱ्याबद्दल आदर ही मूल्ये चिरंतन आहेत, परंतु काही जीवनमूल्यांच्या व्याख्येत कालानुरूप बदल व्हायला हवा. पण आपण चांगली जीवनमूल्ये नजरेआड केली. त्या जागी नवी जीवनमूल्ये स्वीकारलीच नाहीत. त्यामुळे मूल्यांच्या बाबतीत एक प्रकारची पोकळी (vocuum) भासते. आपल्या दुःसह जीवनाचे एक कारण हेच आहे. जिथे भ्रष्टाचार, हळूहळू शिष्टाचार— कदाचित पुढे जीवनमूल्य— म्हणूनही मागीलदाराने स्वीकारण्याची साधार भीती वाटते. म्हणजे आपण अजूनही मूल्यांच्या गोंधळाच्या गर्तेतच आहोत. मात्र हे पॅरीसीयन जुन्या मूल्यांना जपताना नवी मूल्येही स्वीकारताना दिसतात. त्यांनी पॅरीसमधील जुन्या ऐतिहासिक सुंदर इमारती रस्तारुंदीच्या नावाखाली पाडून शहर विद्रूप केले नाही त्याउलट फ्लायओव्हर्स, रिंगरूट, ऑटोरूट निर्माण करून पर्याय शोधले आहेत. त्यामुळे नवे-जुने यांचे मनोहर मिश्रणच नजरेस पडते. चारित्र्याच्या जुन्या कल्पना त्यांनी सोडून दिल्या आहेत. आपल्या इथे चारित्र्य म्हणजे परस्त्रीशी अनैतिक संबंध एवढ्यावरच मर्यादित केले आहे. त्यामुळे लहानपणापासून मुले-मुली वेगळी,

त्यांचे खेळ वेगळे, वर्गात जागा वेगळ्या. या सर्वांमुळे चारित्र्यसंपन्नता न येता अनेक विकृतीच निर्माण झालेल्या दिसतात. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन अजूनही सदोष आहे. लाईन मारणे, रस्त्यावर धक्का मारणे, विनयभंग, बलात्कार, प्रसंगी खूनही आपल्या इथे घडतातच.

याउलट फ्रेंचांनी नव्या जीवनमूल्यांनुसार स्त्री ही मैत्रीण मानली. त्यामुळे स्त्रीसुलभ, पुरुषसुलभ भावना बालपणापासून दडपल्या न गेल्याने सशक्त मनाचा समाज निर्माण झाला आहे. त्यामुळे आपल्या इथे लैंगिक भेदातून निर्माण झालेल्या गुंतागुंतीच्या मानसिक प्रक्रियामुळे घडणारे छोटे-मोठे प्रमाद मला पॅरीसमध्ये दिसले नाहीत. हे बदलत्या जीवनपद्धतीनुसार जीवनमूल्ये स्वीकारण्याचे इष्ट परिणाम नव्हेत काय ?

सार्वजनिक सुखसोई आपल्याच पैशातून निर्माण होतात व त्यांचा उपभोग संयमपूर्वक घ्यायचा, त्या सुखसोयींवर इतरांचाही आपल्याइतकाच हक्क आहे, हे पॅरीसियनांनी पूर्णपणे जाणले आहे. म्हणून मेट्रो, बस, RER, सार्वजनिक बागा, ऐतिहासिक स्थळे, स्वच्छतागृहे, सबवे या सर्वांचा यथार्थ उपयोग झाल्याने या सार्वजनिक उपयुक्ततेच्या गोष्टी न राहता पॅरीसच्या वैभवाचे निर्देशांक बनले आहेत. सर्वत्र हळुवारपणे बोलणे, इतरांशी सौजन्यपूर्ण व्यवहार करणे, आपल्या वैयक्तिक दुःखावर, अडचणींवर, व्यथांवर स्मितहास्याचे मलमली आच्छादन घालणे ही नवी जीवनमूल्ये त्यांनी निर्माण केली आहेत आणि त्यांचे कसोशीने पालन केले जाते. त्यामुळे मनाला कसे चैतन्यशील वाटते. मोटारींचे हॉर्नसुद्धा न वाजवता वाहने हाकली जातात. किंचित जरी धक्का लागला, तरी हमरीतुमरीवर न येता स्त्रिया 'पार्दों मस्य' म्हणतात, तर पुरुष 'पार्दों मादाम' म्हणतात. अशा सौजन्यशील वर्तणुकीमुळे पॅरीसच्या समाजरथास सतत वंगण मिळाल्याने तो न कुरकुरता घोडदौड करीत आहे.

मी फ्रान्स्वा मितराँचे घर ज्या गल्लीत आहे त्या गल्लीच्या तोंडाशी अनेकदा उभे राहून निरीक्षण केले आहे. फ्रान्ससारख्या, जगात पाचव्या क्रमांकावरील बलाढ्य, समृद्ध व सुसंस्कृत राष्ट्राचा पंतप्रधान एका अनेकमजली इमारतीतल्या एका भागात राहतो हे केवढे आश्चर्यजनक. फक्त एक अपवाद त्याच्या बाबतीत केलाय तो म्हणजे त्या गल्लीत मोटार पार्किंगला बंदी आहे. आपल्या राष्ट्रप्रमुखाला एवढीच सोय पॅरीसीयनांनी दिली आहे. भरवस्तीत एका इमारतीत राहाणाऱ्या

पंतप्रधानांच्या सुरक्षिततेसाठी केवळ दोन पोलीस मशीनगन घेऊन वॉकीटॉकीसह गल्लीच्या दोन टोकाला पहारा करतात. राष्ट्राच्या ह्या प्रमुख नेत्याची एवढी जुजबी सुरक्षा व्यवस्था ? पॅरीसच्या भरवस्तीत राहणारा पंतप्रधान खरं तर पॅरीसियनांच्या हृदयातच राहतो म्हणून त्याला जय्यत सुरक्षा व्यवस्था कशाला ? राष्ट्राचे मनोधैर्य, मनोबल व मनोरचना राष्ट्रप्रमुखाच्या वृत्तीवरही बरेचसे अवलंबून असते. साधेपणाचा, सचोटीचा इतका मोठा आदर्श राष्ट्रप्रमुख पॅरीसियनांना दररोजच आपल्या वर्तनातून दाखवीत असेल, तर ते नागरिक वैयक्तिक जीवनात हे आदर्श नकळत आचरणात आणतात. काही वेळा पंतप्रधानांची, मंत्र्यांची खास गाडी शहरातून जाताना पाहिली आहे, वाहतुकीस मार्गदर्शन करणाऱ्या सायरन बसविलेल्या पायलटकार शिवाय, इतर कार्सचा ताफा कधीच दिसला नाही. बडेजावच्या जागी साधेपणा लक्ष वेधून घेतो. देवळाचा कळस नेहमीच चकचकीत, स्वच्छ असायला हवा आणि इथे तो आहे म्हणून पॅरीसच काय सारे फ्रान्स राष्ट्र एक राष्ट्रीय वृत्ती घेऊन जगते आहे. राष्ट्रतेजानेच चमकते आहे.

समस्या, राजकीय अस्थिरता, चलनवाढ, औद्योगिक मंदी, बेकारी, गुन्हेगारी ह्या समस्या त्या राष्ट्रालाही भेडसावीत आहेत हे निश्चित. पॅरीसियनांनाही काही वेगळे प्रश्न सतावीत आहेत. खरं तर अडचणीतच व्यक्तिमत्त्वाचा कस लागतो.

पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे समस्या मान्य करण्याची. ती आपली समस्या आहे हे मानण्याची सर्वांचीच वृत्ती आहे. त्यामुळे सारे राष्ट्रच समस्या सोडवायला एक होऊन प्रयत्न करते, म्हणून समस्या कधी भस्मासुर होत नाहीत. साधे उदाहरण बेकारी समस्येचे घेऊ. कामगारापासून पंतप्रधानापर्यंत सारेच 'सिक्युरिटी सोश्याल' या राष्ट्रीय योजनांतर्गत दरमहा ठराविक रक्कम भरतात. त्यातून बेकारांना भत्ता दिला जातो. बेकारांचा भार सर्वांनी उचलला आहे. अत्यंत स्वखुषीनं. आपण सारे एक, ही भावना घोषणेपेक्षा कृतीतून अधिक शोभून दिसते. आपल्या इथेही अशिक्षित बेकारांना रोजगार मिळावा म्हणून रोजगार हमीसाठी पगारातून व्यवसायकर कापला जातो. आपण त्याला कुरकुरतो. ते राष्ट्रीय कर्तव्य मानत नाही. दुसरी बाजू म्हणजे ह्या रोजगार हमी योजनेतला प्रचंड भ्रष्टाचार. म्हणजे कुठूनही पहा, चांगल्या योजना आपण केवळ सार्वजनिक नीतिमूल्ये प्राणपणाने जपत नाहीत म्हणून अयशस्वी करतो. एका रोजगार हमी योजनेच्या उदाहरणातून हे स्पष्ट होते. ती राबविणाऱ्यांत राष्ट्रीय वृत्ती कुठेच नाही, म्हणून जगात नावाजलेल्या एका

योजनेचे आपण वाटोळे केले आहे. पॅरीसमध्ये असताना हे सारे आठवले की मनाला फार यातना व्हायच्या. निराशेने मन विषण्ण व्हायचे. आपला देश कधी ह्या पाश्चात्याच्या जोडीला यायचा. दरवेळी नवा आशावाद गाऊन स्वतःला फसवीत आयुष्य संपवायचे ? की आपण कधीच या गर्तेतून वर येणार नाही ? मुंबईच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या सहार विमानतळावर उतरताना सहारच्या धावपट्टीला खेटून वाढलेली अवाढव्य झोपडपट्टी पाहून माझे नैराश्य पराकोटीला पोहोचले. तरी आपल्या फ्रान्स दौऱ्याचे निमित्त, ज्या चळवळीतून, फ्रान्स मित्र मंडळाच्या अखंड आशावादातून साध्य झाले, त्या फ्रान्स मित्रमंडळाचे प्रयत्नच ह्या नैराश्यास दूर करेल, असा आशावाद निर्माण झाला.

o

REFBK-0026554